१

प्रकरण - १

विदेशी व्यापार गुणक

(Foreign Trade Multiplier)

घटक रचना

१.० उद्दिष्ट्ये
१.१ विदेशी व्यापार गुणकाची ओळख
१.२ बंदिस्त अर्थव्यवस्थेत गुणकाद्वारे उत्पन्न निर्धारण
१.३ खुल्या अर्थव्यवस्थेत विदेशी व्यापार गुणकाचे परिचालन
१.४ विदेशी प्रतिक्रिया (प्रतिफलित)
१.५ सारांश
१.६ प्रश्न

१.० उद्दिष्ट्ये

१) विदेशी व्यापार गुणकाची संकल्पना समजून घेणे.

२) बंदीस्त अर्थव्यवस्थेत गुणकाद्वारे उत्पन्न निर्धारणाची प्रक्रिया समजून घेणे.

३) मुक्त (खुल्या) अर्थव्यवस्थेत विदेशी व्यापार गुणकाद्वारे उत्पन्न निर्धारण प्रक्रियेचा अभ्यास करणे.

४) विदेशी प्रतिफलीत संकल्पना जाणून घेणे.

१.१ विदेशी व्यापार गुणक संकल्पना

गुणकाची मुळ संकल्पना आर. एफ. कान्ह (R.F. Kahn) यांनी रोजगार गुणकाद्वारे मांडली. कान्ह यांच्या गुणकाच्या संकल्पनेचा वापर नंतर लॉर्ड केन्स यांनी केला. लॉर्ड केन्स यांच्या 'गुंतवणूक गुणक' या संकल्पनेवरच 'विदेशी व्यापार गुणकाची' संकल्पना आधारलेली आहे. जेव्हा देशाची निर्यात ही त्याच्या आयातीपेक्षा जास्त होते तेव्हा त्या देशाचा व्यापार अनुकूल होतो. निर्यात वृध्दीमुळे देशाच्या उत्पन्नात होणारी वाढ ही गुंतवणूकीसारखी असते या गुंतवणूकीचा सुध्दा देशाच्या उत्पन्नावर प्रभाव पडतो.

विदेशी व्यापार गुणकाची व्याख्या :

''आयातीपेक्षा निर्यातीत होणारी शुध्द प्रारंभिक वाढ व त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात होणारी अंतिम वाढ ह्यांच्यातील प्रमाण किंवा अनुपात म्हणजे विदेशी व्यापार गुणक होय.''

'निर्यातीवरील देशी गुंतवणूकीत एका घटकाने वाढ केल्यास राष्ट्रीय उत्पन्नात जी वाढ होते त्याला विदेशी व्यापार गुणक म्हणतात.'

जेव्हा विदेशातील लोक स्वदेशातील वस्तू खरेदी करतात तेव्हा स्वदेशी माल निर्यात होऊ लागतो त्यामुळे स्वदेशातील निर्यात उद्योगांच्या व ह्या उद्योगातील श्रमिकांच्या उत्पन्नात वाढ होते. श्रमिक हे वाढलेले उत्पन्न उपभोग्य वस्तूंवर खर्च करतात. त्यामुळे स्वदेशातील उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढते ह्यामुळे देशातील उत्पन्नात काहीपट वाढ होते. अशाप्रकारे विदेशी व्यापार गुणकाच्या आकारानुसार निर्यातीमुळे निर्माण झालेल्या उत्पन्नात वाढ होते.

१.२ बंदीस्त अर्थव्यवस्थेत गुणकाद्वारे उत्पन्न निर्धारण

बंदीस्त अर्थव्यवस्थेत एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे देशातील लोकांचा उपभोग खर्च (C), गुंतवणूक खर्च (I) आणि सरकारी खर्च (G) यांची बेरीज असते. सुत्र रुपाने पुढील प्रमाणे,

$$Y = C + I + G$$

वरील सुत्रात Y म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न, C म्हणजेच राष्ट्रीय उपभोग, I म्हणजेच एकूण गुंतवणूक व G म्हणजेच सार्वजनीक खर्च होय.

परंतु सरकारमार्फत अर्थव्यवस्थेत अर्थशास्त्रिय नियमांचे कठोरपणे पालन केले जात नसल्याने सरकारच्या भूमिकेवर मर्यादा येतात म्हणूनच बंदीस्त अर्थव्यवस्थेत एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे उपभोग खर्च (C) आणि गुंतवणूक खर्च यांच्या बरोबर असते. सुत्ररुपाने;

$$Y = C + I$$

उपभोगाचा खर्च हा उत्पन्नाचे फलीत असते. म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबर एकूण उपभोग खर्च सुध्दा वाढतो तर राष्ट्रीय उत्पन्नातील घटीबरोबर एकूण उपभोग खर्च सुध्दा घटत असतो. म्हणूनच पुढील सुत्रात व्यक्त केल्याप्रमाणे राष्ट्रीय उत्पन्न (Y) आणि उपभोग खर्च (C) या मध्ये फलनात्मक संबंध (f) दिसून येतो.

$$C = f(Y)$$

गुंतवणूक ही बचतीवर अवलंबून असल्याने आपल्याला मुळ सुत्र पुढील प्रमाणे मांडता येतील.

$$Y = C + I$$

$$Y = C + S$$

वरील दोन्ही सुत्रातील उपभोग खर्च (C) हे चल समान असल्याने ते रद्द होईल व बचत (S) गुंतवणूक (I) समान बनेल. हेच सुत्राद्वारे पुढीलप्रमाणे मांडता येईल.

$$S = I$$

किंवा

$$I = S$$

कालखंडाचा विचार केल्यास बचत आणि गुंतवणूकीत बदल घडून येतील म्हणजेच बचतीत घडून येणारे बदल (Δ S) व गुंतवणुकीतील बदल (Δ I) यामध्ये समानता असेल. सुत्ररुपाने पुढील प्रमाणे :

$$\Delta S = \Delta I$$
$$\therefore \Delta I \ \ \Delta S$$

लॉर्ड केन्सचा गुणक हा 'उपभोगाची सीमान्त प्रवृत्तीवर' (Marginal propesity to consume - MPC) वर अवलंबून आहे. सुत्ररुपाने;

$$K = f\ (MPC)$$

वरील सुत्रात K म्हणजे गुणक, f म्हणजेच फलनात्मक संबंध व MPC म्हणजेच सीमान्त उपभोग प्रवृत्ती होय. सीमान्त उपभोग प्रवृत्ती ही उत्पन्नातील बदलाचे (ΔY) उपभोगातील बदलाशी (ΔC) असलेले प्रमाण व्यक्त करते. सुत्ररुपाने;

$$MPC = \frac{\Delta C}{\Delta Y}$$

सीमांन्त उपभोग प्रवृत्तीवर पुढील दोन मर्यादा दिसून येतात.

i) MPC चे मूल्य नेहमीच धनात्मक म्हणजेच शून्यापेक्षा अधिक असते.

ii) MPC कधीही १ नसते.

म्हणूनच पुढील सुत्रात व्यक्त केल्याप्रमाणे MPC ही नेहमीच शून्य (०) आणि १ मध्ये अडकून असते.

$$O < \frac{\Delta C}{\Delta Y} < 1$$

उपभोग फलनातील गुणकावर देखिल पुढील दोन मर्यादा दिसून येतात.

i) गुणकाचे मूल्य नेहमी १ पेक्षा अधिक असते.

ii) गुणक हा कधीही अनंत नसतो.

सुत्ररुपाने पुढील प्रमाणे;

$$1 < K < \alpha$$

जर K = १ येत असेल तर गुणक निरर्थक ठरतो कारण येणारी अंतिम किंमत बदलणार नाही

उदा. १० x १ = १० म्हणूनच गुणक त्याचवेळी परिणामकारक ठरतो ज्यावेळी त्याचे मूल्य १ पेक्षा अधिक असते.

उदा. १० X २ = २०.

गुणक हा गुंतवणूकीतील बदल (Δ I) व उत्पन्नातील बदल (ΔY) यांच्या गुणोत्तराबरोबर असतो. सुत्ररुपाने;

$$K = \frac{\Delta Y}{\Delta I}$$

गुणकाचा उत्पन्नावरील परिणाम शोधायचा असल्याने जर ΔY बाहेर काढल्यास सुत्र पुढीलप्रमाणे लिहिता येईल.

$$\Delta Y = K. \Delta I$$

याचाच अर्थ गुंतवणूकीतील झालेल्या बदलाने उत्पन्न गुणकाच्या प्रमाणात बदल घडून येतो. (K x ΔI)

$$K = f\left(\frac{\Delta C}{\Delta Y}\right)$$

$$K = \frac{\Delta C}{\Delta Y} + \frac{\Delta S}{\Delta Y}$$

म्हणजेच १ = MPC + MPS

MPC म्हणजेच सीमान्त उपभोग प्रवृत्ती (Marginal Propensity to Consume) व MPS म्हणजेच सीमान्त बचत प्रवृत्ती (Marginal Propensity to Save).

गुणक मोजमापाचे सुत्र;

$$K = \frac{1}{1 - \frac{\Delta C}{\Delta Y}}$$

$$\therefore K = \frac{1}{\frac{\Delta S}{\Delta Y}}$$

$$\Delta Y = K.\ \Delta I$$

गुणक हा सीमान्त बचत प्रवृत्तीच्या व्यस्तांकाबरोबर असतो.

पुढील काल्पनीक उदाहरणाद्वारे गुणकाच्या माध्यमातून राष्ट्रीय उत्पन्न निर्धारण कसे होते हे समजते.

उदा. जर Δ I = १००० कोटी रुपये.

MPC म्हणजेच $\frac{\Delta C}{\Delta Y} = \frac{3}{4}$

म्हणजेच $\frac{\Delta S}{\Delta Y} = \frac{1}{4}$

वरील किंमती सुत्रात टाकल्यास;

$$K = \frac{1}{1 - \frac{3}{4}}$$

$$\therefore K = \frac{1}{\frac{1}{4}}$$

$$\therefore K = 4$$

$\Delta Y = K\ .\ \Delta I$ या सुत्रात वरील किंमती टाकल्यास

$$\Delta Y = 4 \times 1000$$

$$\boxed{\therefore \Delta Y = 4 \times 1000 \text{ कोटी रूपये}}$$

१.३ खुल्या अर्थव्यवस्थेत विदेशी व्यापार गुणकाचे परिचालन

विदेशी व्यापार गुणक म्हणजेच निर्यात बदल व उत्पन्न बदल यातील गुणोत्तर प्रमाण होय. मुक्त व्यापाराच्या परिस्थितीत देशाची निर्यात ही स्वतंत्र असते. म्हणजेच ती संबंधित देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नावर अवलंबून नसते तर विदेशातील नागरिकांच्या आवडी-निवडी व त्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न यावर अवलंबून असते. परंतु आयात ही संबंधित देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीवर अवलंबून असते. सुत्ररुपाने पुढीलप्रमाणे.

$$M = f(Y)$$

वरील सुत्रात M म्हणजेच आयात, f म्हणजेच फलनात्मक संबंध व Y म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.

आयात आणि राष्ट्रीय उत्पन्नात प्रत्यक्ष आणि धनात्मक संबंध दिसून येतो. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास आयातीत देखिल वाढ घडून येते, याउलट राष्ट्रीय उत्पन्न कमी झाल्यास आयात कमी होते. परंतु अशा प्रकारचा धनात्मक संबंध निर्यात आणि राष्ट्रीय उत्पन्न यामध्ये दिसून येत नाही. सुत्र रुपाने;

$$X \neq \mathrm{f}(Y)$$

सुत्रात X म्हणजेच निर्यात, Y म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्न तर $\neq$ सहसंबंध नसणे होय.

मुक्त अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नातील समानता त्याचवेळी प्रस्थापित होते ज्यावेळी अर्थव्यवस्थेतील बचत (S) व गुंतवणूक (I) समान बनेल तसेच निर्यात (X) व आयात (M) समान असतील सुत्र रुपाने;

$$S = I$$
$$M = X$$

खुल्या अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नातील समतोलाची अट पुढील सुत्राद्वारे व्यक्त करता येते;

$$Y = C + I + X - M$$

बंदीस्त अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नातील संतुलन बचत (S) व गुंतवणूकीतील (I) संतूलनातून निश्चित होतो. सुत्ररुपाने

$$S = I$$

तर मुक्त अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नातील संतूलन त्याच वेळी प्रस्थापित होईल ज्यावेळी गुंतवणूक + निर्यात व बचत + आयात यामध्ये समानता दिसून येईल. सुत्ररुपाने;

$$I + X = S + M$$

वरील सुत्रातील I + X म्हणजेच गुंतवणूक + निर्यात अशी परिस्थिती निर्माण होते त्यावेळी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते तर S + M म्हणजेच बचत + आयात ही राष्ट्रीय उत्पन्नात निर्माण होणारी गळती (Leakage) असते. म्हणूनच ज्यावेळी

i) $I + X > S + M$ या परिस्थितीत आर्थिक विस्तार घडून येतो.
ii) $I + X < S + M$ या परिस्थितीत आर्थिक आकुंचन निर्माण होते.

जर वरील आर्थिक चलांमध्ये बदल घडून येत असतील तर वरील सुत्र पुढीलप्रमाणे लिहिता येईल.

$$\Delta S + \Delta M = \Delta I + \Delta X$$

सीमान्त बचत प्रवृत्ती म्हणजेच $\Delta S/\Delta Y$ ही बचतीतील बदल दर्शविते (s) तर सीमान्त आयात प्रवृत्ती $\Delta M/\Delta Y$ ही आयातीतील बदल दर्शविते (m) म्हणूनच नवीन समीकरण पुढील प्रमाणे मांडता येईल.

$$(S+M)\Delta Y = \Delta I + \Delta X$$

$$\therefore \ \Delta Y = \frac{1}{(S+M)}(\Delta I + \Delta X)$$

विदेशी व्यापार गुणक हा सीमान्त बचत प्रवृत्ती व सीमान्त आयात प्रवृत्ती यांचे फलीत असते. सुत्राद्वारे हे पुढीलप्रमाणे मांडता येईल.

$$Kf = f\,(S + M)$$

वरील सुत्रात Kf म्हणजेच विदेशी व्यापार गुणक, f म्हणजेच फलनात्मक संबंध, S म्हणजे सीमान्त बचत प्रवृत्ती व M म्हणजेच सीमान्त आयात प्रवृत्ती होय.

S + M व Kf यामध्ये व्यस्त संबंध दिसून येतो. म्हणजेच S + M जितके अधिक तितके विदेशी व्यापार गुणकाचे (Kf) मूल्य कमी राहते. तर S + M जीतके कमी तितके विदेशी व्यापार गुणकाचे (Kf) मूल्य अधिक राहते. म्हणूनच विदेशी व्यापार गुणकाद्वारे राष्ट्रीय उत्पन्नात वृध्दी कशा पध्दतीने घडून येते हे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

$$\therefore \ \Delta Y = \frac{1}{(S+M)}(\Delta I + \Delta X)$$

$$kf = \frac{1}{MPS+MPM}$$

जर MPS = 0.25, MPM=0.15 असे मूल्य असेल तर

$$kf = \frac{1}{0.25+0.15} = \frac{1}{0.40} = 2.5$$

$$\Delta Y = kf\,.\,\Delta x$$

जर निर्यात २०० वरून वाढून ३०० ते ५०० बनली: ΔI = 0, तर

$$\therefore \Delta Y = 2.5 \times 200 = 500$$
$$\therefore Y_{E1} = YE + \Delta Y$$
$$= 1000 + 500 = 1500.$$
$$\Delta S = S\ \Delta Y = 0.25 \times 500 = 125$$
$$\Delta M = m\,\Delta Y = 0.15 \times 500 = 75$$

हे पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.



वरील आकृतीनुसार

$$\Delta I + \Delta X = \Delta S + \Delta M$$
$$\therefore 0 + 200 = 125 + 75$$
$$\therefore 200 = 200$$

बंदीस्त अर्थव्यवस्थेतील गुणकाचे मूल्य म्हणजेच K = 4 त खुल्या अर्थव्यवस्थेत विदेशी व्यापार गुणकाचे मूल्य म्हणजेच
Kf = 2.5 तर

$$Kf < K$$

म्हणजेच विदेशी व्यापार गुणकाचे मूल्य हे गुणकापेक्षा कमी राहते याचे प्रमुख कारण म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नात बचत व आयातीसारख्या निर्माण झालेल्या गळती (Leakages) होय.

आपली प्रगती तपासा :

१) विदेशी व्यापार गुणक ही संकल्पना स्पष्ट करा.

२) बंदीस्त अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न निर्धारणातील विदेशी व्यापार गुणकाची भूमिका स्पष्ट करा.

३) विदेशी व्यापार गुणकाद्वारे मुक्त अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्न निर्धारण प्रक्रिया स्पष्ट करा.

१.४ विदेशी प्रतिक्रिया (प्रतिफलीत) (Foreign Repercussion)

एका देशाच्या उत्पन्नात घट झाल्यास त्याचा परिणाम म्हणून त्याच्याशी व्यापार करणाऱ्या इतर देशांच्या उत्पन्नात घट होऊ लागते. या प्रतिक्रियांनाच विदेशी प्रतिक्रिया किंवा विदेशी प्रतिफलीत असे म्हणतात.

समजा 'क्ष' आणि 'य' हे दोन देश असून या दोन देशांमध्ये व्यापार घडून येत आहे. 'क्ष'हा देश निर्यातदार देश तर 'य' हा आयातदार देश आहे. 'क्ष' देशाची निर्यात म्हणजेच ती 'य' देशाची आयात असेल. जर 'क्ष' देशाच्या निर्यातीत वाढ झाली तर 'क्ष' देशाच्या उत्पन्नात वाढ घडून येईल याउलट 'य' देशाची आयात वाढून आयात खर्च वाढल्याने 'य' देशाच्या उत्पन्नात घट घडून येईल. जर तसे झाले तर 'य' देशाची आयात घटू लागेल व त्यामूळे 'क्ष' देशाची निर्यात देखिल कमी होऊन 'क्ष' देशाच्या उत्पन्नात घट घडून येईल. किंवा याउलट देखिल होऊ शकेल. यालाच विदेशी प्रतिक्रिया असे म्हणतात. वरील उदाहरणात विदेशी प्रतिक्रियेच्या परिस्थितीत निर्यात करणाऱ्या 'क्ष' देशाच्या विदेशी व्यापार गुणकाच्या आकाराचं संकुचन निर्माण होईल.

विदेशी व्यापारात विदेशी प्रतिक्रियेच्या राष्ट्रीय उत्पन्नावर होणारा परिणाम पुढील प्रमाणे दाखविता येईल.
सुत्ररुपाने

$$kf = \frac{1}{MPS_1 + MPM_1 + MPS_2 + MPM_2}$$

वरील सुत्रात MPS_1+ MPM_1 म्हणजेच निर्यातक देशातील सीमान्त बचत व सीमान्त आयात प्रवृत्ती तर MPS_2+MPM_2 म्हणजेच आयात करणाऱ्या देशातील सीमान्त बचत व सीमान्त आयात प्रवृत्ती होय.

जर

$$MPS_1 = 0.25$$
$$MPM_1 = 0.15$$
$$MPS_2 = 0.06$$
$$MPM_2 = 0.04$$

वरील किंमती मुळ सुत्रात टाकल्यास

$$kf = \frac{1}{0.25 + 0.15 + 0.06 + 0.04}$$

$$\therefore kf = \frac{1}{0.40 + 0.10}$$

$$\therefore kf = \frac{1}{0.50}$$

$$\therefore kf = \frac{1}{\frac{1}{2}}$$

$$\therefore kf = 2$$

$$\Delta Y = k\,f\,.\,\Delta\,x$$

$$= 2 \times 200 = 400$$

$$\therefore YE_1 = YE + \Delta\,Y$$

$$= 1000 + 400$$

$$= 1400$$

म्हणजेच मागील समीकरणांचा संदर्भ विचारात घेतल्यास असे दिसून येते की संबंधित देशाचे राष्ट्रीय उत्पन्नाचे मूल्य 1500 होते ते विदेशी प्रतिक्रियेच्या परिणामांमुळे विदेशी व्यापार गुणकाचे मूल्य घटल्याने राष्ट्रीय उत्पन्न 1400 असे घटल्याचे दिसून येते.

आपली प्रगती तपासा

१) 'विदेशी प्रतिक्रिया' ह्या संकल्पनेवर टिप लिहा.

१.५ सारांश

१) गुणकाची मुळ संकल्पना आर. एफ. कान्ह (R.F. Kahn) यांनी मांडली.

२) लॉर्ड केन्स यांनी गुणक या संकल्पनेचा आधार होऊन आपली 'गुंतवणूक गुणक' ही संकल्पना मांडली.

३) केन्सचा गुंतवणूक गुणक बंदीस्त अर्थव्यवस्थेचा कार्य करतो.

४) निर्यातीवरील देशी गुंतवणूकीत एका घटकाने वाढ केल्यास राष्ट्रीय उत्पन्नात जी वाढ होते त्यास विदेशी व्यापार गुणक असे म्हणतात.

५) बंदीस्त अर्थव्यवस्थेत गुणक (K) हा सीमान्त उपभोग प्रवृत्तीवर (MPC) अवलंबून असतो.

६) K = f (MPC)

७) विदेशी व्यापार गुणक म्हणजे निर्यात बदल व उत्पन्न बदल यातील गुणोत्तर प्रमाण होय.

८) विदेशी व्यापार गुणक हे सीमांन्त बचत प्रवृत्ती आणि सीमान्त आयात प्रवृत्ती यांचे फलित असते.

९) $\Delta Y = \frac{1}{s+m}(\Delta I+\Delta X)$

१०) $kf = \frac{1}{MPS+MPM}$

११) $\Delta Y = Kf. \Delta X$

१२) एका देशाच्या उत्पन्नात घट झाल्यास त्याचा परिणाम म्हणून त्याच्याशी व्यापार करणाऱ्या इतर देशांच्या उत्पन्नात घट होण्याच्या प्रक्रियेलाच विदेशी प्रतिक्रिया (प्रतिफलीत) असे म्हणतात.

१३) $kf = \frac{1}{MPS_1+MPM_1+MPS_2+MPM_2}$

१४) $Kf < K$

१.६ प्रश्न

१) राष्ट्रीय उत्पन्न वृध्दीतील विदेशी व्यापार गुणक प्रक्रिया स्पष्ट करा.

२) विदेशी व्यापार गुणक ही संकल्पना स्पष्ट करा.

३) पुढील प्रश्नांवर टिप लिहा.

अ) बंदीस्त अर्थव्यवस्थेतील गुणक परिणाम.

ब) मुक्त अर्थव्यवस्थेतील गुणक परिणाम.

४) विदेशी प्रतिक्रिया ही संकल्पना स्पष्ट करा.

५) राष्ट्रीय उत्पन्नावर गुणकाचा होणारा विदेशी प्रतिक्रिया उदाहरणासह स्पष्ट करा.

*****

२

आंतरिक आणि बाह्य संतूलन

(Internal and External Balance)

घटक रचना

२.० उद्दिष्ट्ये
२.१ आंतरिक आणि बाह्य संतूलन संकल्पना : मौद्रिक आणि राजकोषिय धोरणाची भुमिका
२.२ व्यय परिवर्तनकारी मौद्रिक धोरण
२.३ व्ययात (खर्चात) बदल घडवून आणणारी धोरणे
२.४ 'धोरण-मिश्र' संकल्पना
२.५ मिड्स चे प्रतिमान
२.६ मुंडेलचे प्रतिमान
२.७ मुंडेल - फ्लेमिंग प्रतिमान
२.८ सारांश
२.९ प्रश्न

२.० उद्दिष्ट्ये

१) अंतर्गत व बाह्य समतोल ही संकल्पना समजून त्यामध्ये मौद्रिक व वित्तीय धोरणाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
२) व्यय परिवर्तनकारी मौद्रिक धोरणाचा अभ्यास करणे.
३) व्ययात बदल घडवून आणणारी धोरणे जाणून घेणे.
४) धोरण मिश्र ही संकल्पना समजून घेणे.
५) मौद्रिक व वित्तीय धोरण मिश्र जाणूण घेणे.
६) मिड्स च्या प्रतिमानाचा अभ्यास करणे.
७) मुंडेल प्रतिमानाचा अभ्यास करणे.
८) मुंडेल फ्लेमिंग प्रतिमान समजून घेणे.

२.१ आंतरिक आणि बाह्य संतूलन (Internal and External Balance)

आंतराष्ट्रीय नाणेनिधीच्या विनिमय दर धोरणामूळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (IMF) सभासद देशांना एका दुहेरी समस्येला सामोरे जावे लागले व ती समस्या म्हणजेच अंतर्गत समतोल व बाह्य समतोल राखणे होय. अंतर्गत समतोलमध्ये पूर्ण रोजगार व किंमत स्थिरता ही उद्दिष्ट्ये अपेक्षित असतात तर बाह्य संतूलनात व्यवहारतोल (Balance of Payment) संतूलन अपेक्षित असते. ज्यावेळी एखाद्या देशाला एकाचवेळी अर्थव्यवस्थेत अंतर्गत व बाह्य संतूलन साह्य करण्याचे उद्दिष्टे पूर्ण करावे लागते त्यावेळी त्यावर उपाय म्हणून एकाचवेळी पुढील दोन प्रकारच्या धोरणांचा वापर करावा लागतो.

अर्थव्यवस्थेत आंतरिक व बाह्य संतूलन प्रस्थापित करण्यासाठी मौद्रिक धोरण (Monetary Policy) व राजकोषिय धोरण (Fiscal Policy) यांचा एकत्रित वापर करावा लागतो.

२.१.१ आंतरिक व बाह्य संतूलन - संकल्पना:

i) आंतरिक संतूलन : आंतरिक संतूलन ह्यामध्ये देशांतर्गत किंमत स्थिरता व पूर्ण रोजगाराचा विचार होतो.

ii) बाह्य संतूलन : बाह्य संतूलनात व्यवहारकोष संतूलनाचा विचार केला जातो.

सर्वसाधारणत: कोणताही देश वरील दोन संतूलनापैकी किंमत स्थिरता आणि पूर्ण रोजगाराद्वारे आंतरिक संतूलन प्रस्थापित करण्यास प्राधान्य देतात परंतु ज्यावेळी एखाद्या देशाच्या व्यवहारतोलात मूलभूत किंवा रचनात्मक असंतूलन निर्माण होते त्यावेळी त्या देशाला अंतर्गत संतूलनाऐवजी बाह्य संतूलनाला प्राधान्य देणे क्रमप्राप्त होते. अर्थव्यवस्थेत घडून येणारे प्रक्रिया व हंगामी बदल हे अल्पकालीन असल्याने अशा प्रकारचा असमतोल आपोआप दुरुस्त होत असतो. परंतु अर्थव्यवस्थेतील मुलभूत व रचनात्मक असंतूलनाचा परिणाम दीर्घकालीन असून तो योग्य वेळी दुरुस्त न झाल्यास अर्थव्यवस्थेत बिकट परिस्थिती निर्माण होऊ शकते म्हणूनच अशा वेळी व्यवहारतोलात मूलभूत संतूलन प्रस्थापित करणे क्रमप्राप्त ठरते. अशा परिस्थितीत अर्थव्यवस्थेत योग्य धोरणांची आखणी व अंमलबजावणीची गरज असते.

मीड या अर्थतज्ञाच्या मते आंतरिक व बाह्य संतूलन साधण्यासाठी प्रत्येक देशाला आपल्या एकूण खर्चावर तसेच विनिमय दरावर नियंत्रण ठेवावे लागते. जॉन्सनच्या मते आंतरिक व बाह्य संतूलन साधण्याकरिता व्यय किंवा खर्च परिवर्तनकारी (Expenditure Changing) व खर्च बदलावकारी (Expenditure Switching) या पध्दतींचा वापर करावा लागतो.

२.२ व्यय परिवर्तनकारी किंवा खर्च परिवर्तनकारी धोरणे (Expenditure Changing Policies)

व्यय परिवर्तनकारी धोरणालाच 'खर्च समायोजन धोरण' असेही म्हटले जाते. व्यवहारतोलातील असंतूलनाविरुध्द मौद्रिक व वित्तीय (राजकोषिय) धोरणाद्वारे एकूण खर्चात बदल करण्याच्या पध्दतीला व्यय परिवर्तनकारी नीती असे म्हणतात. खर्चात वाढ किंवा घट करुन व्यय परिवर्तनकारी धोरण राबविले जाते. या धोरणाचा परिणाम म्हणून उत्पन्न पातळीमध्ये बदल घडून येतात. म्हणूनच ही नीति 'उत्पन्न परिवर्तनकारी नीति' या नावाने देखिल ओळखली जाते.

देशाच्या आयातीत होणाऱ्या वाढीबरोबर व्यवहारतोलात तूटीची परिस्थिती निर्माण होते याउलट देशाच्या निर्यातक्षमतेतील वाढीबरोबर देशाच्या व्यवहारतोलात वाढाव्याची परिस्थिती निर्माण होते. जर देशाची आयात वाढलेली असेल तर ती कमी करण्यासाठी सार्वजनिक खर्चात कपात करणे आवश्यक ठरते. म्हणजेच सार्वजनिक खर्चात कपात झाल्यास व्यवहारतोलातील तूट दुर होण्यास मदत होते. याउलट सार्वजनिक खर्चात वाढ घडवून आणल्यास व्यवहारतोल वाढण्याच्या परिस्थितीचे समायोजन करणे शक्य होते, कारण सार्वजनिक खर्चात वाढ घडून आल्यास देशाची आयात वाढुन व्यवहारतोल वाढावा घटू लागतो.

वरील व्यवहारतोलातील वाढावा व तूट या वरील दोन्ही परिस्थितीपैंकी व्यवहारतोलात घडून येणारी तूट ही अर्थव्यवस्थेला बाधक असते अशा वेळी सार्वजनिक खर्चात सतत घट घडवून आणावी लागते म्हणूनच या धोरणाला खर्चात (व्ययात) कपात करणारी नीति (Expenditure Reducing Policy) असेही म्हणतात. या अनुषंगानेच खर्चात कपात करुन व्यवहारतोल तूट दुर करण्यासाठी मौद्रिक व राजकोषिय नीतिचा अवलंब केला जातो.

२.२.१ मौद्रिक धोरण (Monetary Policy):

कोणत्याही देशातील मौद्रिक अधिसत्तेलाच (मध्यवर्ती बँक) मौद्रिक धोरण राबविण्याचा सर्वोच्च अधिकार आहे. भारतात मौद्रिक धोरण तयार करणे व त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार रिझर्व्ह बँकेकडे सुपूर्त करण्यात आलेले आहेत. मौद्रिक धोरणामध्ये देशातील मौद्रिक घटकांचा व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे. उदा. पैशाचा पुरवठा नियंत्रित करणे, संख्यात्मक व गुणात्मक साधनांचा वापर करणे इ.

कोणत्याही देशाच्या मध्यवर्ती बँकेकडे मौद्रिक व्यवस्थापनासाठी जी अनेक साधने उपलब्ध असतात त्यापैकी सर्वाधिक परिणामकारक साधने म्हणजेच

i) बँकदर (Bank Rate)

ii) खुल्या बाजारात रोख्यांचे व्यवहार (Open Market Operations)

बँकदर म्हणजेच असा कमीत कमी व्याजदर की जो मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना अल्पकालीन कर्जे देण्यासाठी आकारते. देशातील परिस्थितीचा विचार करुन मध्यवर्ती बँक बँकदरामध्ये वाढ किंवा घट घडवून आणण्याचा निर्णय घेऊ शकते. खुल्या बाजारातील रोख्यांच्या खरेदी-विक्री मध्ये मध्यवर्ती बँकेमार्फत सरकारी कर्जरोख्यांच्या खरेदी किंवा विक्रिच्या व्यवहारांचा समावेश होतो. ही दोन्ही साधनांची परिणामकारकतेमध्ये साधर्म्य दिसून येते.

देशातील मध्यवर्ती बँक व्यवहारशेषातील परिस्थितीत संतूलन प्रस्थापित करण्यासाठी पुढील दोन प्रकारे मौद्रिक धोरण राबवू शकते.

i) संकुचनकारी मौद्रिक धोरण - (Contractionary Monetary Policy)

ii) विस्तारक मौद्रिक धोरण - (Expansionary Monetary Policy)

ज्यावेळी एखाद्या देशाच्या व्यवहारतोलात तुटीची समस्या दिसून येते अशा वेळी संकुचनकारी मौद्रिक धोरण अवलंबिले जाते. यानुसार बँकदरात वाढ केली जाते. मध्यवर्ती बँकेमार्फत बँकदरात वाढ घडवून आणल्याने व्यापारी बँकांसाठी अल्पकालीन कर्जे अधिक खर्चिक बनतात कारण बँकदर आणि बाजारव्याजदर यामध्ये २ % पर्यंतचेच अंतर असू शकते. बाजार व्याजदर हा व्यापारी बँकांनी त्यांच्या कर्जदारांसाठी आकारलेला दर असतो. बँकदरातील वाढीचा परिणाम म्हणून बाजारदरात सुध्दा बँकांना वाढ करावी लागते त्यामुळे कर्जदारांसाठी कर्जे महाग बनल्याने पैशासाठी मागणी कमी होऊ लागते व त्याचवेळी मध्यवर्ती बँकेमार्फत पैशाच्या पुरवठ्यावर मर्यादा आणली जाते.

संकुचनकारी मौद्रिक धोरणाचाच दुसरा भाग म्हणजे मध्यवर्ती बँक सरकारी कर्जरोखे खुल्या बाजारात विक्रीस काढते. ज्यांच्यामार्फत या सरकारी कर्जरोख्यांची खरेदी केली जाते ते खरेदीदार आपल्या व्यापारी बँकेचे धनादेश मध्यवर्ती बँकेकडे सुपूर्द करतात त्या धनादेशांद्वारे मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांमधून पैसा (रोख्यांच्या व्यवहाराची रक्कम) काढून घेते त्यामुळे व्यापारी बँकांच्या पुनर्निर्मितीच्या कार्यावर आपोआप मर्यादा येते. मध्यवर्ती बँकेच्या संकुचनकारी नीतिलाच 'कडक मौद्रिक धोरण' असेही म्हणतात कारण या धोरणाद्वारे मध्यवर्ती बँक अर्थव्यवस्थेतील पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवते, परिणामस्वरुप खर्चात कपात घडून येते त्यामुळे आयात प्रवृत्ती कमी होऊन व्यवहारशेषात आपोआप संतूलन प्रस्थापित होते.

ज्यावेळी व्यवहारतोल वाढण्याचा (Surplus Balance of Payment) दिसून येतो त्यावेळी मध्यवर्ती बँक 'सुलभ मौद्रिक धोरणांचा' अवलंब करते कि ज्याद्वारे व्याजदरामध्ये घट घडवून आणली जाते. व्याजदरातील घटीमुळे कर्जे स्वस्त झाल्याने गुंतवणूकीत वाढ होऊन उत्पन्नात वाढ घडून येते पर्यायाने देशाची आयात वाढून वाढाव्याच्या व्यवहारतोलाचे समायोजन करता येते.

देशात आंतरिक संतूलन प्रस्थापित करण्यासाठी मौद्रिक धोरण मदत करते. ज्यावेळी मध्यवर्ती बँक 'सुलभ मौद्रिक धोरण' आखते त्यानुसार व्याजदरात घट घडवून आणल्याने गुंतवणूकीला प्रोत्साहन मिळून देशात रोजगार संधी निर्माण होऊन

उत्पन्नपातळीत वाढ घडून येते. याउलट मध्यवर्ती बँक 'कडक मौद्रिक धोरणाचा' अवलंब करुन देखिल आंतरिक समतोलाद्वारे देशातील रोजगार व किंमत पातळीत स्थिरता प्रस्थावित करु शकते.

२.२.२ रोजकोषिय धोरण किंवा वित्तिय धोरण : (Fiscal Policy)

मौद्रिक धोरणाबरोबरच देशात आंतरिक आणि बाह्य संतुलन प्रस्थापित करण्याासाठी राजकोषिय किंवा वित्तीय धोरणाचा देखिल वापर केला जातो. Fiscal हा शब्द मुळ ग्रीक भाषेतील Fisc' या शब्दापासून बनलेला आहे 'Fisc' याचा अर्थ 'Basket' (थैली) असा होतो. सरकारी थैली म्हणजेच सरकारचे कोषागार (Treasury) होय. म्हणजेच राजकोषिय धोरणाचा संबंध सरकारच्या महसूली भांडाराशी किंवा कोषागाराशी आहे. या धोरणाचा संबंध सरकारच्या महसूली जमा (उत्पन्न) (Revenue) आणि महसूली खर्च (Expenditure) या बाजुंशी असल्यानेच या धोरणाला सरकारचे 'अंदाजपत्रकीय धोरण' (Budgetory Policy) या नावाने देखिल ओळखले जाते.

वित्तीय धोरणात सरकार मार्फत महसूल व खर्चाबाबत अशा पध्दतीने सुयोग्य बदल घडवून आणले जातात कि ज्यामुळे उत्पादन, रोजगार, उत्पन्न आणि व्यवहारतोलात सकारात्मक बदल घडून येतील या अनुषंगाने सरकारमार्फत सार्वजनिक महसूल व सार्वजनिक खर्चात अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी पुढील दोन प्रकारे वित्तीय धोरण राबविले जाते.

i) संकुचनकारी वित्तीय (राजकोषिय) धोरण :(Contractionary Fiscal Ploicy)

ii) विस्तारक वित्तीय धोरण : (Expansionary Fiscal Policy)

व्यवहारतोलातील तुटीची समस्या दूर करण्यासाठी सरकार 'संकुचनकारी वित्तीय धोरणाचा' अवलंब करते. या धोरणानुसार सरकार एका बाजुला सार्वजनिक खर्चात घट करते तर दुसऱ्या बाजुस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे दर वाढविते. सार्वजनिक खर्चात केलेल्या कपातीमुळे रोजगार व उत्पन्न पातळीत घट होऊन किंमत पातळीत देखिल घट घडून येते. या उपायामुळे चलनस्फिती (भाववाढ-Inflation) नियंत्रित करता येते व त्याद्वारे अर्थव्यवस्थेतील आंतरिक संतुलन प्रस्थापित करता येतो.

दुसऱ्या बाजुला वरील उपाय हा बाह्य संतुलन प्रस्थापित करण्यास सुध्दा मदत करतो कारण सार्वजनिक खर्चातील घटीमुळे रोजगार व उत्पन्नात घट घडून येते. उत्पन्नातील घटीचा परिणाम म्हणून आयात क्षमता कमी होते कारण आयात (M) आणि उत्पन्न (Y) यामध्ये फलनात्मक सहसंबंध दिसून येतो. (M=f (Y)) उत्पन्न व आयातीत प्रत्यक्ष धनात्मक संबंध दिसून येतो. ज्यावेळी उत्पन्नपातळीत घट घडून येते त्याबरोबर आयातीत देखिल घट घडून येते. किंमत पातळीत घट घडून आल्यास आपल्या देशातील वस्तू व सेवा परकीय नागरीकांसाठी स्वस्त होऊन आपल्या देशातील वस्तू व सेवांना मागणी वाढून निर्यात वाढते. निर्यातीत घडून येणारी वाढ परकीय

चलनात वाढ घडवून आणते व आपोआप व्यवहारतोलातील असंतूलन दूर होण्यास मदत होते.

ज्यावेळी व्यवहारतोलात वाढावा निर्माण होतो अशा वेळी हा वाढावा नियंत्रित करण्यासाठी सरकार 'विस्तारक वित्तीय धोरणाचा' अवलंब करते. या धोरणानुसार सार्वजनिक खर्चात वाढ तर दुसऱ्या बाजुस प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे दरांमध्ये कपात केली जाते. त्यामुळे रोजगार व उत्पन्न पातळी गुणकपरिणामाद्वारे वाढू लागते. त्याचा परिणाम म्हणून उपभोग, वस्तू व सेवांच्या किंमती यात वाढ घडून येते. अशा वेळी वस्तू व सेवा महाग झाल्याने देशाची निर्यात कमी होऊन विदेशी वस्तू व सेवा स्वस्त वाटू लागल्याने आयात वाढू लागते परिणामतः व्यवहारतोलातील वाढाव्याचे प्रमाण कमी होऊन व्यवहार तोलात संतुलन प्रस्थापित होते. म्हणजेच विस्तारक वित्तीय धोरणाद्वारे देशाचा बाह्य समतोल प्रस्थापित होण्यास मदत होते. तसेच उत्पन्न, रोजगार व किंमत पातळीत सकारात्मक बदल घडवून आणून आंतरिक समतोल देखिल साह्य केला जातो.

सर्वसाधारणतः आंतरिक समतोल प्रस्थापित करण्यासाठी मौद्रिक धोरणाचा व बाह्य समतोल प्रस्थापित करण्यासाठी वित्तीय धोरणाचा वापर केला जातो. खर्च कपात धोरण व्यवहार तोल असंतूलनावर धनात्मक परिणाम घडवून आणते तर खर्च वाढ धोरण व्यवहारतोल असंतूलनावर नकारात्मक परिणाम घडवून आणते.

२.३ व्ययात किंवा खर्चात बदल घडवून आणणारी धोरणे (Expenditure Switching Policy)

खर्चात बदल घडवून आणणारी धोरणे पुढील दोन घटकांशी संबंधित असतात.

अ) अवमूल्यन (Devaluation)

ब) प्रत्यक्ष नियंत्रणे (Direct Controls)

अ) अवमूल्यन - (Devaluation):

खर्चात बदल घडवून आणण्याऱ्या धोरणांमुळे देश आपला खर्च विदेशातील वस्तूंकडून स्वदेशातील वस्तूंकडे किंवा उलट दिशेनेही वळवू शकतो. या धोरणांचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजेच व्यवहारदोषातील असंतुलन दुर करुन अर्थव्यवस्थेत बाह्य संतुलन राखणे होय. अवमूल्यनाचा संबंध खर्चात बदल घडवून आणणाऱ्या धोरणांशी आहे.

'स्वदेशी चलनाचे मूल्य विदेशी चलनाच्या तुलनेत कमी करणे म्हणजे अवमूल्यन होय'. देशातील व्यवहारशेषातील तुट भरुन काढण्यासाठी अवमूल्यन या तंत्राचा वापर केला जातो. चलनाचे अवमूल्यन केल्याने त्या देशातील चलन व वस्तूंच्या किंमती परकीय देशांसाठी स्वस्त बनल्याने विदेशातून मागणी वाढून स्वदेशाची निर्यात वाढण्यास मदत होते. त्याचवेळी स्वदेशी नागरीकांना विदेशी वस्तू महाग वाटत

असल्याने विदेशी वस्तूंची मागणी घटून आयात कमी होऊ लागते. अवमूल्यनामुळे संबंधित देशाच्या आयातीत घट व निर्यातीत वाढ होत असल्याने देशाच्या व्यवहारशेषातील तुट भरुन निघण्यास मदत होते. ह्याशिवाय देशाची निर्यात वाढू लागल्याने व स्वदेशी वस्तूंची स्वदेशांतर्गत व विदेशातील मागणी वाढल्याने ही मागणी पूर्ण करण्यासाठी अवमूल्यन करणाऱ्या देशांना पूर्वीपेक्षा अधिक उत्पादन करावे लागते. अशाप्रकारे अवमूल्यनामुळे विदेशी आयात वस्तूंवर होणारा खर्च काही प्रमाणात स्वदेशी वस्तूकडे वळविला जातो. थोडक्यात निर्यात मूल्यात वाढ व आयात मूल्यात घट झाल्याने व्यवहारशेषातील तूट आपोआप नाहिशी होते.

ब) प्रत्यक्ष नियंत्रणे - (Direct Controls) :

व्यवहारतोल तुटीचे असंतुलन भरुन काढण्यासाठी प्रत्यक्ष नियंत्रणाचा वापर करुन वस्तूंची आयात नियंत्रित करता येते. प्रत्यक्ष नियंत्रण पुढील दोन पध्दतीद्वारे केले जाते.

i) वाणिज्यविषयक नियंत्रणे - (Commercial Controls)

ii) वित्तीय नियंत्रणे - (Financial Controls)

i) वाणिज्यविषयक नियंत्रणे:

यानुसार स्वदेशी उत्पादनाला चालना देणासाठी आयातीला स्वस्त पर्याय स्वदेशातच तयार करण्याच्या धोरणाचा (आयात पर्यायीकरण) अवलंब केला जातो. तसेच सरकार निर्यातदारांना निर्यात-सवलती (Export Subsidies) देणे अनावश्यक वस्तुंच्या आयातीवर भारी प्रशुल्क आकारणे, वाटा किंवा कोटा (Quota) ठरवून देणे किंवा अत्यावश्यक वस्तूंच्या आयातीवरील आयात प्रशुल्कात घट करणे किंवा त्यांचा कोटा वाढवून देणे अशा उपायांद्वारे वस्तूंच्या आयातीवर नियंत्रण ठेवण्यासाठी जे प्रयन्त करते त्यांना वाणिज्यविषयक नियंत्रणे असे म्हणतात. त्यामुळे व्यवहारशेषातील तुटीचे प्रमाण कमी होऊन संतुलन प्रस्थापित होण्यास मदत होते.

ii) वित्तीय नियंत्रणे (Financial Contols):

व्यवहारतोलातील तुट भरुन काढण्यासाठी सरकार वित्तीय नियंत्रणांचा अवलंब करते. ह्या उपायांमुळे मुद्रेच्या उपयोगावर नियंत्रण ठेवता येते. ही नियंत्रणे कडक स्वरुपाची असतात. ह्या प्रकारात मुद्रा अधिकाऱ्याचे विदेशी चलनांचे देणे व प्राप्ती यावर पूर्ण नियंत्रण ठेवले जाते. विनिमय अधिकाऱ्यांकडे विदेशी चलन सुपूर्त करावे लागते. विदेशी विनिमय, प्रतिभूतींची खरेदी, रॉयल्टी, विदेशी कर्ज व व्याज, पर्यटन ह्याकरिता विदेशात होणारा खर्च नियंत्रित केला जातो. कच्चा माल, मशिनरी इ. विकासाला आवश्यक गोष्टींवर कमी विनिमय दर व अनावश्यक वस्तूंवर जास्त विनिमय दर आकारण्याचा प्रयोगही सरकार करु शकते.

अशा प्रकारे वाणिज्यविषयक व वित्तीय आयातीत कपात करुन तसेच अर्थव्यवस्थेतील विदेशी विनिमयाच्या गरजा नियंत्रित करुन प्रत्यक्ष नियंत्रणे ही व्यवहारतोलातील तुट नाहिशी करुन संतुलन साधण्यात सहाय्यक ठरतात.

आपली प्रगती तपासा :

१) खालील संकल्पना स्पष्ट करा.

अ) खर्चात बदल घडवून आणणारी धोरणे

ब) व्यय परिवर्तनकारी धोरणे

२) आंतरिक आणि बाह्य संतुलनातील फरक स्पष्ट करा.

३) टिपा लिहा.

अ) मौद्रिक धोरण

ब) वित्तीय धोरण

२.४ संमिश्र (मिश्र) धोरण - (Policy Mix)

संमिश्र धोरणाचा अर्थ समजण्यापूर्वी मौद्रिक व वित्तीय धोरणाची परिणामकारकता विचारात होणे आवश्यक ठरते. विकसनशील देशात नाणेबाजार, भांडवल बाजार, वित्तीय संस्था यामधील असंघटीतपणा व एकजीनसीपणाच्या अभावामुळे मौद्रिक धोरणाच्या परिणामकारकतेवर मर्यादा येतात. त्यामुळे देशातील मध्यवर्ती बँकेला मौद्रिक धोरण यशस्वीरित्या राबविता येत नाही. कारण अशा देशांमध्ये संघटीत वित्तीय घटकांपेक्षा असंघटीत वित्तीय घटकांचे प्रमाणात वर्चस्व जास्त असते व हे असंघटीत क्षेत्र मध्यवर्ती बँकेच्या नियंत्रणाबाहेर असते.

विकसनशील देशांमध्ये प्राथमिक क्षेत्र हे असंघटीत क्षेत्रात मोडते व ह्या क्षेत्रासाठी वित्तपुरवठ्याची गरज सावकार व एतदद्देशिय बँकेर्स यांच्या मार्फत पूर्ण होत असल्याने व हे घटक मध्यवर्ती बँकेच्या नियंत्रणाबाहेर असल्याने मौद्रिक धोरणाची उद्दिष्टे पूर्ण करण्याच्याबाबतीत अनेक मर्यादा निर्माण होतात. वास्तविकत: किंमत स्थिरतेसह आर्थिक विकास ही मौद्रिक धोरणाची दोन्ही उद्दिष्ट्ये परस्पर विरोधी आहेत. कारण विकासाच्या प्रारंभिक अवस्थेत चलनवाढ अपरिहार्य असते अशा वेळी जर किंमत स्थिरतेच्या उद्दिष्ट पुर्ततेकडे लक्ष केंद्रित केले तर आर्थिक विकास घडवून आणणे शक्य होणार नाही.

विकसनशील देशातील मध्यवर्ती बँकेच्या मौद्रिक धोरणाची परिणामकारकता कमी दिसून येते, कारण बाजार व्याजदर आणि बँकदर (Bank Rate) यामध्ये तफावत असल्याने मध्यवर्ती बँकेच्या संख्यात्मक साधनांपैकी (Qunatitative

Instruments) बँकदर हे साधन पतनियंत्रण घडवून आणण्यात अपयशी ठरत आहे. पतनियंत्रणाच्या कार्यात खुल्याबाजारातील सरकारी कर्जरोख्यांच्या खरेदी-विक्रीच्या कार्यावर देखिल मर्यादा येतात कारण अशा देशांमध्ये नाणेबाजार व भांडवल बाजाराचा विकास घडून आलेला नसतो. विकसनशील देशांमध्ये बँकदर आणि खुल्या बाजारातील रोख्यांच्या खरेदी विक्री ह्या दोन साधनांपेक्षा राखीव निधीचे प्रमाण (Reserve Ratio Policy) हे साधन अधिक परिणामकारक ठरु शकते. परंतु बहुतांश विकसनशील देशातील व्यापारी बँका जाणिवपूर्वक स्वत:जवळ अधिक राखीव निधी बाळगुन असल्याने मध्यवर्ती बँकेच्या 'रोख राखीव निधी प्रमाणात' (Cash Reserve Ratio - CRR) वाढ करुनही व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीच्या कार्यावर कोणताही परिणाम घडून येत नसल्याने अशा देशांमध्ये मौद्रिक धोरणाची अंमलबजावणी अयशस्वी ठरते. म्हणूनच बहुतांश विकसनशील देशांत मौद्रिक धोरणाच्या संख्यात्मक साधनांऐवजी 'गुणात्मक साधनांच्या' (Qualitative Instruments) अंमलबजावणीवर अधिक भर दिला जातो. त्यान्वये अन्नधान्य व जिवनावश्यक वस्तूंच्या अनावश्यक साठेबाजीवर व किंमतीवर नियंत्रण ठेवले जाते परंतु या धोरणाच्या सुध्दा पुढील प्रमुख मर्यादा दिसून येतात.

i) उत्पादक कारणांसाठी घेतलेल्या कर्जाचा वापर अनुत्पादक कारणांसाठी होतो यावर योग्य त्या देखरेखिचा अभाव दिसून येतो.

ii) एकूण प्राथमिक क्षेत्रातील उत्पादनापैकी जास्तित जास्त हिस्सा हा शेतकऱ्यांमार्फत स्वउपभोगासाठी किंवा स्थानिक बाजारात विक्रीसाठी वापरला जात असल्याने हे उत्पादन खरेदी-विक्रीच्या मुख्य बाजारप्रवाहात येण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

राजकोषिय किंवा वित्तीय धोरण हे सार्वजनिक धोरणाची बाजु असून करप्रणाली (Tax System) सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक कर्ज ही वित्तीय धोरणाची मुख्य साधने मानली जातात. विकसनशील देशांतील राजकोषिय धोरणाचा प्रमुख हेतू म्हणजेच आर्थिक विकास साह्य करणे तर विकसित देशातील राजकोषिय धोरणाचा प्रमुख हेतू आर्थिक विकासाचा दर टिकवून ठेवणे हा असतो. त्या अनुषंगाने प्रत्येक देश आपल्या देशातील वित्तीय धोरणाची आखणी करतात.

रोजकोषिय धोरणाचे यश हे देशातील तेजी-मंदीच्या व्यापार चक्रिय बदलांच्या केल्या जाणाऱ्या अचूक अंदाजांच्या कठीण कार्यावर अवलंबून आहे. जरी अर्थव्यवस्थेतील चक्रीय बदलांची पूर्वकल्पना असेल तरीही राजकोषिय धोरणाच्या साधनांचा अर्थव्यवस्थेवर विविध अंगावर घडून येणाऱ्या प्रत्यक्ष परिणामांचे अचूक भाकीत करणे शक्य नाही.

वित्तीय धोरणाचा एक भाग म्हणून सार्वजनिक गुंतवणूकीत वाढ झाल्यास देशात रोजगार निर्मिती उत्पन्नात वाढ घडून येईल. उत्पन्नातील वाढ ही व्यवहारतोल असंतुलनाला आमंत्रण ठरते कारण वाढत्या उत्पन्नाबरोबर लोकांची आयात वाढते त्यातून व्यवहारतोलाते तुटीची समस्या निर्माण होऊन व्यवहारशेष असंतुलनाची परिस्थिती निर्माण होते.

देशातील अंतर्गत व बहिर्गत संतुलन प्रस्थापित करण्यात वित्तीय धोरणाच्या सार्वजनिक कर या साधनाचा वापर सर्रास केला जातो. परंतु विकसनशील देशांत या साधनाच्या वापरावर पुढील मर्यादा दिसून येतात.

i) या देशांतील बहुसंख्य लोक निरक्षर असल्याने कर भरण्याबाबतच्या सामाजिक जाणिवेचा त्यांच्यात अभाव दिसून येतो.

ii) अघोषित उत्पन्न असलेल्या व्यक्ति किंवा संस्था यांच्या मार्फत कर भरले जात नाहीत.

iii) करचुकवेगीरीचे प्रमाण अधिक.

iv) प्रत्यक्ष करांमध्ये (प्राप्तीकर) वाढ करुन सरकार लोकांचे खर्च योग्य उत्पन्न स्वत:कडे वळविते.

v) अप्रत्यक्ष करांचे प्रमाण वाढवून वस्तूंच्या किंमत पातळीत वाढ घडवून आणली जाते. परिणामत: लोकांची उपभोग प्रवृत्ती नियंत्रित केली जाते.

वित्तीय धोरणाचे तिसरे महत्त्वाचे साधन म्हणजेच सार्वजनिक कर्ज हे होय. या साधनाचा वापर सरकार देशांतर्गत व विदेशातून कर्ज उभारणीसाठी करु शकते. अशा प्रकारची कर्जे देशाच्या आर्थिक विकासासाठी कराव्या लागणाऱ्या 'विकासकारी खर्चाची' गरज पूर्ण करतात. परंतु सातत्याने या साधनाचा वापर हा संबंधित देशाला परावलंबी बनवू शकतो. सततचे परावलंबन हे संबंधित देशाची आंतरराष्ट्रीय पत घसरविण्यास कारणीभूत असतात. या साधनाचा सर्वात मोठा दोष म्हणजेच सततची कर्जे व त्यांची परतफेड यामुळे अनेकदा अशा देशांत अतिरिक्त कर्जाचे संकट निर्माण होऊन देशाच्या आर्थिक विकासाला बाधा निर्माण होऊ शकते. तसेच परकीय चलन साठ्यांवरही या कर्जपरतफेडीचा विपरीत परिणाम दिसून येतो.

२.५ मीड चे प्रतिमान (Mead's Model)

अर्थव्यवस्थेतील अंतर्गत आणि बहिर्गत संतुलन एकाचवेळी प्रस्थापित करण्यासाठी मौद्रिक व वित्तीय धोरणाच्या समायोजनाविषयीचे प्रतिमान मीड या अर्थशास्त्रज्ञाने मांडले. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी खर्च कपात धोरण व खर्च बदल धोरण वापरावे लागते. अर्थव्यवस्थेत जेव्हा पूर्ण रोजगार स्थिती असते तेव्हा अवमूल्यनाचे धोरण अर्थव्यवस्थेस चलनवाढ निर्माण करते म्हणूनच अवमूल्यनाचे खर्च कपात धोरण हे खर्च बदल धोरणाशी सुसंगत असले पाहिजे. ही दोन्ही उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी पुढील आकृती अभ्यासणे आवश्यक आहे.



आकृती क्र. २.१

वरील आकृतीत x अक्षावर घरगुती खर्च व Y अक्षावर विनिमयाचा दर दर्शविण्यात आला आहे. IB हा अंतर्गत संतुलनाचा वक्र असून तो पूर्ण रोजगार आणि किंमत स्थैर्य दर्शवितो. IB हा वक्र ऋणात्मक उताराचा असून तो देशांतर्गत खर्च आणि विनिमयाचा दर यामधील व्यस्त संबंध दर्शवितो.

EB हा वक्र बाह्य संतुलनाचा वक्र असून हा वक्र धनात्मक आकाराचा असून तो विनिमयाचा दर आणि देशांतर्गत खर्च यातील सम संबंध दर्शवितो.

E ह्या संतुलनाच्या बिंदूत IB व EB हे दोन्ही वक्र परस्परांना छेदुन जातात म्हणूनच E हा अंतर्गत व बाह्य संतुलनाचा एकत्रित संतुलन बिंदू असून या बिंदूत एकाचवेळी अंतर्गत व बाह्य समतोल प्रस्थापित झालेला आहे. या संतुलन बिंदूलाच 'अत्यूच्च बिंदू' (Bliss-Point) असेही म्हटले जाते. जर अर्थव्यवस्था E बिंदू पर्यंत पोहोचली नाही तर तेथे असमतोल आढळतो.

मीडच्या मते अंतर्गत व बाह्य समतोल हे दोन्ही वक्र आर्थिक उद्दिष्टांचे पुढील चार विभागात दर्शवितात. ते पुढीलप्रमाणे.

1) विभाग - I : चलनवाढ आणि व्यवहारतोल वाढावा.

2) विभाग - II : चलनवाढ आणि व्यवहारतोल तूट

3) विभाग - III : बेरोजगारी आणि व्यवहारतोल तूट

4) विभाग - IV : बेरोजगारी आणि व्यवहारतोल वाढावा

या संदर्भात अंतर्गत आणि बाह्य समतोल एकाचवेळी साधण्यासाठी विविध प्रकारची धोरणे राबवावी लागतात त्यासाठी पुढील चार विभागात असमतोल स्थितीचा अभ्यास आवश्यक आहे.

विभाग - I मध्ये व्यवहारतोलातील वाढावा अवास्तव चलनवाढीशी संबंधित आहे. या स्थितीत विनिमय दरात वाढ घडवून आणल्यास वाढावा आणि खर्च कपात यांच्यात बदल होतात. मात्र खर्चातील कपात वाढावयात आणखी भर टाकतो. अशा ठिकाणी कोणतेही एकसूत्री धोरण लावता येत नाही.

विभाग - II मध्ये व्यवहारतोलातील तुट एकत्रित दाखविलेली आहे. अतिरिक्त चलनवाढीमुळे आणि स्वदेशी खर्च कपातीमुळे व्यवहारतोलातील तुट कमी होऊ शकते. खर्च कपातीमुळे व्यवहारतोलातील तुट कमी होऊ शकते.

विभाग - III मध्ये बेकारी आणि व्यवहारतोलात तुट दिसून येते. त्यासाठी देशांतर्गत खर्च वाढवून बेकारी कमी केली पाहिजे आणि विनिमय दराचे अवमूल्यन करुन व्यवहारतोलातील तुट सुधारली पाहिजे. त्यासाठी विस्तारित वित्तीय धोरण आवश्यक आहे. ज्याद्वारे उत्पन्न पातळी वाढून मागणी वाढेल व तूट वाढेल.

शेवटी विभाग - IV मध्ये बेरोजगारी व वाढावा एकत्रित दाखविण्यात आलेला आहे. विनिमयदर वृध्दी व देशांतर्गत खर्च वाढीमुळे E बिंदूपाशी अंतर्गत आणि बहिर्गत समतोल निर्माण होतो.

विभाग I आणि III यांना 'पेच विभाग' तर विभाग II आणि IV यांना 'साधे विभाग' असे म्हणतात.

२.६ मुंडेलचे प्रतिमान (Mundell's Model)

हे प्रतिमान रॉबर्ट मुंडेल यांनी मांडले. त्यांच्या मते अर्थव्यवस्थेस अंतर्गत व बाह्य समतोल ही दोन उद्दिष्ट्ये एकाचवेही साध्य करायची असतील तर मौद्रिक व वित्तीय धोरणसुध्दा एकाचवेळी अवलंबणे आवश्यक आहे. अंतर्गत समतोलात पूर्ण रोजगार आणि किंमत स्थिरता अपेक्षित असते तर बाह्य संतुलनात व्यवहारतोल संतुलन अपेक्षित असते. मुंडोल यांनी व्यवहारतोल संतुलनासाठी 'स्थिर विनिमय दर' धोरणाचा पुरस्कार केला कारण त्यांच्या मते विनिमयाचा दर अस्थिर असेल तर बाह्य संतुलन आपोआप प्रस्थापित होतो.

मुंडेल यांच्या मते ज्या देशात रोजगार आणि व्यवहारतोल धोरणे मौद्रिक व वित्तीय साधनांशी निगडीत असतात तेथे मौद्रिक धोरण व्यवहारशेष संतूलन साधण्यासाठी आणि वित्तीय धोरण अंतर्गत संतुलनासाठी वापरले जाते. मुंडेल यांचे हे तत्त्व आंतरिक व बाह्य समतोलासाठी मौद्रिक व वित्तीय धोरणाची परिणामकारकता स्पष्ट करते.

विस्तारक मौद्रिक धोरणाचा एक भाग म्हणून व्याजाचे दर कमी केले जातात त्याचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेत रोजगार व उत्पन्नपातळीत वाढ घडून येते. उत्त्पन्नातील वाढीचा आयात वाढीशी फलनात्मक संबंध असल्याने [M = f (Y)] उत्पन्नातील वाढीबरोबर आयातीत वाढ होऊ लागते.

संकुचनकारी मौद्रिक धोरणाचा भाग म्हणून व्याजाच्या दरात वाढ केली जाते. त्यामुळे गुंतवणूकीत घट होऊन उत्पन्न व रोजगारपातळीत घट घडून येते. उत्पन्नातील घट ही आयातीत घट घडूवन आणते. त्यामुळे चलनवाढ व व्यवहारतोलातील तूट कमी होऊ लागते.

सार्वजनिक खर्चात वाढ करण्याच्या धोरणात विस्तारक मौद्रिक व वित्तीय धोरणाचा समावेश होतो. म्हणजेच व्याजदरात घट व सार्वजनिक खर्चात वाढ घडवून आणणे याउलट खर्च कपात धोरणामध्ये संकुचनकारी मौद्रिक आणि वित्तीय धोरणाचा समावेश होतो. त्यानुसार व्याजदरात वाढ व सार्वजनिक खर्चात घट घडवून आणली जाते.

वरील दोन्ही धोरणांचा समावेश खर्च समायोजन किंवा खर्च बदल धोरणात केला जातो. जर एखाद्या देशात अंतर्गत व बाह्य असंतूलनाची समस्या निर्माण होत असेल तर अशावेळी मौद्रिक व वित्तीय संमिश्र धोरण वापरण्याचा उपाय सुचविला जातो.

मौद्रिक आणि वित्तीय धोरणाचे एकत्रिकरण :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (IMF) विनिमय दर धोरणांमुळे अनेकदा अंतर्गत व बाह्य असंतुलनात देशांसमोर इतर उपाय वापरण्यावर मर्यादा येतात. अशावेळी असंतुलन दूर करण्यासाठी फक्त दोनच परिणामकारक साधने शिल्लक राहतात व ती म्हणजेच मौद्रिक धोरण व वित्तीय धोरण. म्हणूनच देशात अंतर्गत व बाह्य संतुलन प्रस्थापित करण्यासाठी मौद्रिक व वित्तीय धोरण वापरण्याच्या पध्दतीलाच मुंडेल यांनी 'अभिहस्तांकन समस्या' असे म्हटलेले आहे म्हणून मुंडेल यांचा हा नियम 'अभिहस्तांकन प्रतिमान' या नावाने देखिल ओळखला जातो.

हा सिध्दांत पुढील आकृतीद्वारे अभ्यासता येईल.



आकृती क्र. २.२

आकृतीत x अक्षावर राजकोषिय किंवा वित्तीय धोरण तर Y अक्षावर मौद्रिक धोरणाची बाजु विचारात घेतली आहे. IB हा अंतर्गत समतोलाचा तर EB हा बहीर्गत समतोलाचा वक्र असून हा वक्र B या वक्रापेक्षा लवचिक आहे. कारण वित्तीय धोरणापेक्षा मौद्रिक धोरणाची परिणामकारकता सुरुवातीस जास्त दिसून येते.

E हा IB व EB या दोन्ही वक्रांचा छेदन बिंदू असून या बिंदूत एकाचवेळी अंतर्गत व बाह्य संतुलनाची अट पूर्ण झालेली आहे. आकृतीचे पुढील चार विभागात वर्गीकरण करता येईल.

1) विभाग I : चलनवाढ आणि व्यवहारतोल वाढावा.

2) विभाग II : चलनवाढ आणि व्यवहारतोल तूट.

3) विभाग III : बेरोजगारी आणि व्यवहारतोल तूट

4) विभाग IV : बेरोजगारी आणि व्यवहारतोल वाढावा.

असमतोल दुरुस्तीसाठी पुढील धोरणात्मक उपाययोजना सुचविता येतील.

विभाग	असंतूलन (समस्या)	मौद्रिक धोरण	वित्तीय धोरण
I	चलनवाढ आणि वाढावा	विस्तारक	संकुचनकारी
II	चलनवाढ आणि तूट	संकुचनकारी	संकुचनकारी
III	बेरोजगारी आणि तूट	संकुचनकारी	विस्तारक
IV	बेरोजगारी आणि वाढावा	विस्तारक	विस्तारक

परंतु जगातील बहुतांश देशात मौद्रिक धोरण व वित्तीय धोरण हे अनुक्रमे मध्यवर्ती बँक आणि सरकार अशा दोन वेगवेगळया अधिसत्तांमार्फत राबविले जात असल्याने त्यामध्ये सुसंगतपणा व समायोजनक्षमतेचा अभाव दिसून येतो.

२.७ मुंडेल - फ्लेमिंग प्रतिमान (Mudell - Fleming Model)

हे प्रतिमान मुंडेल व फ्लेमिंग यांनी एकत्रितरित्या मांडले म्हणूनच हे प्रतिमान मुंडेल-फ्लेमिंग प्रतिमान या नावाने ओळखला जातो. या प्रतिमानात IS, LM व BP तंत्राचा वापर केला जातो. त्यातील IS वक्र वित्तीय धोरण, LM वक्र मौद्रिक धोरण व BP वक्र हा व्यवहारतोलाची बाजू स्पष्ट करतो. हे पुढील आकृतीवरुन दाखविता येते.



आकृती क्र. २.३

वरील आकृतीत E या बिंदूत IS आणि LM हे वक्र परस्परांना छेदून जातात म्हणूनच E हा समतोलाचा बिंदू असून या संतूलन बिंदूत अंतर्गत समतोल प्रस्थापित होऊन संतुलित व्याजदर OR व संतुलित राष्ट्रीय उत्पन्न OY असे निश्चित झाले आहे.

E हा बिंदू BP वक्राच्या डाव्या बाजुला वरच्या दिशेला दिसून येतो म्हणजेच हा बिंदू अर्थव्यवस्थेतील व्यवहारतोलातील वाढाव्याची परिस्थिती दर्शवितो.

वरील परिस्थितीत जर अर्थव्यवस्थेला एकाचवेळी अंतर्गत व बाह्य समतोल प्रस्थापित करायचा असेल तर पुढील चार शक्यता विचारात घेणे आवश्यक आहे.



आकृती क्र. २.४



आकृती क्र. २.५

आकृतीच्या 'A' भागात असे दिसून येते की विनिमय दरात सकारात्मक बदल घडून आल्याने BP वक्र वरच्या बाजुस सरकून E या बिंदूतून IS व LM वक्राच्या मुळ संतुलनाला छेदून जाते म्हणजेच E बिंदूत IS, LM व BP असा संयोग झाल्याने अर्थव्यवस्थेत एकाचवेळी अंतर्गत व बाह्य संतुलन प्रस्थापित झालेला दिसून येतो.

आकृतीच्या 'B' भागात असे दिसून येते की विस्तारीत मौद्रिक धोरणाचा एक भाग म्हणून मध्यवर्ती बँकेने व्याजाचे दर जर कमी केल्यास LM वक्र हा E या संतुलन बिंदूवरुन उजवीकडे पुढच्या दिशेने LM_1 असा सरकुन E_1 बिंदूत पुन्हा एकदा IS, LM_1 व BP हे एकत्रित येऊन अर्थव्यवस्थेत एकाचवेळी अंतर्गत व बहिर्गत संतुलन प्रस्थापित झालेला आहे.

आकृतीच्या 'C' भागात असे दिसून येते की, वित्तीय धोरणाचा एक भाग म्हणून सरकारने विस्तारक राजकोषिय धोरणाचा स्विकार केल्यास त्याचा परिणाम म्हणून IS वक्र E बिंदूवरुन उजव्या बाजूला वरच्या दिशेने IS_1 असा सरकून E_1 बिंदूत स्थिरावतो. E_1या नवीन संतुलन बिंदूत पुन्हा एकदा अंतर्गत व बहिर्गत संतुलन प्रस्थापित होतो.

आकृतीच्या 'D' भागात भांडवल पूर्ण गतिशील असतांना मौद्रिक व राजकोषिय धोरणाची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. BP हा वक्र X अक्षास समांतर दर्शविण्यात आलेला असून E ह्या मूळ संतूलनात IS, LM व BP ही ह्यांच्या संयोगाची अट पूर्ण होऊन अर्थव्यवस्थेत अंतर्गत व बाह्य संतुलन प्रस्थापित होऊन राष्ट्रीय उत्पन्न OY असे निर्माण झालेले दिसून येतो. अशा परिस्थितीत मध्यवर्ती बँकेने विस्तारित मौद्रिक धोरणाचा स्विकार केल्यास LM हा उजव्या बाजून LM_1 असा सरकतो तसेच सरकारने विस्तारित वित्तीय धोरणाचा अवलंब केला तर IS वक्र हा IS_1 असा उजव्या बाजुला सरकतो.

मूळ BP वक्र आणि नवीन IS_1 व LM_1 हे तिन्ही वक्र परस्परांना E_1 या नविन संतूलन बिंदूत छेदून जातात व या बिंदूत अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नात OY वरुन OY_1 अशी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येऊन अर्थव्यवस्थेत पुन्हा एकदा अंतर्गत व बाह्य संतुलन प्रस्थापित होतो. व अर्थव्यवस्था राष्ट्रीय उत्पन्नाची वरची पातळी गाठण्यास यशस्वी होते.

आपली प्रगती तपासा :

१) संमिश्र धोरण ही संकल्पना स्पष्ट करा.

२) संमिश्र धोरणाच्या पुढील प्रतिमानांवर थोडक्यात टिप लिहा.

अ) मीडचे प्रतिमान

ब) मुंडेलचे प्रतिमान

क) मुंडेल-फ्लेमिंग प्रतिमान

२.८ सारांश

१) अर्थव्यवस्थेत पुढील दोन प्रकारचे समतोल दिसून येतात.
   अ) आंतरिक (अंतर्गत) समतोल.
   ब) बहिर्गत (बाह्य) समतोल.

२) अंतर्गत समतोल म्हणजेच पूर्ण रोजगार व किंमत स्थैर्य होय.

३) बाह्य समतोल म्हणजेच व्यवहारतोलातील समतोल होय.

४) अंतर्गत व बाह्य संतुलन प्रस्थापित करण्यासाठी पुढील दोन प्रकारची साधने वापरली जातात.
   अ) व्यय परिवर्तनकारी धोरणे.
   ब) खर्च बद्दल घडवून आणणारी धोरणे.

५) व्यय परिवर्तनकारी धोरणे पुढील दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

अ) मौद्रिक (चलन विषयक) धोरण.

ब) वित्तीय (राजकोषिय) धोरण.

६) खर्चात बदल घडवून आणणारी धोरणे पुढील दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

अ) अवमूल्यन.

ब) प्रत्यक्ष नियंत्रणे.

७) मौद्रिक धोरण ही देशातील मध्यवर्ती बँकेची जबाबदारी आहे.

८) वित्तीय धोरण हे सरकार मार्फत राबविले जाते.

९) मीडचे प्रतिमान अर्थव्यवस्थेतील अंतर्गत व बाह्य संतुलन एकाचवेळी साध्य करण्यासाठी अर्थव्यवस्थेस खर्च समायोजन धोरण व खर्च बदल घडवून आणणारे धोरण एकाचवेळी वापरण्याचे स्पष्ट करतो.

१०) मुंडेल चे प्रतिमान असे स्पष्ट करते की अंतर्गत व बाह्य समतोल साह्य होण्यासाठी मौद्रिक व वित्तीय धोरणाच्या एकाचवेळी अवलंब करण्यावर भर देते.

११) मुंडेल-फ्लेमिंगच्या मते IS, LM व BP यातील समानता अंतर्गत व बहिर्गत समतोल साध्य करण्यास मदत करते.

२.९ प्रश्न

१) अंतर्गत व बाह्य संतुलनात खर्च बदल धोरणाची भूमिका स्पष्ट करा.

२) अंतर्गत व बाह्य समतोल प्रस्थापित करण्यात मौद्रिक धोरणाची भूमिका स्पष्ट करा.

३) अंतर्गत व बाह्य समतोल प्रस्थापित करण्यात वित्तीय धोरणाची भूमिका स्पष्ट करा.

४) खालील प्रश्नांवर थोडक्यात टिपा लिहा.

अ) खर्च बदल धोरण

ब) मौद्रिक धोरण

क) रोजकोषिय धोरण

५) मीडचे प्रतिमान सविस्तर स्पष्ट करा.

६) अंतर्गत व बाह्य संतुलन साह्य करण्यात मुंडेलच्या प्रतिमानाचे योगदान लिहा.

७) मुंडेल-फ्लेमिंगचे प्रतिमान सविस्तर स्पष्ट करा.

*****

३

प्रकरण - २
आर्थिक एकात्मीकरण - I

घटक रचना

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ आर्थिक एकात्मीकरणाच्या लोकप्रियतेची कारणे
३.३ आर्थिक एकात्मीकरणाचे प्रकार
३.४ मुक्त व्यापार आणि सुरक्षित व्यापार
३.५ प्रादेशिक व्यापार गट - संकल्पना व उदाहरणे
३.६ युरोपिय संघ (EU)
३.७ उत्तर अमेरीकेचा मुक्त व्यापारी करार (NAFTA)
३.८ सारांश
३.९ प्रश्न

३.० उद्दिष्ट्ये

१) आर्थिक एकात्मीकरण या संकल्पनेचा अभ्यास करणे.
२) आर्थिक एकात्मीकरणाच्या लोकप्रियतेच्या कारणांचा अभ्यास करणे.
३) आर्थिक एकात्मीकरणाच्या विविध प्रकारांचा अभ्यास करणे.
४) संरक्षणवाद आणि व्यापारी उदारीकरणाचा अर्थ समजावून घेणे.
५) प्रादेशिक आर्थिक सहकार्याचे विविध प्रकार समजून घेणे.
६) युरोपिय संघाचा अभ्यास करणे.
७) उत्तर अमेरीकेचा मुक्त व्यापार करार जाणून घेणे.

३.१ प्रस्तावना

आर्थिक एकात्मीकरण ही संकल्पना समजण्यापूर्वी आर्थिक उदारीकरण ही संकल्पना जाणून घेणे आवश्यक ठरते. आर्थिक उदारीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये अर्थव्यवस्थेत काही रचनात्मक बदल घडवून आणले जातात. आर्थिक उदारीकरणात पुढील प्रमुख बदल अंतर्भूत असतात.

i) तांत्रिक सुधारणा.

ii) व्यापारविषयक, मौद्रिक, राजकोषिय, किंमतविषयक आणि औद्योगिक धोरणातील बदल.

iii) अर्थव्यवस्था विदेशी गुंतवणूकीसाठी खुली करणे.

iv) परवाना पध्दती रद्द करणे.

v) निर्यातीला प्रोत्साहन देणे इ.

आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेवरील सर्व निर्बंध शिथील करुन अर्थव्यवस्थेला जागतीक स्वरुप प्राप्त करुन देणे अपेक्षित असते. आर्थिक उदारीकरणामुळे मुक्त अर्थव्यवस्था जागतिक एकात्मीकरणाच्या दृष्टीने वाटचाल करण्यास सक्षम बनू लागतात.

दुसऱ्या महायुध्दात बेचिराख झालेल्या अर्थव्यवस्थांच्या पुनर्वसन व पुर्नविकासासाठी प्रत्येक देशाने संरक्षणात्मक धोरणाचा अवलंब करुन आयातीवर मोठ्या प्रमाणात निर्बंध व निर्यातीला प्रोत्साहन असे धोरण स्विकारले. परंतु अशा प्रकारच्या 'जशास-तसे' (Tit for Tat) धोरणामुळे विदेशी व्यापार वाढण्याऐवजी तो घटू लागला. त्यामुळे स्पर्धाक्षमता, कार्यक्षमता, उत्पन्न आणि रोजगार यावर विपरीत परिणाम घडून आले. या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी व्यापारावरील जकाती शिथील करुन आर्थिक शिथीलीकरणाची गरज निर्माण झाली. यामुळे व्यापारीवरील निर्बंध शिथील करुन प्रादेशिक व जागतिक पातळीवर आर्थिक एकात्मीकरणासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले. युरोपचा समुदाय (EU), NAFTA, ASEAN, OPEC, SAARC हे प्रादेशिक आर्थिक एकात्मीकरणाचे काही प्रमुख उदाहरणे सांगता येतील तर GATT की जे कालांतराने WTO मध्ये रुपांत्रीत झाले हे बहुपक्षीय आर्थिक एकात्मीकरणाचे प्रमुख उदाहरण मानता येईल.

३.१.१ आर्थिक एकात्मीकरण - संकल्पना:

''प्रादेशिक आर्थिक एकात्मीकरण म्हणजेच विकसनशील देशातील व्यापार वाढीची एक अभिनव कल्पना होय.''

आर्थिक एकात्मीकरण ही संकल्पना वेगवेगळया पध्दतीने मांडण्यात आलेली आहे. काही अर्थतज्ञांना आर्थिक एकात्मीकरणाचा अर्थ सामाजिक, आर्थिक व राजकीय एकात्मीकरण असा अभिप्रेत आहे.

काही अर्थतज्ञांच्या मते आर्थिक एकात्मिकरण हे दोन किंवा दोनापेक्षा जास्त देशांनी व्यापारावर आकारली जाणारी कृत्रिम नियंत्रणे रद्द किंवा शिथील करण्याची प्रक्रिया आहे.

टींबरजेन यांच्या मते, ''आर्थिक एकात्मीकरण ही एक अशी आदर्श रचना आहे की, ज्यामध्ये अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापारावरील सर्व नियंत्रणे काढुन परस्पर सहकार्यातून विकास साधणे होय.''

आर्थिक एकात्मीकरणाची वरील संकल्पना मांडतांना टींबरजेन यांनी आर्थिक एकात्मीकरणाचे 'सकारात्मक आर्थिक एकात्मीकरण' आणि 'नकारात्मक आर्थिक एकात्मीकरण' असे दोन प्रकारात वर्गीकरण केले. सकारात्मक आर्थिक एकात्मीकरण म्हणजेच अर्थव्यवस्थेच्या रचनेत सुधारणा घडवून आणणे व बाजारपेठेतील अपूर्णता दुर करण्याच्या हेतूने धोरणांचे परीक्षण करणे होय. तर नकारात्मक आर्थिक एकात्मीकरण म्हणजेच व्यापारी गटातील सभासद राष्ट्रांच्या वस्तू व सेवांवरील जकात व बिगरजकात नियंत्रणे हटविणे होय.

३.२ आर्थिक एकात्मीकरणाच्या लोकप्रियतेची कारणे

आर्थिक एकात्मीकरण आणि वित्तीय पध्दत यामध्ये आंतरसंबंध आहे. विकसित देशांकडून विकासनशील देशात मदतीचा प्रवाह वाढावा, विकसनशील देशातील उत्पादन, रोजगार यावर अनुकूल परीणाम व्हावा या दृष्टीने आर्थिक एकात्मीकरणाची गरज निर्माण झाली. व त्यातूनच ही संकल्पना अधिक लोकप्रिय बनली.

आर्थिक एकात्मीकरणाच्या लोकप्रियतेची काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

i) बाजारपेठांचा विस्तार :

आर्थिक एकात्मीकरणामुळे देशातील स्थानिक बाजारपेठांच्या कक्षा रुंदावतात. स्वदेशापुरता मर्यादीत असलेला व्यापार राजकीय सीमारेषा ओलांडून आंतरराष्ट्रीय किंवा प्रादेशिक व्यापारात प्रवेश करीत असल्याने स्थानिक बाजारपेठांचा विस्तार घडून येण्यास मदत होते.

ii) उत्पादनातील मितव्ययता :

प्रादेशिक आर्थिक एकात्मीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जात असल्याने विशेषिकरणाचे लाभ मिळून उत्पादनातील अंतर्गत व बाह्य मितण्ययता वाढते.

iii) विशेषिकरणाचे फायदे :

आर्थिक एकात्मीकरणाचा परीणाम म्हणून स्थानिक बाजारपेठांचा विकास घडून येणे, महत्तम उत्पादनाचे लाभ मिळणे, उत्पादन खर्च कमी होणे, अंतर्गत व बाह्य

मितव्ययता वाढणे असे लाभ मिळून देशात विशेषिकरणासाठी पोषक परीस्थिती निर्माण होऊन सहभागी देशांना विशेषिकरणाचे लाभ मिळू लागतात.

iv) नैसर्गिक साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर :

आर्थिक एकात्मीकरणामुळे वस्तू व सेवांची मागणी वाढून उत्पादनाचे प्रमाण वाढवावे लागते. अशावेळी देशातील नैसर्गिक साधनसामग्री उत्पादनकार्याकडे वळविली जाते व पूर्ण रोजगार साह्य होण्यास मदत होते.

v) उत्पादनाच्या प्रमाणात वाढ :

पूर्ण रोजगारामुळे देशातील उत्पादनाचे घटक पर्याप्त प्रमाणात उत्पादक कार्यांकडे वळविले गेल्याने उत्पादनाच्या प्रमाणात वाढ होऊन महत्तम उत्पादनाचे उद्दिष्ट साह्य करता येते.

vi) उत्पादन खर्च आणि किंमत रचनेत बदल :

व्यापाराच्या आधुनिक सिध्दांतांनुसार ज्या देशात ज्या वस्तूच्या उत्पादनात येणारे खर्चाचे प्रमाण कमी असेल तो देश त्या संबंधित वस्तू उत्पादनात विशेषिकरण करु शकतो. उत्पादन खर्च कमी असल्याने वस्तूच्या किंमती देखिल कमी राहून उत्पादन खर्च व किंमत रचनेत अनुकूल बदल दिसून येतात.

vii) परस्पर व्यापारी लाभ :

आर्थिक एकात्मीकरणात एका देशाला प्राप्त होणारे फायदे इतर सभासद राष्ट्रांना देखिल मिळत असल्याने परस्परांना व्यापारापासून मिळणाऱ्या फायद्यांचा लाभ घेता येतो.

viii) उपभोक्तांच्या संतोषाधिक्यात वाढ :

आर्थिक एकात्मिकरणापूर्वी देशातील उपभोक्त्यांना स्वदेशी वस्तू अधिक किंमत देऊन खरेदी करावी लागते. परंतु आर्थिक एकात्मीकरणामूळे सभासद राष्ट्र परस्परांवरील आयातीवरील जकाती कमी किंवा रद्द करीत असल्याने स्वदेशी उपभोक्त्यांना कमी किंमतीत वस्तू खरेदी करता येते. त्यामुळे त्यांच्या संतोषधिक्यात वाढ घडून येते.

ix) कार्यक्षमतेत व स्पर्धाक्षमतेत वाढ :

आर्थिक एकात्मीकरणातून देशा-देशांमधील स्पर्धाक्षमता वाढून सभासद राष्ट्रांतील उत्पादनातील कार्यक्षमतेत सुधारणा घडून येतात.

x) राहणीमान दर्जा ऊंचावण्यास मदत :

उच्च स्पर्धाक्षमता, कार्यक्षमता, उत्पादनवृध्दी, संतोषाधिक्यात वाढ, विशेषिकरण या सर्वांमुळे सभासद देशातील नागरीकांच्या राहणीमानाचा दर्जा ऊंचावतो.

xi) आर्थिक विकास व आर्थिक कल्याण :

व्यापारात घडून आलेली वाढ ही देशातील दरडोई उत्पन्न, राष्ट्रीय उत्पन्न, राहणीमानाचा दर्जा यावर अनुकूल परीणाम घडवून आणते. व हे आर्थिक विकासाचे एक प्रमुख लक्षण मानले जाते.

वरील सर्व फायद्यांचा एकत्रित परीणाम म्हणून सभासद राष्ट्रांमधील लोकांच्या सामाजिक व आर्थिक कल्याणात वाढ घडवून येण्यास मदत होते.

३.३ आर्थिक एकात्मीकरणाचे प्रकार

आर्थिक एकात्मीकरणाचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) आर्थिक संघ - (Economic Union)

२) सीमा शुल्क संघ - (Custom Union)

३) खुला व्यापार क्षेत्र / मुक्त व्यापार क्षेत्र (Free Trade Area)

४) क्षेत्रीय / आंशिक एकात्मीकरण - (Sectoral / Partial Integration)

५) अधिमान्य / प्राधान्य व्यापारीकरण - (Preferential Trading Agreement)

६) दीर्घकालीन व्यापारी करार - (Long-Term Trade Agreement).

वरील प्रकारांची थोडक्यात ओळख पुढीलप्रमाणे -

१) आर्थिक संघ : (Economic Union - E. U.):

आर्थिक संघ ही परीपूर्ण एकात्मीकरणाची बाब समजली जाते. 'युरोपीय सामाईक बाजारपेठ (European Common Market) हे आर्थिक संघाचे एक उत्तम उदा. समजले जाते. श्रम, भांडवल आणि सेवांच्या मुक्त हालचालींवर निर्बंध घालणारे कायदे रद्द करणे, सामाईक वाहतूक व्यवस्था, सामाईक कृषिविषयक धोरण आखणे, सामाईक मौद्रीक धोरण, सामाईक अंदाजपत्रकीय धोरण, एकच विकास बँकेची निर्मिती, सामाईक चलन या पायाभूत तत्वांवरच आर्थिक संघाची उभारणी केली जाते. या प्रकारात सभासद देशांना स्वतःच्या देशातील धोरणे रद्द करावी लागतात कारण संपूर्ण क्षेत्रात शेवटी एकच समान धोरण लागू होते.

आर्थिक संघाचे फायदे :

१) सभासद राष्ट्रांमध्ये व्यापारबंधने काढल्यामुळे अधिक चांगले साधन सामग्रीचे वाटप होते.

२) तांत्रिक बदल आणि वाढीव भांडवलाचा ओघ यामुळे उत्पादन घटकांची गुणवत्ता वाढण्यास मदत होते.

३) मोठ्या उत्पादनाचे फायदे मिळतात.

४) व्यापाराचे आकारमान वाढते.

५) आर्थिक क्षमता वाढल्याने सभासद देशांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करता येत

६) सभासद देशांमध्ये उत्पादन घटकांचे स्थलांतर सहज होण्यास मदत होते.

७) समान वित्तीय धोरण व एकत्रित चलन धोरणाचे सभासद देशांना फायदे मिळतात.

८) स्वस्त दरात उत्कृष्ट व दर्जेदार वस्तू उपलब्ध होतात.

९) राष्ट्रीय उत्पन्न वाढुन जनतेचे राहणीमान सुधारते.

१०) सभासद देशांना पूर्ण रोजगार, आर्थिक वृध्दी, संपत्तीतील विषमता कमी करणे अशी समान उद्दिष्टे पुर्ण करता येतात.

२) सीमा शुल्क संघ / जकात संघ : (Custom Union - C. U.):

यामध्ये सहभागी झालेले सभासद देश समान परकीय जकात स्वीकारतात आणि समान आयातविषयक धोरण राबवितात. ही सभासद राष्ट्रे आपापसात व्यापार करतांना जकाती लादत नाहीत. सर्व देश एकसंघ स्वरुपात परकीय व्यापार असला तरी देशांतर्गत व्यापार असल्याप्रमाणे व्यापार करतात.

या प्रकारात सभासद देशांना परस्पर व्यापारावरील प्रशुल्क व इतर निर्बंध अत्यंत कमी किंवा समाप्त करावे लागतात. परंतु त्याचवेळी जकात संघाबाहेरील असभासद राष्ट्रांच्या व्यापारावर समान प्रशुल्क लावावे लागतात.

३) खुला / मुक्त व्यापार क्षेत्र : (Free Trade Area - F.T.A.):

या प्रकारात एकात्मीकरणाचे स्वरुप अधिक शिथील किंवा सैल असते. सभासद देश आपापसात होणाऱ्या व्यापारावरील बहुतांश जकात व बिगर जकात नियंत्रणे कमी करतात किंवा समाप्त करतात. मात्र प्रत्येक देशाला क्षेत्राबाहेरील इतर असभासद देशांशी होणाऱ्या व्यापारावर इच्छेने प्रशुल्क किंवा निर्बंध लावण्याचे स्वातंत्र्य असते.

जकात संघ आणि खुला व्यापार क्षेत्र यात प्रमुख फरक म्हणजेच जकात संघात सभासद देश इतर असभासद देशांशी होणाऱ्या व्यापारावर समान प्रशुल्कविषयक

धोरण स्विकारतात याउलट खुला व्यापार क्षेत्रात बाह्य जगातील असभासद राष्ट्रांवर जकातीचे दर ठरविण्याचा अधिकार प्रत्येक देशाला असून तो वेगवेगळा असु शकतो.

खुला व्यापार क्षेत्राची जगातील काही प्रमुख उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील.

उदा. युरोपीय मुक्त व्यापार क्षेत्र (European Free Trade Association - EFTA) उत्तर अमेरीकन मुक्त व्यापार क्षेत्र (North American Free Trade Area - NAFTA), लॅटीन अमेरिकन मुक्त व्यापार क्षेत्र - (Latin American Free Trade Area - LAFTA)

४) क्षेत्रीय किंवा आंशिक एकात्मीकरण (Sectoral or Partial Integration):

या चवथ्या प्रकारात एखाद्या किंवा काही विविध वस्तूंची सामाईक बाजारपेठ स्थापन केली जाते. युरोपीय कोळसा आणि पोलाद समुदाय (European Coal & Steel Community-ECSC) आणि युरोपीय अणुशक्ती समुदाय ही आंशिक एकात्मीकरणाची प्रमुख उदाहरणे होत.

५) अधिमान्य किंवा प्राधान्य व्यापार करार : (Preferential Trading Agreement)

या प्रकारात सभासद देश प्रशुल्क आणि इतर परिणात्मक निर्बंध याबाबतीत परस्पर अधिक उदार धोरण स्वीकारतात. 'साम्राज्य अभिमान' (Imperial Preference) आणि 'सध्याचे राष्ट्रकूल' अधिमान (Commonwealth Preference) हे या प्रकारचे आर्थिक सहकार्याचे उत्तम उदाहरण होय. युरोपीयन आर्थिक सहकार्य संघटना (Organisation of Europen Economic Cooperation - OEEC) आणि युरोपीय सहकार्य आणि विकास संघटना (Organisation for European Co-Operation & Development - OECD) ही अलीकडील उदाहरणे आहेत.

६) दीर्घकालीन व्यापारी करार : (Long Term Trade Agreement):

या शेवटच्या प्रकारात दोन देश काही विक्रेय वस्तूंच्या व्यापाराबाबत द्विपक्षीय करार करतात. करारांची मुदत १ ते ५ वर्षांपर्यत किंवा आणखी जास्त असू शकते. यामुळे जागतिक बाजारातील घटना आणि चढउतार यांच्या दुष्परिणामांपासून दोन्ही देशांना संरक्षण मिळते. उत्पादनाच्या योजना आखता येतात. आर्थिक सहकार्याचा हा अत्यंत शिथिल असा प्रकार.

आदर्श व्यवस्थेच्या जागतिक पातळीवर आर्थिक सहकार्य हाच संपूर्ण महत्तम आर्थिक कल्याण साधणारा पहिला उत्तम उपाय मानला जातो. परंतु अशी अवस्था

उभारणे सध्या तरी शक्य नसल्याचे स्पष्ट आहे. म्हणूनच बहुतांश राष्ट्रे आता प्रादेशिक पातळीवर जमेल तेवढ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य करण्याचा द्वितीय उपाय स्वीकारीत आहेत. आणि GATT ही संघटना नाखुशीने का असेना परंतु संमती देत आहे. प्रादेशिक पातळीवरील आर्थिक सहकार्य आता केवळ व्यापारापर्यंत सीमित राहिले नसुन अधिदानाच्या क्षेत्रातही सुरु झाले आहे. अशा आर्थिक सहकार्याचे आणि त्यात अभिप्रेत असलेल्या एकात्मीकरणाचे फायदे काय ? यांचा विचार झाला पाहिजे.

३.४ मुक्त व्यापार आणि संरक्षित व्यापार

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात व्यापारी धोरणाचे महत्त्व अनन्यसाधारण असते, कारण या व्यापार धोरणावरच आंतरराष्ट्रीय व्यापार अवलंबून असतो. व्यापार विषयक धोरण हा आर्थिक धोरणाचाच एक भाग आहे. अपेक्षित परिणाम साह्य करण्यासाठी या धोरणाची आखणी केली जाते. देशाच्या अंतर्गत परिस्थितीचा विचार करुन आर्थिक धोरणाशी सुसंगत अशा व्यापार धोरणाची आखणी केली जाते. आर्थिक विकासासाठी व्यापार या साधनाचा वापर करायचा असेल तर त्यासाठी कोणत्या तंत्राचा वापर करायचा, कोणते तंत्र देशाला हितकारक व कोणते अहितकारक याचा विचार करावा लागतो त्यासाठी मुक्त व्यापार धोरण (Trade Libralism / Free Trade) योग्य की संरक्षित व्यापार धोरण (Protection Policy) योग्य की, दोघांचा समन्वय योग्य याचा निर्णय शासनाला घ्यावा लागतो. म्हणूनच व्यापार धोरणांच्या पुढील दोन पध्दतींचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

अ) मुक्त व्यापार धोरण (Free Trade Policy)

ब) संरक्षित व्यापार धोरण (Protection Policy)

अ) मुक्त व्यापार धोरण:

मुक्त व्यापार धोरणाचा पुरस्कार सनातनपंथी अर्थतज्ञांनी केला. मुक्त व्यापार धोरणालाच खुले व्यापार धोरण किंवा व्यापार उदारीकरण (Trade Liberalism) असेही म्हटले जाते. परकीय व्यापारात ज्यावेळी सरकारची कोणत्याही प्रकारची बंधने नसतात त्याला मुक्त व्यापार म्हणतात. मुक्त व्यापार धोरणात देशांतर्गत व्यापार आणि आंतराष्ट्रीय व्यापार असा भेदभाव केला जात नाही. मुक्त व्यापार ही संकल्पना समजून घेण्यासाठी अर्थतज्ञांनी दिलेल्या व्याख्या पाहणे आवश्यक आहे.

मुक्त व्यापाराच्या व्याख्या:

१) 'मुक्त व्यापार धोरणात देशी आणि परदेशी व्यापार असा भेद केला जात नाही. त्यांना कोणत्याही प्रकारचे विशेष प्राधान्य दिले जात नाही'.

-ॲडम स्मिथ

२) ''जगात मुक्त व्यापारात कोणतीही जकात नसते आणि आयात किंवा निर्यातीवर कोणतेही निर्बंध नसतात. जगातील सर्व देश सर्व वस्तूंची आयात करु

शकतात. ते त्यांच्या देशातील उत्पादनाचा खर्च हस्तांतरणासाठी कमी किंमतीत मोठ्या प्रमाणात खरेदी करु शकतात''.

-लिप्से (Lipsey)

३) ''ज्या व्यापाराच्या धोरणात आयात-निर्यातीवर कोणत्याही जकाती नसतात, ठराविक परिमाणे (Quota) ठरवले जात नाहीत, चलनाच्या देवाण-घेवाणीवर कसलेही निर्बंध नसतील, कोणतेही कर नसतील तसेच सरकारकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळत नसेल त्यास मुक्त व्यापाराचे धोरण असे म्हणतात''.

- प्रा. जगदीश भगवती

काही विचारवंतांच्या मते मुक्त व्यापार धोरण देशाला लाभदायक असते, तर काहींच्या मते हानीकारक असते. म्हणूनच मुक्तव्यापाराचे फायदे व तोटे यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

मुक्त व्यापाराच्या बाजुने युक्तीवाद:

i) विशेषिकरणातून महत्तम उत्पादनाचे फायदे मिळतात.

ii) उत्पादन साधनांचा कार्यक्षम वापर.

iii) स्वस्त आयात.

iv) स्पर्धाक्षमतेत वाढ.

v) अकार्यक्षम उद्योगांचा ऱ्हास.

vi) उपभोक्त्यांच्या संतोषाधिक्यात वाढ.

vii) मक्तेदारीवर प्रतिबंध.

viii) बाजारपेठांचा विस्तार.

ix) आंतराष्ट्रीय सहकार्यात वाढ.

x) विकसनशील देशांच्या आर्थिक विकासात वाढ.

मुक्त व्यापाराच्या विरोधी युक्तीवाद:

i) अनावश्यक व गौण वस्तूंचे उत्पादन.

ii) विकसनशील देशांची पिळवणूक.

iii) गळेकापू स्पर्धा आणि अवपुंजन (Dumping).

iv) राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय मक्तेदारी.

v) आर्थिक अवलंबित्व वाढते.

vi) वसाहतवादाला प्रोत्साहन मिळते.

vii) उपद्रवी आणि आरोग्यास विघातक वस्तूंची आयात.

viii) व्यापारचक्रे निर्माण होऊन अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण होतो.

ix) विकसित आणि अविकसित देशांतील अंतर वाढते.

x) व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाची असंतूलीत विभागणी.

ब) संरक्षित व्यापार धोरण :

देशाच्या जलद आर्थिक विकास व स्वदेशातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी संरक्षणाचा अवलंब १९७१ मध्ये अमेरिकन अर्थतज्ञ अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी 'उत्पादकांच्या अहवालात' (Report on Manufacturers) नमूद केले. हेनरी कॅरी (Henry Ciary) या अर्थतज्ञाने रोजगाराच्या विविधीकरणासाठी संरक्षणाचे समर्थन केले. फेडरिक लिस्ट या जर्मन अर्थशास्त्रज्ञाने बालोद्योगांना संरक्षण देण्याचे मान्य केले.

वरील अर्थतज्ञांच्या संरक्षणवादाच्या कल्पना लवकरच लोकप्रिय झाल्या आणि अनेक देशांनी संरक्षणवादी व्यापार धोरणांचा स्विकार केला. या अनुषंगाने संरक्षणवादाच्या पुढील व्याख्यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

संरक्षित व्यापार धोरणाच्या व्याख्या :

१) 'ज्या व्यापारामध्ये स्वदेशी उद्योगांना विदेशी उद्योगांपासून संरक्षण दिले जाते. त्याला संरक्षित व्यापार धोरण असे म्हणतात'.

२) 'ज्या व्यापारात आयातीवर निर्बंध असतात, त्यास संरक्षण व्यापार धोरण असे म्हणतात'.

वरील व्याख्यांवरुन असे स्पष्ट होते की, देशांतर्गत उद्योगांना प्रोत्साहन देणे, विदेशी स्वस्त वस्तूंच्या स्पर्धेमुळे आयातशुल्क मोठ्या प्रमाणात आकारणे किंवा अतिरिक्त आयातीला पायबंद घालण्यासाठी आयातीवर निर्बंध घालणे किंवा संबंधित आयातीची ठराविक परिमाणे (Quota) ठरविणे अशा सर्वसाधारण पध्दती संरक्षणासाठी वापरली जातात.

संरक्षण धोरणाच्या बाजुने मते :

संरक्षित व्यापार धोरणाचे समर्थन पुढील दोन गटांत वर्गीकृत करता येतात.

आर्थिक युक्तीवाद	**आर्थिकतर युक्तीवाद**
i) बाल्यावस्थेतील उद्योगांना संरक्षण.	i) इतर देशांवरील अवलंबित्व कमी.
ii) व्यापार शर्तीत सुधारणा.	ii) देशाच्या सार्वभौमत्वास पोषक.

iii) अवपुंजनाविरोधी युक्तीवाद.

iv) उद्योगांचे विविधीकरण शक्य.

v) मुलभूत उद्योग विकासाला चालना.

vi) उगवत्या उद्योगांना संरक्षण.

iii) स्वदेशातील पैसा स्वदेशातच ठेवणे.

iv) अनावश्यक-चैनिच्या वस्तु आयातीला पायबंद.

v) देशाच्या वैशिष्ट्यांचे संवर्धन करणे.

vi) सरंक्षण साहित्य व शस्त्र निर्मिती उद्योगांचे स्वावलंबित्व वाढते.

vii) सरकारी महसुलात जकातीद्वारे वाढ.

viii) व्यापारतोल अनुकूल बनतो.

ix) रोजगार संधीत वाढ.

x) नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन.

xi) स्वस्त श्रमिकांची उपलब्धता.

xii) अंतर्गत बाजारपेठांचा विस्तार.

वरील गुणांबरोबरच संरक्षण व्यापार धोरणाचे पुढील काही दोष सुध्दा सांगितले जातात. संरक्षण धोरणाच्या विरोधी मते.

i) संरक्षणामुळे स्वदेशी उद्योग सुस्त, आळशी व अकार्यक्षम बनतात.

ii) संरक्षणाची सवय उद्योगांना परावलंबी व अपंग बनविते.

iii) संरक्षण मिळवून घेण्यासाठी अधिकारी वर्गावर राजकीय दबाव व भ्रष्ट मार्गांचा अवलंब केला जातो. त्यातून भ्रष्टाचार वाढतो.

iv) काही प्रभुत्व असलेल्या उद्योगांची मक्तेदारी निर्माण होते.

v) नैसर्गिक साधनसामग्रीचा अपव्यय व दुरुपयोग होतो.

vi) उत्पन्न आणि संपत्तीमध्ये विषमता निर्माण होते.

vii) निकृष्ट दर्जाच्या परंतु उच्च किंमतीच्या स्वदेशी वस्तूंचा अंतिम बोजा ग्राहकांवर पडतो.

viii) अधिक आयात शुल्क आकारल्याने उत्पादकांमध्ये निरुत्साह निर्माण होते पर्यायाने सरकारी महसुलात घट होते.

ix) इतर देशसुध्दा जकातीचे उत्तर जकाती वाढवून देत असतात. (Tit For Tat Policy)

x) आंतरराष्ट्रीय सहकार्याऐवजी द्वेष, मत्सर व संघर्ष निर्माण होऊन त्याचे पर्यावसन आंतराष्ट्रीय अशांततेत होते.

xi) मोठ्या प्रमाणातील आयात निर्बंधामुळे निर्यात घटून रोजगार संधी कमी होतात. परिणामत: बेकारी वाढते.

xii) संरक्षित धोरणामुळे आंतराष्ट्रीय व्यापारात घट घडून येते.

३.५ व्यापारी गट (Trade Blocks)

व्यापारी गट ही संकल्पना व्यापार वाढीचे समान उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून परस्पर सहकार्याच्या तत्त्वावर एकत्रित आलेल्या विविध राष्ट्रांच्या एकात्मीकरणावर आधारलेली आहे. व्यापारी गटाचे स्वरुप मुक्त व्यापारा प्रमाणेच असुन त्यात सभासद देशांनी परस्परांच्या व्यापारावरील कृत्रिम निर्बंध (प्रशुल्क व प्रशुल्केतर) कमी करणे किंवा पूर्णतः समाप्त करणे अपेक्षित आहे. व्यापारी गट हे जकात संघाचेच एक रुप असुन त्याद्वारे सभासद देशांवरील जकात नियंत्रणे काढुन इतर असभासद राष्ट्रांशी व्यापार करण्याविषयी एक समान धोरण आखले जाते.

या प्रकरणात आपण जागतिक स्तरावरील पुढील प्रमुख व्यापारी गटांचा अभ्यास करणार आहोत.

i) युरोपीय आर्थिक समुदाय (EEC) किंवा आर्थिक संघ (EU)
(European Economic Union or Economic Union)

ii) उत्तर अमेरीकन मुक्त व्यापारी करार - (NAFTA)
(North American Free Trade Agreement)

iii) आशिया-पॅसिफिक आर्थिक सहकार्य - (APEC)
(Asia-Pacific Economic Co-operative)

iv) दक्षिण आशियायी देशांचे आर्थिक संघटन - (ASEAN)
(Association of South East Nations)

v) प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियायी संघटना - (SAARC)
(South Asian Association For Regional Co-operation)

३.६ युरोपीय आर्थिक समुदाय (EEC) किंवा युरोपचा आर्थिक संघ (EU)

युरोपीय आर्थिक समुदायालाच (EEC) युरोपीय समुदाय (European Community - EC) किंवा आता युरोपीय संघ (European Union - EU) असेही म्हणतात. EEC ची स्थापना बेल्जियम, फ्रान्स, जर्मनी, इटाली, लक्झँबर्ग आणि नेदरलँड या सहा देशांनी केली त्यांनाच The Six असे म्हणतात. १९५७ मध्ये 'रोमच्या करारावर' (Treaty of Rome) स्वाक्षऱ्या करुन १ जानेवारी १९५८ मध्ये या देशांनी EEC ची स्थापना केली. सध्या EEC चे सभासद देशांची संख्या वाढुन ती २७ देश इतकी बनलेली आहे. त्यांनाच 'EU-27' या नावानेदेखिल ओळखले जाते.

EEC च्या स्थापनेची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

३.६.१ EEC च्या स्थापनेची उद्दिष्ट्ये:

१) EEC अंतर्गत सभासद देशांमधील प्रशुल्क, प्रशुल्केतर व इतर व्यापार निर्बंध व अडथळे दूर करणे.

२) सभासद राष्ट्रांमध्ये श्रमीक, भांडवल व सेवा यांची हालचाल मुक्त ठेवणे.

३) समुदयाबाहेरील असभासद देशांविषयी समान प्रशुल्क व समान व्यापारी धोरण राबविणे.

४) सामाईक वाहतूक व्यवस्था अंमलात आणणे.

५) सामाईक कृषीविषयक धोरण राबविणे.

६) सामाईक मौद्रिक धोरण व अंदाजपत्रकीय धोरण तयार करणे.

७) सामाईक युरोपीयन गुंतवणूक बँकेची स्थापना करणे.

८) सामाईक चलन अस्तित्वात आणणे.

९) सदस्य देशात रोजगाराच्या संधी वाढविण्याकरिता व राहणीमान उंचावण्याकरिता 'युरोपीय सामजिक कोषाची' स्थापना करणे.

१०) समुदयाची कार्यक्षमता वाढावी यासाठी देशांच्या कायद्यात एकरुपता आणणे.

३.६.२. EEC चे प्रशासकीय संघटन:

१) युरोपीय संसदीय व्यवस्थापिका (European Parliament) :

ही आवश्यक कायदे बनविण्याकरिता प्रत्येक देशाच्या संसदेद्वारे निवडलेल्या १९८ सदस्यांची व्यवस्थापिका आहे.

२) मंत्रिपरिषद (The Council of European Union):

या अंतर्गत EEC ने तयार केलेल्या धोरणांच्या अंमलबजावणीकडे लक्ष ठेवण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. मंत्रीपरिषदेची बैठक महिन्यातून किमान एकदा होते.

३) युरोपीय सभा (European Assembly):

या सभेला एका राष्ट्रीय संसदेसारखी भूमिका पार पाडावयाची होती व वेळोवेळी निर्माण होणाऱ्या समस्यांचे पुनर्विलोकन करावयाचे होते. २/३ बहुमताच्या पाठिंब्याने 'आयोग' या कार्यकारी संस्थेला राजीनामा देण्यास सांगण्याचा अधिकार ह्या सभेला देण्यात आला आहे.

४) युरोपीयन आयोग (European Commission):

संकुचित राष्ट्रीय भावनेने समाज हितावर आघात करणाऱ्या समस्यांकडे लक्ष देण्याचे प्रमुख कार्य करते.

५) न्यायालय : (Court of Justice)

युरोपीय समुदायासाठी सर्वोच्च न्यायिक संस्थेचे कार्य या न्यायालयाकडे सोपविण्यात आले.

६) आर्थिक व सामाजिक परिषद : (Economic & Social Committee):

ही सुध्दा एक परामर्श घेणारी संस्था असून हिच्यात गुंतवणूक, उपभोक्ता, श्रमिक, व इतर क्षेत्रातील प्रतिनिधी भाग घेतात. EEC चे आर्थिक व सामाजिक धोरणाचे सर्व अधिकार या परिषदेकडे सोपविण्यात आलेले आहेत.

७) उच्च अधिकरण : (European Ombudsman)

ह्या सर्व समस्या निवारणार्थ धोरण ठरविण्याचे व अंमलबजावणी करण्याचे कार्य करतो.

८) युरोपीय मध्यवर्ती अधिकोष : (European Central Bank)

ही युरोपीय समुदायाची सर्वोच्च मौद्रिक हक्क असलेली संस्था असून 'युरोचलन' (EURO) निर्मितीचा अधिकार या केंद्रीय बँकेकडे आहे. तसेच विदेशी चलनांचे व्यवहार करण्याची जबाबदारी या संस्थेकडे सोपविण्यात आलेली आहे.

९) लेखापाल समिती (Court of Auditors):

EEC च्या महसुल आणि खर्चाबाबतचे सर्व व्यवहार व्यवस्थित मांडणे व तपासण्याची मक्तेदारी या समितीकडे सोपविलेली आहे.

३.६.३ युरोपियन आर्थिक समुदायाचे कार्य :

EEC च्या स्थापनेनंतर EEC अंतर्गत करण्यात आलेली प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) सामान्य शेती धोरण :

या धोरणानुसार 'ग्रीन रेट' प्रत्येक देशात आधार किंमत योग्य ठेवून राष्ट्रीय किंमत ठरवली जाते. शेतकऱ्यांना उत्पादनासाठी स्वातंत्र्य देणे, उत्पादनाचा दर्जा राखणे इ. प्रमुख कार्ये करणे.

२) युरोपीय चलनविषयक संघ :

या संघाची स्थापना मार्च १९७९ मध्ये झाली. त्याचे स्वरुप पुढील प्रमाणे -

अ) विनिमय दर यंत्रणेअंतर्गत सभासद देशांचे व्याजदर वृध्दीवर नियंत्रण ठेवणे.

ब) युरोपीय चलन सहकार्य कायादान्वये चलन कार्यासाठी मध्यवर्ती बँक महत्वाचे काम करते.

क) मध्यवर्ती बँकेमार्फत 'समाशोधन गृहांची' सुविधा देण्यात आली.

ड) EEC च्या मागासलेल्या सभासद राष्ट्रांना कर्ज, कर्ज मुदतवाढ इ. ची खात्री देण्यासाठी 'युरोपियन गुंतवणूक बँक' कार्य करते.

इ) बेरोजगार श्रमिकांना रोजगार देणे, प्रशिक्षण देणे, दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी 'युरोपियन सामाजिक निधी' मार्फत उचलली जाते.

फ) मागास प्रदेशांचा विकास करण्यासाठी 'युरोपियन प्रादेशिक निधी' द्वारे मदत केली जाते.

ज) EEC अंतर्गत श्रमिक व भांडवलाच्या मुक्त हालचालीस गती प्राप्त झाली आहे.

३) सामान्य वाहतूक धोरण :

या धोरणाअंतर्गत विविध वाहतूक सुविधा तसेच समुद्राच्या वाहतूक पध्दतीतील अडथळे दुर करणे, तसेच संघटन व नियंत्रण करणे, समुदायाची वाहतूक कार्यक्षमता व परिणामकारकता वाढविणे इ. कार्ये करणे.

३.७ उत्तर अमेरिकेचा मुक्त करार - NAFTA

युरोपिय आर्थिक समुदाय (EEC) आणि जपान यांनी निर्माण केलेल्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी NAFTA ची स्थापना करण्यात आली. दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिकेने EEC च्या स्थापनेला मान्यता दिली परंतु EEC विषयी अमेरिकेच्या मनात साशंकतेची भावना निर्माण झाली त्यामुळेच EEC च्या साम्राज्याला आव्हान व प्रतिशह देण्यासाठी अमेरीकेने आपला मुक्त व्यापार स्थापन करायचे ठरविले.

NAFTA ची स्थापना :

आपल्या सदस्य राष्ट्रांमध्ये मुक्त व्यापारात वाढ करणे व EEC च्या मक्तेदारीचा सामना करण्यासाठी NAFTA ची स्थापना करण्यात आली १९६५ मध्ये

अमेरिका व कॅनडा यांच्यात एकद्विपक्षिय करार झाला. व या करारामध्ये स्वयंचलित यंत्रे, वाहने, वाहनांचे सुटे भाग यावरील जकातींमध्ये घट घडवून आणण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर २० वर्षांनी १९८५ मध्ये अमेरीका व कॅनडा यांच्यात परस्परांच्या अर्थव्यवस्था जोडण्याविषयी विशेष प्रयत्न करण्यात आले व या करारान्वये पुढील महत्त्वाच्या तरतूदी मान्य करण्यात आल्या.

i) पुढील १० वर्षात परस्परांमधील जकाती पूर्णपणे रद्द करणे.

ii) सेवा क्षेत्रातील व्यापार शिथिल करणे.

iii) अवमूल्यनाबाबत (Dumping) योग्य तो निर्णय घेणे.

डिसेंबर १९९२ मध्ये अशाच प्रकारचा करार अमेरिकेने मेक्सिकोबरोबर केला व त्यानुसार अमेरिका, मेक्सिको व कॅनडा यांचा उत्तर अमेरिकेतील मुक्त व्यापार करार (NAFTA) अस्तित्वात आला.

३.७.१ NAFTA च्या स्थापनेची उद्दिष्ट्ये :

NAFTA च्या स्थापनेची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) EEC च्या आव्हानाला सामोरे जाणे :

EEC च्या स्थापनेनंतर EEC च्या सभासद राष्ट्रांच्या निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ घडून आली. जपानची निर्यातदेखिल झपाट्याने वाढू लागली. परिणामतः अमेरिकेने स्वतःच्या प्रगतीसाठी आणि व्यापारासाठी तसेच EEC च्या स्पर्धेत आव्हान स्विकारण्यासाठी NAFTA ची स्थापना केली.

२) आर्थिक साधनांचा पुरेपुर व्यापार :

NAFTA करारानुसार ज्या देशात आर्थिक साधनसामुग्री उपलब्ध आहे. त्यांचा उपयोग करुन त्या क्षेत्रातील लोकांचा विकास घडवून आणण्याच्या उद्देश्याने NAFTA ची स्थापना करण्यात आली.

३) व्यापारात वाढ :

NAFTA च्या स्थापनेचा एक प्रमुख उद्देश म्हणजेच सभासद राष्ट्रांमधील मुक्त व्यापारात वाढ घडवून आणणे हा आहे. त्यासाठी परस्परांमधील जकातीचा दर कमी करणे व कालांतराने तो समाप्त करण्याचे बंधन आहे.

४) रोजगारात वाढ घडवून आणणे :

NAFTA च्या स्थापनेमुळे परस्पर सभासद राष्ट्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे.

५) वादनिवारण यंत्रणेची निर्मिती :

सभासद राष्ट्रांमधील वादविवाद मिटविण्यासाठी वादनिवारण यंत्रणा निर्माण करणे.

NAFTA करारान्वये व्यापार, कृषी, सेवा, विदेशी गुंतवणूक यावरील सर्व नियंत्रणे टप्प्या-टप्प्याने कमी करुन ते रद्द करण्याचे मान्य करण्यात आले आहे. जगातील सर्वात मोठ्या असलेल्या या मुक्त व्यापार गटातील तीन सभासद देशांचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे संपूर्ण जगाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळजवळ ३०% इतके आहे.

आपली प्रगती तपासा -

१) प्रादेशिक व्यापारी गट ही संकल्पना स्पष्ट करा.

२) युरोपीय आर्थिक समुदाय (EEC) यावर टिप लिहा.

३) NAFTA या व्यापारी गटावर टिप लिहा.

३.८ सारांश

१) आर्थिक एकात्मीकरण समजण्यासाठी आर्थिक उदारीकरण ही संकल्पना समजून घेणे.

२) आर्थिक एकात्मीकरण म्हणजेच दोन किंवा अधिक देशांच्या अर्थव्यवस्थांचे काही समान उद्दिष्ट पूर्ततांसाठी करण्यात येणारे एकत्रिकरण होय.

३) टिंबरजन यांच्या मते आर्थिक एकात्मीकरण हे आंतराष्ट्रीय अर्थव्यवस्थांच्या अधिक उपयुक्त अशा आराखड्याची निर्मिती होय कि ज्यामध्ये व्यापारावरील कृत्रिम अडथळे दुर केले जातात आणि एकत्रिकरणासाठी आवश्यक ते घटक जोपासले जातात.

४) बलासा (Balassa) यांच्या मते आंतरराष्ट्रीय संघटन ही पध्दती आहे, व्यवहार स्थिती आहे कि ज्यात भेदभाव असत नाही.

५) सध्याच्या परीस्थितीत आर्थिक एकात्मीकरणाचा प्रकार अधिक लोकप्रिय होत आहे.

६) प्रादेशिक आर्थिक एकात्मीकरणाचे पुढील प्रकारांत वर्गीकरण केले जाते.

अ) आर्थिक संघ

ब) सीमा शुल्क संघ

क) खुला व्यापार क्षेत्र

ड) क्षेत्रिय एकात्मीकरण

इ) प्राधान्य व्यापारी करार

फ) दीर्घकालीन व्यापारी करार

७) आर्थिक संघ हा आर्थिक एकात्मतेचा एक परिपूर्ण असा प्रकार मानला जातो.

८) व्यापारी गट हा प्रादेशिकता जोपासण्याऱ्या विविध देशांचा एक समुह असतो.

९) पुढील काही गट प्रादेशिक व्यापारी गटांची उदाहरणे सांगता येतील.

अ) युरोपियन आर्थिक संघ (EEC)

ब) उत्तर अमेरिकन मुक्त व्यापारी करार (NAFTA)

३.९ प्रश्न

१) आर्थिक एकात्मीकरणाचा अर्थ सविस्तर स्पष्ट करा.

२) आर्थिक एकात्मीकरणाचे विविध प्रकारांची सविस्तर चर्चा करा.

३) आर्थिक एकात्मीकरणाच्या लोकप्रियतेची कारणे लिहा.

४) विकसनशील राष्ट्रांसाठी आर्थिक एकात्मीकरणाच्या विविध प्रकारांपैकी कोणता प्रकार तुम्ही सुचवाल ?

५) टिपा लिहा.

अ) मुक्त व्यापारी करार.

ब) सीमा शुल्क संघ

क) आर्थिक संघ

ड) प्राधान्य व्यापारी करार

६) युरोपीय आर्थिक समुदायाच्या कार्यांचे सविस्तर वर्णन करा.

७) NAFTA या व्यापारी गटाची सविस्तर माहिती लिहा.

*****

४

आर्थिक एकात्मीकरण - II

घटक रचना

४.० उद्दिष्ट्ये
४.१ आशिया - पॅसिफिक आर्थिक सहकार्य (APEC)
४.२ दक्षिण - पूर्व आशियाई राष्ट्रांचा संघ (ASEAN)
४.३ प्रादेशिक सहकार्याची दक्षिण आशियायी राष्ट्रांची संघटना (SAARC)
४.४ प्रादेशिक व्यापारवाद विरुध्द बहुपक्षीय व्यापारवाद.
४.५ सारांश
४.६ प्रश्न

४.० उद्दिष्ट्ये

१) आशिया-पॅसिफीक आर्थिक संघटने विषयी जाणून घेणे.
२) दक्षिण-पूर्व आशियायी राष्ट्रांच्या संघाचा अभ्यास करणे.
३) प्रादेशिक सहकार्याची दक्षिण-आशियायी राष्ट्र संघटनेविषयी माहिती समजावून घेणे.
४) प्रादेशिक व्यापारवाद आणि बहुपक्षीय व्यापारवाद यामधील फरक समजावून घेणे.

४.१ आशिया-पॅसिफीक आर्थिक सहकार्य [Asia-Pacific Economic Co-operation (APEC)]

APEC या संघटनेचे स्वरुप एखाद्या न्यायव्यवस्थेप्रमाणे असून या संघटनेचे संस्थापक सभासदांची संख्या १८ इतकी आहे. हे संस्थापक सभासद पुढील प्रमाणे सांगता येतील.

APEC चे सभासद देश :

ऑस्ट्रेलिया, ब्रुनेल, कॅनडा, चिली, चीन, न्युझिलँड, पॅपस्, न्यू गिनिया, फिलीपाईन्स, सिंगापूर, तैवान, थायलंड, अमेरीका इ. देश APEC चे सभासद देश आहेत.

भारताच्या APEC कडील निर्यातीचा हिस्सा ४५%, आयातीचा हिस्सा ३०% तर प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण (FDI) ५४% इतके आहे. रशिया, भारत आणि व्हिएतनाम यासारख्या देशांनी सुध्दा APEC च्या सभासदत्वाची इच्छा व्यक्त केली आहे.

मनिला या ठिकाणी भरविण्यात आलेल्या परिषदेत APEC मधील सभासद राष्ट्रांनी पुढील सहा क्षेत्रात सभासद राष्ट्रांमधील व्यापार मुक्त करण्याबाबत एक कृती आराखडा तयार करण्यात आला.

i) बाजारपेठांचा विस्तार करणे.

ii) सेवा क्षेत्रातील बाजारपेठांचा विस्तार घडवून आणणे.

iii) मुक्त गुंतवणूकीविषयी तरतूद करणे.

iv) व्यापारातील उत्पादन खर्च किमान करण्यावर भर देणे.

v) पायाभूत क्षेत्रातील मुक्तपणा व कार्यक्षमतेला प्रोत्साहन देणे.

vi) आर्थिक व तांत्रिक सहकार्य मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणे.

वरील कृती आराखड्यापैकी शेवटच्या तरतुदीनुसार आर्थिक व तांत्रिक सहकार्य वृध्दींगत करण्याचे उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी APEC मार्फत काही मार्गदर्शक तत्वे ठरवून देण्यात आली. APEC सभासद देशांमधील आर्थिक व तांत्रिक सहकार्य वृध्दींगत करण्याबाबत पुढील उद्दिष्ट्ये ठरवून देण्यात आली.

i) चिरंतन किंवा शाश्वत विकास साध्य करणे.

ii) आर्थिक विषमता दुर करणे.

iii) नागरीकांच्या जीवनमानाचा व आर्थिक कल्याणाचा दर्जा उंचावणे.

iv) आशिया-पॅसिफिक राष्ट्रांमध्ये सहकार्य भावना वृध्दींगत करणे.

वरील उद्दिष्टांबरोबरच APEC च्या सभासद संख्येमध्ये मुक्त व्यापार व मुक्त गुंतवणूकीद्वारे वाढ घडवून आणणे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्राचा व्यापार वाढविणे, विदेशी भांडवलाचा ओघ आकर्षित करण्यासाठी भांडवल बाजाराचा विकास घडवून आणणे, स्वदेशी बचत वाढवून पायाभूत क्षेत्रातील विदेशी गुंतवणूकीचा हिस्सा वाढविणे व त्यासाठी वाहतूक, दळणवळण, ऊर्जा व लघुउद्योगांच्या विकासावर भर देणे या उद्दिष्टांचा देखिल अंतर्भाव करण्यात आला.

४.२ दक्षिण-पूर्ण आशियायी राष्ट्रांची संघटना Association of South East Asian Nations - (ASEAN)

०८ ऑगस्ट, १९६७ ला ASEAN या संघाच्या स्थापनेची औपचारिक घोषणा बँकॉकमध्ये करण्यात आली. या संघटनेचे संस्थापक सदस्य देश म्हणजेच इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, फिलीपिन्स आणि सिंगापूर हे होय. त्यानंतर १९८४ मध्ये ब्रुनेई, १९९५ मध्ये व्हिएतनाम, व १९९७ मध्ये लाओस व म्यानमान (ब्रम्हदेश) यांना ASEAN चे सदस्य बनविण्यात आले. ३० एप्रिल १९९९ मध्ये कंबोडियाला

सभासदत्व देण्यात आले. सध्या ASEAN ची सदस्य राष्ट्रांची संख्या १० झालेली आहे. ASEAN चे प्रमुख सचिवालय 'जकार्ता' येथे आहे.

ASEAN च्या स्थापनेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजेच दक्षिण पूर्व आशियामध्ये क्षेत्रातील सर्व राष्ट्रांना सामिल करुन दक्षिण-पूर्व आशियात आर्थिक सहकार्याद्वारे प्रगती करुन आर्थिक स्थिरता निर्माण करणे हे आहे.

भौगोलिक परिस्थितीमुळे भारताला ASEAN चा पूर्ण सदस्याचा दर्जा देता येत नाही कारण भारत हा दक्षिण आशियाय आहे, तर ASEAN हे दक्षिण-पूर्व आशियायी देशांचे संघटन आहे. असे असुनही जुलै, १९३६ मध्ये भारताला ASEAN मध्ये महत्वाचा दर्जा देण्यात आलेला आहे. अमेरिकेला असा दर्जा फार पूर्वीच देण्यात आलेला आहे.

४.२.१ ASEAN च्या स्थापनेची उद्दिष्ट्ये:

१) परस्पर सहकार्यातून सभासद राष्ट्रांच्या विकासाला गती देणे.

२) सभासद राष्ट्रांमधील व्यापारी नियंत्रणे (जकात आणि बिगर जकात) मोठ्या प्रमाणात कमी करणे.

३) आंतराष्ट्रीय व्यापार, वाहतूक यांचा विकास घडवून आणणे.

४) पायाभूत क्षेत्राचा विकास घडवून आणणे.

५) सभासद राष्ट्रांच्या व्यापारात स्थिरता निर्माण करणे.

६) विदेशी भांडवल आकर्षित करणे.

४.२.२ ASEAN ची वैशिष्ट्ये :

१) सभासद देशांचा परस्पर सहकार्यातून व्यापार वाढविण्यासाठी ही संघटना अस्तित्वात आली आहे.

२) या संघटनेचे सर्व सभासद देश विकसनशील देश आहेत.

३) या संघटनेतील सर्वच सभासद देश नैसर्गिक साधनसंपत्ती बाबत संपन्न देश मानले जातात.

४) या संघटनेला 'Asian Development Bank - ADB कडून मोठ्या प्रमाणात आर्थिक सहकार्य प्राप्त झाले आहे.

५) केवळ दक्षिण-पूर्व आशियायी राष्ट्रांचेच सभासदत्व असलेला हा एक प्रादेशिक व्यापारी गट आहे.

४.२.३ ASEAN च्या सहाव्या शिखर संमेलनातील शिफारशी:

१५-१६ डिसेंबर १९९८ मध्ये व्हिएतनामच्या हनोई शहरात ASEAN चे सहावे शिखर संमेलन भरविण्यात आले त्यामध्ये पुढील शिफारशी करण्यात आल्या.

१) दक्षिण-पूर्व आशियायी मुक्त व्यापार क्षेत्राची (ASEAN Free Trade Area - AFTA) स्थापना करणे.

२) AFTA अधिक परिणामकारक होण्याबाबत तरतुदी करणे.

३) व्यापाराचे उदारीकरण करणे.

४) ASEAN च्या सहा संस्थापक राष्ट्रांनी पूर्ण स्वतंत्र्य व्यापाराचे उद्दिष्ट २००३ ऐवजी २००२ मध्येच पूर्ण करणे.

५) वित्तीय क्षेत्रातील सहकार्यात वाढ घडवून आणणे.

६) 'Vision 2020' या योजनेनुसार १९९९-२००४ या काळात सभासद राष्ट्राअंतर्गत क्षेत्रीय आर्थिक एकात्मीकरणासाठी विविध उपाययोजना करणे.

४.२.४ ASEAN - भारत:

आशियान क्षेत्रीय मंचाचा (ASEAN Regional Forum - ARF) बैठक २६ जुलै १९९९ ला सिंगापुरमध्ये झाली, ह्यात भारतातर्फे तत्कालीन विदेशमंत्री श्री. जसवंत सिंग हजर होते. या बैठकित पुढील ठराव मांडण्यात आले.

१) ARF ने परमाणू विरोधी, सीमेपलिकडील आतंकवाद व लाहोर प्रक्रिया ह्याबाबत असलेल्या भारतीय विचारांचे समर्थन करण्यात आले.

२) भारत व पाकिस्तानने 'सर्वंकष अणूचाचणी बंदी करारावर' (CTBT) सह्या कराव्यात.

३) पाकिस्तानला ARF चे सदस्यत्त्व देण्याबाबतचा विचार टाळावा.

४) ASEAN ला परमाणूरहित क्षेत्र बनविण्याच्या उद्देशाने 'दक्षिण-पूर्व आशिया परमाणू शस्त्ररहित क्षेत्र' (South East Asia Nuclear Weapon Free Zone-SEANWFZ) आयोगाची स्थापना करावी.

यानुसार २४ जुलै १९९९ रोजी सिंगापूर या ठिकाणी SEANWFZ ची स्थापना करण्यात आली.

ASEAN ह्या गटात सहभागी सर्व सदस्य राष्ट्रांना निसर्गतःच नैसर्गिक साधनसामुग्रीची देणगी मिळालेली असल्याने निर्यातीमध्ये प्राथमिक वस्तूंचा समावेश सर्वाधिक आहे. अलिकडील काळात सभासद राष्ट्रांमधील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीत (FDI) सतत वाढ घडून येत आहे.

४.३ प्रादेशिक सहकार्यासाठी दक्षिण आशियायी राष्ट्रांची संघटना - (सार्क) (South Asian Association For Regional Co-operation- SAARC)

दक्षिण आशियायी देशांमध्ये प्रादेशिक सहकार्याद्वारे विकास होण्याकरिता एखादी प्रादेशिक संघटनेची आवश्यकता बांगलादेशाचे अध्यक्ष झिया-उर-रेहमान ह्यांना १९७० नंतर जाणवू लागली त्यानुसार त्यांनी प्रयत्न करुन भारत, पाकिस्तान, नेपाळ, भूतान, श्रीलंका, मालदिव या देशांना आपले प्रतिनिधी पाठवून अशा प्रादेशिक

संघटनेच्या स्थापनेबाबत आवाहन केले. या सुचनेचे वरील सर्व देशांनी स्वागत केले. वरील सात देशातील विदेशी सचिवांची पहिली बैठक २१ ते २३ एप्रिल १९८१ मध्ये कोलंबो येथे भरली. या बैठकीत शेती, ग्रामिण विकास, आरोग्य व लोकसंख्या इ. सहकार्याची क्षेत्रे ठरविण्यात आली.

१ व २ ऑगष्ट १९८३ ला भरलेल्या सात देशांच्या विदेशी मंत्र्यांच्या बैठकीत दक्षिण आशियायी राष्ट्रांच्या संघटनेच्या (सार्क) स्थापनेची औपचारिक घोषणा केली. सार्कचे मुख्यालय (सचिवालय) काठमांडू (नेपाळ) येथे आहे.

४.३.१ सार्कच्या स्थापनेची उद्दिष्ट्ये :

१) दक्षिण आशियायी लोकांच्या कल्याणात व जीवनमानात वाढ करणे.

२) दक्षिण आशियायी राष्ट्रांत स्वावलंबन वाढविणे.

३) सार्कच्या बाहेरील असभासद राष्ट्रांशी व्यापारी संबंध वाढविणे.

४) सभासद राष्ट्रांच्या परस्परांविषयीच्या विश्वासात वाढ करणे.

५) सभासद राष्ट्रांत असलेल्या समस्यांची जाणीव ठेवणे.

६) ह्या देशांचा आर्थिक वृध्दी, सामाजिक प्रगती व सांस्कृतिक विकासाचा वेग वाढविणे.

७) सभासद राष्ट्रातील लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे.

८) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक व शासकीय क्षेत्रात परस्परांना सहकार्य व सहाय्य देऊन प्रगती करणे.

९) आंतराष्ट्रीय व आंतरप्रादेशिक संघटनांशी समान उद्दिष्टांनी व हेतूंनी सहकार्य करणे.

४.३.२ सार्कची तत्वे :

१) सार्क सभासदांमधील परस्पर सहकार्य हे समता, प्रादेशिक एकता, राजकीय स्वातंत्र्य तसेच दुसऱ्या देशाच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप न करणे या तत्वावर आधारलेले असेल.

२) हे सहकार्य द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय सहकार्याप्रमाणेच असतील.

३) हे सहकार्य द्विपक्षीय व बहुपक्षीय करारांशी सुसंगत राहतील.

४.३.३ सार्क अंतर्गत असलेल्या समस्या :

१) सार्क सभासद राष्ट्रांमध्ये सर्वात मोठी समस्या म्हणजेच सीमावर्ती क्षेत्रावरील मतभेदाची राजकीय समस्या होय.

२) सार्कच्या सभासद राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांच्या स्वरुपामध्ये एकजीनसीपणाऐवजी असमानता दिसून येते.

३) आंतरप्रादेशिक व्यापाराकडे या राष्ट्रांनी सतत दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

४) आपापसांतील व्यापाराऐवजी या राष्ट्रांचा व्यापार ओघ मजबूत चलन परिस्थिती असलेल्या देशांशी आधिक आहे.

५) बहुतांश सार्क सभासद राष्ट्रे सारख्याच वस्तूंची निर्यात करतांना दिसूत येतात. उदा. भारत व श्रीलंकेतून चहाची होणारी निर्यात.

६) या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांमध्ये भिन्नता असल्याने मजबूत व वर्चस्व असलेल्याच सभासद देशांना व्यापारी लाभ प्राप्त होतात. गरीब राष्ट्रे मात्र आर्थिक विकासापासून वंचित आहेत.

७) या राष्ट्रांमध्ये परकीय भांडवलाची दुर्मिळता दिसून येते.

८) वाहतूक व दळणवळणाच्या क्षेत्रात अजुनही योग्यत्या सहकार्याचा सभासद देशांत अभाव दिसून येतो.

४.३.४ सार्कचे व्यवस्थापन:

पुढील प्रमुख मंडळांमार्फत सार्कची व्यवस्थापकीय रचना बनलेली दिसून येते.

सार्कचे व्यवस्थापन



४.३.५ सार्क अधिमान्य (अधिक पसंती) व्यापार करार - (साप्टा) SAARC Preferencial Trading Agreement - (SAPTA):

७ डिसेंबर १९९५ पासून सार्कमधील भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांग्लादेश, नेपाळ, मालदिव, भूतान या सभासद देशांना अंतर्गत व्यापार सहकार्य वाढण्याच्या उद्देशाने SAPTA हा करार लागू करण्यात आला.

४.३.६ SAPTA ची उद्दिष्ट्ये :

१) सभासद देशांचा व्यापार विस्तार घडवून आणणे.
२) सभासद राष्ट्रातील व्यापारावरील जकात व जकातेतर अडथळे काढून टाकणे.
३) सभासद देशात आर्थिक सहकार्य व अंतर्गत व्यापाराची स्थैर्याधिष्ठीत उभारणी करणे.

४.३.७ SAPTA च्या प्रशासनाची तत्वे :

१) परस्पर संगनमताद्वारे सभासद राष्ट्रांना प्रादेशिक एकात्मतेचे समान लाभ मिळवून देणे.
२) कच्चा माल व अर्धसिध्द उत्पादीत वस्तूंना अंतर्गत सवलत देणे.
३) व्यापारी निर्बंध टप्प्या-टप्प्याने कमी करुन कालांतराने ते रद्द करणे.

वरील तत्वांच्या अंमलबजावणीसाठी सार्क देशांनी २२६ वस्तूंच्या व्यापारावरील सर्व जकात व बिगरजकात नियंत्रणे १०% ते १००% पर्यंत कमी करण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने भारताने १०६ वस्तू, बांग्लादेशाने १२ वस्तू, मालदिव १७, नेपाळ १४, पाकिस्तान ३५, श्रीलंका ३१ व भूतानने ११ वस्तूंवरील जकातींमध्ये सवलती देण्याचे मान्य केले आहे. भारताने घोषित केलेल्या १०६ वस्तूंपैकी ६२ वस्तू तर केवळ अल्पविकसित व गरीब राष्ट्रांसाठीच राखिव आहेत.

४.३.८ SAPTA ते SAFTA :

०६ जानेवारी २००४ या दिवशी SAARC देशांच्या शिखर संमेलनात एक ऐतिहासिक करार करण्यात आला. त्यानुसार 'दक्षिण आशियायी मुक्त व्यापारी करार' (South Asian Free Trade Agreement = SAFTA) ची घोषणा करण्यात आली SAFTA ची स्थापना SAPTA च्या जागी व्हावयाची आहे. SAFTA मुळे २५० मिलियन डॉलर्स असलेल्या भारत-पाक व्यापारात १ मिलियन डॉलर्सपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे.

SAFTA च्या कार्याची सुरुवात १ जानेवारी २००६ पासून झाली त्यानुसार पुढील दोन टप्प्यात व्यापराचे उदारीकरण होणे अपेक्षित आहे.

i) १ ला टप्पा : दोन वर्षात भारत-पाकिस्तान यांनी जकात २०% नी व इतर देशांनी ३ वर्षात कमी करणे.

ii) २ रा टप्पा : येणाऱ्या ५ वर्षात भारत-पाकिस्तान आयात शुल्क ५% ने कमी करतील श्रीलंकाही आयातशुल्क ६ वर्षात व इतर देश ८ वर्षात करतील.

४.३.९ सार्क मधील भारताचे योगदान:

सार्कच्या यशात भारताचे योगदान अनन्यसाधारण आहे. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) सार्क सभासदांच्या तुलनेत भारत हा अधिक लोकसंखेचा व विशाल क्षेत्रफळ असलेला देश आहे.

२) भारताने नेपाळ, बांगलादेश, भूतान व श्रीलंकेबरोबर द्विपक्षीय करार केलेले आहेत.

३) १९८७ मध्ये भारत सार्कच्या इतर देशात झालेल्या निर्यातीचे मूल्य ४०६ दशलक्ष डॉलर्स तर आयातीचे मूल्य ९८ दशलक्ष डॉलर्स होते.

४) १९९८-९९ मध्ये भारताचे सार्क देशांशी झालेल्या निर्यातीचे मूल्य ७१८७ दशलक्ष डॉलर्स इतके होते.

५) भारताचा सार्क देशांशी असलेला व्यापार सतत अनुकूल आहे.

६) भारताच्या निर्यातीतील सर्वाधिक निर्यात बांग्लादेश व श्रीलंका या देशात झाली आहे.

७) भुतान व मालदीव देशातील निर्यातीचे प्रमाण अत्यंत कमी दिसून येते.

म्हणजेच सर्वाधिक लोकसंख्या आणि विशाल क्षेत्रफळामुळे तसेच अनुकूल व्यापारी सहकार्यामुळे इतर सभासद देशांच्या मानाने सार्कमधील भारताचा दबदबा वाढतांना दिसून येतो.

४.४ प्रादेशिक व्यापारवाद विरुध्द बहूपक्षीय व्यापार

युरोपियन संघ (EU), उत्तर अमेरिकन मुक्त व्यापारी करार (NAFTA), दक्षिण अमेरिकन सामाईक बाजारपेठ (MERSCOSUR), आशियायी मुक्त व्यापार क्षेत्र (AFTA), आशिया-पॅसिफिक आर्थिक संघटन (APEC), दक्षिण आशियायी मुक्त व्यापार करार (SAFTA) या व इतर व्यापारी गटांमुळे जागतिक अर्थव्यवस्थांचे प्रादेशिक गटांमध्ये विभाजन झाल्याचे दिसून आले परंतु हे तत्व 'विश्व व्यापार संघटनेच्या' (WTO) तत्वांच्या विरुध्द होते. अशा वेळी WTO ला अपेक्षित असलेल्या बहुपक्षीय व्यापार तत्वांचा अवलंब करावा, कि प्रादेशिक व्यापारवादाचा स्विकार करावा असा प्रश्नचिन्ह निर्माण झाला.

गेल्या ५० वर्षापासून दुसऱ्या महायुध्दातून सावरण्यासाठी, अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी गुंतवणूक, तंत्रज्ञान, सेवा क्षेत्र इ. चा विकास होण्यासाठी प्रत्येक देशाला निर्बंधमुक्त विदेशी व्यापाराची आपवश्यकता होती. त्या अनुषंगाने जानेवारी १९९५ मध्ये WTO ची स्थापना करण्यात आली. जागतीक अर्थव्यवस्थेत WTO ला पूर्वसुचना देऊनच विविध देशांमध्ये प्रादेशिक व्यापारी करारांची (Regional Trade Agreements - RTAs) लाट पसरली होती.

जागतिक व्यापारातील ६०% पेक्षा अधिक व्यापार हा प्रादेशिक व्यापारी करारांद्वारे व्यापलेला असून प्रत्येक देश हा किमान एका तरी प्रादेशिक गटाशी संलग्न असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ आंतराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेत प्रादेशिक व्यापारी करार (RTA) हे बहुपक्षीय व्यापार पध्दतीला समांतर अशी व्यवस्था निर्माण करीत आहेत.

४.४.१ प्रादेशिक आर्थिक गटांचे (RTAs) फायदे :

WTO च्या स्थापनेचा मुळ हेतूच नियंत्रण व निर्बंध मुक्त व्यापार, भेदभावविरहित व्यापार, जागतिक स्पर्धाक्षमतेत वाढ व बहुपक्षीय व्यापारवादाला प्रोत्साहन देणे हा होता. म्हणूनच अनेक अर्थतज्ञांनी बहुपक्षीय व्यापार तत्त्वांचाच पुरस्कार केलेला आहे. परंतु कॅनकुन मंत्रिपरीषदेतील वाटाघाटी अपयशी झाल्यानंतर अधिकाधिक राष्ट्रांनी त्यांची पसंती RTA ला दिली. कारण व्यापाराचे पूर्णत: उदारीकरण करण्यासाठी WTO च्या बहुपक्षीय व्यापारवादापेक्षा प्रादेशिक व्यापारी करार (RTA) कधीही अचानक व समर्थनिय आहेत.

४.४.२ प्रादेशिक व्यापारी करार व त्यांचे परिणाम:

RTA चा प्रमुख विपरीत परीणाम हा व्यापारी गटाबाहेरील कमी उत्पादन खर्च असणाऱ्या असभासद राष्ट्रांना भोगावा लागतो. RTA च्या तत्वांनुसार व्यापारात सभासद राष्ट्रांना प्राधान्य व जकातीत सवलती दिल्या जातात. परंतु त्याचवेळी उत्पादन खर्च कमी असुनही गटाबाहेरील असभासद राष्ट्राबरोबर व्यापार केला जात नसल्याने व्यापाराचे अपवहन होऊन व्यापारा गटातील उपभोक्त्यांना स्वस्त वस्तूंपासून वंचित रहावे लागते.

प्रत्येक प्रादेशिक व्यापारी गट स्वत:चे वेगळे नियम तयार करतात कि ज्यांचा ऋणात्मक परिणाम अनेकदा दिसून येतो.

उदा. व्यापाराचे अपवहन, नवनिर्मितीचा अभाव, जागतिक बाजार विस्तारावर मर्यादा, मर्यादित विकास इ.

'आर्थिक संघटन व विकास संघटन' (Organisation For Economic Co-operation & Development - OECD) च्या अभ्यासगटाच्या निष्कर्षानुसार असे दिसून येते की विविध RTA मध्ये समाविष्ट असलेल्या देशांमध्ये एकाच वस्तूंवर २० ब त्यापेक्षा अधिक प्रकारच्या जकाती आकारल्या जातात.

वरील सर्व चर्चेवरुन असा निष्कर्ष काढता येतो कि जागतिक व्यापार वृध्दीसाठी निर्माण झालेल्या 'प्रादेशिक व्यापारी गट' (RTA) आणि WTO चा बहुपक्षीय व्यापारवाद ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

४.५ सारांश

१) प्रादेशिक व्यापारी गटांची पुढील उदाहरणे सांगता येतील

अ) आशिया-पॅसिफिक आर्थिक सहकार्य (APEC).

ब) दक्षिण पूर्व आशियायी राष्ट्रांचा संघ (ASEAN)

क) प्रादेशिक सहकार्याची दक्षिण आशियायी राष्ट्रांची संघटना - (SAARC)

२) प्रादेशिक व्यापारी करार (RTA) आणि बहुपक्षीय व्यापारवाद हे परस्पर पर्यायी नसुन पुरक आहेत.

४.६ प्रश्न

१) 'प्रादेशिक व्यापारी करार (RTA) आणि बहुपक्षीय व्यापारवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत' हे विधान सविस्तर स्पष्ट करा.

२) टिपा लिहा.

अ) APEC

ब) ASEAN

क) SAARC

३) सार्कच्या यशातील भारताचे योगदान स्पष्ट करा.

*****

५

प्रकरण - ३
GATT आणि उरुग्वे फेरी

घटक रचना

५.० उद्दिष्टे
५.१ प्रास्ताविक
५.२ गॅटच्या फेऱ्या
५.३ गॅटची उरुग्वे फेरी
५.४ उरुग्वे फेरीतील चर्चा आणि वाटाघाटी
५.५ उरुग्वे फेरीतील प्रमुख करार.
५.६ डंकेल प्रस्ताव
५.७ सारांश
५.८ प्रश्न

५.० उद्दिष्टे

i उरुग्वे फेरीच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे
ii टोकीओ फेरीतील प्रमुख वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
iii उरूग्वे फेरीची प्रमुख वैशिष्टे समजून घेणे.
iv उरूग्वे फेरीतील प्रमुख करार जाणून घेणे.
v डंकेल प्रस्ताव अभ्यासणे.
vi उरुग्वे फेरीतील करारांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.
vii TRIPs आणि TRIMs करार जाणून घेणे.
viii उरुग्वे फेरीचे मूल्यमापन करणे.
ix उरुग्वे फेरीचा विकसनशील राष्ट्रांवर होणाऱ्या परीणामांचा अभ्यास करणे.

५.१ प्रास्ताविक

आंतराष्ट्रीय व्यापारात वृद्धी व्हावी हे ध्येय समोर ठेवून १९४७ मध्ये जिनेव्हा येथे एक संमेलन भरविण्यात आले व त्यात असे ठरले की राष्ट्राराष्ट्रातील व्यापारी संबंध वाढविण्यात यावेत व बहुपक्षीय व्यापार नियमांचे पालन करावे या हेतून आयात-निर्यात प्रशुल्कांमध्ये घट करावी ह्या दृष्टीने जो एक सामान्य करार करण्यात आला त्यालाच गॅट GATT असे म्हणतात.

गॅट हा एक बहुपक्षीय करार असुन त्यात सभासद देशांचे परस्पर अधिकार व जबाबदारी ह्यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. सम्मेलन भरवून प्रशुल्क कमी करण्याबाबत वेळोवेळी चर्चा होऊन सभासद राष्ट्रांचा लाभ होईल. अशा प्रकारचे उपाय व करार करण्यात येतात. १ जानेवारी १९४८ रोजी हा करार अस्तित्त्वात आला व त्यावर इतर देशांनी सह्या केल्या. त्यात भारताचा सहभाग होता. गॅटचे मुख्य कार्यालय जिनेव्हा येथे आहे.

५.१.१ गॅटची उद्दिष्टे :

गॅटचे प्रमुख प्रयोजन म्हणजे प्रशुल्क दर शक्य तितके कमी करुन व्यापार विकासात येणारे अडथळे दूर सारुन लाभ देणारी पूढील उद्दिष्टे पूर्ण करणे हे आहे.

१) सभासद देशातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे.

२) अर्थव्यवस्थेची पूर्ण रोजगारीच्या अवस्थेकडे वाटचाल करणे.

३) वास्तव उत्पन्न आणि प्रभावी मागणी ह्यात वाढ करणे.

४) आंतराष्ट्रीय व्यापार व उत्पादनात वृद्धी घडवून आणणे.

५) आंतराष्ट्रीय साधनांचा पर्याप्त वापर करणे.

५.२ गॅटच्या फेऱ्या (GATT Rounds)

व्यापार आणि जकातीसंदर्भात विचार विनिमयासाठी आमंत्रित केलेल्या सभासद देशाच्या एका सामान्य बैठकीला गॅट फेरी असे म्हणतात आतापर्यंत गॅटच्या आठ फेऱ्यांचा आढावा पूढील प्रमाणे घेता येईल.

गॅटच्या फेऱ्या आणि जागतिक व्यापार वाटाघाटी

गॅटच्या फेऱ्या	ठिकाण	व्यापार वाटाघाटी
पहिली (१९४७)	जिनिव्हा (स्वित्झर्लंड)	-२३ देशांच्या गॅट करारावर सह्या. -४५०० जकात सवलती -१० बिलियन डॉलर्स सवलत
दुसरी (१९४९)	ॲनेसी (फ्रान्स)	-ठराविक उत्पादनावर जकात कमी. -५००० जकात सवलती
तिसरी (१९५०-५१)	टर्की (इग्लंड)	ठराविक उत्पादनावर जकाती कमी. ८७०० जकात सवलती
चौथी (१९५६)	जिनिव्हा (स्वित्झर्लंड)	ठराविक उत्पादनाव जकाती कमी. व्यापार मूल्य २.५ बिलियन डॉलर्स
पाचवी	जिनिव्हा	सरासरी २०टक्के जकाती काढून

(१९६०-६१)		टाकल्या. ४४०० जकात सवलती संयुक्त व्यापाराचे मूल्य ४.९ बिलियन डॉलर्स
सहावी (१९६४-६७)	जिनिव्हा (केनेडी फेरी)	२५ टक्के जकाती कमी. उत्पादीत वस्तू व्यापार ४० बिलियन डॉलर्स
सातवी (१९७३-७९)	टोकिओ जपान	जकात अडथळे कमी अनुदाने, जकाती कमी केल्या. व्यापार ३०० बिलीन डॉलर्स.
आठवी (१९८६-९३)	उरुग्वे	प्रथमच कृषी क्षेत्राचा समावेश बौद्धीक संपत्ती अधिकार परकीय गुंतवणूक नियंत्रण शिथिलता. औद्योगिक वस्तूवरील जकात कमी.

१ली फेरी :

हे अधिवेशन जिनिव्हा या ठिकाणी १० एप्रिल १९४७ ते १० ऑक्टोबर १९४७ पर्यंत चालले. त्यात २३ देशांनी सहभाग घेतला. यात पुढील ठराव मांडण्यात आले.

i) काही प्रशुल्क पूर्णतः हटविणे.

ii) काही प्रशुल्क दरांना वर्तमान पातळीवर मर्यादीत

iii) काही प्रशुल्क दरात घट करण्यात आली.

iv) ह्या फेरीत भाग घेणाऱ्या सभासद देशांनी १२३ द्विपक्षीय करार केले.

२री फेरी:

फ्रान्स मध्ये १९४९ मध्ये ही फेरी ॲनेसी येथे भरविण्यात आली. ह्यात ३३ राष्ट्रानी सहभाग घेतला. पहिल्या फेरीत जे नव्हते त्यांना GATT मध्ये प्रवेश देणे हा मुख्य उद्देश होता. ह्यात ५०० वस्तुंबाबत १४७ द्विपक्षीय करार करण्यात आले व हे १९५० मध्ये लागू करण्यात आले.

३री फेरी:

इंग्लंड मधील टर्की याठिकाणी १९५०-५१ मध्ये ही फेरी आयोजित करण्यात आली. परंतु यात ४०० अपेक्षित करारांऐवजी फक्त १४७ करारच पूर्ण होऊ शकले. प. जर्मनी, ऑस्ट्रेलिया, पेरु, फिलिपाईन्स, व उरुग्वे ह्या देशांनी प्रथमच या संमेलनात भाग घेतला.

४थी फेरी:

१९५६ मध्ये जिनिव्हा या ठिकाणी आयोजित करण्यात आली. ३ऱ्या फेरीप्रमाणेच हे संमेलन देखिल फारसे सफल झाले नाही. ह्या फेरीत अमेरिकेकडून अधिक सवलतींची सभासद राष्ट्रांची अपेक्षा होती मात्र सभासद राष्ट्रांची निराशा झाली.

५ वी फेरी:

ह्यात ४४ राष्ट्रांनी सहभाग घेतला. हा फेरीत ऑस्ट्रेलिया व भारत ह्यांनी विभिन्न करारातील प्रशुल्क दरांशिवाय अतिरिक्त कोटा, आंतरिक कर ह्यावर विचार विमर्श करण्याकरिता ठोस प्रस्ताव मांडले.

६ वी फेरी :

त्यावेळचे अमेरीकेच राष्ट्रपती केनेडी यांच्या मार्गदर्शनाखाली ही फेरी झाली. म्हणूनच ही फेरी केनेडी फेरी या नावाने ओळखली जाते. या फेरीत द्विपक्षीय समझोत्यां ऐवजी बहुपक्षीय समझोत्यांवर भर देण्यात आला. सभासद देशांनी एका एका वस्तूवरील प्रशुल्क कमी करण्याऐवजी एकदम वस्तूसमूहावरील प्रशुल्क कमी करण्यावर विचार झाला.

केनेडी फेरीमुळे विकसनशील देशांना आशा होती की त्यांच्या देशातील निर्मित वस्तूंवर विकसित देश अधिक सवलती देतील. परंतु अपेक्षेनुसार सवलती न मिळाल्यामुळे ते निराश झाले. ह्या फेरीत देशादेशामधील व्यापारात असलेले प्रशुल्क अडथळे दुर करण्याबाबत कोणतीच प्रगती झाली नाही. केनेडी फेरीची फलश्रुती हे केवळ निर्मित वस्तुंवर प्रशुल्क सवलती देण्याइतपतच मर्यादित राहिली. ह्या फेरीत कृषी उत्पादनाबाबत झालेली चर्चा फारशी सफल झाली नाही. ह्या उणीवा असुनही ह्या अधिवेशनात प्रशुल्क दरात कपात व व्यापार वृद्धी करण्याच्या दृष्टीने ठोस पाऊले उचलण्यात आली. व हे अधिवेशन पूर्वीच्या अधिवेशनापेक्षा अधिक यशस्वी ठरले.

७ वी फेरी (टोकियो फेरी):

ह्या फेरीची काही ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

i) प्रशुल्क दरात कपात व गैरप्रशुल्क निर्बंध हटविण्याबरोबरच बहुपक्षीय व्यापार व्यवस्था व आंतराष्ट्रीय व्यापार यांच्यात आगामी दशकातील आवश्यकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने योग्य अशा सुधारणा घडवून आणणे.

ii) ह्या अधिवेशनात सहभाग घेण्याऱ्या देशांची संख्या ३३ होती.

iii) ह्या फेरीत व्यापारातील २७,००० वस्तूंवर सवलती देण्यात आल्या व ३०० बिलियन डॉलर्स किंमतीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर चर्चा झाली.

iv) ह्या अधिवेशनात देण्यात आलेल्या परस्पर सवलतींमूळे औद्योगिक देशांच्या मालाच्या किंमती सरासरीने जवळपास ३४टक्के नी कमी झाल्या.

v) ह्या अधिवेशनात जकातींचे मूल्यांकन, आयात-परवाना पद्धती, अनुदान व व्यापार ह्यांच्या मार्गात येणाऱ्या तांत्रिक अडचणी ह्याबाबतीत एक आचरण संहिता ठरविण्यात आली.

ह्या अधिवेशनात भारताने चार करारांवर सह्या केल्या ह्यातील एक सीमाशूल्क मूल्यांकन करार जानेवारी १९८१ पासून लागू करण्यात आला. उरलेले तीन करार Subsidies, Counter valuing Measures & Anti Dumping & Import licencing procedures ह्यांच्याशी संबंधित आहेत. हे करार स्वाक्षरी झाल्यापासून ३० दिवसांचे आत लागू करण्यात आले.

मात्र टोकीओ फेरीला अपेक्षेप्रमाणे यश प्राप्त झाले नाही. व्यापार उदारीकरणाचे उद्दिष्ट, कृषी क्षेत्रातील समस्या, याविषयी समाधानकारक उपाय योजना न झाल्याने विकसनशील राष्ट्रांना अधिक सवलतीपासून वंचित रहावे लागल्याने ही फेरी विकसनशील देशांची व्यापार उद्दिष्टे पूर्ण करण्यात अपयशी ठरली.

५.३ गॅटची उरुग्वे फेरी (आठवी फेरी २० सप्टे. १९८६)

गॅटची आठवी फेरी ही पूर्वीच्या सर्व फेऱ्यांपेक्षा एकदम वेगळी होती व त्यामुळेच ती विवादास्पद व चर्चित राहीली. ह्या अधिवेशनात ११७ देशांनी सहभाग घेतला. पहिल्या बैठकीत जो प्रस्ताव ठेवण्यात आला त्याचे दोन भाग पडतात.

अ) पहिला भाग :

वस्तू व्यापाराच्या क्षेत्रात प्रशुल्क गैरप्रशुल्क उपाय, उष्ण कटिबंधातील वस्तू, नैसर्गिक संसाधनावर आधारित वस्तू, कापड व कपडे व शेती, बहुपक्षीय व्यापाराच करार, अनुदान, परस्पर मतभेद, भांडणे ह्यांचे निवारणे, व्यापाराशी संबंधित बौद्धीक संपत्ती अधिकार, व्यापाराशी संबंधित गुंतवणूक इ.

ब) दुसरा भाग :

दुसऱ्या भागात पूर्णपणे नवीन वस्तू तसेच व्यापारापासून वेगळ्या असलेल्या सेवांशी संबंधित व्यापार ह्यांचा समावेश होतो.

ह्यावरुन असे दिसून येते की GATT ने आपल्या कार्यक्षेत्रातील विभिन्न परंपरागत क्षेत्रांव्यतिरीक्त पुढील तीन नव्या क्षेत्रांची भर टाकली.

i) व्यापाराशी संबंधित बौद्धि संपत्ती अधिकार (TRIPS)

ii) व्यापाराशी संबंधित गुंतवणूक उपाय (TRIMS)

iii) सेवा क्षेत्र व्यापार (QATS)

गॅटच्या आठव्या फेरीत याच तीन क्षेत्रांबाबत मतभेद निर्माण झाल्याने आठव्या फेरीतील हा प्रस्ताव डिसेंबर १९९० पर्यंत पूर्ण होऊ शकले नाहीत. परंतु हे अधिवेशन समाप्त न करता काही सभासद देशांच्या आग्रहाखातर पुढे ढकलण्यात यावे असा ठराव संमत झाला की सर्व सदस्यांनी केलेल्या सुचना व सुचविलेले उपाय यांचा विचार करून गॅटचे त्यावेळचे निर्देशक 'आर्थर डंकेल' ह्यांनी एक प्रस्ताव तयार करून तो सर्व सभासद राष्ट्रांकडे अभ्यासासाठी पाठवावा व त्यावरुन निघणारे निष्कर्ष एक शिखर संमेलन घेऊन त्यात ठेवावे त्यानुसार ऑर्थर डंकेल यांनी २० डिसे १९९१ ला ४३६ पानाचा एक अहवाल सादर केला व हाच 'डंकेल प्रस्ताव' ह्या नावाने ओळखला जातो.

५.४ उरुग्वे फेरीतील चर्चा आणि वाटाघाटी

	क्षेत्र	चर्चात्मक वाटाघाटी
१)	जकात	i जकाती शिथिल करणे. ii काही वस्तूंवरील जकाती पूर्णतः समाप्त करणे. iii वस्तूनिहाय दृष्टीकोन
२)	जकातेतर निर्बंध	i बिगर जकात नियंत्रणे शिथिल करणे. ii बिगर जकात नियंत्रणे पूर्णतः रद्द करणे.
३)	नैसर्गिक संसाधनाद्वारे उत्पादित वस्तू	i ह्या वस्तूंवर व्यापारी जकाती कमी करणे. ii परिमाणात्मक नियंत्रणे आकारणे.
४)	वस्त्र व कापड	वस्त्र व कापड या विषयी बहुतंतू व्यवस्थे अंतर्गत कोणते सुयोग्य धोरण अवलंबिणे ?
५)	शेती (कृषी क्षेत्र)	I आयात प्रशुल्क कमी करून शेतमाल व्यापर वृद्धी घडवून आणणे. ii कृषी क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या सवलती व अनुदाने कमी करणे.
६)	प्रक्रिया उद्योग	I प्रक्रिया उद्योग वस्तुंवरील प्रशुल्क कपात करणे. ii जकातेतर निर्बंध शिथिल करणे
७)	TRIPs	i गॅटमधील तरतूदींचा विचार करणे. ii TRIPs विषयी योग्य प्रक्रिया तयार करणे.
८)	TRIMs	i परकीय गुंतवणूक नियंत्रणे शिथिल करणे.
९)	वाद निवारण यंत्रणा	I अधिक सुधारणा व पारदर्शकता आणणे. ii निकालांची योग्य अंमलबजावणी करण्यात यावी.
१०)	सेवा व्यापार	I सेवा व्यापाराच्या संकल्पना अधिक विस्तृत व निश्चित करणे. ii विदेशी गुंतवणूक

		iii आंतराष्ट्रीय श्रम गतीशिलता iv प्रतिस्थापना अधिकार इ.

५.५ उरुग्वे फेरीतील प्रमुख करार

१) कृषी क्षेत्र : (Agriculture)

१९३४ मध्ये डंकेल प्रस्ताव स्वीकारल्यापासून जागतिकीकरणाची प्रक्रिया अधिक वेगाने सुरु झाली आहे. उरुग्वे फेरीत प्रथमच कृषी क्षेत्राचा समावेश करण्यात आला. म्हणूनच या फेरीत कृषीविषयक करारास अतिशय महत्त्व देण्यात आले असल्याने कृषीप्रधान अर्थव्यवस्थांचे लक्ष जागतिक व्यापार संघटनेच्या कृषीविषयक कराराकडे लागले. या करारानुसार विकसित देशांची स्वदेशि कृषीजन्य उत्पादनांना दिल्या जाणाऱ्या सवलती व अनुदाने प्रतिबंधित करण्याचे ठरविण्यात आले. जागतिक कृषी व्यापार अधिक सक्षम व पारदर्शक व्हावा हा ह्यामागील एक महत्त्वाचा हेतू होता.

या करारात जकात व बिगर जकात नियंत्रणांचा जागतीक स्पर्धेवर होणारा परिणाम विचारात होण्यात आला आहे या कराराच मुख्य उद्देश देशांतर्गत उत्पादन आणि निर्यात वाढीसाठी दिले जाणारे अर्थसहाय्य कमी करणे आहे. त्यानुसार पुढील गट करण्यात आले.

i) पहीला गट:

हा गट विकसित देशांचा असुन या गटातील देशांनी १ जानेवारी १९५५ पासून पुढील ६ वर्षात कृषीजकाती ३६टक्के नी कमी करणे.

ii) दुसरा गट:

हा विकसनशील देशांचा गट असून या गटातील देशांनी १ जानेवारी १९९५ पासून पुढील १० वर्षात कृषीजकाती २४टक्के नी कमी करण्याचे बंधन होते.

iii) तीसरा गट:

ह्या गटात अविकसित व गरीब देशांचा समावेश असून ह्या देशांना जकाती कमी करणाचे कोणतेही बंधन नव्हते.

उरुग्वे फेरीत कृषी अर्थसहाय्याचे पुढील ३ गटात वर्गीकरण करण्यात आले.

अ) प्रतिबंधित सवलती:

यामध्ये स्वदेशी निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी विदेशी आयात वस्तूंच्या खरेदीवर बंधने टाकण्यात आली अशा निर्यात वस्तू उत्पादनासाठी स्वदेशी कच्चा माल व आयातीत वस्तूला पर्यायी स्वदेशी वस्तूंच्या वापरासाठी सवलती देण्यात येत होत्या.

ब) आक्षेपार्ह सवलती :

या मध्ये अशा सवलतींचा समावेश करण्यात आला की ज्या सवलतींचा विपरित परिणाम इतर देशांच्या अर्थव्यवस्थांवर दिसून येत असेल.

क) आक्षेपार्ह नसलेल्या सवलती :

अनार्थिक क्षेत्राच्या व मागासलेल्या प्रदेशांचा विकास करण्यासाठी त्या क्षेत्रातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी औद्योगिक संशोधनासाठी, विकासकारी प्रकल्पासाठी दिल्या जाणाऱ्या सवलतींच्या समावेश अनाक्षेपार्ह सवलतींमध्ये करण्यात आला.

शेतमाल आंतरराष्ट्रीय बाजार सुयोग्य दिशेने जाण्यासाठी, शेतमाल व्यापारात पारदर्शकता निर्माण होण्यासाठी, कृषी व्यापारातील अडथळे दूर करण्यासाठी हा करार करण्यात आला. या करारात शेतमालाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील बाजार प्रवेशावर निर्बध देशांतर्गत मदत आणि निर्यात उत्तेजनासाठी अर्थसहाय्य या तीन बाबींवर विशेष भर देण्यात आलेला आहे.

२) वस्त्र आणि कापडविषयक करार :(Textiles and clothing)

१९६० पासून गॅटच्या करारात कापडाच्या व्यापाराचा समावेश करण्यात आला आहे. १९७४ पासून कापड आणि वस्त्र यांच्या व्यापारावर 'बहुधागा व्यवस्थेचा'(Multi Fibre arrangement MFA) चा प्रभाव वाढत गेला होता. १९७४ मध्ये औद्योगिक उत्पादनासाठी लागू ठरणारे नियम आणि अटी कापड उद्योगासाठी लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार १९९० च्या आधारावर १९९५ मध्ये कापडाच्या आयातीवर १६टक्के, १९९८ मध्ये १७टक्के, २००२ मध्ये १८ टक्के आणि २००५ मध्ये राहिलेल्या सर्व कापड उत्पादनाचा समावेश करारात करण्यात आला आहे. अशा रितीने २००५ पर्यंत कापडाच्या व्यापारावरील सर्व निर्बंध टप्प्या टप्प्याने काढून टाकावेत.

३) सेवा क्षेत्र (Trade in Services):

उरुग्वे फेरीच्या पूर्वी सेवा क्षेत्र व्यापाराबाबतीत कोणत्याही विशेष तरतूदी करण्यात आल्या नव्हत्या. उरुग्वे फेरीत प्रथमच सेवा क्षेत्र व्यापाराचा समावेश करण्यात आला.

या फेरीत 'सेवा व्यापाराविषयी सर्वसामान्य करार'(General Agreement on Trade in Service GATS) अस्तीत्वात आला. सेवा क्षेत्र व्यापाराचे चित्र अनुकूल पद्धतीने लादण्यासाठी ज्या मार्गात हा करार मैलाचा दगड ठरणार होता. उरुग्वे फेरीच्या पूर्वी प्रत्येक देशाच्या सामाजिक व आर्थिक तसेच राजकीय परिस्थितीचा विचार करून प्रत्येक देशाने सेवा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात निर्बंध लादले होते. प्रत्येक देशाने सेवा क्षेत्रांवर काही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रणे लादली होती.

उदा. VISA अनिवार्यता, गुंतवणुकीवरील कडक कायदे नियम, विपणन विषयक कडक नियंत्रणे, परकीय नोकरदारांच्या रोजगार संधींवरील बंधने, बँका, विमा वाहतूक मनोरंजन दळणवळण साधने अशा सेवांचा वापर करण्याची सक्ती इ. कडक नियंत्रणे लावली जात होती.

उरुग्वे येथील परिषदेत सेवांच्या व्यापाराचा करारात समावेश करुन त्या अंतर्गत बँकिंग सेवा, विमा, वाहतूक-दळणवळण, सल्लागार मंडळे, करमणूक व मनोरंजन इ. नी पुरविलेल्या सेवांचा समावेश होता. त्या करारातील नमुद केलेल्या अटीनुसार व सेवा पुरविणे बंधनकारक असेल. वित्तीय सेवांमध्ये गुंतवणूकदार ठेवीदार आणि विमाधारक यांचे संरक्षण झाले पाहिजे. दुरसंचार सेवा व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाच्या असल्याचे मान्य करण्यात आले आहे.

GATS करारान्वये पुढील दोन महत्त्वाच्या कर्तव्यांचा समावेश करण्यात आला.

i) अधिक प्राधान्य देश कलम (Most Favoured Nathions clause MFN):

या कलमान्वये GATT च्या सभासद राष्ट्रांनी परस्परांशी सेवा व्यापार करतांना कोणताही भेदभाव न करता सर्व सभासद देशांना समान दर्जा देण्यात यावा.

ii) पारदर्शकता:

या तत्त्वानुसार असे ठरविण्यात आले की प्रत्येक सभासद राष्ट्रांने आपल्या सेवा व्यापारविषयीचे सर्व नियम व अटी प्रसिद्ध कराव्यात.

या करारात पुढील तीन उद्दिष्टे ठरविण्यात आली.

i) सेवा व्यापाराविषयी मुक्त धोरण स्विकारण्यासाठी बहुउद्देशिय नियमावली तयार करणे.

ii) सेवा क्षेत्राचे उदारीकरण व पारदर्शकता

iii) सर्व सभासद राष्ट्रांचा सर्वांगिण विकास, मुख्यत्वे विकसनशील देशांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे.

४) बौद्धिक संपदा व्यापारी करार (Trade Related Intellectual Property Rights TRIPs):

व्यापाराशी संबंधित बौद्धिक संपदा करार ही उरूग्वे फेरीमधील एक प्रमुख परंतु वादग्रस्त तरतूद मानली जाते. TRIPs ही तरतूद ह्या अधिवेशनात का अंतर्भूत करण्यात आली व तशी गरज विकसित देशांना का निर्माण झाली ह्याची कारणे अभ्यासणे आवश्यक आहे.

तत्कालीन परिस्थितीतील तंत्रज्ञान व संशोधनाचे कोणत्याही विकसित देशाच्या वाणिज्यविषयक मालमत्तेचा दर्जा मिळाला होता. आंतरराष्ट्रीय स्पर्धाक्षमतेत टिकून राहण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान हा एक प्रमुख मार्ग बनला होता. आपल्या वस्तूंना जागतिक पातळीवर स्पर्धाक्षम बनविण्यासाठी विकसित देशांनी उत्पादनाच्या पारंपारीक पद्धतींचा त्याग करून नवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा स्विकार करण्यास सुरुवात केली. या तंत्रज्ञानाच्या बळावर अशा विकसित देशांनी वाहतूक, माहिती तंत्रज्ञान, दळणवळण जैवतंत्रज्ञान इ. क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात प्रगती साध्य केली. परंतू या क्षेत्रातील विकसित देशांनी लावलेल्या शोध व त्याद्वारे उत्पादीत होणाऱ्या वस्तू यांची चांचेगिरी (Piracy) वाढल्याने या देशातील बौद्धिक संपदा धोक्यात येऊ लागली. अशा बनावट वस्तूंचा विपरीत परिणाम विकसित देशांच्या उत्पादन व्यापार व नफ्यावर दिसून आला. म्हणूनच या Piracy च्या समस्येतून बाहेर पडून नवीन शोधांचे हक्क सुरक्षित राहण्यासाठी 'बौद्धिक संपदा व्यापार करार TRIPs ; तरतूद करण्यात आली.

TRIPs तरतूदीमध्ये बौद्धिक संपदेच्या पुढील क्षेत्रांचा समावेश करण्यात आला.

१) Copy Rights

२) बोध चिन्ह Trade Mark

३) भौगोलिक संकेत

४) औद्योगिक प्रारुप (ट्रेडमार्क)

५) पेटंट Patents

६) व्यापारी गोपनिय माहिती इ. साठी १० वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला असून पेटंटसाठी मात्र २० वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. व्यापारी गोपनियता Trade Secret आणि संशोधनास व्यापारी मूल्य असल्याने त्याचे देखिल संरक्षण झाले पाहिजे असे या करारात स्पष्ट करण्यात आले आहे.

५) व्यापारी संबंधित गुंतवणूकीविषयी उपाययोजना: (Trade Related Investment Measures TRIMs)

TRIMS मधील तरतूदीनुसार प्रत्येक सदस्य देशाने विदेशी गुंतवणूकीवरील सर्व प्रतिबंध हटवावयास हवेत ज्या सोयी सवलती स्वदेशी गुंतवणूकदारांना मिळतात त्या सर्व विदेशी गुंतवणूकदारांना मिळावयास हव्यात. ह्या करारानुसार ५ वर्षाच्या आत व्यापाराशी संबंधीत गुंतवणूकीवरील नियंत्रणे समाप्त करावयास हवी. हा निर्देश केवळ संख्यात्मक अडथळे व राष्ट्रीय व्यवहारांपूरताच आहे. प्रामुख्याने निवडक क्षेत्रातील

गुंतवणूक, विदेशी कंपन्यांना राष्ट्रीय कंपन्यांच्या बरोबर आणण्याकरिता विदेशी गुंतवणूकीची पातळी, निर्यातीची जबाबदारी व घरगुती कच्च्या मालाचा उपयोग अशा निवडक क्षेत्रापुरताच मर्यादीत आहे. हा करार विदेशी चलनाची प्राप्ती, विदेशी समभाग, व तांत्रिक स्थानांतरणाशी संबंधित विदेशी गुंतवणूकदार ह्यांच्यावर निर्बंध लावण्याचा निषेध करतो. हा करार आदेश देतो की विदेशी गुंतवणूकदार कंपन्यांना घरगुती कंपन्यांच्या बरोबर ठेवले पाहिजे. गुंतवणूक क्षेत्रातील अडथळ्यांना हा रोखतो. हा करार कच्चा माल व मध्यवर्ती वस्तू ह्यांची आयात मुक्त असावी अशी अपेक्षा करतो.

काही गुंतवणूकी ह्या व्यापारात अडथळे निर्माण करतात व व्यापारात विकृती निर्माण करतात. ही गोष्ट ह्या कराराला मान्य आहे. म्हणून विकसित देश दोन वर्षामध्ये विकसनशील देश ५ वर्षामध्ये व अल्पविकसित देश ७ वर्षांमध्ये सर्व गैर अनुरुप TRIMs ची अनिवार्यपणे सुचना देतील व समाप्त सुद्धा करतील अशी अपेक्षा आहे. TRIMs करिता एक समिती नेमली असून ती TRIMs मधील करारांचे बरोबर पालन होत आहे किंवा नाही ह्यांची देखरेख करेल व ह्याबाबतचा अहवाल वस्तुंच्या व्यापाराकरीता स्थापलेल्या समितीला देईल.

५.६ डंकेल प्रस्ताव

गॅटचे तत्कालीन डायरेक्टर जनरल ऑर्थर डंकेल यांनी जकाती आणि व्यापारासंबंधी एक प्रस्ताव लेखी स्वरुपात १९९१ मध्ये सादर केला. त्यालाच डंकेल प्रस्ताव (DUNKEL DRAFT) असे म्हणतात. हा प्रस्ताव कायदेशिर आणि तांत्रिक आहे त्यात विविध बाबींचे पुढील सात करार आहेत.

१) बाजार व्यवस्था

२) शेती

३) वस्त्र आणि कापड

४) गॅटचे नियम

५) व्यापारासंबंधी बौद्धिक संपदा हक्क (TRIPs)

६) सेवा करार (GATS)

७) संस्थात्मक बाबी.

इत्यादीचा समावेश होता. ह्या वरील सात घटकांबाबत वाटाघाटी झाल्या. परंतू अनेक बाबतीत सभासद देशांमध्ये एकमत होऊ शकले नाही. विशेषतः कृषी, सुती कापड, TRIPs इ. बाबतीत मतभेद निर्माण झाले. त्यातून मार्ग काढण्यासाठी आर्थर डंकल यांनी एक प्रस्ताव तयार केला. तो सर्व सभासदांनी जसाच्या तसा स्वीकारण्याचे ठरले.

डंकेल प्रस्ताव प्रमुख दोन भागात विभागण्यात आला आहे. ह्यातील पहिला भाग २४ वर्गात विभाजित आहे.

५.६.१. डंकेल प्रस्ताव पहिला भाग :

डंकेल प्रस्तावाच्या १ल्या भागात ज्यांचा अंतर्भाव आहे त्यातील प्रमुख विषय पुढील प्रमाणे.

अ) डंकेल प्रस्तावाच्या पहिल्या भागत शेती व प्राथमिक वस्तूंच्या निर्यातीवर विस्तारपूर्वक चर्चा आहे. शेतीच्या बाबतीत निर्यात सहाय्य, आयात, संरक्षण व शेती उत्पादन वाढीकरिता स्वदेशी मदत इत्यादी बाबींवर चर्चा आहे.

आ) शेती क्षेत्रातील प्रत्येक सभासद राष्ट्राने आपल्या बाजाराचा ३.३टक्के भाग विदेशी निर्यातदारांना उपलब्ध करुन द्यावा असा प्रस्ताव आहे.

इ) वृक्ष व त्यांचे प्रजाती यांचे पेटंट करण्याचा प्रस्ताव आहे.

ई) ह्यात सरकारी खरेदी व सार्वजनिक वितरण ह्यांच्या सहाय्याने कृषीमूल्यांना प्रभावित करण्याची मनाई आहे.

उ) ६ ते १० वर्षाच्या आत शेती उत्पादनावर लावण्यात येणाऱ्या प्रशुल्कात कपात करण्याचा व निर्यातीला दिले जाणारे अर्थसहाय्य बंद करण्याचा उल्लेख डंकेल प्रस्तावात आहे.

ऊ विकसनशील देश स्वदेशी उद्योगांना संरक्षण देण्याकरिता व औद्योगिक विकासाला प्रार्थमिकता देण्याकरिता व औद्योगिक विकासाला प्राथमिकता देण्याकरिता सुनियोजित पद्धतीने तयार करीत असलेल्या औद्योगिक गुंतवणूक व प्रबंधनाशी संबंधित अटींचा विरोध डंकेल प्रस्तावात केला आहे.

ए) सदस्य राष्ट्रांनी आपली सर्व क्षेत्रे विदेशी गुंतवणूकीकरिता पूर्णतः मुक्त केली पाहिजेत असाही ह्यात प्रस्ताव आहे.

५.६.२ डंकेल प्रस्तावाचा दुसरा भाग :

ह्या भागातील 'बौद्धिक संपत्ती अधिकाराबाबतचा'पैलू सर्वात जास्त वादग्रस्त आहे. ह्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

अ) बौद्धिक संपत्तीशी संबंधित असलेल्या अधिकारांचे संरक्षण करण्याकरिता अतिशय कडक नियम ह्या प्रस्तावात दिलेले आहेत. हे नियम लागू झाले तर भारतासहित अधिकांश अर्धविकसित राष्ट्रांना आपल्या पेटंट कायद्यांमध्ये आमूलाग्र बदल करावे लागतील.

आ) वस्तू स्वदेशात तयार झालेली असेल किंवा परकिय देशांकडून आयात केलेली असेल अशा प्रत्येक वस्तूच्या बाबतीत पेटंट तयार करणे आवश्यक आहे.

इ) आतापर्यंत भारत व इतर अनेक देशांमध्ये केवळ उत्पादन प्रक्रियेचे पेटंट घ्यावे लागत आहेत, परंतू डंकेल प्रस्ताव लागू झाल्यास उत्पादन प्रक्रिये बरोबरच तयार होण्याऱ्या उत्पादनांचा देखिल पेटंट घेणे आवश्यक आहे.

ई) डंकेल प्रस्तावातील सर्वात मतभेद निर्माण करणारा मुद्दा म्हणजेच, एखादा देशाने जर दुसऱ्या देशाच्या पेटंटची नक्कल केलेली असेल तेव्हा त्या मूळ पेटंट धारक देशाला ही गोष्ट सिद्ध करण्यासाठी कोणताही पुरावा देणे बंधनकारक नाही.

ह्यामुळे अशा देशाने केवळ तक्रार दाखल करणे हेच पुरेसे ठरेल. परंतू याचा विपरीत परिणाम विकसनशील देशांमधील औषधी उत्पादनाच्या क्षेत्रात दिसून येईल.

डंकेल प्रस्तावात सेवा क्षेत्राला देखिल व्यापारी दर्जा देण्यात आलेला आहे. सेवा क्षेत्राला व्यापारी दर्जा देण्यासंदर्भात ज्या व्यापक तरतूदी डंकेल प्रस्तावात करण्यात आला आहेत त्यातील काही प्रमुख तरतूदी पुढील प्रमाणे आहेत.

अ) सेवा व्यापाराचे नियमन व नियत्रण करण्याच्या उद्देशाने एका बहुपक्षीय समझोत्याचे प्राविधान डंकेल प्रस्तावात आले. ह्याला सेवासंबंधी व्यापाराचा सामान्य करार GATS असे म्हटले आहे.

आ) ह्या प्रस्तावात सेवासंबंधी व्यापाराला वस्तूंच्या व्यापाराप्रमाणे समजण्यात यावे अशी तरतूद आहे.

इ) आतापर्यंत डंकेल प्रस्तावातील ज्या तरतूदींवर सह्या झाल्या आहेत त्यात सेवासंबंधी व्यापार क्षेत्राचा समावेश नाही.

डंकेल प्रस्तावाच्या द्वितीय भागातील एक महत्त्वपूर्ण मुद्दा म्हणजेच ज्या उद्देशाने गॅटची स्थापना केली होती. तो उद्देश पूर्ण झाला असल्यामुळे ही संस्था विसर्जित करून हिच्या ऐवजी एक बहुपक्षीय व्यापार संघटाना (MIO) किंवा जागतिक व्यापार संघटना (WTO) स्थापना करण्यात यावी. अशा या संघटनेची उद्दिष्टे, संघटन, कार्यक्षेत्र इत्यादीबाबत डंकेल प्रस्ताव सविस्तर विवेचन आहे.

आपली प्रगती तपासा

१) उरुग्वे फेरीची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२) उरुग्वे फेरीची प्रमुख वैशिष्टे स्पष्ट करा.

३) डंकेल प्रस्ताव यावर टीप लिहा.

५.७ सारांश

१) गॅटच्या एकूण आठ फेऱ्यांपैकी आठवी फेरी ही उरुग्वे या ठीकाणी १९८६ साली भरविण्यात आली.

२) लॅटीन अमेरिकेतील उरुग्वे या ठीकाणी ही सभा भरविण्यात आल्याने ती 'उरुग्वे फेरी' या नावाने ओळखली जाते.

३) या फेरीत एकूण ११६ देशांनी सहभाग घेतला.

४) GATT ची ही आठवी फेरी काही महत्त्वपूर्ण मुद्द्यांमूळे विवादास्पद व म्हणून

५) या फेरीतील चर्चा i) वस्तु व्यापार आणि ii) सेवा व्यापार अशा दोन स्वतंत्र भागात करण्यात आली.

६) या फेरीत TRIPs, TRIMs, GATs अशा नवीन क्षेत्रांविषयीच्या वाटाघाटींचा प्रथमच समावेश करण्यात आला.

७) GATT चे तत्कालीन डायरेक्टर जनरल सर ऑर्थर डंकेल यांनी १९९१ मध्ये एक प्रस्ताव सादर केला. हा प्रस्ताव 'डंकेल प्रस्ताव' या नावाने ओळखला जातो.

८) गॅट मुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर अनुकूल परिणाम दिसून येणार आहेत.

५.८ प्रश्न

१) जागतिक व्यापार नियंत्रण मुक्त व निर्बंध मुक्त करण्यात उरुग्वे फेरीचे योगदान सविस्तर स्पष्ट करा.

२) उरुग्वे फेरीच्या स्थापनेची पार्श्वभूमी सविस्तर लिहा.

३) गॅटच्या फेऱ्यांचा थोडक्यात आढावा घ्या.

४) टीपा लिहा

i) टोकीओ फेरी

ii) TRIPs

iii) TRIMs

५) डंकेल प्रस्तावाविषयी सविस्तर माहिती द्या.

६) 'गॅटची आठवी फेरी ही इतर फेऱ्यांपेक्षा वादग्रस्त ठरली' या विधानाची कारणमिमांसा करा.

*****

६

जागतिक व्यापार संघटना

(World Trade Organisation)

घटक रचना

६.० उद्दिष्टे

६.१ प्रास्ताविक

६.२ WTO ची संकल्पना

६.३ WTO चे संघटन

६.४ WTO ची उद्दिष्टे

६.५ WTO ची कार्ये

६.६ दोहा घोषणा पत्र

६.७ WTO ची मंडळे

६.८ WTO पुढील आव्हाने

६.९ WTO ची वाद निवारण यंत्रणा

६.१० वाद निवारण पद्धती यंत्रणा संकल्पना व तत्त्वे

६.११ वाद निवारण प्रक्रिया

६.१२ WTO च्या कार्याचे चिकित्सक परीक्षण

६.१३ सारांश

६.१४ प्रश्न

६.० उद्दिष्टे

i) WTO च्या स्थापनेची पार्श्वभूमी अभ्यासणे.

ii) WTO ची उद्दिष्टे अभ्यासणे.

iii) WTO च्या कार्यांचा अभ्यास करणे.

iv) दोहा परिषद जाणून घेणे.

v) WTO पुढील आव्हाने समजून घेणे.

vi) WTO च्या वाद निवारण यंत्रणा समजून घेणे.

vii) WTO च्या वाद निवारण यंत्रणेची पद्धती जाणून घेणे.

viii) विकसनशील देशांच्या बाबतीत WTO च्या वाद निवारण यंत्रणेच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

ix) WTO च्या कार्यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

६.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय व्यापार उदारीकरणाच्या प्रक्रियेत जागतिक व्यापार संघटनेची WTO स्थापना ही एक अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते. WTO च्या स्थापनेचा मूळ हे दोन विश्व युद्धाशी संबंधित आहे. पहिले विश्व युद्ध (१९१४-१९१८) आणि दुसरे महायुद्ध (१९३९-१९४५) हे विश्व युद्ध WTO च्या स्थापनेस जबाबदार मानले जातात. १९४४ मध्ये झालेल्या ब्रेटन वुइस परिषदेमध्ये जागतिक स्तरावर पुढील ३ महत्त्वाच्या संस्थांच्या स्थापनेची शिफारस करण्यात आली त्या पुढील प्रमाणे.

१) आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी (IMF)

२) आंतराष्ट्रीय पुनर्रचना व विकास बँक (IBRD) किंवा जागतिक अधिकोष (World Bank)

३) जागतिक व्यापर संघटना (ITO)

वरील ३ संस्थापैकी IMF व IBRD या दोन संस्थांची १९४६ मध्ये त्वरीत स्थापना करण्यात आली. परंतु ITO च्या स्थापनेला मात्र काही देशांनी विरोध दर्शविला कारण त्यांच्या मते विश्व व्यापार संघटनेद्वारे काही महासत्ता देशांचा धोरणे तयार करण्याच्या बाबतीत हस्तक्षेप होऊन ITO चे स्वरुप एकतर्फी राहण्याची शक्यता होती. म्हणूनच विश्व व्यापार संघटने ऐवजी (ITO) व्यापार व जकातीविषयीचा सामान्य करार GATT अस्तित्वात आला.

१९४८ मध्ये WTO च्या ऐवजी GATT ची निर्मिती करण्यात आली. या संस्थेचे स्वरुप एक करार (Agreement) आणि संघटना (Organisation) असे दुहेरी होते. जगातील काही सदस्य देशांनी परस्परांमधील व्यापार शिथिल करण्यासाठी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

GATT च्या स्थापनेपासून वेगवेगळ्या ठीकाणी आठ फेऱ्या भरविण्यात आल्या. त्यापैकी उरुग्वे या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली फेरी सर्वात महत्त्वाची आणि वादग्रस्त ठरली. GATT च्या करारात उत्पादीत वस्तूंचा समावेश होता तर WTO च्या करारात उत्पादीत वस्तुंबरोबरच सेवा व्यापार, कृषी क्षेत्र, TRIPs, TRIMs, व इतर महत्त्वाच्या घटकांचा अंतर्भाव करण्यात आला. सनातन व नवसनातवादी अर्थतज्ञ मुक्त व्यापाराचा पुरस्कार करणारे होते. मुक्त व्यापारामुळे विशेषिकरण घडून येऊन श्रमविभादजन, तुलनात्मक लाभ, अल्प उत्पादन खर्च, मध्यत्त्म नफा असे व्यापारी लाभ मिळून एकूण व्यापारात वाढ घडून येण्यास मदत होते. सनातनवादी अर्थतज्ञांच्या याच मुक्त व्यापार धोरणाला GATT व WTO च्या स्थापनेने दुजोरा दिला असे म्हणता येईल. कारण नियंत्रण व निर्बंधमुक्त व्यापार हा GATT चे महत्त्वाचा उद्देश होता. व्यापारावरील जकात व जकातेतर अडखळे दुर करुन व्यापार मुक्त करण्यासाठीच GATT ची स्थापना करण्यात आली. हीच उद्दिष्टे पुढे WTO ने अवलंबिली.

६.२ WTO ची संकल्पना

''बहुपक्षीय व्यापारी प्रणालीसाठी असलेले वैधानिक आणि संस्थात्मक व्यासपीठ'' अशी WTO ची थोडक्यात व्याख्या करता येईल.

WTO च्या स्थापनेला १९८६-१९९३ या काळात मान्यता मिळाली ८१ सभासद देशांच्या एकत्रित निर्णयाद्वारे उरुग्वे फेरी मान्य करण्यात आली. १९९८ पर्यंत ही सभासद संख्या ८१ वरुन १३२ देशांपर्यंत वाढली. एप्रिल १९९४ मध्ये माराकस, मोरोक्को येथे गॅटच्या उरुग्वे चर्चाफेरीच्या वाटाघाटी झाल्या त्यानुसार १ जानेवारी १९९५ रोजी विश्व व्यापार संघटना (WTO) स्थापना झाली. १९१४ या वर्षापुरते GATT आणि WTO या दोन्ही संस्थांचे सहअस्तित्व राहणार होते परंतू ०१ जाने. १९९५ पासून GATT चे रुपांतर WTO मध्ये करण्यात आले. भारत हा WTO चा संस्थापक देश आहे. या उरुग्वे फेरीचे काही महत्त्वाचे परीणाम पुढील प्रमाणे होते.

१) गॅटची उरुग्वे फेरी ही सर्वाधिक गुंतागुंतीची आणि विवादास्पद ठरली. या फेरीतील वाटाघाटी सर्वाधिक म्हणजेच सात वर्षे चालल्या व्यापारावरील जकाती व जकातेतर निर्बंध हटविणे हे सर्वात मोठे यश या फेरीत मानले जाते.

२) उरुग्वे फेरीचा परीणाम म्हणून वास्तव जागतिक उत्पन्न २१२ बिलियन डॉलर्सवरुन वर्ष २००५ पर्यंत २७४ बिलियन डॉलर्स इतके वाढणार होते.

३) या वाटघाटींचा सर्वाधिक अनुकूल परीणाम विकसित देशांना होणार असून मागासलेली राष्ट्रे, प्रामुख्याने, अन्नधान्य वस्तूंची आयात करणाऱ्या देशांसाठी हा करार काही अंशी प्रतिकूल परीणाम घडवून आणणारा होता.

४) या करारान्वये स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या प्रमाणात अणेरीकेच्या वास्तव उत्पन्नात ०.२टक्के युरोपीयन संघामध्ये १.६टक्के, जपान ०.९टक्के, चिन २.५टक्के, भारत ०.५टक्के, दक्षिण अफ्रिका ०.९टक्के तर ब्राझिल ०.३टक्के इतकी वाढ अपेक्षित होती.

६.३ जागतिक व्यापार संघटनेचे संघटन

१) मंत्री परिषद : (Ministerial Conference)

जागतिक व्यापार संघटनेच्या रचनेमध्ये मंत्रीपातळीवरील परिषद ही सर्वोच्च पातळीवरील कार्य करणारी यंत्रणा आहे. मंत्री परिषदेमध्ये सभासद देशाचे व्यापार मंत्री सदस्य म्हणून कार्य करतात. मंत्रिपातळीवरील परिषद ही सर्व बाबीसंबंधी अंतिम निर्णय घेते.

२) सर्वसाधारण मंडळ (General Council):

जागतिक व्यापार संघटनेचे दैनंदीन कामकाज पाहण्यासाठी अनेक मंडळांची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळामध्ये सर्वसाधारण मंडळ हे सर्वांत महत्त्वाचे मानले जाते. कारण हे मंडळ मंत्रिपातळीवरील परिषदेला कामकाजाचा अहवाल देण्यास

बांधिल असते. सर्वसाधारण मंडळांतर्गत दोन स्वतंत्र मंडळे कार्यरत असतात. त्यापैकी एक देशादेशांत व्यापारातून निर्माण झालेले विवाद मिटविण्याचे कार्य करते तर दुसरे मंडळ व्यापार धोरणाचा आढावा घेण्याचे कार्य करीत असते.

अ) वादविवाद निवारण मंडळ (Dispute Settlement Body):

सर्वसाधारण मंडळ आपल्या कार्याची जबाबदारी इतर ३ स्वतंत्र मंडळांवर विभागून देते. त्यापैकी वस्तूच्या व्यापारासाठी मंडळ (Trade in Goods), सेवांच्या व्यापारासाठी मंडळ (Trade in Services) आणि व्यापारासंबंधी बौद्धीक संपदा अधिकारासाठी मंडळ TRIPs ही तीन्ही मंडळे सर्वसाधारण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली कार्य करतात आणि सर्वसाधारण मंडळाने सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडतात.

ब) व्यापार धोरण आढावा मंडळ (Trade Policy Review Body):

वरील स्वतंत्र ३ मंत्रिमंडळाबरोबरच व्यापार धोरणाचा आढावाघेण्यासाठी सर्वसाधारण मंडळाकडून स्वतंत्र तीन समित्या नियुक्त करण्यात येतात. त्यापैकी एक व्यापार आणि विकास समिती (Committee of Trade and Development), दुसरे व्यवहारतोलावर नियंत्रण ठेवणारी समिती (Committee on Balance of payment Restriction) तिसरी समिती अंदाजपत्रक, वित्तव्यवहार आणि प्रशासन सांभळणारी (Committee on Budget, Finance and Administration) ही समिती जागतिक व्यापारसंघटना आणि सर्वसाधारण मंडळाने सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडते.

३) WTO चे सचिवालय (Secretarial of WTO):

WTO चे प्रशासन डायरेक्टर जनरल प्रमुख असलेल्या सचिव पातळीवरील मंडळामार्फत पाहिले जाते. डायरेक्टर जनरलची नियुक्ती मंत्रिपातळीवरील परिषदेमार्फत केली जाते. त्यांची मुदत चार वर्षांची असते. त्याला मदत करण्यासाठी चार स्वतंत्र डेप्युटी डायरेक्टर असतात. जे विविध सभासद देशांचे प्रतिनिधित्व करीत असतात. WTO चे वार्षिक अंदाजपत्रक तयार करून ते अंदाजपत्रक वित्त व प्रशासन मंडळाला आढावा घेण्यासाठी सादर केले जाते आणि त्याला अंतिम मंजूरी संबंधी शिफारसी करण्यासाठी सर्वसाधारण मंडळाकडे पाठविले जाते.

६.४ जागतिक व्यापर संघटनेची उद्दिष्टे

WTO ची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतील.

i) व्यापारातील जकात व जकातेतर अडथळे दूर करणे.

ii) आंतरराष्ट्रीय व्यापारातील संबंधांमधील भेदभाव करणारे धोरण नाहीसे करणे.

iii) व्यापार क्षेत्राच्या संबंधातील देशात लोकांचे जीवनमान उंचवणे, रोजगार पातळीत वाढ करणे, वास्तव उत्पन्नात वाढ करणे, परिणामकारक मागणीत वाढ करणे, उत्पादनात वाढ करणे, वस्तू व सेवा व्यापार वाढविणे.

iv) जागतिक साधनांचा जास्तित जास्त वापर करणे त्याचबरोबर स्थैर्यात्मक विकास करणे व आर्थिक विकास साह्य करणे.

v) विकसनशील देशांच्या आर्थिक विकासासाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून त्यांच्या व्यापारात वाढ घडवून आणणे.

vi) बहुपक्षीय करारानुसार व्यापारात समन्वय घडवून आणणे व त्यासाठी उत्तेजन देणे.

vii) व्यापार धोरणांमध्ये परिवर्तनात्मक धोरणे आणि स्थैर्यात्मक विकासासाठी समन्वय साधणे.

६.५ जागतिक व्यापार संघटनेचे कार्य

WTO ची प्रमुख कार्ये पुढील प्रमाणे

i) जकाती आणि व्यापारातील इतर निर्बंध कमी करण्यासाठी आचारसंहिता आणि नियमावली तयार करणे.

ii) व्यापारातील वाटाघाटी घडवून आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ म्हणून कार्य करणे.

iii) बहुपक्षीय व्यापारासंबंधी या कराराचे प्रशासन आणि अंमलबजावणी करणे.

iv) व्यापारात निर्माण झालेले कलह व वादविवाद सोडविण्याचा प्रयत्न करणे.

v) व्यापारातील निकोप स्पर्धेला प्रोत्साहन देणे आणि राष्ट्रीय व्यापार धोरणावर लक्ष देणे.

vi) जागतिक व्यापार धोरण ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी IMF व जागतिक बँकेसारख्या (IBRD) संस्थांना सहकार्य करणे.

६.६ दोहा घोषणा पत्र (The Doha Declaration)

WTO च्या भावी कार्य योजनेची निश्चिती करण्याकरीता ९ ते १४ नोव्हेंबर २००१ च्या दरम्यान कतो मधील दोहा शहरात WTO च्या चौथ्या मंत्रीस्तरीय संमेलन भरविण्यात आले. या संमेलनात भारताने सक्रिय भूमिका बजावली ज्यामध्ये केवळ व्यापारच नव्हे तर विकसनशील देशांचे विकासात्मक लक्ष्ये Targets व प्रार्थमिकता आहे अशा कार्यक्रमांवर भारताने जोर दिला.

संमेलनाच्या निष्कर्षाबाबत भारताने व्यक्त केलेली चिता व इशारे ह्याकडे लक्ष देण्यात आले. दोहा घोषणापत्रात भविष्यकालीन व्यापार व्यवहारीबाबत एक कार्यक्रम सुची तयार करण्यात आली व आता WTO मधील कार्ययोजनेकडे केंद्रबिंदू सरकला.

इतर विकसनशील देशांच्या सहकार्याने भारत आता हे निश्चितपणे ठरविल की, त्यांच्या हिताकडे व गैरसौयीकडे पुढील कार्यक्रमात निश्चितपणे लक्ष देण्यात येईल.

दोहा घोषणापत्रात प्रामुख्याने पुढील ३ घोषणांचा अंतर्भाव महत्त्वाचा होता

i) WTO च्या नवीन अधिवेशनातील वाटाघाटी व चर्चेचा कार्यक्रम.

ii) WTO कराराची विकसित देशांतील अंमलबजावणी संदर्भात.

iii) पेटंट आणि सार्वजनिक आरोग्याच्या बाबींसदर्भात.

दोहा संमेलनातील ठरावाअंतर्गत चिन व तैवान या दोन नवीन देशांची सभासदत्व मान्य करण्यात आले. त्यामुळे WTO ची सभासद संस्था वाढून १४४ देश इतकी बनली.

६.७ WTO ची मंडळे (WTO Bodies)

WTO च्या मंडळामध्ये पुढील ३ प्रमुख मंडळांचा अंतर्भाव होता.

i) वाद निवारण मंडळ (The Dispute Settlement Body DSB):

ह्या मंडळाची महिन्यातून किमान दोनदा बैठका होत असून या बैठकिमध्ये सभासद देशांच्या व्यापारा संबंधीच्या तक्रारीची दखल घेतली जाते.

त्यानुसार तज्ञ व अनुभवी अधिकाऱ्यांमार्फत दोन्ही पक्षांच्या बाजूंचा विचार करुन योग्य निर्णय देऊन वाद मिटविण्याच्या अनुषंगाने प्रयत्न केले जातात.

ii) अपिल मंडळ (The Appellate Body AB):

या मंडळामार्फत वादी-प्रतिवादी यांच्या मार्फत आलेल्या अपिलांची दखल घेऊन ती पुन्हा वाद निवारण यंत्रणेकडे DSB) पाठविण्याचे कार्य केले जाते.

iii) व्यापार धोरण पुनरावलोकन मंडळ : The Trade Policy Review Body TPRB):

सभासद राष्ट्रांच्या व्यापार धोरणांचा आढावा, बदल किंवा चिकित्सक परीक्षण करणारे हे मंडळ आहे. बहुपक्षीय व्यापार तंत्र व्यवस्थितपणे कार्यरत रहावे याकरीत TPRB अंतर्गत व्यापार धोरणे व प्रक्रिया यांची तपासणी करण्यात येते. प्रत्येक सभासद देशाला आपल्या व्यापार धोरणे व प्रक्रिया यांची तपासणी करण्यात येते. प्रत्येक सभासद देशाला आपल्या व्यापार धोरण प्रक्रियांबाबतचा अहवाल TPRB कडे सतत पाठवावा लागतो.

६.८ WTO पुढील आव्हाने

WTO च्या स्थापनेनंतर WTO पुढील आव्हाने व अपेक्षा वाढलेल्या दिसून येतात. WTO पुढील प्रमुख पहिले आव्हान म्हणजेच जागतिक जास्तित जास्त व्यापारी राष्ट्रांना WTO चे सभासद करून घेणे होय. अन्यथा WTO ला नियंत्रण मुक्त व्यापाराचे उद्दिष्ट साह्य करण्यात काही अडथळे निर्माण होऊ शकतात.

उदा. जागतिक व्यापारात महत्त्वाचे स्थान प्राप्त करणाऱ्या चीन सारख्या नवीन महासत्ता देशांनी WTO चे सभासदत्व होणे सहयंत आवश्यक आहे.

दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे WTO च्या तत्त्वांच्या अविरोधी व्यापर करणारे प्रादेशिक व्यापारी गट होय. त्यापैकी दक्षिण आफ्रिकेतील २००२ मध्ये स्थापन धालेला The Mercosurz जकात संघ आणि The Asia Pacific Economoc Co-operative (APEC) हा मुक्त व्यापर क्षेत्र ही त्याची अलिकडील काही प्रमुख उदाहरणे देता येतील.

सध्याचे ज्वलंत आव्हान म्हणजेच पर्यावरणासंबंधिच्या समस्या होय. तसेच श्रम मानदंड विषयक समस्या होय. विकसनशील देश आर्थिक विकासासाठी जे प्रयत्न करीत आहेत त्यातून पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. तसेच हे देश पर्यावरण संरक्षणासाठी मात्र कोणतेच प्रयत्न करीत नसल्याची टीका विकसित राष्ट्रांमार्फत केली जात आहे. तसेच विकसनशील देश जो माल तयार करतात त्यात मजुरांची अपुरी मजूरी देऊन शोषण करण्यात येत आहे व श्रम कल्याण कार्यक्रमांकडे दुर्लक्ष करुन श्रमीकांच्या राहणीमानाचा दर्जा घसरत आहे. बालकामगारांचा वापर व मानवाधिकारांचे उल्लंघन करुन हे विकसनशील देश आंतरराष्ट्रीय श्रम-मानदंडाचे (Labour Standards) चे पालन करतांना दिसत नाही.

WTO पुढील एक प्रमुख आव्हान हे सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेतील घडून आलेल्या मूलभूत बदलांशी संबंधित आहे व ते म्हणजेच सभासद देशांवरील नियंत्रणात्मक धोरणांबाबत WTO ला दिलेले अधिकार अपुरे असल्याचे दिसून येतात. GATT च्या १९४७ च्या नियमावली नुसार व्यापारी धोरणे, जकात व बिगर जकातीसंबंधी नियम, व इतर महत्त्वाच्या बाबिंविषयी काही विशिष्ट नियमावली ठरवून देण्यात आली परंतू सभासद देशांवरील नियत्रणांबाबत WTO ला फारसे अधिकार देण्यात आलेले नाहीत. म्हणूनच WTO च्या नियंत्रणात्मक कार्यावर काही प्रमाणात मर्यादा दिसून येतात.

जागतिक व्यापार उदारीकरणाचे उद्दिष्ट साह्य करण्यासाठी WTO प्जागतिक व्यापार व्यवहारातील होणारा खर्चात घट घडवून आणावी अशी अपेक्षा होती. व त्या अनुषंगाने जागतिक स्तरावर उत्पादन घटकांचे कार्यक्षम वाटप करुन उत्पन्न पातळीत वाढ घडवून आणणे हे एक महत्त्वाचे आव्हान WTO पुढे निर्माण झालेले दिसून येते.

असे जरी असले तरीही WTO भवितव्य च्या अहवाला नुसार असे नमुद करण्यात आलेले आहे की WTO च्या स्थापनेमुळे निश्चितच जागतिक स्तरावरील व्यापारापासून मिळणाऱ्या निरपेक्ष वाढाव्यात सुधारणा घडून येण्यास मदत होणार असून विकसि देश व विकसनशील देश यांच्यातील आर्थिक विषमतेची दरी वाढवण्याची शक्यता असल्याने त्याविषयी WTO ने राजकिय धोरणे व त्यांची योग्य अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे.

६.९ WTO ची वादविवाद (तक्रार) निवारण यंत्रणा (Dispute Settlment Mechanism DSM)

GATT च्या स्थापनेपासून भरविण्यात आलेल्या प्रत्येक फेरीमध्ये जकात व बिगर जकाती नियंत्रणे शिथिल करण्यावरुन सभासद देशांमध्ये सतत वादविवाद निर्माण होऊ लागल्याने सामोपचाराने ह्या सर्व तक्रारीचे निवारण करण्यासाठी वाद निवारण यंत्रणेची DSM आवश्यकता भासू लागली.

GATT करारातील Articles XXII आणि XXIII नुसार सभासद देशांमधील व्यापारी तक्रांरींचे निवारण करण्यासाठी वाद निवारण यंत्रणेची गरज व्यक्त करण्यात आलेली आहे. याच शिफारसीचा एक पुढील टप्पा म्हणून GATT करार १९४७ ला खंड iv नुसार Articles XXXVI, XXXVII जोडण्यात आले. या नुसार विकसनशील देशांना विशिष्ट दर्जा देण्यासाठी कायदेशिर मान्यता देण्यात आली. तसेच खास विकसनशील देशांच्या समस्या सोडविण्यासाठी १९६६ मध्ये DSM ची गरज व्यक्त करण्यात आली. DSM च्या स्थापनेमुळे WTO च्या संरचनेला नवीन रुप प्राप्त होऊन जागतिक व्यापार अधिकाधिक पारदर्शी, नियमाधिष्ठीत व न्याय्य तत्त्वांवर आधारीत होण्यास मदत मिळाली.

थोडक्यात WTO चे वाद निवारण मंडळ हे खास अप्रगत राष्ट्रांच्या गरजा व समस्या विचारात घेऊन स्थापन करण्यात आले होते. त्यामुळेच हे पाहणे आवश्यक आहे कि DSM चा अप्रगत देशांना कितपत फायदा करुन घेता येतो ? तसेच DSM मुळे निश्चितच अप्रगत राष्ट्रांच्या कार्यक्षमतेत व आत्मविश्वासात वाढ घडून येणार आहे किंवा नाही ?

६.१० वाद निवारण पद्धती यंत्रणा संकल्पना व तत्त्वे

WTO च्या सदस्य देशांचे अधिकार, कर्तेव्य यांच्याशी संबंधित विषयावर विचार व चर्चा करण्यासाठी तसेच मतभेद मिटविण्यासाठी विवाद मिटविणारी यंत्रणा स्थापन करण्यात आली. सुरुवातीला मतभेद असल्यास संबंधित राष्ट्रांमध्ये सामोपचाराने वाटाघाटी करण्याची व्यवस्था आहे. यामध्ये यश न आल्यास WTO चे डायरेक्टर जनरल मध्यस्थी करतात. तक्रार करणारा देश DSM कडे ३० दिवसांच्या आत ३ तज्ञांची नियुक्त करण्याची विनंती करु शकतो. DSM मार्फत सात सदस्यांचे अपिल मंडळ नेमण्यात येते हे मंडळ चौकशी करुन ९० दिवसांच्या आत आपला अहवाल DSM ला सादर करतात. या अहवालाविषयी DSM ला ३० दिवसांच्या आत निर्णय द्यावा लागतो व दोन्ही देशांना तो मान्य करावा लागतो.

६.१०.१ DSM चे तत्त्व:

WTO मध्ये असलेले वाद हे प्रामुख्याने विदेशी व्यापाराचे नियम व कायदे अमान्य केल्याच्या किंवा कायदे तोडण्याच्या संदर्भात दिसून येतात. WTO च्या सभासदांशी DSM चे तत्त्व मान्य केले आहे व ते म्हणजेच जर एखाद्या सभासद राष्ट्रामार्फत व्यापारी कराराचे व नियमांचे उल्लंघन केले जात असले तर त्या राष्ट्रांशी होणारा मतभेद इतर मार्गांनी न सोडविता ते मतभेद सोडविण्यासाठी न्यायाची बाजू विचारात घेऊन DSM चा एक व्यासपीठ म्हणून वापर करणे व सामोपचाराने विवाद मिटविणे होय.

६.१०.२ DSM च्या कार्याचे टप्पे :

DSM च्या कार्याचे प्रमुख टप्पे किंवा पायऱ्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) सल्ला व मध्यस्थी (६०दिवस)

२) पैनलची स्थापना व सदस्यांची नेमणूक (४५ दिवस)

३) मतभेद असणाऱ्या देशांना अंतिम रिपोर्ट देणे. (६ महिने)

४) WTO च्या सभासदांना अंतिम रिपोर्ट देणे (३ आठवडे)

५) DSM मार्फत अंतिम रिपोर्टची स्वीकृती (अपिलाशिवाय ६० दिवस)

६) अपिल रिपोर्ट (६०-९० दिवस)

७) DSM मार्फत अपिलाची स्वीकृती (३० दिवस)

६.११ वाद निवारण प्रक्रिया

वाद निवारणाची संपूर्ण जबाबदारी DSM ची असून त्यामध्ये प्रत्यक्षरीत्या सर्व WTO च्या सभासदांची देशाचा समावेश होतो. DSM हा तज्ञांच्या पॅनल स्थापनेचा संपूर्ण अधिकार असतो. ह्या वादनिवारण कार्याची प्रक्रिया पुढील टप्प्यांमार्फत पूर्ण होते.

१) सल्ला व समुपदेशन : (पहिला टप्पा)

संबंधित तक्रारीविषयी वादी आणि प्रतिवादी देशांकडून तक्रार समजून घेऊन त्याविषयी योग्य ते समूपदेशन व मार्गदर्शन केले जाते. हा आपापसातील वाद मिटविण्याचा पहिला प्रयत्न केला जातो. अन्यथा दोन्ही पक्ष WTO च्या डायरेक्टर जनरलची भेट घेऊन त्यांच्या मध्यस्तीने प्रकरण सोडविण्याचा प्रयत्न करतात ही सर्व प्रक्रिया ६० दिवसांत होणे अपेक्षित असते.

२) पॅनलची नियुक्ती : (दुसरा टप्पा)

जर सल्ला व मार्गदर्शन, मध्यस्थी व समूपदेशन हा पहीला टप्पा अपयशी ठरल्यास तक्रार करणारा पक्ष पॅनलच्या स्थापनेसाठी अर्ज करु शकतो. त्यासाठी ४५ दिवसांची मुदत असते. या पॅनल मार्फत अंतिम रिपोर्ट दिला जातो. त्यासाठी ६ महिल्यांचा कालावधी अपेक्षित असतो.

३) पहिल्या सुनावणीपूर्वीची प्रक्रिया (तिसरा टप्पा):

पॅनलचा रिपोर्ट तयार झाल्यानंतर पहिल्या सुनावणीपूर्वी दोन्ही पक्षांनी आपल्या बाजू लेखी स्वरुपात DSM ला सादर करावी.

४) पहिली सुनावणी (चौथा टप्पा):

या टप्प्यात पॅनलच्या रिपोर्टच्या आधारे मंडळ महिली सुनावणी घोषित करीत असते.

५) दुसरी सुनावणी : (पाचवा टप्पा)

दुसऱ्या सुनावणीमध्ये दोन्ही पक्षांचा व आपल्या बाजू लेखी व तोंडी स्वरुपात मांडाव्या लागतात.

६) तज्ञांची नियुक्ती (सहावा टप्पा):

कोणत्याही प्रकारीची तांत्रिक किंवा शस्त्रिय स्वरुपाची अडचण निर्माण झाल्यास त्या संबंधित विषयाच्या तज्ञांची नियुक्ती करुन रिपोर्ट मागवून घेतले जातात.

७) कच्चा रिपोर्ट (सातवा टप्पा):

आतापर्यंतच्या युक्तीवादाच्या आधारे पैनल एक कच्चा रिपोर्ट तयार करुन तो दोन्ही पक्षांकडे सुपूर्त करतो या कच्चा रिपोर्टमध्ये कोणताही निष्कर्ष किंवा निर्णय दिलेला नसतो. त्यामध्ये उणीवा भासल्यास त्याच्यावर युक्तीवाद करण्यासाठी दोन्ही पक्षांना २ आठवड्याचा कालावधी दिला जातो.

८) अंतिम रिपोर्ट (आठवा टप्पा):

दोन्ही पक्षांच्या युक्तीवादानंतर पॅनल दोन्ही पक्षांना अंतिम रिपोर्ट पाठविले जातात. परंतू त्यामध्ये निष्कर्ष किंवा निकाल दिलेला नसतो. त्याच्या परीक्षणासाठी एक आठवड्याचा कालावधी दिला जातो.

९) रिपोर्टचा आढावा : (नऊवा टप्पा):

अंतिम रिपोर्टच्या आढाव्यासाठी २ आठवड्यांची मुदत दिली जाते.

१०) अंतिम निर्णय : (दहावा टप्पा)

झालेला अंतिम निर्णय हा आठवड।नंतर दोन्ही पक्षांकडे पाठविला जातो. तसेच WTO च्या सर्व सभासद राष्ट्रांकडे त्याच्या प्रति पाठविल्या.

११) अंमलबजावणी : (अंतिम टप्पा)

दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी ६० दिवसांच्या आत होणे अपेक्षित आहे. जर निर्णय अमान्य असेल तर अपिल करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. त्यासाठी ६०-३० दिवसांची मुदत आहे. परंतु या अपिलाची स्विकृती किंवा तो अमान्य करण्याचा अधिकार DSM ला आहे. त्यासाठी ९० दिवसांची मुदत आहे. या सर्व कारवाईमध्ये दोषी आढळणाऱ्या देशावर दंडात्मक कारवाई केली जाते.

६.१२ WTO च्या कार्याचे चिकित्सक परीक्षण

GATT ची उरुग्वे फेरी ही अधिक क्लिष्ट व विवादास्पद ठरली. या फेरीतील वाटाघाटी पूर्णत्वास येण्यासाठी सात वर्षाचा कालावधी लागला. या फेरीतील TRIPs, TRIMs सेवा व्यापार, कृषी क्षेत्र अनुदान व सवलती, बिगर जकाती नियंत्रणे शिथिल करणे, अधिक प्राधान्य करार या मुद्द्यांमुळे ही फेरी अधिक गुंतागुंतीची व विवादास्पद ठरली. म्हणूनच उरुग्वे फेरीचे यश व भवितव्य त्यातील करारांच्या अंमलबजावणीवरच अवलंबून होते.

एका अहवालावरुन असा अंदाज व्यक्त करण्यात आला की उरुग्वे फेरीतील करारांच्या योग्य अंमलबजावणीतून वर्ष २००५ पर्यंत जागतिक वास्तव उत्पन्नात २७२ बिलिअन डॉलर्स ते २७४ बिलिअन डॉलर्स पर्यंत वाढ घडून येणार होती. GATT च्या अभ्यासगटाच्या अहवालानुसार हे प्रमाण जागतिक स्थूल उत्पादनाच्या १टक्के म्हणडेच ५१० बिलिअन डॉलर्स पर्यंत वाढणार आहे. परंतु हे सर्व व्यापारी लाभ विकसित देशांना सर्वाधिक मिळणार असून विकसनशिल व मागासलेले देश मात्र या लाभापासून काही प्रमाणात वंचित राहणार आहेत.

उरुग्वे फेरी मुळे युरोपिय महासंघाच्या वास्तव उत्पन्नात त्यांच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या GDP १.६टक्के नी, अमेरीकेत ०.२ टक्के नी तर जपान मध्ये ०.९ टक्के नी वाढ होणार होती. परंतु एक स्वतंत्र देश म्हणून या कराराचा सर्वाधिक फायदा म्हणजेच ४२ बिलिअन डॉलर्स इतका जपानच्या वाट्याला येणार होता. तर अमेरिकेच्या वाट्याला २७ बिलिअन डॉलर्स व युरोपिय महासंघाला ६१टक्के बिलिअन डॉलर्स ३६ ते ७८ बिलिअन डॉलर्स विकसनशील देशांच्या वाट्याला येणार होता.

चिनसाठी एकूण GDP च्या हे प्रमाण २.५टक्के, भारत ०.५ टक्के दक्षिण अफ्रिका ०.६टक्के तर ब्राझिलसाठी ०.३टक्के इतके राहणार.

६.१२.१ उरुग्वे फेरी आणि विकसनशील देश :

उरुग्वे फेरी ही खऱ्या अर्थाने विकसनशिल राष्ट्रांचे भवितव्य ठरवणारी मानली जाते. मात्र या पूर्वीच्या फेऱ्यांप्रमाणेच उरुग्वे फेरीत सुद्धा विकसनशील देशांना झुकते माप दिल्याचे दिसून येते. The Wall Street Journal च्या अहवालानुसार, ज्यावेळी अमेरीका व युरोपिय संघाच्या वस्तूंना आंतराष्ट्रीय बाजारात उत्तम किंमत मिळत होती त्याचवेळी मात्र विकासनशिल देशांच्या वस्तूंच्या किंती दुष्टचक्रात अडकलेल्या होत्या असे मत व्यक्त करण्यात आले होते.

उरुग्वे फेरीतील TRIPs, TRIMs सेवा व्यापार क्षेत्र, कृषी क्षेत्र इ. विषयीचे करार विकसनशील देशांच्या बाबतीत अधिक संवेदनशील मानले जातात. या करारांनुसार वरील क्षेत्रातील सर्व निर्बंध व नियंत्रणे शिथिल करणे अपेक्षित आहे. परंतु त्यामुळे बलाढ्य स्पर्धक देशांपुढे विकसनशील देशांची स्पर्धाक्षमता कमी पडून त्यांचा निभाव लागणार नाही.

बहुतांश अप्रगत राष्ट्रांमध्ये शेती हा मूख्य व्यवसाय असल्याने त्यांचा तो जिव्हाळ्याचा प्रश्न होता. परंतु प्रगत देशांना अप्रगत देशांच्या बाजारपेठ करायच्या होत्या म्हणूनच त्यांनी शेती अनुदाने कमी करण्याबाबतचा अट्टाहास कायम ठेवला. अमेरीका आणि युरोपातील देशांनी त्यांच्या शेतकऱ्यांचे हित जोपासण्यासाठी दिल्या जाणाऱ्या भरमसाठ अनुदानांमध्ये कपात करायची नाही. परंतु विकसनशील देशांवर मात्र शेती अनुदान कमी करण्यासाठी दबाव आणावयाचा ही प्रगत देशांची चाल अप्रगत देशांनी संघटीतपणे अयशस्वी ठरविली.

प्रगत देश दरवर्षी शेतीक्षेत्राला ३२० बिलीयन डॉलर्स पेक्षाही अधिक अनुदान देतात. अमेरीकेने मागील वर्षी कापूस उत्पादन शेतकऱ्यांना २ अब्ज डॉलर्स पेक्षा अधिक अनुदान दिले होते. अशा परिस्तितीत अप्रगत देशांना जगा आणि जगू द्या या तत्त्वाप्रमाणे प्रगत देशांनी शेती अनुदानात कपात करुन त्यांची सेवा क्षेत्रे अप्रगत देशांसाठी खुली करण्याची मागणी कॅनकून परिषदेत जोरदारपणे मांडली. मात्र प्रगत देशातील शेती अनुदानात कपात करण्याच्या मुद्द्यावर तोडगा निघू शकला नाही.

या करारातील वस्त्र व कापड विषयक करार हा देखिल विकसनशील राष्ट्रांच्या बाबतीत असलेला एक महत्त्वाचा करार मानला जातो. या करारानुसार वस्त्र व कापड क्षेत्रात असलेला बहुधागा करार (MFA) २००५ सालापर्यंत टप्प्यां टप्पाने रद्द होणार आहे. त्यामुळे अप्रगत देशांच्या कापड निर्यातीतील सर्वांत मोठा अडथळा संपुष्टात येणार आहे. जागतिक कपडा व वस्त्र व्यापार प्रतिवर्षी २४० बिलियन डॉलर्स इतक्या किंमतीचा असून बहुधागा करार संपुष्टात आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन हा व्यापार प्रतिवर्षी २५ बिलियन डॉलर्स इतका होणार आहे. परंतु त्यामध्ये देखिल

कापड,उद्योगात वर्चस्व असणाऱ्या चिन, तैवान, हॉगकॉग, दक्षिण कोरीया इ. राष्ट्रांबरोबर अप्रगत देशांतील वस्त्र व कापड उद्योगांना स्पर्धा करावी लागणार आहे.

उरुग्वे कराराचा एक महत्त्वाच परीणाम म्हणजेच सेवा क्षेत्राला मिळालेला व्यापारी दर्जा होय. या करारानुसार सेवा क्षेत्रासंबंधिचे नियम शिथिल केल्याने जागतिक सेवा क्षेत्र व्यापारात वाढ घडून येणार आहे.

जशी उरुग्वे फेरीतील विविध करार हे सर्वानुमते संमत झालेले असले तरीही या कराराचे परिणाम मात्र प्रत्येक देशांवर वेगवेगळे दिसून येणार आहेत. त्यामध्ये विकसित अर्थव्यवस्थांवर अनुकूल तर विकसनशील देशांवर काही क्षेत्रांत प्रतिकूल परिणाम दिसून येणार आहेत असे जरी असले तरीही जागतिक व्यापार नियंत्र निर्बंध मुक्त करण्यासाठी व पारदर्शक व्यवहारांसाठी WTO ची भूमिका अत्यंत महत्तवाची ठरणार आहे.

६.१२.२ उरुग्वे करार आणि भारत:

भारत १९९५ मध्ये जरी WTO मध्ये सामील झाला असला तरीही भारत पूर्वीपासूनच GATT चा सभासद देश राहीला आहे. परंतु भारताच्या या भूमिकेवरच काही विरोधी पक्ष, व आंतराष्ट्रीय व्यापार परिस्थितीविषयी अनभिज्ञ असलेल्या विरोधकांमार्फत सतत टिका करण्यात आली. WTO चा करार हा विकसित राष्ट्रांना अधिक अनुकूल आहे हे जरी योग्य असले तरी असे म्हणता येणार नाही की भारताच्या बाबतीत हा करार संपूर्ण प्रतिकूल आहे. भारताला देखिल या करारामुळे फायदे मिळणार आहेत. परंतु ते विकसित राष्ट्रांच्या तुलनेत कमी असू शकतील.

या कराराचा सर्वात मोठा फायदा म्हणजे भारताला WTO सभासद देश म्हणून 'विशिष्ट परम मित्र राष्ट्रे '(Mast Favoured Nations MFM चा दर्जा मिळून भारत हा देखिल इतर विकसित सभासद देशांच्या समपातळीत राहणार असून त्यांना मिळणारे सर्व व्यापारी लाभ व सवलती भारताला देखिल लागू होणार आहेत.

शेती क्षेत्रातील सवलती व अनुदाने कमी केल्याने भारतीय शेती व शेतकऱ्यांवर त्याचे प्रतिकूल परिणाम दिसून येतील अशी एक टीका केली जात होती. परंतू शेती अनुदाने व सवलती कमी करण्याचे बंधन केवळ भारतावरच नसून इतर विकसित सभासद देशांवर देखिल आहे असे झाल्यास भारतीय कृषिजन्य वस्तू आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक स्पर्धाक्षम बनतील. अल्प किंमतीमुळे भारतीय कृषी क्षेत्राला निर्यात वाढीच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

भारत १९९५ मध्ये WTO मध्ये सामील झाला त्यामुळे जागतिक निर्यात व्यापारात १९९० मध्ये भारताचा ०.५टक्के भाग होता, तो वाढून १९९५ मध्ये ०६टक्के झाला. आर्थिक सुधारणांच्या १२ वर्षाच्या काळात २००२ पर्यंत हा हिस्सा वाढून ०.८ टक्के झाला.

१९९० मध्ये भारताची एकूण निर्यात १८१४३ मिलियन डॉलर्स होती. ती वाढून १९९५ मध्ये ३१११७ मिलियन डॉलर्स झाली.इ.स. २००३-२००४ ह्या वर्षात भारताची निर्यात ६३८४३ मिलियन डॉलर्स पर्यंत वाढली. WTO च्या आधुनिक अहवालानुसार भारताच्या व्यापारी वस्तूंच्या निर्यातीत १५टक्के वाढ झाली असून इ.स. २००२ मध्ये जगाच्या ३० प्रमुख निर्यातक व आयातक देशांमध्ये भारताने चीन नंतर दुसरा क्रमांक घेतला आहे.

इ.स. २००१-२००२ मध्ये भारताची आयात २४१९२९ वरुन वाढून २००३-२००४ मध्ये २९९७०८ कोटी रु. झाली. सन २००२ मध्ये जागतिक निर्यात व्यापारात भारताचा हिस्सा केवळ ०.८टक्के होता., तर अमेरिकेचा १०.७टक्के चीनचा ५.२ टक्के तर जपानचा ६.६टक्के हिस्सा होता. ह्याच कालावधीत एकूण जागतिक आयात व्यापारात भारताचा हिस्सा ०.९टक्के चीनचा हिस्सा ४.५टक्के तर जपानचा हिस्सा ५.२ टक्के होता. इ.स. २००४ मध्ये जागतिक निर्यात व्यापारात भारताचा हिस्सा ०.८टक्के इतकाच राहिला परंतू निर्यातीत २८.१टक्के वृद्धी घडून आली.

जागतिक व्यापारात भारताच्या हिश्श्यात अपेक्षित वाढ होत नाही याचे प्रमुख कारण विकसित देश विकसनशील देशांच्या निर्यात व्यापारात सतत विविध तऱ्हेचे अडथळे निर्माण करण्याचा पर्यत्न करीत असतात. ह्या विविध प्रकाच्या अडथळ्यामुळे जागतिक व्यापारात विकसनशील देशातील व्यापाराचा अत्यंत कमी हिस्सा असतो. WTO सारख्या संघटनेच्या दबावाकाली असलेल्या विकसनशील देशांना आपले व्यापार अडथळे काढून टाकण्यास व त्यांचा सतत प्रवाह चालू ठेवण्याकरिता विकसित व संपन्न देश भाग पाडीत असतात व त्याचवेळी विकसित देश स्वत:च्या फायद्याकरीता संरक्षण धोरण अंमलात आणण्याकरीता व्यापार अडसर उभे करीत असतात.

थोडक्यात विकसित देश हे विकसनशील देशांच्या निर्यात व्यापारात शक्यतो सर्व प्रकारचे अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहोत. ह्या कारणामुळे भारतासारख्या विकसनशल देशांचा जागतिक व्यापारातील हिस्सा वाढत नाही.

६.१३ सारांश

i) जागतिक व्यापार निर्बंधमुक्त करण्याच्या प्रक्रियेत जागतिक व्यापार संघटनेची WTO ची स्थापना ही एक महत्त्वपूर्ण घटना समजली जाते.

ii) एप्रिल १९९४ मध्ये माराकश, मोरोक्को येथे GATT चे रुपांतर WTO मध्ये करण्याविषयी मान्यता देण्यात आली.

iii) १ जानेवारी १९९५मध्ये GATT संपुष्टात येऊन WTO ची स्थापना करण्यात आली.

iv) WTO मार्फत आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापारी तक्रारींचे निवारण करण्यासाठी वाद निवारण यंत्रणा DSM ची व्यवस्था उभारण्यात आली.

v) WTO चे प्रशासन सर्वोच्च पदावर असलेल्या डायरेक्टर जनरल व सचिव मंडळामार्फत पाहिले जाते.

vi) ०९ ते १४ नोव्हें २००१ मध्ये कतारमधील दोहा शहरात WTO चे चौथे संमेलन भरविण्यात आले. या परीषदेत भारताने विकसनशील राष्ट्रांचा प्रतिनिधी म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.

vi) WTO ची वाद निवारण यंत्रणा DSM ही आंतराष्ट्रीय व्यापारातील भेदभावाच्या धोरणावर प्रतिबंब घालून व्यापारात स्थिरता निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य करते.

vii) WTO चे कायदे व नियमांचे उल्लंघन झाल्यास दोन राष्ट्रांमध्ये वाद निर्माण होतात.

viii) असे वाद निर्माण झाल्यास त्यांच्यानिवारणासाठी स्वतंत्र पॅनल नियुक्त करण्याची जबाबदारी DSM ची असते.

ix) पॅनलने दिलेला निर्णय स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार DSM ला आहे.

x) DSM कडे आलेल्या तक्रारीचे निवारण एक वर्षाच्या आत करणे बंधनकारक आहे.

xi) निर्णय अमान्य असल्यास संबंधित देशाला DSM कडे अपील करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

xii) DSM मार्फत पहिल्या टप्प्यात दोन्ही पक्षांचा सल्ला व मार्गदर्शन करुन समुपदेशनाद्वारे समेट घडवून आणण्याचा पहिला प्रयत्न केला जातो.

xiii) समुपदेशन व मध्यस्थीचा पहीला टप्पा अपयशी ठरल्यास पॅनलची नियुक्ती करुन खटला पुढे चालविला जातो.

xiv) पॅनलमार्फत वादी प्रतिवादी अशा दोन्ही पक्षांची लेखी व तोंडी बाजू लक्षात घेऊन निर्णय दिला जातो.

xv) या निर्णया विरुद्ध अपिल करण्याचा दोन्ही पक्षांना अधिकार असतो.

xvi) WTO च्या करारातून मिळणारा फायदा किंवा नुकसान देशपरत्वे भिन्न भिन्न जरी असेल तरीही प्रगत राष्ट्रांना होणाऱ्या लाभाचे प्रमाण अप्रगत राष्ट्रांच्या लाभापेक्षा निश्चित अधिक असेल.

६.१४ प्रश्न

१) WTO च्या स्थापनेची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२) WTO च्या स्थापनेची उद्दिष्टे व कार्ये लिहा.

३) थोडक्यात टीप लिहा:- i) WTO ची संघटनात्मक रचना ii)WTO पुढील आव्हाने.

४) WTO ची 'वाद निवारण यंत्रणा' ही संकल्पना स्पष्ट करा.

५) DSM मार्फत वाद निवारणाची प्रक्रिया सविस्तर लिहा.

६) WTO च्या कार्याचे चिकित्सक परिक्षण करा.

७) टीपा लिहा:- i) WTO आणि विकसनशील देश ii) WTO आणि भारत

*****

७

प्रकरण ४

विदेशी विनिमय बाजार

(Foreign Exchange Market)

घटक रचना

७.० उद्दिष्ट

७.१ प्रास्ताविक

७.२ विदेशी विनिमयाची आवश्यकता

७.३ विदेशी विनिमयाची साधने

७.४ विदेशी विनिमय बाजार

७.५ विदेशी विनिमय बाजारपेठेची कार्ये

७.६ विदेशी विनिमय बाजारपेठेतील व्यवहार

७.७ विदेशी विनिमय दर संकल्पना

७.८ विदेशी विनिमय दर निश्चिती

७.९ विनिमय दर पद्धती

७.१० व्यवस्थापित विनिमय दर

७.११ सारांश

७.१२ प्रश्न

७.० उद्दिष्ट्ये

१) विदेशी विनिमय संकल्पना समजून घेणे.

२) विदेशी विनिमयाची आवश्यकता/गरज जाणून घेणे.

३) विदेशी विनिमयाची विविध साधने अभ्यासणे.

४) विदेशी विनिमय बाजारपेठेचा अर्थ समजून घेणे.

५) विदेशी विनिमय बाजारपेठेच्या कार्यांचा अभ्यास करणे.

६) विदेशी विनिमय बाजारपेठेतील होणाऱ्या व्यवहारांचा अभ्यास करणे.

७) विदेशी विनिमय दर ही संकल्पना समजून घेणे.

८) विदेशी विनिमय दर निर्धारीत करणे.

९) विनिमय दराच्या विविध पद्धतींचा अभ्यास करणे.

१०) व्यवस्थापित लवचिकता या संकल्पनेचा अभ्यास करणे.

७.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय व्यापार हा दोन किंवा दोनापेक्षा जास्त देशांशी संबंधीत असून आयात आणि निर्यात ह्या विदेशी व्यापाराच्या प्रमुख दोन बाजू आहेत. आयातीमध्ये विदेशी देण्यांचा (Receipts) समावेश होतो. वस्तुविनिमय पद्धती ही दोषपूर्ण असल्याने प्रत्येक देशाने विनिमयासाठी चलनाचा वापर करण्यास सुरुवात केली. सध्या प्रत्येक देशाचे स्वत:चे चलन अस्तित्वात असून देशांतर्गत व्यवहार पार पाडण्यासाठी या चलनांचा वापर केला जातो. परंतु स्वदेशी सीमारेषा ओलांडून दुसऱ्या देशांशी व्यापार करतांना मात्र या स्वदेशी चलनावर मर्यादा येत असतात. हीच अडचण समोरील देशाच्या बाबतीत देखिल निर्माण होते. उदा. भारतात रुपया, इग्लंडमध्ये पाऊंड, अमेरिकेत डॉलर्स इ.

ज्यावेळी दोन देशांमार्फत परस्परांकडून वस्तू किंवा सेवांची खरेदी विक्री केली जाते त्यावेळी त्या दोन्ही देशांना आपापल्या देशातील चलनाचे मूल्य एकमेकांच्या चलनात रुपांतरीत करुन घ्यावे लागते. अशावेळी दोन देशांतील चलन बदलून देण्याची एक नविनच समस्या निर्माण होते. आपल्या देशातील किती चलन दिल्यास समोरील देशाचे किती चलन आपल्याला प्राप्त होईल ? हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. अशावेळी हा अडथळा दुर करुन विदेशी व्यापार सुरळित घडून येण्यासाठी विदेशी विनिमय बाजारपेठेची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

७.२ विदेशी विनिमयाची आवश्यकता

निर्यात व्यापाऱ्याने दुसऱ्या देशात वस्तु निर्यात केल्यास किंमत रुपाने त्याला प्राप्त होणाऱ्या परकीय चलनाचा तो स्वदेशात वापर करु शकत नाही. अशा वेळी ते परकीय चलन स्वदेशी चलनात बदलून घेण्याची गरज निर्माण होते. त्याचप्रमाणे आयात व्यापाऱ्याने माल आयात केला तर मूल्यफेड करण्यासाठी त्याला स्वत:कडील स्वदेशी चलनात बदलून घ्यावे लागेल. कोणतेही चलन स्वदेशात स्वीकार्य व विदेशात अस्वीकार्य ठरत असल्यामुळे परकीय चलनाची खरेदी किंवा विक्री करणे अपरिहार्य ठरते. अशावेळी ज्या बाजारात परकीय चलनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातात त्या बाजारपेठेलाच विदेशी विनिमय बाजारपेठ असे म्हणतात. हेच पुढील काल्पनिक उदाहरणाद्वारे स्पष्ट करता येईल.

उदा.

समजा भारत हा जपानला चहा ची निर्यात करतो तर जपान भारतात इलेक्ट्रॉनिक वस्तुंची निर्यात करीत आहे. अशावेळी भारताने स्वत:चे रुपया हे चलन जपानकडे आयातीचे मूल्य म्हणून तर जपानने 'येन' हे चलन चहाच्या आयातीचे मूल्य म्हणून भारतात पाठविले तर एक प्रमुख अडचण निर्माण होईल व ती म्हणजे भारतीय रुपया जपानमध्ये तर जपानचा येन भारतात अस्वीकार्य ठरेल.

अशा वेळी भारताने रुपया येनमध्ये रुपांतरीत करुन जपानच्या आयातीचे मूल्य फेडणे तर जपानने येन या चलनाचे रुपयात रुपांतर करुन भारताच्या आयातीचे मूल्य फेडणे योग्य ठरेल. दोन देशांमधील या चलनांच्या रुपांतरणाचे महत्त्वाचे कार्य करण्यासाठी विदेशी विनिमय बाजारपेठेची आवश्यकता भासते.

म्हणूनच विकसित आणि विकसनशील राष्ट्राच्या विदेशी व्यापार वाढीसाठी, आंतराष्ट्रीय भांडवल प्रवाहाला गती देण्यासाठी, आंतराष्ट्रीय नाणेबाजार व भांडवल बाजाराच्या विकासासाठी आणि जागतिकीकरणाच्या प्रवाहात प्रत्येक अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी विदेशी विनिमय बाजारपेठेची नितांत गरज आहे.

७.२.१ विदेशी विनिमय संकल्पना:

परकीय विनिमय व्यवहारात उत्पन्न आणि संपत्तीच्या हक्कांचे एका देशाच्या चलनाचे परिवर्तन दुसऱ्या देशाच्या चलनात करता येते. या पद्धतीत काही बाबींचा अभ्यास केला जातो.

i) इतर देशांचा आणि देशांच्या चलनांचा अभ्यास करणे.

ii) विनियम दरावर परिणाम करणारे घटक

iii) विनिमयाच्या ठिकाणी विनिमय आणि समतोल मूल्य यांचा अभ्यास केला जातो.

कोणत्याही देशाचे चलन भौतिकदृष्ट्या (Physically) बदलता येत नाही. त्याचा कायदेशीररीत्या संबंधित देशात विनिमय केला जातो व त्याची नोंद केली जाते.

अर्थ : 'ज्या बाजारात परकीय चलनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातात त्या बाजारास परकीय विनिमय बाजारपेठ असे म्हणतात.'

'परकीय विनिमय बाजार ही अशी एक संख्यात्मक यंत्रणा असते की त्यामध्ये बँका, व्यापारी, व्यक्ती, संस्था, सरकार इ. च्या द्वारे परकीय चलनांची खरेदी विक्री होत असते. या बाजारात व्यापारी, दलाल बँका आणि मध्यवर्ती बँक परकीय विनिमय बाजारातील प्रमुख खरेदीदार असतात. विनिमय बाजारातील मध्यस्थ दलाल परकीय चलनाची खरेदी विक्री करुन लाभ मिळवितात. परकीय विनिमय बाजार हे नाणेबाजाराचे वित्तीय केंद्र आहे ?

७.३ विदेशी विनिमयाची साधने

राष्ट्रीय सीमारेषांच्या पलीकडे खरेदीशक्तीचे स्थानांतरण करण्यासाठी दोन गोष्टी आवश्यक असतात. एक पतसाधन आणि दुसरे बँक. बँका विनिमय व्यवहार करणाऱ्या प्रत्येक देशात आणि विनिमय होणाऱ्या अशा दोन्ही देशात असल्या पाहिजेत. बँकांची कार्यपद्धती समजून घेण्यापूर्वी विनिमय व्यवहार करतांना कोणती निरनिराळी पतसाधने वापरली जातात हे पुढील प्रमाणे थोडक्यात पाहू.

i) व्यापारी हुंड्या किंवा स्वीकृतीपत्र (Foreign Bill of Exchange)

ii) धनाकर्ष (Bank Draft)

iii) तार अंतरण (Telegraphic Transfer)

iv) व्यक्तीगत पतपत्र (Letter of credit)

i) व्यापारी हुंड्या किंवा स्वीकृतीपत्र:

हे विदेशी विनिमय व्यवहाराचे अत्यंत प्राथमिक स्वरुपाचे साधन आहे. हुंडी म्हणजेच मालाच्या विक्रेत्याने काढलेले आज्ञा पत्र. यात खरेदीदाराने मालाच्या विक्रेत्यास किंवा त्याने जेथे हुंडी वटविली असेल त्या बँकेला किंवा वटावगृहाला (Discount House) सांगितलेली रक्कम चुकती करण्याचा आदेश दिलेला असतो.

हुंडीचे काही प्रकार असतात. हुंडी दाखविल्या बरोबर नमुद केलेली रक्कम चुकती करावी लागत असेल तर दर्शनी हुंडी (Sight Bill) म्हणतात. परंतु सामान्यत: रक्कम फेडण्यासाठी काही विशिष्ट कालावधी (९० दिवस) देण्याची पद्धत आहे. हुंडी दाखविल्यानंतर तेवढ्या कालावधीत रक्कम फेडणे क्रमप्राप्त असेल तर अशा हुंड्यांना मुदती हुंड्या (Time Bill) म्हणतात. आयात व्यापारी किंवा पैसे गुंतविण्यात इच्छुक असलेले लोक अशा स्वीकृत व्यापारी हुंड्या नि:संकोचपणे विकत घेतात.

ii) धनाकर्ष :

विदेशी विनिमय व्यवहार बँक धनाकर्षाचाही (Bank Draft) वापर करु शकते. धनाकर्षाचे स्वरुप धनादेशासारखेच असते. फरक एवढाच की धनाकर्ष, एका बँकेद्वारे दुसऱ्या बँकेच्या नावावर लिहीला जातो. ऋणको आपल्या बँकेकडून विशिष्ट रक्कमेचा धनाकर्ष विकत घेतो आणि धनकोला पाठवितो. धनकोला त्या बँकेच्या शाखेकडून किंवा संबंधित बँकेकडून निर्दिष्ट रक्कम मिळते. धनाकर्ष टपालाने पाठवावा लागत असल्याने बराच वेळ लागतो आणि तेवढा वेळ निधी अडकून राहतो. त्यामुळेच तार अंतरण (Telegraphic Transfer) या साधनाचा वापर आता सार्वात्रिकरीत्या केला जातो.

iii) तार अंतरण:

सर्वात महत्त्वाचे पतसाधन म्हणजे तार अंतरण (Telegraphic Transfer) किंवा केबल आदेश (cable order) यात एका देशातील बँक दुसऱ्या देशातील बँकेला तारेने किंवा केबलने संदेश पाठवून आपल्या नावावर असलेल्या ठेवी खात्यातून एक विशिष्ट रक्कम आदेशानुसार किंवा निर्देशित खात्यात हस्तांतरित करण्याची सुचना करते.

थोडक्यात तार अंतरण म्हणजेच टपालाने न पाठविता तारेने किंवा रेडिओ संदेशाने दुसऱ्या देशात पाठविला जाणारा धनादेश होय.

iv) व्यक्तीगत पतपत्र:

व्यक्तीगत पतपत्राचे स्वरुप मात्र वरील साधनांपेक्षा वेगळे असते. सामान्यत: प्रवाशांना ही पतपत्रे बँकेद्वारे दिली जातात. पतपत्रात विशिष्ट रकमेचा निर्देश केलेला असतो आणि तेवढी रक्कम खरेदीदाराच्या नावावर जमा असल्याची हमी दिली असते. परदेशात प्रवास करतांना तेथील बँकांकडून स्थानिक चलन प्रवाशांना विकत घेता येते. जेवढे चलन विकत घेतले असेल तेवढ्याने मुळ रकमेत घट करुन ती पतपत्रावर दाखविली जाते. व्यक्तीगत पतपत्रे ही प्रवासी धनादेशाप्रमाणेच असतात. परंतु व्यक्तीगत पतपत्रात निश्चित रक्कम दाखविली असली तरी प्रवाशाला गरजेप्रमाणे कमीजास्त रक्कम त्या देशात घेता येते. व्यक्तीगत पतपत्रे रकमेच्या बाबतीत अधिक लवचिक असतात हे ह्यावरुन स्पष्ट होते.

७.४ विदेशी विनिमय बाजार

विदेशी देणी देण्यासाठी विविध प्रकारची विशेषीकृत साधने वापरली जातात. विदेशी विनिमयात दोन देशातील चलनांची अदलाबदल केली जाते. विदेशी विनिमय बाजार हे नाणेबाजाराचे एक वित्तीय केंद्र असते. विदेशी विनिमय बाजारातून विविध प्रकारचे (Dealers) (दलाल) कार्य करीत असतात. त्यामध्ये महत्त्वाची भूमीका बँका पार पाडतात. विदेशी विनिमय बाजारपेठ ही आंतराष्ट्रीय नाणेबाजाराचा एक महत्त्वाचा भाग असून तो कोणत्याही विशिष्ट भौगोलिक ठीकाणाशी संबंधीत नाही

विदेशी विनिमय बाजार म्हणजेच एक अशी यंत्रणा कि ज्याद्वारे विदेशी चलनांची खरेदी आणि विक्री केली जाते. या बाजारपेठेत विदेशी चलनाचे खरेदीदार आणि विक्रेते यांचा तसेच मध्यस्थांचा समावेश होतो. अत्याधुनिक दळणवळणाच्या साधनांद्वारे या बाजारात चलनांची खरेदी विक्री होत असते. या बाजारात विविध दलालांचा समावेश होतो.

७.४.१ विदेशी विनिमय बाजार संकल्पना:

परकीय विनिमय व्यवहारात उत्पन्न आणि संपत्तीच्या हक्काचे एका देशाच्या चलनाचे परिवर्तन दुसऱ्या देशातील चलनात करता येते. या पद्धतीत काही बाबींचा अभ्यास केला जातो.

१) इतर देशांचा आणि देशांच्या चलनाचा अभ्यास

२) विनिमय वाढीची कारणे.

३) विनिमयाच्या ठिकाणी विनिमय आणि समतोल मूल्य यांचा अभ्यास केला जातो.

विविध चलनांचे पतसाधनांत रुपांतर करणे, प्रबळ साधनांचे रुपांतर वेगवेगळ्या चलनांत करणे जसे चेक, ड्राफ्ट, फॅक्स, हुंड्या, टेलिग्राफ ट्रान्सफर, प्रवासी धनादेश, तारेने पैसे पाठविणे, बँकेची पतपत्र इ. चा समावेश होतो.

व्याख्या:

ज्या बाजारात परकीय चलनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातात त्या बाजारास विदेशी विनिमय बाजार असे म्हणतात ?

७.४.२ विदेशी चलनाचे व्यवहारकर्ते:

विदेशी विनिमय बाजारपेठेतील चलनाच्या देवाणघेवाणीचे व्यवहार करणारे प्रमुख घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) विदेशी चलनाचे ग्राहक (आयातदार - निर्यातदार):

विदेशी विनिमयाचा सर्वात मोठा ग्राहक वर्ग वस्तूची आयात व निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांचा असतो. निर्यात व्यापाऱ्याजवळ परदेशी ऋणकोकडून मिळालेल्या हुंड्या किंवा विपत्रे असतात. परकीय चलनावर अधिकार दर्शविणाऱ्या हुंड्या ते बाजारात विक्रीस काढतात. याउलट आयात व्यापारी परदेशातील देणे फेडण्यासाठी हुंड्या किंवा बँक धनाकर्ष विकत घेतात.

२) पर्यटक:

देशात येणारा परदेशी प्रवासी आणि देशाबाहेर जाणारे प्रवासी हे सुद्धा विदेशी चलनाची विक्री किंवा खरेदी करतात. परदेशातून येणारे प्रवासी आपल्यासोबत प्रवासी धनादेश किंवा पतपत्र आणतात आणि बँकांना विकतात. तर देशाबाहेर जाणारे प्रवासी अशा प्रकारच्या अधिकार पत्रांची खरेदी करतात.

३) व्यापारी बँका:

विदेशी विनिमयाचे व्यवहार करणारा प्रमुख घटक म्हणजेच बँका होय. निरनिराळ्या देशांत या बँकांनी आपल्या सारवांचे जाळे पसरविलेले असते. प्रत्येक शाखेत पुरेसा निधी ठेवला जातो. या बँकांमार्फत एका देशातील चलन दुसऱ्या देशांत बदलून देण्याचे महत्त्वाचे कार्य केले जाते.

ज्या देशांत बँकेची शाखा नसेल तिथे दुसऱ्या एखाद्या बँकेत निधी जमा ठेवला जातो. अर्थात त्या दुसऱ्या बँकेने प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यास संमती दिलेली असते. अशा बँकांना पत्रासहित बँका (Correspondent Bank) असे म्हणतात. या बँका विनिमय विपत्रे (Bill of Exchange) विकत घेतात. किंवा वटवितात व

अशा प्रकारे मिळविलेल्या रकमा एकत्र करीत जातात. शिवाय (Bank Draft, Telegraphic Transfer), इ. द्वारे विनिमय देवाण घेवाण करतात. या कार्यात व्यापारी बँका पुढील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवतात.

i) लाभक्षमता :

व्यापारी बँका विदेशी विनिमयाचे व्यवहार करतांना महत्तम नफा विचारात घेत असतात. या बँका निर्यातक देशाकडून कमी दरात चलन खरेदी करुन गरजू आयातदारांना अधिक किमतीला विकून लाभ मिळवितात.

ii) धोक्याचे व्यवस्थापन :

विदेशी चलनाच्या व्यवहारात निर्माण होणाऱ्या धोके पत्करणे व त्यांचे व्यवस्थापन करणे.

iii) ग्राहकाभिमुख सुविधा :

स्पर्धात्मक विनिमय दरांमार्फत व्यापारी बँका आपल्या ग्राहकांना विविध उपयुक्त सेवा देतात.

४) केंद्रिय (मध्यवर्ती) बँक :

देशाची मध्यवर्ती बँक या नात्याने संबंधित देशातील चलनाच्या दरात स्थिरता ठेवण्याची जबाबदारी या बँकेकडे असते. त्यासाठी मध्यवर्ती बँका पुढील दोन प्रकारच्या विनिमय दरांचा वापर करतात.

i) स्थिर विनिमय दर पद्धती

i) अस्थिर विनिमय दर पद्धती.

५) विपत्रांचे दलाल (Bill brokers):

आंतराष्ट्रीय मुद्रा बाजारात केवळ बँकाच विनिमयाचे व्यवहार करतात असे नसून विपत्रांचे दलाल (Bill Brokers) आणि व्यवहारकर्ते (Dealers) हे सुद्धा महत्त्वाचे कार्य करतात. विपत्रांचे दलाल हे मध्यस्थांचे कार्य करतात तर व्यवहारकर्ते मात्र विदेशी विनिमयाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करतात. विदेशी विनिमयाच्या मागणी आणि पुरवठ्याची परिस्थिती लक्षात घेऊन फायदेशीर ठरेल अशा पद्धतीने ते आपले व्यवहार करीत असतात. या कार्याबद्दल यांना अडत (Brokerage) मिळते.

६) स्वीकृती गृहे (Acceptance House):

स्वीकृत गृहांजवळ बराचसा निधी असतो. आपल्या ग्राहकांच्या नावावर आलेल्या हुंड्या त्यांच्या वतीने स्वीकारण्याचे कार्य ही गृहे करतात व त्याबद्दल ते अडत

आकारतात. ह्या स्वीकृतीगृहांचा बाजारात नावलौकीक असल्याने ज्या व्यापाऱ्यांची परदेशात ओळख किंवा पत प्रस्थापीत झाली नसते त्यांना स्वीकृती गृहांचे सहाय्य मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर व्यापार करणे शक्य होते.

७) वटावगृहे (Discount Houses):

विदेशी व्यापारात निर्माण होणाऱ्या हुंड्या मुदतीपूर्वीच वटवून देण्याचे महत्त्वाचे कार्य वटाव गृहांमार्फत केले जाते. त्याबद्दल ही वटावगृहे काही प्रमाणात अडत स्वीकारतात.

आपली प्रगती तपासा:

१) विदेशी विनिमय ही संकल्पना स्पष्ट करा.

२) आंतराष्ट्रीय देणी देण्याच्या विविध साधनांची सविस्तर माहिती द्या.

३) 'केवळ आयातदार आणि निर्यातदार हेच विदेशी विनिमयाचे व्यवहार करतात.' या विधानाची सत्य असत्यता पडताळून पहा.

७.५ विदेशी विनिमय बाजारपेठेची कार्ये

विदेशी विनमय बाजारपेठेमार्फत पुढील प्रमुख कार्ये केली जातात

१) चलनाचे परिवर्तन करणे :

विदेशी विनिमय बाजाराचे प्रमुख कार्य म्हणजे विशिष्ट परकीय चलनाचे ग्राहकांच्या मागणीनूसार इतर देशांच्या चलनात परिवर्तन करणे हे असते.

२) खरेदीशक्तीचे हस्तांतरण :

विनिमय बाजारपेठेचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजेच खरेदीशक्तीचे एका देशातून दुसऱ्या देशात हस्तांतर करणे होय. देशातल्या देशातील खरेदीशक्तीचे हस्तांतरण मध्यवर्ती बँकेच्या समाशोधन गृहामार्फत होत असते. मात्र दोन देशात भिन्न प्रकारचे चलन अस्तित्वात असल्याने क्रयशक्तीचे हस्तांतरण Bank Draft व धनादेशाद्वारे करता येत नाही. आंतराष्ट्रीय पातळीवर समाशोधनाची स्वतंत्र अशी यंत्रणा नसते. त्यामुळे विविध देशांतील चलनाचे देण्याघेण्याचे व्यवहार विदेशी विनिमय बाजारामार्फत पार पाडले जातात.

३) परकीय चलनात कर्जपुरवठा :

आंतराष्ट्रीय व्यापारात भाग घेणाऱ्या वापाऱ्याना विदेशी चलनातील कर्जपुरवठा करणे हे विनिमय बाजाराचे एक महत्त्वाचे कार्य असते. कारण आयात व्यापाऱ्याना आयातीची किंमत परकीय चलनात द्यावी लागते. त्यासाठी त्याला काही कालावधीची आवश्यकता असते तर निर्यात व्यापाऱ्यास त्याने निर्यात केलेल्या मालाची तात्काळ किंमत हवी असते. अशा वेळी आयात व्यापारी विनिमय बाजारातून परकीय चलनाच्या स्वरुपात कर्ज घेऊन आयातीची किंमत तात्काळ देऊ शकतो. आयात आणि निर्यात व्यापारी भिन्न देशांचे नागरिक असल्याने त्यांना एकमेकांच्या पतविषयक Credit माहिती नसते. अशा परिस्थितीत आयात व्यापाऱ्यांना विदेशी चलनातील कर्ज देणे हे विनिमय बाजाराचे महत्त्वाचे कार्य असते.

४) हमी स्वीकारणे :

आयात-निर्यात व्यापारात भाग घेणारे व्यापारी विविध देशातील असल्याने त्यांचा एकमेकांवर विश्वास नसतो. अशा वेळी निर्यात व्यापाऱ्यांना त्यांनी निर्यात केलेल्या मालाची तात्काळ किंमत मिळावी अशी अपेक्षा असते. त्याच प्रमाणे आयात व्यापारी माल ताब्यात मिळविल्याशिवाय त्याची किंमत देण्यास तयार नसतात. अशावेळी आयात आणि निर्यात व्यापाऱ्यांच्या व्यवहाराची हमी विनिमय बाजार घेत असतो. निर्यात व्यापाऱ्यांना त्यांनी निर्यात केलेल्या मालाची किंमत देण्याची हमी घेतली जाते. त्याचप्रमाणे आयात व्यापाऱ्यास त्याने खरेदी केलेला माल खात्रीशीर मिळेल अशी हमी घेतली जाते. अशा हमीमूळे व्यापारात विश्वासाचे वातावरण तयार होऊन व्यापार वाढण्यास मदत होते.

५) समाशोधन गृह (Clearing House):

विदेशी विनिमय बाजारामुळे आंतराष्ट्रीय देण्या घेण्याचे व्यवहार मिटविण्यासाठी समाशोधन गृहाची सुविधा उपलब्ध होते.

६) हुंड्या व विनिमय पत्र व्यवहार:

आंतराष्ट्रीय व्यापारातून निर्माण होणाऱ्या (हुंड्यांच्या मागणीनुसार पुरवठा करता येतो. विदेशी विनिमय बँकांकडून विदेशी चलनाच्या स्वरुपातील विनिमय वियंत्रे गोळा करुन त्याची विक्री आयात व्यापाऱ्यामध्ये करणे विनिमय बाजारामुळे शक्य होते.

७) चलनांची अदला बदल:

दोन देशांतील चलनांची अदला बदल करुन देणे हे विनिमय बाजाराचे मुख्य कार्य असते.

८) विनिमय बाजार संरक्षण :

वरील कार्याबरोबरच विनिमय दरातील बदलामुळे होणारे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी विनिमय बाजार संरक्षण म्हणून कार्य करतो. विदेशी विनिमय बाजारातील देण्या घेण्याचे व्यवहार पार पाडण्यासाठी विदेशी चलन, सोन्याची निर्यात, आंतराष्ट्रीय स्वरुपाच्या हुंड्या, बँक ड्राफ्ट, टेलिग्राफिक ट्रान्सफर आणि प्रवासी धनादेश यांचा वापर केला जातो. विदेशी विनिमयाचे व्यवहार करण्यामध्ये विनिमय बाजारातील मध्यस्थ, विनिमय बँका व मध्यवर्ती बँकेचा प्रामुख्याने समावेश होतो. देण्याघेण्याचे व्यवहार करण्यासाठी विनिमय दराला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. विदेशी विनिमय दर निश्चित करतांना हुंड्या आणि कर्जरोख्यांचाही विचार केला जातो.

७.६ विदेशी विनिमय बाजारपेठेतील व्यवहार

विदेशी विनिमयाचा उद्देश हा आहे की बाजारात व्यवहार करत त्यांचे वर्गीकरण पुढील प्रकारांमध्ये करता येईल.

१) हजर बाजारदर : (Spot Exchange Rate)

या बाजारात परकीय विनिमयाची देवाण घेवाणीचे व्यवहार २४ तासांत केले जातात. अल्पकालावधीत विदेशी चलनाची खरेदी विक्री करण्यासाठी विनिमयाचा जो दर निश्चित केला जातो त्या विनिमय दरास हजर बाजार दर म्हणतात. हजर दरात विक्रीचा दर आणि खरेदीचा दर दोन्ही वेगवेगळे असतात. हजर दरात केबलदर, अंतरणदर, टपाल अंतरण दर यांचा समावेश होतो. ज्या वेळेस परकीय चलनाचा खरेदीदार परकीय चलनाची किंमत देशांतर्गत चलनामध्ये बँकेत जमा करतो जमा खात्यावर हजर दराने रक्कम जमा केली जाते.

२) वायदा बाजार दर : (Forward Exchange Rate)

वर्तमान काळात प्रचलित दराने भविष्यासाठी लागणारी किंवा करावयाची खरेदी विक्री परदेशी चलनाच्या विशिष्ट बाजारात करतात. तेव्हा त्या बाजारास वायदा बाजार असे म्हणतात. वायदे बाजारात व्याजदर महत्त्वाचा असतो. देश तारणावर अधिक व्याज देतो तेव्हा चलनाचा वायदा दर कमी असतो. जर खरेदीचा भविष्यकालीन कालावधी अधिक असेल तर कसर दर किंवा विनिमयाची किंमत अधिक राहते.

३) चलन अदलाबदलीचे व्यवहार : (Swap operations)

विदेशी विनिमय बाजारपेठेत चलन अदलाबदलीचे व्यवहार प्रामुख्याने व्यापारी बँकांमार्फत पार पाडले जातात. या व्यवस्थेनुसार एक विशिष्ट कालावधीसाठी एका चलनाचा विनिमय दुसऱ्या चलनाशी करण्यात येतो. म्हणजेच तात्पुरत्या कालावधीसाठी

एका चलनाची दुसऱ्या चलनाशी अदलाबदल केली जाते. म्हणजेच ज्या व्यक्तीजवळ दोन चलनांपैकी एक चलन आहे. परंतु त्याला दुसऱ्या चलनाची तात्पुरत्या काळाकरीता गरज आहे त्याला भविष्यकाळात विनिमयाच्या दरामध्ये होणाऱ्या बदलांच्या अनिश्चितते मुळे स्वीकारावी लागणारी जोखिम कोणतेही नुकसान न होता स्वीकारता यावी हा अदलाबदीच्या कराराचा प्रमुख उद्देश आहे.

उदा. - समजा अ या व्यक्तीकडे अमेरीकन डॉलर्स आहेत परंतु त्याला तीन महिन्यांकरीता हॉगकॉग डॉलर्स ची आवश्यकता आहे. अशा स्थितीत तीन महिन्यांमध्ये विनिमयाच्या दरात अनुकूल किंवा प्रतिकूल बदल घडून येऊ शकतात. अशावेळी या विनिमय दर बदलातील जोखिमेपासून संरक्षण मिळविण्यासाठी अ हा व्यक्ती तीन महिन्याकरीता अमेरीकन डॉलर्सच्या बदल्यात ब व्यक्तीशी हाँगकॉग डॉलर्स असा अदला बदलीचा करार (Currency Swap) करु शकतो. तीन महिन्यांनंतर पुन्हा हाँगकाँग डॉलर्स च्या बदल्यात अमेरीकन डॉलर्स असा व्यवहार करुन दोन्ही व्यक्ती तीन महिन्यातील विनिमय दर बदलातील अनिश्चिततेचे व्यवस्थापन करु शकतात.

४) अंतरपणन व्यवहार (Arbitrage operations):

अंतरपणन व्यवहार म्हणजेच दोन देशातील दोन वेगवेगळ्या विदेशी विनिमय बाजारपेठेमध्ये चलनाची खरेदी विक्री करणे होय. या व्यवहारामुळे दोन बाजारात असलेली विनिमय दरातील भिन्नता आपोआप नाहिशी होते व त्यांच्या मोबदल्यात दोन्ही बाजारपेठांमध्ये एक समान किंमत प्रस्थापित होते.

परंतु अंतरपणन व्यवहारांच्या प्रमुख हेतू हा दोन देशातील चलनदराच्या फरकांद्वारे नफा मिळविणे हा असतो.

उदा. लंडन मध्ये डॉलर व पाऊंड या चलनांतील विनमयाचा दर १ पाऊंड = ४ डॉलर असा आहे. तर न्यूयार्क मध्य हाच दर १ पाऊंड ला ४.५ डॉलर असेल तर अंतरपणनाचे व्यवहार करणारे अंतरपणक हे लंडनमध्ये डॉलरची १पाऊंड = ४ डॉलर या दराला खरेदी करुन न्युयार्क मध्ये १ पॉउड ४.५ ला विक्री करुन नफा मिळवितील.

आपली प्रगती तपासा

१) विदेशी विनिमय बाजारपेठेची कार्य स्पष्ट करा.

२) हजर आणि वायदा विनिमय दर यामधील फरक स्पष्ट करा.

३) अंतरपणन व्यवहार म्हणजे काय ?

४) चलन अदलाबदल (Currency Swap) यावर थोडक्यात टीप लिहा.

_____

_____

_____

_____

७.७ विदेशी विनिमय दर संकल्पना

स्वदेशी व्यापार हा त्या देशातील भौगोलिक सीमारेषांच्या अंतर्गत होत असल्याने व एकच चलन असल्याने विनिमयामध्ये कोणतीही अडचण निर्माण होत नाही. परंतु ज्यावेळी विदेशी व्यापार होत असतो त्यावेळी वेगवेगळ्या देशातील भिन्न भिन्न चलने परस्परांच्या चलनांमध्ये बदलून देण्याची एक मुख्य समस्या निर्माण होते.

विदेशी विनिमय दराचा अर्थ :

'विदेशी विनिमय दर म्हणजे एक चलनाची दुसऱ्या चलनात व्यक्त केलेली किंमत होय.' विनिमय दरामूळे दोन देशातील चलनांचा परस्परांशी असणारा संबंध स्पष्ट होतो. विनिमय दराची अशी व्याख्या करता येते की देशांतर्गत चलनाच्या शर्तीत परकीय चलनाच्या एका एकाकाची किंमत होय.'

विनिमयाचा दर रुपया आणि डॉलरचा विचार करता किती रुपयामध्ये डॉलरची खरेदी केली जाते किंवा १ डॉलर मध्ये किती रुपये मिळतील यावर विनिमय दर अवलंबून असतो. जर विनिमय दर रुपया आणि डॉलर भारताच्या (Point) पासून (Expressed) रुपये ४५ - १ अमेरिकन डॉलर असा असेल तर त्याचा अर्थ भारताला १ डॉलर मिळविण्यासाठी ४५ रुपये खर्च करावे लागतात.

विदेशी विनिमय दराचे महत्त्व:

आंतराष्ट्रीय व्यापारात विदेशी विनिमय दर ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. त्याचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

१) विदेशी विनिमय दरामुळे वेगवेगळ्या देशांचा आंतरराष्ट्रीय खर्च आणि किंमती समजण्यास मदत होते.

२) विनिमय दर हा एका चलनातून दुसऱ्या चलनाच्या संरक्षणासाठी उपयोगी ठरतो.

३) कोणत्याही प्रकारे देशांतर्गत किंमती कमी न करता देशाची निर्यात स्वस्तात करता येते.

देशातील चलनाचे अवमूल्यन करुन पैशाचा विनिमय दर कमी करता येतो. त्यामुळे निर्यात वाढते आणि परकीय चलनाद्वारे उत्पन्न वाढते.

७.८ विदेशी विनिमय दर निश्चिती

आंतराष्ट्रीय व्यापारात विदेशी विनिमय दर ही संकल्पना फारच महत्त्वाची आहे. परकीय विनियम दरामूळे दोन देशातील चलनांचा परस्परांशी असणारा संबंध स्पष्ट होतो. विनिमय दर निश्चितीचे अनेक सिद्धांत आहेत. त्यापैकी विदेशी विनिमय दर निश्चिच्या व्यवहारतोल सिद्धांतानुसार विनिमय दर हा पुढील दोन घटकांवर आधारित असतो.

i) विदेशी चलनाची मागणी (Demand for Foreign Exchange Df)
ii) विदेशी चलनाचा पुरवठा (Supply of Foregn Exchange Sf)

सुत्र रुपाने

$$F.E.R = f (Df . Sf)$$

वरील सुत्रात
FER = Foreign Exchange Rate विदेशी विनिमय दर
f = Functional Relationship फलनात्मक संबंध
Df = Demand for Foreign Exchange विदेशी चलनाची मागणी
Sf = Supply of Foreign Exchange विदेशी चलनाचा पुरवठा

७.८.१ विदेशी चलनाची मागणी:

विदेशी चलनासाठी केली जाणारी मागणी पुढील हेतूने होत असते.

१) वस्तूंची आयात :

हे विदेशी चलनाच्या मागणीचे एक प्रमुख कारण आहे. पक्क्या मालाच्या उत्पादनासाठी देशातील उत्पादकांमार्फत कच्चा माल, सुटे भाग, अर्ध उत्पादीत वस्तु इ. ची आयात केली जाते. तसेच अनेकदा यंत्रसामग्री, अवजारे, इ. भांडवली वस्तु जलद औद्योगिकरणासाठी विदेशातून आयात केल्या जातात

अशा आयातीचे मूल्य फेडण्यासाठी विदेशी चलनाला मागणी केली जाते.

२) सेवांची आयात :

देशातील नागरीकांमार्फत अनेकदा विदेशी सेवांना मागणी केली जाते. या सेवा पुढील दोन प्रकारच्या असु शकतात.
अ) व्यक्तीगत सेवा - (डॉक्टर्स, वकिल, प्राध्यापक संगीतकार इ.)
ब) संस्थात्मक सेवा - (बँका, विमा कंपन्या, शिक्षण, संस्था, वाहतुक, दळणवळण पर्यटन इ.)

अशा सेवांच्या किंमती व्यक्त करण्यासाठी विदेशी चलनाला मागणी होत असते.

३) विदेशातील देणी :

अनेकदा इतर देशांना बक्षीस, देणग्या अनुदाने, वित्तीय मदत इ. देणी देण्यासाठी विदेशी चलनाची मागणी होत असते.

परकीय चलनाची किंमत ज्यावेळी आधिक असते. त्यावेळी परकीय चलनासाठी केली जाणारी मागणी कमी असते तर ज्यावेळी परकीय चलनाची किंमत कमी असते. अशा वेळी परकीय चलनाची मागणी अधिक केली जाते. म्हणूनच विदेशी चलनाच्या मागणीचा वक्र पुढील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे ऋणात्मक उताराचा दिसून येतो.



आकृती ७.१

वरील आकृतीत X अक्षावर डॉलर्स संदर्भात पाऊंडला असलेली मागणी तर Y अक्षावर विदेशी विनिमय दर दर्शविलेला आहे. Df हा विदेशी चलनाचा मागणीचा वक्र असून तो डावीकडून उजवीकडे वरुन खाली येणारा ऋणात्मक उताराचा वक्र आहे. हा वक्र विदेशी विनिमय दर आणि विदेशी चलनाची मागणी यातील व्यस्त संबंध दर्शवितो.

ज्यावेळी डॉलर $ आणि पाऊंड £ यामधील विनिमय दर २$ = १ £ असा आहे त्यावेळी इंग्लंडच्या १००० £ पॉउड ला मागणी केली जाते. परंतु ज्यावेळी विनिमय दर घडून १.५ डॉलर्स - १ पाऊंड झाल्यास डॉलरच्या तूलनेत पूर्वीपेक्षा पाऊंड स्वस्त झाल्याने पाऊंडसाठी मागणी वाढून ती १५०० पाऊंड अशी वाढलेली दिसून येते.

७.८.२ विदेशी चलनाचा पुरवठा:

विदेशी चलनाचा पुरवठा पुढील घटकांमार्फत निर्धारीत होतो.

१) वस्तूंची निर्यात:

विदेशी येण्यांचा पर्यायाने विदेशी चलनाच्या पुरवठ्याचा हा प्रमुख मार्ग आहे. विदेशी चलनाचा पुरवठा हा वस्तुच्या निर्यातीचा आकार निर्यात वस्तूंची किंमत यावर अवलंबून असते. निर्यातीचा आकार अधिक असतांना किंवा निर्यात मालाच्या किंमती अधिक असतांना विदेशी चलनाचा पुरवठा देखिल अधिक राहतो.

२) सेवांची निर्यात:

सेवा निर्यातीमध्ये 'व्यक्तीगत सेवा' आणि संस्थात्मक सेवा अशा सेवांचा समावेश असून अशा सेवांची विदेशातील निर्यात जीतकी अधिक तितका विदेशी चलनाचा पुरवठा अधिक राहील

३) विदेशी येणी :

देणग्या, अनुदाने, विदेशी वित्तीय मदत, व्याज, अशा विदेशी येण्यातून विदेशी चलनाचा पुरवठा वाढतो.

ज्या वेळी विदेशी विनिमय दर अधिक त्यावेळी विदेशी चलनाचा पुरवठा अधिक तर ज्यावेळी विनिमय दरात घट घडून येते त्यावेळी विदेशी चलनाच्या पुरवठा देखिल घडू लागतो. विनिमय दर आणि विदेशी चलनाचा पुरवठा यातील सम संबंधामुळे विदेशी चलनाचा पुरवठा वक्र पुढील आकृतीत दर्शविल्याप्रमाण धनात्मक स्वरुपाचा दिसून येतो.



आकृती क्र. ७.२

वरील आकृतीत X अक्षावर डॉलरच्या मोबदल्यात पाऊंडचा होणारा पुरवठा दर्शविलेला असून Y अक्षावर विदेशी विनिमय दर दर्शविलेला आहे. हा विदेशी चलनाचा पुरवठा वक्र असून तो धनात्मक स्वरुपाचा आहे.

ज्यावेळी विनिमयाचा दर १.५ डॉलर = १ पाऊंड असा कमी असतो. त्यावेळी इग्लंडमार्फत पाऊंडचा केला जाणारा पुरवठा १००० पाऊंड इतका आहे. परंतु ज्यावेळी विनिमयाचा दर वाढून 2$ = £1 असा होतो त्यावेळी जास्त डॉलर्स मिळविण्यासाठी इंग्लंडमार्फत पाऊंडचा पुरवठा देखील वाढवून तो २००० पाऊंड झाल्याचे दिसून येते.

संतुलन बिंदू आणि विनिमय दर निश्चिती:

विदेशी चलनाची मागणी आणि विदेशी चलनाचा पुरवठा ज्या ठीकाणी समान बनतो तो संतूलन बिंदू असून त्या बिंदूत समतोलित विनिमय दराची निश्चिती होते. हेच पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.



आकृती क्र. ७.३

वरील आकृतीत x अक्षावर विदेशी चलनाची मागणी व विदेशी चलनाचा पुरवठा विचारात घेतलेला असून y अक्षावर विनिमय दर दर्शविलेला आहे. Df हा विदेशी चलनाचा मागणीवक्र तर Sf हा विदेशी चलनाचा पुरवठा वक्र आहे. हे दोन्ही वक्र परस्परांना E बिंदूत छेदून जातात. या ठिकाणी संतुलनाची अट पूर्ण होऊन E या संतुलन बिंदूत Y अक्षावर संतूलीत विनिमयाचा OR हा दर निश्चित होतो.

OR या संतूलीत विनिमय दरात वाढ झाल्यास नवीन विनिमय दर OR_1 असा निश्चित होतो. परंतु या विनिमय दराला विदेशी चलनाची मागणी a बिंदूमध्ये कमी तर विदेशी चलनाचा पुरवठा 'b' बिंदूमध्ये अधीक अशी असंतुलनाची परीस्थिती निर्माण होऊन OR_1 हा विनिमयाचा दर पुन्हा घडून OR अशा पुर्वपदावर येवून स्थिरावेल.

याउलट जर विनिमयाचा दर OR_2 असा कमी झाला तर d बिंदूत विदेशी चलनाची मागणी वाढून व c बिंदूत विदेशी चलनाचा पुरवठा घटून पुन्हा असंतुलन निर्माण होईल. अशा वेळी विनिमयाचा दर वरच्या दिशेने वाहून पुन्हा OR असा संतुलनाच्या ठिकाणी स्थिरावेल व हाच विनिमयाचा दर टीकून राहील.

आपली प्रगती तपासा

१) विदेशी विनिमय दर ही संकल्पना स्पष्ट करा.

२) विदेशी विनिमय दर निश्चितीची प्रक्रिया स्पष्ट करा.

७.९ विनिमय दर पद्धती

विनिमय दरांच्या पुढील दोन पद्धती अधिक प्रचलीत आहेत
i) स्थिर विनिमय दर पद्धती (Fixed Exchange Rate System)
ii) अस्थिर (लवचिक) विनिमय दर पद्धती (Flexible Exchange Rate System)

७.९.१ स्थिर विनिमय दर पद्धती:

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या स्थिर विनिमय दर पद्धतीत सर्व प्रकारच्या विदेशी चलनाच्या देण्याघेण्याचे व्यवहार सरकारने ठरवून दिलेल्या विनिमय दराने करण्याचे निश्चित केले जाते. सरकार जेव्हा कायदा करुन विनिमय दर निश्चित करते त्या दरास स्थिर विनिमय दर असे म्हणतात. असा दर स्थीर राखण्यासाठी सरकार आवश्यकता भासल्यास विदेशी चलनाची किंवा सोन्याची खरेदी विक्री करु शकते.

पहिल्या महायुद्धकाळापर्यंत सोन्यावर आधारीत आंतराष्ट्रीय सुवर्ण परिमाण पद्धती अस्तित्वात होती. ती अतीशय सोपी होती. सोन्याचे परिवर्तन निश्चित दराने करता येत होते. देशाची मध्यवर्ती बँक ठरावीक किंमतीत सोन्याची खरेदी विक्री करत असे. देशाच्या चलनाचे सोन्यात परिवर्तन करणे याला सोन्याची टाकसाळ किंमत म्हटले जाते. (Mint Parity)

टांकसाळ समता दर सिद्धांतानुसार (Mint Par parity Theory) विनिमय दर हा चलनामध्ये असणाऱ्या सुवर्णाच्या प्रमाणावरुन ठरत असतो. सुवर्ण परिमाण असतांना मागणी आणि पुरवठ्यातील बदलाप्रमाणे विनिमय दरात बदल होत असतात. सुवर्ण चलन पद्धतीमध्ये विनिमय दर स्थिर असतो. कारण प्रत्येक देशाचे चलन सुवर्णाच्या एका निश्चित अशा परिमाणाशी जोडलेले असल्याने दोन्ही चलनांचा विनिमय दर सहज काढता येतो.

उदा.

पहील्या महायुद्धापूर्वी इग्लंड आणि अमेरिका या देशांमद्ये सुवर्ण चलन परिमाण पद्धती अस्तित्वात होती. इंग्लंडचे पाऊंड हे चलन सोन्यामध्ये ११३.००१५ grains तर अमेरीकेचे डॉलर हे चलन २३.२२०० grains असे व्यक्त केले जात होते. म्हणूनच डॉलर व पाऊंड या दोन चलनांमधील विनिमय दर टांकसाळ समता दर पद्धतीनुसार पुढील सुत्राद्वारे काढता येईल.

$$\frac{११३.००१६}{२३.२२००} = ४.८६६५$$

टांकसाळ समता दर पद्धतीनुसार निश्चित होणाऱ्या विनिमय दरामध्ये होणारे बदल अत्यंत नगण्य असून तो 'सुवर्ण निर्यात बिंदू (Gold Export point) आणि सुवर्ण आयात बिंदू (Gold Import point) यांच्या दरम्यान स्थिर राहतो. पुढील आकृतीद्वारे हे स्पष्ट करता येईल.



आकृती क्र. ७.४

आकृतीत x अक्षावर इग्लंडच्या पाऊंडची मागणी आणि पुरवठा दर्शविलेला असून Y अक्षावर डॉलर व पाऊंडचा विनिमय दर दर्शविलेला आहे. D हा वक्र पाऊंडचा मागणीवक्र तर S हा वक्र पाऊंडचा पुरवठा वक्र आहे. E बिंदूत ही मागणी व पुरवठा एकत्र येऊन OR हा विनिमयाचा संतूलित दर निश्चित झालेला आहे. हा दर स्थिर विनिमयाचा दर असून त्यामध्ये होणारे बदल हे सुवर्ण निर्यात बिंदू (R_1) व सुवर्ण आयात बिंदू (R_2) यांच्या मर्यादेत अत्यंत नगण्य स्वरुपात होतात व पुन्हा एकदा OR हा विनिमयाचा दर स्थिर बनतो.

स्थिर विनिमयाची ही परिस्थिती पुढील परिस्थिती मध्येच अनुभवास येऊ शकते.

१) एका चलनाच्या शर्तीत देशाच्या सोन्याची किंमत निश्चित होते.

२) दोन्ही देशांत सोन्याची आयात व निर्यात मुक्त असेल.

३) सोन्याचा टांकसाळ समता दर टीकवून ठेवण्याची संपूर्ण मक्तेदारी त्या देशातील मौद्रिक अधिसत्तेकडे असेल.

४) त्या दृष्टीने सोन्याच्या खरेदी किंवा विक्रीतून हा दर स्थिर ठेवला जातो.

५) भांडवलाची मुक्त गतीशीलता असावी

६) आपोआप तडजोड यंत्रणा काम करते.

स्थिर विनिमय दरात सर्व परकीय विनय व्यवहार देशाच्या वित्तीय अधिकारात विनिमय दराच्या ठिकाणी ठरवून घेतले जातात. विनिमय दर स्थिर ठेवण्यासाठी

कायद्याने परकीय चलन बाजारात मध्यस्थ म्हणून वित्तीय अधिकारात मागणी आणि पुरवठ्याची पोकळी भरुन काढण्यासाठी मध्यवर्ती बँकेत चलन राखीव ठेवले जाते.

'जेव्हा परकीय चलनाची देवाण घेवाण सरकारने कायद्यानुसार ठरविलेल्या विनिमय दरानुसार केली जाते तेव्हा त्या दरास विनिमय स्थिर विनिमय दर म्हणतात.'

स्थिर विनिमय दराच्या बाजूने युक्तीवाद:

१) चलनात चढ उतार होत नाही :

स्थिर विनिमय दर पद्धतीनुसार चलनाच्या घटीचे किंवा वाढीची शक्यता नसते. त्यामुळे देशांतर्गत चलनात व आर्थिक विकासात स्थैर्य निर्माण होते.

२) दीर्घ कालीन भांडवल प्रवाह :

स्थिर विनिमय दरामूळे दीर्घ काळ भांडवलाचा प्रवाह चालू राहतो तो अर्थव्यवस्थेला सहाय्यक ठरतो.

३) सट्टेबाजी उपक्रमावर नियंत्रण :

स्थिर विनिमय दर असेल तर सट्टेबाजीला प्रेरणा मिळत नाही. देशाची वित्तीय प्रणाली सट्टेबाजीला अयशस्वी ठरविते.

४) नाणेबाजार आणि भांडवल बाजाराचा विकास :

स्थिर विनिमय दरामुळे नाणे आणि भांडवल बाजाराचा विकास होऊन देशामध्ये भांडवलाचा प्रवाह वाढतो.

५) वित्तीय शिस्त :

स्थिर विनिमय दरामुळे वित्तीय शिस्त लागण्यास मदत होते. वित्तीय प्रवाह योग्य दिशेने वळविण्यासाठी वित्तीय आणि राजकोषिय धोरण काळजीपूर्वक राबविले जाते.

६) लहान देशांना उपयुक्त :

जॉन्सन यांच्या मते स्थिर विनिमय धोरण लहान देशांना अत्यंत उपयुक्त ठरते. कारण या देशांच्या बाबतीत बदलत्या विनिमय दरामुळे चलनवाढ आणि मूल्यऱ्हास होऊन विनिमय दर पडतात.

७) विकसनशील देशांना स्थिरता:

विकसनशील देश स्थिर विनिमय दराला प्राधान्य देतात. स्थिर विनिमयासाठी आर्थिक विकासाचे नियोजन केले जाते. परकीय भांडवलाचा देशांतर्गत प्रवाह सुरळीतपणे राहण्यासाठी स्थिर विनिमय दर महत्त्वाचा असतो.

७.९.२ अस्थिर (लवचिक) विनिमय दर पद्धती

पहिल्या महायुद्धाच्या काळात सुवर्ण चलन पद्धत संपुष्टात येऊन अपरिवर्तनिय कागदी चलन पद्धती अस्तित्वात आली. कागदी चलन पद्धतीचा स्वीकार जगातील बहुतेक सर्वच देशांनी केल्यामुळे दोन वेगवेगळ्या देशातील वेगवेगळ्या कागदी चलनांची देवाण घेवाण कोणत्या रीतीने करावी व विनिमय दर कसा निश्चित करावा याबाबत स्वीडिश अर्थतज्ञ गुस्टाव कॅसल (Gustav Cassel) यांनी १९१८ मध्ये खरेदीशक्ती समता सिद्धांत मांडला.

टांकसाळ समता दर सिद्धांतात काही मर्यादा होत्या. कारण प्रत्यक्षात दोन देशातील चलनांच्या मागणी पुरवठ्यात सतत चढ उतार होणे स्वाभाविक होते. अशा परिस्थितीत विनिमयाचा दर स्थिर राहणे शक्य नसल्याने अस्थिर विनिमय दर पद्धतीनुसार बाजारातील चलनांच्या मागणी पुरवठ्यातील बदलांनुसार विनिमय दर लवचिक राहणारा असेल व याच दृष्टीने 'क्रयशक्ती समता सिद्धांताचा' (Purchasing Power parity PPP Theory) अभ्यास करणे आवश्यक आहे.

कॅसल यांच्या मते चलनांच्या खरेदीशक्ती क्षमतेच्या आधारे विनिमय दराची निश्चिती करण्यात यावी. गुस्टाव कॅसलच्या मते,

''दोन अपरिवर्तनीय कागदी चलनाचा विनिमय दर हा साधारणपणे त्या दोन चलनाच्या खरेदीशक्तीच्या गुणोत्तरा बरोबर असतो.''

कॅसल यांनी आपला क्रयशक्ती समता सिद्धांत दोन दृष्टीकोनातून स्पष्ट केला.

i) निरपेक्ष दृष्टीकोन : (Absolute version)

ii) सापेक्ष दृष्टीकोन : (Relative version)

i) **निरपेक्ष दृष्टीकोन:**

क्रयशक्ती समता सिद्धांताच्या निरपेक्ष दृष्टीकोनानुसार दोन देशांच्या चलनाचा विनिमय त्या चलनांच्या अंतर्गत खरेदीशक्तीत प्रतिबिंबित होत असतो. या दृष्टीकोनानुसार एखादी वस्तु दोन भिन्न देशात खरेदी करण्यासाठी किती खर्च करावा लागेल यावरुन विनिमय दर ठरविता येतो. ज्या ठीकाणी दोन देशातील चलनांची खरेदीशक्ती समान होते त्या ठिकाणी दोन चलनांचा विनिमय दर ठरतो.

उदा. x या वस्तुची खरेदी करण्यासाठी भारतात ४५,००० रुपये लागत असतील आणि तिच वस्तु अमेरिकेत १००० अमेरिकन डॉलर्सला खरेदी करता येत असेल तर भारतातील ४५,००० रुपयाची व अमेरेकितील १००० डॉलर्सची खरेदी शक्ती x वस्तुच्या ठिकाणी समान होते म्हणून दोन चलनांतील विनिमय दर ४५,०००रु. / १००० डॉलर म्हणजेच ४५ रुपये = १ डॉलर असा निश्चित होईल. दोन देशातील विनिमय दर पुढील सुत्राच्या सहाय्याने ठरविता येतो.

$$FER = \frac{DPPI}{DPPUSA}$$

वरील सुत्रात

FER = विदेशी विनिमय दर (Foreign Exchange Rate)

DPPO = भारतीय रुपयाची स्वदेशी खरेदीशक्ती (Domestic Purchasing power of Rupee in India)

DPPUSA = अमेरीकन डॉलर्स ची स्वदेशातील खरेदीक्षमता (Domestic Purchasing Power of Doller in USA)

म्हणून

$$FER = \frac{45000 \text{ Rs.}}{1000 \$}$$

P.P.P. or FER = $1 = Rs. 45

ii) सापेक्ष दृष्टीकोन :

कॅसल यांनी क्रयशक्ती समता सिद्धांताचा सापेक्ष दृष्टीकोन पूर्वी मांडलेल्या निरपेक्ष दृष्टीकोन पेक्षा आधुनिक असल्याने तो अधिक लोकप्रिय ठरला आहे. या दृष्टीकोनामध्ये अंतर्गत क्रयशक्ती आणि विनिमय दरात कसे बदल होतात हे स्पष्ट करण्यात आले आहे. या दृष्टीकोनानुसार समतोल विनिमय दरातील बदल हे अंतर्गत क्रयशक्तीतील बदलामुळे घडून येतात. या ठिकाणी पूर्वीचे विनिमय दर समतोल विनिमय दर म्हणून गृहीत धरले जातात. आणि ते दर पायाभूत दर म्हणून स्वीकारले जातात आणि क्रयशक्तीतील बदल किंमत पातळीतील बदलाच्या निर्देशांकाच्या साहाय्याने मोजले जातात व विनिमय दरातील बदलाचे मापन संबंधित किंमत पातळीतील बदलाच्या गुणोत्तराच्या सहाय्याने करता येतात. त्यामुळे नवीन विनिमय दर निश्चित होतो.

$$R_1 = R_0 \times \frac{PA_0}{PA_1} \times \frac{PB_1}{PB_0}$$

सापेक्ष दृष्टीकोनानुसार विनिमय दर ठरविण्यासाठी पुढील सुत्राचा वापर केला जातो.

R_o = पायाभूत विनिमय दर

R_1 = चालू वर्षातील नवीन विनिमय दर

PA_1 = A देशातील मूळ किंमत निर्देशांक (A देश USA मानू)

PA_1 = देशांतील चालू किंमत निर्देशांक

PB_o = B देशातील मूळ किंमत निर्देशांक (B देश भारत मानू)

PB_1 = B देशातील चालू किंमत निर्देशांक

सुत्रात किंमती टाकून

$$R_1 = \$1 = 50 \text{ Rs.} \times \frac{100}{400} \times \frac{200}{100}$$

$$R_1 = \$1 = 25 \text{ Rs.}$$

विदेशी विनिमय दरातील बदल:

विदेशी विनिमय दरात पुढील दोन प्रकारचे बदल घडून येऊ शकतात.

i) विनिमय दरात वाढ ii) विनिमय दरात घट



विदेशी चलनाची मागणी-पुरवठा

आकृती क्र. ७.५

अस्थिर (लवचिक) विनिमय दराच्या बाजुने युक्तीवाद

१) सामान्य मूल्य सिद्धांत:

बदलत्या विनिमय पद्धतीत कृती करण्याची यंत्रणा अत्यंत साधी आहे. विनिमय दर विदेशी चलनाची मागणी आणि पुरवठ्याच्या आंतरक्रियेतून मुक्तपणे आपोआप निश्चित होतो. त्यामुळे सामान्य मूल्य सिद्धांत कार्य करतो.

२) सुरळीत तडजोड :

व्यवहार तोल सुरळीतपणे आणि परिणामकारक रीत्या जुळवून घेतले जाते. व्यवहारतोलावर ताण येत नाही.

३) आपोआप समतोल दुरुस्ती :

बदलत्या विनिमय दर पद्धतीमूळे व्यवहार तोलातील असमतोल आपोआप आणि परिणामकारकरीत्या दुरुस्त होते.

४) परकीय विनिमयाच्या राखीवतेची गरज नाही :

बदलता विनिमय दर हा आपोआप समतोल पातळीवर येतो त्यासाठी परकिय विनिमय सेवेची गरज नाही. देशांच्या व्यवहार तोलातील तूट भरुन काढण्यासाठी परकिय चलन संबंधात चलनाचा मूल्य ऱ्हास होतो. त्यामुळे चलनाचे अधिक्य स्वीकारले जाते आणि व्यवहारतोलाचा समतोल आपोआप साह्य होतो.

५) देशांतर्गत आर्थिक धोरणे स्वयंपूर्ण:

सरकारचे ध्येय आर्थिक कल्याणाचे असते. त्यासाठी पूर्ण रोजगार वाढीबरोबर वाढीच्या दरात स्थैर्य निर्माण करणे हे असते. व हे ध्येय लवचिक विनिमय दरामूळे शक्य होते.

६) आंतराष्ट्रीय देयतेची समस्या बदलते :

लवचिक विनिमय दरामुळे परकिय विनिमयाची अपूर्णतेची समस्या निर्माण होते. त्यामुळे परकीय विनिमय पुरवठ्यात सट्टेबाजी निर्माण होते. खाजगी देयतेची गरज समाधानकार होते. त्यामुळे आंतराष्ट्रीय देयतेची समस्या कमी होते.

७.१० व्यवस्थापित विनिमय दर

एका राष्ट्राने आपल्या चलनाची मूल्यघट (अवमूल्यन) केल्यास प्रतिकारात्मक कारवाई म्हणून इतर राष्ट्रेही मूल्य घट करु लागतात. इ. स. १९३० नंतरच्या दशकात अनेक देशांनी अशी स्पर्धात्मक मूल्यघट केल्याची उदाहरणे सापडल्यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून दुसऱ्या महायुद्धानंतर आंतराष्ट्रीय मुद्रानिधीच्या (IMF) अंतर्गत जी पद्धती अस्तीत्त्वात आली तीला व्यवस्थापित विनिमय दर पद्धती म्हणता येते.

स्थिर विनिमय दर व लवचिक विनिमय दर यांच्यात काही दोष असल्याने एक परिपूर्ण विनिमय दर पद्धती म्हणून व्यवस्थापिक विनिमय दर पद्धती अस्तित्वात आली. या पद्धतीत स्थिर विनिमय दर व अस्थिर विनिमय दर या दोन्ही पद्धतींचे काही गुणधर्म असल्याने खऱ्या अर्थाने ही पद्धत या दोन्ही विनिमय दरांमधील 'सुवर्णमध्य' मानली जाते.

व्यवस्थापित विनिमय दर पद्धतीत सरकार म्हणजेच मध्यवर्ती बँकेची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. देशातील मध्यवर्ती बँक ही देशाची मौद्रिक व विस्तीय अधिसत्ता या नात्याने विदेशी विनिमय बाजारात विनिमय दर स्थिर राखण्यासाठी हस्तक्षेप करते. या पद्धतीनुसार विदेशी विनिमयाचा दर विशिष्ट मर्यादेपर्यंत लवचिक राहू शकेल अशी व्यवस्था केली जाते. म्हणून त्याला नियंत्रित (Controlled Flexibility) असेही म्हणतात.

ज्यावेळी विनिमय दरामध्ये सतत बदल होऊ लागतात त्यावेळी मध्यवर्ती बँक विदेशी विनिमय बाजारपेठेत हस्तक्षेप करुन विनिमय दर स्थिर राखण्याचा प्रयत्न करते. म्हणजेच ज्या वेळी विदेशी चलनासाठी मागणी वाढू लागते. त्यावेळी विनिमय दरातील वाढ रोखण्यासाठी मध्यवर्ती बँक आपल्याकडील विदेशी चलनाचा बाजारात पुरवठा म्हणजेच विक्री करुन मागणी पुरवठ्यात संतूलन राखून विनिमयाचा दर स्थिर ठरतो. याऊलट ज्यावेळी विदेशी चलनाचा पुरवठा वाढू लागतो त्यावेळी विनिमय दरातील घसरणे थांबविण्यासाठी मध्यवर्ती बँक बाजारातील विदेशी चलन खरेदी करते.

मध्यवर्ती बँकेची ही नियंत्रणात्मक भूमिका पुढील आकृतीद्वारे समजण्यास मदत होते.



आकृती क्र. ७.६

आपली प्रगती तपासा

१) स्थिर विनिमय दर आणि अस्थिर विनिमय दर पद्धती यातील फरक स्पष्ट करा.

२) व्यवस्थापित विनिमय दर म्हणजे काय ?

७.११ सारांश

१) विदेशी विनिमयात दोन देशातील चलनांच्या देवाण घेवाणीचा अर्थ अभिप्रेत आहे.

२) विदेशी विनिमयाची प्रमुख साधने पुढील प्रमाणे सांगता येतील

i) व्यापारी हुंड्या किंवा स्वीकृतीपत्रे

ii) धनाकर्ष

iii) तार अंतरण

iv) व्यक्तीगत पतपत्रे

३) विदेशी विनिमय बाजारपेठेद्वारे विदेशी चलनांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार केले जातात.

४) विदेशी विनिमय बाजारपेठेतील प्रमुख सहभाग घटक पुढीलप्रमाणे सांगता येतील.

i) विदेशी चलनाचे ग्राहक

ii) व्यापारी बँका

iii) मध्यवर्ती बँका

iv) मध्यस्थ व दलाल

v) वटाव गृहे

vi) स्वीकार गृहे

५) विदेशी विनिमय बाजारपेठेची प्रमुख कार्ये

i) चलनाचे परिवर्तन करणे

ii) खरेदीशक्तीचे हस्तांतरण करणे.

iii) परकीय चलनात कर्जपुरवठा करणे.

iv) हमी स्वीकारणे

v) चलनांची अदलाबदल करणे.

६) विदेशी विनिमय बाजारपेठेतील व्यवहार :

i) हजर आणि वायदा दर

ii) चलन अदलाबदल व्यवहार (Swap)

iii) अंतरपणन व्यवहार (Arbitrage)

७) विनिमय दर म्हणजेच एका देशातील चलनाची दुसऱ्या देशातील चलनात व्यक्त केलेली किंमत होय.

८) FER = F (Df - Sf)

९) ज्या बिंदूत विदेशी चलनाचा मागणीवक्र व पुरवठा वक्र परस्परांना छेदुन जातात त्या ठीकाणी संतूलित विनिमय दर निश्चित होतो.

१०) विनिमय दराचे प्रमुख दोन प्रकार प्रचलित आहेत

i) स्थिर विनिमय दर

ii) अस्थिर विनिमय दर

७.१२ प्रश्न

१) विदेशी विनिमय बाजारपेठ म्हणजे काय ? तीची प्रमुख कार्ये कोणती ?

२) टीपा लिहा

i) हजर दर

ii) वायदा दर

iii) चलन अदलाबदल

iv) व्यवहार

v) अंतरणपन

३) विदेशी विनिमय दर म्हणजे काय ते सांगून तो कसा निश्चित होते ते सविस्तर स्पष्ट करा.

४) स्थिर विनिमय दराच्या बाजून मते मांडा

५) अस्थिर विनिमयदराच्या समर्थनिय मुद्दे सांगा

*****

८

चलनाची परिवर्तनियता

(Currency Convertibility)

घटक रचना

८.० उद्दिष्ट्ये

८.१ प्रास्ताविक

८.२ चलन परिवर्तनियतेची संकल्पना

८.३ चलन परिवर्तनियतेचे प्रकार

८.४ चलन परिवर्तनियतेचे निर्धारक (अटी)

८.५ चलन परिवर्तनियतेचे फायदे

८.६ भारतीय रुपयाची परिवर्तनियता

८.७ राखिव विदेशी विनिमय

८.८ आंतराष्ट्रीय राखिवाची रचना

८.९ IMF कडील राखिव निधी

८.१० विशेष आहरण अधिकार SDR

८.११ राखिव विदेशी विनिमय धारणाची उद्दिष्टे

८.१२ विनिमय धोके

८.१३ विदेशी विनिमय बाजारपेठेचे जागतिक दुवे

८.१४ सारांश

८.१५ प्रश्न

८.० उद्दिष्ट्ये

i) चलन परिवर्तनियतेच्या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे.

ii) चलन परिवर्तनियतेच्या फायद्यांचा अभ्यास करणे.

iii) चलन परिवर्तनियतेचे विविध प्रकार जाणून घेणे.

iv) राखिव विनिमयाचा अर्थ समजून घेणे.

v) भारतिय रुपयाच्या परिवर्तनियतेची माहिती करुन घेणे.

vi) भांडवली खात्यावर रुपया परिवर्तनिय करण्याबाबतच्या तारापौरावाला समितीच्या शिफारसींचा अभ्यास करणे.

vii) राखिव विदेशी विनिमयाच्या निर्धारकांचा अभ्यास करणे.

viii) विशेष आहरण अधिकार (SDR) ही योजना जाणून घेणे.

ix) विनिमय धोके ही संकल्पना समजून घेणे.

x) विदेशी विनिमय बाजारातील जागतिक दुवे अभ्यासणे.

८.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय व्यापारात बहुपक्षीय व्यापारवृद्धीसाठी चलनाची परिवर्तनियता अत्यंत महत्त्वाची मानली जाते. चलन परिवर्तनियतेचा खरा अर्थ म्हणजेच ज्यावेळी गरज लागेल त्यावेळी आपल्या देशातील चलन दुसऱ्या देशातील चलनाच्या संदर्भात पूर्णतः परिवर्तनिय असले पाहिजे.

डिसेंबर १९४६ च्या 'वॉशिंग्टन कर्ज करारानुसार' जुलै १९४७ पर्यंत हे उद्दिष्ट साध्य होऊ शकले नाही. युरोपियन देशांकडून अमेरिकन वस्तुंना मोठ्या प्रमाणात मागणी होत होती. म्हणूनच जेवढे स्टर्लिंग पाऊंड त्यांच्याकडे उपलब्ध होतील ते सर्व त्वरीत अमेरिकन डॉलर्स मध्ये परिवर्तीत करुन अमेरिकेतील आयातीचे देणे डॉलर्समध्ये करणे अपेक्षित होते. त्यामुळे ब्रिटनच्या राखीव चलनसाठ्यांवर ताण निर्माण झाला. त्याच वेळी वॉशिंग्टन करार करतेवेळी अमेरिकेने जागतिक महायुद्धाचा ब्रिटनवर झालेला परिणामांचा विचार न करता चलन परिवर्तनियतेचा करार लादल्यामुळे ब्रिटनची अर्थव्यवस्था अधिक बिकट बनली. त्यामुळेच १९४७ पर्यंत चलनाच्या परिवर्तनियतेत ब्रिटनला अपयश आले व म्हणूनच भविष्यात अशी जोखिम न पत्करण्याबाबत ब्रिटनच्या मौद्रिक सत्तेने निर्णय घेतला.

१९९१ नंतर भारताचे जागतीक अर्थव्यवस्थेतील स्थान विचारात घेता भारतातील रुपयाच्या परिवर्तनियतेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले आहे. त्या दृष्टीने भारतात 'तारापौरवाला समिती' नियुक्त करण्यात आली होती. या समितीद्वारे भांडवली खात्यावर रुपयाच्या परिवर्तनियतेचा मुद्दा विचाराधिन होता. परंतु भारतातील रुपयाच्या परिवर्तनियतेचा अभ्यास करण्यापूर्वी आपल्याला शिथिलिकृत विनिमय दर पद्धती (Liberalised Exchange Rate management System - LERMs) अभ्यासणे आवश्यक आहे.

LERMS च्या शिफारशिनुसार ६०टक्के , ४० टक्के चे धोरण अवलंबण्यात आले की ज्याद्वारे विदेशात होणाऱ्या वस्तू व सेवांच्या निर्यातीतून प्राप्त होण्याऱ्या परकीय चलनापैकी ६०टक्के विदेशी चलन बाजार दरानुसार विकून रुपयात परिवर्तीत करण्याचा व ४०टक्के विदेशी चलन RBI कडे सुपुर्त करुन RBI च्या अधिकृत दरानुसार परिवर्तीत करण्याची सक्ती करण्यात आली. आयातीच्या बाबतीत ४० टक्के चलन RBI च्या अधिकृत दरानुसार व उर्वरीत ६० टक्के परकीय चलन बाजारदरानुसार खरेदी करण्याचे बंधन होते.

८.२ चलन परिवर्तनियतेची संकल्पना

बहुपक्षीय व्यापारात पुढील दोन प्रकारच्या चलनांचा समावेश होतो.

i) परिवर्तनिय चलन

ii) नियंत्रित चलन

परिवर्तनिय चलन म्हणजेच असे चलन की जे इतर देशांच्या चलनात परिवर्तीत करता येऊ शकते तसेच आयात वस्तुंच्या देणी देण्यासाठी मुक्तपणे वापरता येते. याउलट देशातील वित्तीय नियंत्रणाचा एक भाग म्हणून ज्या देशात विनिमय नियंत्रणे असतील अशा देशातील चलन पूर्णपरवानगीशिवाय दुसऱ्या देशातील चलनांत परिवर्तीत करता येत नाही.

मुक्त परिवर्तनियता म्हणजेच कोणत्याही नियंत्रणाशिवाय एखाद्या देशातील चलन बाजार दरानुसार दुसऱ्या परिवर्तनिय चलनात बदलता येणे होय. भारतीय रुपयाच्या संदर्भात रुपयाची परिवर्तनियता म्हणजे विदेशी विनिमय बाजारात विदेशी चलनाच्या मागणी पुरवठयाच्या संतुलनातून निश्चित होणाऱ्या बाजार दरानुसार भारतीय रुपया इतर परकीय चलनाच्या संदर्भात (उदा. डॉलर, पाऊंड, येन इ.) परिवर्तीत करुन घेता येईल.

चलनाची परिवर्तनियता ही संकल्पना मुळात ब्रेटन वुडस करारात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) व जागतिक बँकेच्या स्थापनेच्या वेळी उदयास आली. त्यानुसार चलन परिवर्तनियतेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) देशाच्या चालू खात्यावर व्यापार व देणी देण्याच्या व्यवहारांचे स्वातंत्र्य

२) चालू खात्यावरील देणी देण्याच्या व्यवहारांबाबत स्थिर विनिमय दराची अंमलबजावणी.

३) IMF च्या कोटा पद्धतीनुसार विदेशी चलनाच्या मागणी व पुरवठ्याच्या आंतरक्रियेतून विनिमयाचा दर स्थिर ठेवणे.

८.३ चलन परिवर्तनियतेचे प्रकार

चलन परिवर्तनियतेचे पुढील दोन प्रकारांत वर्गीकरण करता येते.

i) अंशतः परीवर्तनिय चलन

i) पूर्णतः परिवर्तनिय चलन

चलन परिवर्तनियतेचे वरील दोन्ही प्रकारांमधिल फरक लक्षात येण्यासाठी आपल्याला व्यवहारतोलाच्या संरचनेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

व्यवहारतोलाच्या संरचनेचा विचार केल्यास व्यवहार तोलात पुढील प्रमुख दोन प्रकारची खाती (Accounts) समाविष्ट असतात.

अ) चालू खाते (Current Account):

चालू खात्यात ii) दृश्य खाते ii) अदृश्य खाते यांचा समावेश होतो.

दृश्य खात्यात वस्तूंच्या आयात व निर्यातीची नोंद असते. तर अदृश्य खात्यातील आयात निर्यातीत सेवांचे मोबदले किंवा देणग्या यांचा समावेश होतो. या अदृश्य बाबींमध्ये जहाज सेवा, विमा, बँकिंग, आरोग्य, शिक्षण, कर्जावरील व्याज पर्यटकांचा खर्च, परकीय मदत इ. चा समावेश होतो.

खर्चाच्या बाजुस देशात आयात होणाऱ्या सोन्याचे मूल्य जहाज वाहतूक, बँका, विमा कंपन्यांच्या सेवांचे मूल्य देशातील रहिवाशांना परदेशात जाऊन केलेल्य खर्चाचा समावेश होतो तर जमेच्या बाजुस देशातून निर्यात होणाऱ्या दृश्य वस्तुंचे मूल्य, देशातून निर्यात होणारे सोने, देशातील बँका, विमा कंपन्या जबाज कंपन्या इ. सेवांचे मूल्य, परकीय प्रवाशांचा खर्च इ. चा समावेश होतो.

ब) भांडवली खाती (Capital Account)

व्यवहरतोलात मुख्यतः अल्प आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाचा समावेश होतो. त्यामध्ये

i) बाह्य मदत परकीय देशांची कमी सवलतीच्या दराने दिलेली कर्जे.

ii) व्यापारी कर्जे - खाजगी क्षेत्र आणि सरकारला दिलेली कर्जे.

iii) अल्पकालीन जमा

iv) अनिवासी भारतीयांनी ठेवलेल्या ठेवी.

v) परकीय गुंतवणूक आणि इतर भांडवली बाबी. इ.

सोन्याचा निव्वळ प्रवाह व अल्पकालीन भांडवलाची आयात किंवा निर्यात अशा प्रकारच्या भांडवली खात्यातील व्यवहारांमुळे व्यवहारातोल समतोल ठेवला जातो.

ज्यावेळी चलन केवळ चालू खात्यातील व्यवहारांच्याबाबतीत परिवर्तनिय असेल त्यावेळी त्याला चलनाची आंशिक परिवर्तनियता असे म्हणतात. परंतु ज्यावेळी देशाचे चलन व्यवहारतोलातील चालू खाते आणि भांडवली खाते या दोहोंमध्ये परिवर्तनिय असते तेव्हा त्यास चलनाची पूर्ण परिवर्तनियता असे म्हणतात.

८.४ चलन परिवर्तनियतेचे निर्धारक (अटी)

i) अर्थव्यवस्थेची देशांतर्गत स्थिरता.

ii) परकीय चलनाचा पर्याप्त साठा

iii) जर परकीय चलनाचे साठे पर्याप्त प्रमाणात नसतील त्यावेळी अनावश्यक आयातीला निर्बंध घालून केवळ अत्यावश्यक वस्तूंच्या आयातीचे धोरण अवलंबिणे.

iv) व्यवहारतोलातील चालू खात्याची बाजू मजबूत असावी.

v) योग्य औद्योगिक व गुंतवणूकविषयक धोरणे.

vi) निर्यातीला सवलती व अनुदाने देण्यात यावी की ज्यादारे आर्थिक विकास नियोजन निर्यातीभिमुख करता येईल.

८.५ चलन परिवर्तनियतेचे फायदे

१) चलनाच्या परिवर्तनियतेमुळे निर्यातीस प्रोत्साहन मिळून देशाची निर्यातीची लाभक्षमता वाढू लागते.

२) निर्यातीस प्रोत्साहन व आयात पर्यायी करण्यास चालना मिळते.

३) अनिवासी भारतीयांसाठी योग्य सवलती दिल्याने त्यांच्याकडील ठेवी आकर्षित करण्यास मदत मिळते.

४) चलन परिवर्तनियतेमुळे हवाला बाजारा सारखे गैरव्यवहारांना प्रतिबंध घालता येतात.

५) चलनाला योग्य मूल्य मिळवण्यासाठी व चलनाचे मूल्य टिकवून ठेवण्यासाठी चलनाची परिवर्तनियता आवश्यक आहे.

८.६ भारतीय रुपयाची परिवर्तनियता

१९७१ मध्ये ब्रेटन वुडस् प्रणाली कोलमडल्यानंतर चार वर्षासाठी भारतीय रुपया पाऊंडशी जोडण्यात आला त्यानंतर चौदा राष्ट्रांच्या चलनांच्या समूहाशी रुपया जोडण्यात आला. तर १९८१ मध्ये केवळ पाच राष्ट्रांच्या चलन समुहाशी रुपया जोडण्यात आला. भारतातील आर्थिक धोरणांच्या सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत १९९२-९३ मध्ये तत्कालीन अर्थमंत्र्यांनी आपल्या अंदाजपत्रकीय भाषणात चालू खात्यावर रुपया अंशतः परिवर्तनियतेची घोषणा केली, त्यानुसार १ मार्च १९९२ पासून भारतीय रुपयाची चालू खात्यावरील अंशतः परिवर्तनियतेकडे वाटचाल सुरु झाली. IMF च्या अहवालानुसार १९९० पूर्वीच जगातील जवळ जवळ ७० पेक्षा अधिक देशांनी आपले चलन चालू खात्यावर परिवर्तनिय करुन घेतले होते. त्यानंतर आणखी १० राष्ट्रांचा त्यात समावेश झाला.

भारतात १९९२ मध्ये लागू करण्यात आलेल्या शिथिलीकृत विनिमय दर पद्धतीनुसार' (LERMS) चलन परिवर्तनियतेबाबत ६०-४० चे धोरण स्विकारण्यात आले. त्यानुसार चालू खात्यावरील करण्यात आलेल्या वस्तु व सेवांच्या निर्यातीद्वारे मिळालेल्या एकूण परकिय चलनापैकी ६० टक्के चलन बाजार दराने तर उर्वरीत ४० टक्के चलन RBI कडे सुपुर्त करुन अधिकृत दराने रुपांतरीत करुन घेण्याचे दुहेरी विनिमय धोरण स्वीकारण्यात आले.

भारतात दुहेरी विनिमय धोरणाद्वारे चालू खात्यावर रुपया अंशतः परिवर्तनिय करण्यामागचा प्रमुख हेतू म्हणजेच भारतात विदेशी चलनाची कमी कींमतीला उपलब्धता होणे होय. की ज्यादारे आर्थिक विकास किंमत स्थिरतेसाठी अत्यावश्यक वस्तूंची कमी किंमतीला आयात करणे शक्य होईल. चालू खात्यावर रुपया अंशतः परिवर्तनिय

करण्याच्या निर्णयामूळे भारताच्या चालू खात्यात मोठ्या प्रमाणात तूट निर्माण होऊ लागल्याने रुपया चालू खात्यावर पूर्णतः परिवर्तनिय करणे धोक्याचे होते. असे असूनही १९९३-९४ च्या अंदाजपत्रकात चालू खात्यावर रुपया पूर्णतः परिवर्तनिय करण्याची घोषणा करण्यात आली.

८.६.१ भांडवली खात्यावर रुपयाची परिवर्तनियता:

मार्च १९९३ फेब्रुवारी १९९४ या काळात 'एक विनिमय दर पद्धती' हे धोरण स्विकारण्यात आले होते. चालू खात्यावर 'दुहेरी विनिमय दर पद्धती चा स्वीकार करण्यात आला होता व हा अनुभव विचारात घेऊन व्यापार खात्यावर रुपया पुर्णतः परिवर्तनिय करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार पूर्वीप्रमाणे ४० टक्के विदेशी चलन RBI कडे जमा करण्याची अट आता शिथिल करुन निर्यातीपासून मिळणारे सर्वच्या सर्व विदेशी चलन बाजार विनिमय दराने रुपांतरीत करुन घेण्याचे स्वातंत्र्य निर्यातदारांना देण्यात आले होते. तसेच आयातदारांना सुद्धा खुल्या बाजारात विदेशी चलनाची खरेदी करण्याचे व त्याच्या सहाय्याने आयातीचा मोबदला देण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. भारतीय रुपयाच्या परिवर्तनियतेतील हा एक महत्त्वाचा टप्पा समजला जातो.

१९९७-१९९८ च्या अंदाजपत्रकीय भाषणात तत्कालीन वित्त मंत्री श्री. पी. चिदंबरम् यांनी RBI मार्फत भांडवली खात्यावरील रुपयाच्या परिवर्तनियतेसंबंधी एक समिती नियुक्त करण्याची शिफारस केली. त्यानुसार २८ फेब्रुवारी १९९७ मध्ये RBI ने श्री. एस. एस. तारापोरावाला यांच्या अध्यक्षतेखाली भांडवली खात्यावरील रुपया परिवर्तनियता समिती (Committee on capital account convertibility CAC) स्थापन करण्यात आली या समितीकडे पुढील कायक्षेत्र सोपविण्यात आले.

i) भांडवली खात्यावर रुपया पुर्णतः परिवर्तनिय करण्यासंदर्भात जागतिक अनुभव विचारात घेऊन भारतात रुपया परिवर्तनियतेसाठी योग्य त्या शिफारसी सुचविणे.
ii) भांडवली खात्यावर रुपयाच्या परिवर्तनियतेसंबंधी उपाययोजना सुचविणे.
iii) संपूर्ण प्रक्रियेसाठी अभिप्रेत कालमर्यादा सुचविणे.
iv) रुपयाच्या परिवर्तनियतेच्या यशासाठी देशांतर्गत योग्य धोरण व संरचनात्मक बदल सुचविणे.
v) समितीला सोपविण्यात आलेल्या कार्याव्यतीरीक्त विषयांच्या संबंधित इतर बाबतीत शिफारसी सुचविणे.

तारापौरवाला समितीने इ.स. २००० सालापर्यंत भांडवली खात्यावर रुपया पुर्णतः परिवर्तनिय करणे शक्य असल्याचे मत व्यक्त केले. तसेच पुढील ३ वर्षात भांडवली खात्यावर रुपया परिवर्तनिय करण्यासाठी कोणती पाऊले उचलावी यासाठी एक योजना सादर केली.

तारापौरवाला समीतीच्या मते पुढील अटींची पुर्तता केल्यास भांडवली खात्यावर रुपया परिवर्तनीय करणे शक्य होईल व त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेला अनेक फायदे मिळतील.

१) इ.स. २००० सालापर्यंत भारत सरकारची वित्तीय तूट आणि भारताचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न यांचे गुणोत्तर ३.५ पर्यंत खाली आणणे आवश्यक आहे.

२) भारत सरकार आणि घटक राज्ये यांची हिशेब पद्धती पारदर्शक करावी त्यामुळे जागतीक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेची सार्वजनिक उत्पन्न व खर्च यांची तुलना करणे शक्य होईल.

३) भारतीय चलनवाढीचा दर इ.स.२००० सालापर्यंत ३.५टक्के च्या दरम्यान स्थिर ठेवणे.

४) सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या निष्क्रीय मत्तेचे प्रमाण १३.७टक्के वरुन पुढील तीन वर्षात ५ टक्के पेक्षा कमी करणे.

५) भारताच्या एकूण चलन पुरवठ्याशी विदेशी चलनाचे प्रमाण ४० टक्के ठेवणे.

६) पुर्ननिर्माण फंड निर्माण करुन या फंडात RBI चा नफा व सार्वजनिक उद्योगांचे भागभांडवल विक्रीतून मिळणारे उत्पन्न जमा करणे.

७) परिणामकारक विनिमय दरामध्ये ५ टक्के पेक्षा अधिक चढ उतार होणार नाहीत या दृष्टीकोनातून विनिमय दरावर नियंत्रण ठेवणे.

अशा प्रकारे वरील अटींची पूर्तता झाल्यास भांडवली खात्यावर इ.स. २००० सालापर्यंत रुपया पूर्णपणे परिवर्तनिय करणे शक्य होईल.

तारापौरवाला समितीच्या शिफारशींचा विचार करुन भारतीय रुपयाची पूर्ण परिवर्तनियतेकडे वाटचाल सुरु आहे. हाच दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेऊन २५ ऑगस्ट १९९७ रोजी भारताच्या मंत्रीमंडळाने FERA हा कायदा रद्द करुन FEMA हा नवीन कायदा पास केला. आता या नविन कायद्यामुळे विदेशी विनिमयावरील नियंत्रणे रद्द होणार आहेत व विदेशी विनिमयाचे फक्त व्यवस्थापन होणार आहे.

आपली प्रगती तपासा

१) चलनाची परिवर्तनियता म्हणजे काय ?

२) चलनाच्या अंशतः व पूर्णतः परिवर्तनियतेतील फरक स्पष्ट करा.

३) चलन परिवर्तनियतेचे फायदे स्पष्ट करा.

४) भारतीय रुपया परिवर्तनियतेपर्यंतचा प्रवास सविस्तर स्पष्ट करा.

८.७ राखिव विदेशी विनिमय

ज्या प्रमाणे एखाद्या व्यक्तीला स्वत:ची देणी किंवा कर्ज परतफेड करण्यासाठी स्वत:कडे राखीव उत्पन्न असावे लागते. त्याचप्रमाणे प्रत्येक देशाला त्याने केलेल्या वस्तू व सेवांच्या आयातींचे मूल्य फेडण्यासाठी कर्ज परतफेडीसाठी विदेशी चलन राखून ठेवणे आवश्यक असते. ह्या देणी देण्यासाठी प्रथम प्रत्येक देशाला वस्तू व सेवांच्या निर्यातीद्वारे परकीय चलन मिळवावे लागते. अशा प्रकारचे राखिव चलन प्रामुख्याने अमेरिकन डॉलर्स, सोने, पाऊंड, SDR या सारख्या आंतराष्ट्रीय मान्यता प्राप्त चलनांमध्ये ठेवावे लागते.

आंतराष्ट्रीय व्यापार आणि राथिव विदेशी विनिमय यामध्ये एक विशिष्ट प्रकारचा सहसंबंध दिसून येतो. ज्याप्रमाणे आंतराष्ट्रीय व्यापारात वाढ होत जाईल त्या प्रमाणात राखिव विनिमयाचे प्रमाण देखिल वाढत जाते. याउलट आंतराष्ट्रीय व्यापारातील घटीबरोबर राखिव विनिमयात देखिल घट घडून येते. ज्यावेळी राखिव विदेशी विनिमयासाठी असलेली मागणी आणि राखिव विदेशी विनिमयाचा पुरवठा समान असतो. त्यावेळी राखिव विदेशी विनिमयबाबत कोणतीच अडचण निर्माण होत नाही. परंतु ज्यावेळी राखिव विदेशी विनिमयाच्या पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक असते त्यावेळी राखिव विदेशी विनिमयाचा प्रश्न निर्माण होतो.

८.७.१ राखिव विदेशी विनिमय संकल्पना:

राखिव विदेशी विनिमयाची संकल्पना ही देशाच्या आंतराष्ट्रीय अधिदान प्रणालिशी संबंधित असून ती आंतरराष्ट्रीय रोखतेचा एक भाग आहे. अनेकदा राखिव विदेशि विनिमय व आंतराष्ट्रीय रोखता या संज्ञा समानार्थी वापरल्या जातात. परंतु प्रत्यक्षात या दोन्ही संकल्पना भिन्न असून त्यामध्ये फरक आहे. 'आंतराष्ट्रीय रोखता' ही संकल्पना व्यापक असून राखिव विदेशी विनिमय ही एक संकुचित संकल्पना आहे. राखिव विदेशी विनिमय ही विविध विस्तीय मत्तांचा संच असून ती आंतराष्ट्रीय रोखतेचा एक भाग आहे. राखिव विदेशी विनिमयात पुढील घटकांचा समावेश होतो.

i) सोन्याची अधिकृत धारण क्षमता.

ii) परकीय चलन (उदा. डॉलर, पाऊंड, येन, युरो इ.)

iii) विशेष आहरण अधिकार (SDR)

iv) IMF कडील राखिव साठे इ.

८.८ आंतराष्ट्रीय राखिवाची रचना

पुढील तक्त्याद्वारे आपल्याला आंतराष्ट्रीय पातळीवरील राखीवांच्या रचनेची कल्पना येऊ शकते.

Official Holding of Reserve Asset (Billon of SDRs)

		1973	1980	1990	1997
1)	Total Reserve Exchange gold	117.7	321.8	590.7	1133.0
2)	Fund Related Assets	15.0	28.6	46.6	54.98
3)	Reserve Position inthe fund	6.2	16.8	25.2	36.2
4)	SDRs	8.8	11.8	20.4	18.7
5)	Foreign Exchange Gold	102.7	293.10	545.1	1078.2
6)	Quantity (Million Ounces)	1022.0	952.4	938.2	892.8
7)	Value at London Market Price	95.0	44.2	265.6	224.1

(Source I.M.F. Annual Report)

८.९ IMF कडील राखिव निधी

IMF कडील राखिव निधीचे प्रमाण प्रत्येक सभासद देशाला ठरवून दिलेल्या निश्चित अशा वर्गणीद्वारे निश्चित होते. प्रत्येक सभासद देशाला पुढील प्रमाणात वाटा निश्चित केला जातो.

i राष्ट्रीय उत्पन्नाच्या २ टक्के

ii सोने व परकीय चलनाच्या ५टक्के

iii देशाच्या सरासरी वार्षिक आयातीच्या १०टक्के

iv देशातील सरासरी वार्षिक निर्यात बदलाच्या जास्तित जास्त १०टक्के

v वरील पैकी i) ii) iii) आणि iv) यांच्या वाट्याचे प्रमाण हे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी सरासरी वार्षिक निर्यातीनुसार वाढू शकतो.

सर्व सभासद राष्ट्रांच्या वर्गणीच्या एकूण वाट्यानुसार IMF च्या राखिव निधीचे प्रमाण ठरते प्रत्येक सभासद राष्ट्राला आपल्या ठरवून दिलेल्या वर्गणीचा हिस्सा अंशत: सोन्यात व अंशत: स्वदेशी चलनात देणे बंधनकारक आहे. प्रत्येक सभासद राष्ट्राला त्याच्या ठरवून दिलेल्या वर्गणीच्या २५टक्के रक्कम सोन्यामध्ये किंवा एकूण सुवर्ण साठे व परकीय चलन साठ्याच्या १०टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल ती भरणे बंधनकारक आहे. ही सवलत देण्याचे मुख्य कारण म्हणजे ज्या राष्ट्रांजवळ सुवर्णाचा साठा अपर्याप्त असतो. त्यांना त्यापैकी २५टक्के सुवर्ण निधीला देणे अत्यंत जड जाते. उर्वरीत भाग हा स्वदेशी चलनात द्यावा लागतो हे चलन स्वदेशातील केंद्रिय

बँकेत निधीच्या नावे उघडलेल्या खात्यात जमा केले जाते. ते हस्तांतरणीय नसते व निधी त्यावर व्याजही देत नाही.

अशा प्रकारे निधी म्हणजे एक 'संमिश्र पिशवी' (Mixed Bag) आहे असे म्हणता येईल. या पिशवीत सर्व राष्ट्रांच्या एकंदर वाट्याच्या १/४ भाग रोकडसुलभ राखिवांच्या (Liquid Reserve) रुपात आणि बाकीचा ३/४ भाग सभासद राष्टांच्या विभिन्न चलनांच्या स्वरुपात असतो.

IMF च्या सभासदांच्या वाट्यात वेळोवेळी वाढ होत गेल्याने १९७४ च्या अखेरपर्यंत सर्व राष्ट्रांच्या वाट्यांची बेरीज एकंदर २९.१८९ बिलियन डॉलर्स झाली. १९५६ साली ही बेरीज केवळ ८.९२८ बिलियन डॉलर्स होती. या कालखंडात उद्योगप्रधान देशांचे वाटे दुपटीपेक्षा अधिक वाढविण्यात आले. इतर विकसित आणि अल्पविकसित राष्ट्रांचे वाटे याच कालखंडात चौपटीपेक्षा अधिक वाढविण्यात आले. सर्वसामान्यतः अशी वाढ सप्टेंबर १९५९, फेब्रुवारी १९६६ व डिसें १९७० अशी तीनदा करण्यात आली. तीन्ही वेळेस काही निवडक सभासदांना विशेष वाढ आणि इतर सर्व सभासदांना ठराविक स्वीकृत प्रमाणात वाढ मंजूर करण्यात आली. डिसें. १९७० ला वाट्यामध्ये जी सर्वसामान्य वाढ मंजूर करण्यात आली त्यानुसार सर्व वाट्याची बेरीज २१,३०० बिलियन डॉलर्स पासून २९,१८९ बिलियन डॉलर्स पर्यंत वर गेली ही वाढ सुमारे ३५टक्के होती. या वाढीमुळे भारताचे स्थान मात्र खाली घसरले. तोपर्यंत सर्वाधिक वाटा मिळालेल्या पाच देशांत भारताची गणना होत असे. परंतु यावेळी भारताच्या वाट्याला २५टक्के वाढ तर जपानच्या वाट्याला ६५टक्के वाढ मंजूर झाल्याने भारताची जागा जपानने घेतली.

IMF च्या सर्व सभासदांच्या ३१ डिसेंबर १९६९ रोजी वॉशिंग्टन येथे झालेल्या वार्षिक बैठकीचे एक वैशिष्ट्य म्हणजे बहुतांश राष्ट्रांनी यावेळी होणाऱ्या वाटा वाढीमध्ये स्वतःसाठी जास्त वाटा मिळावा असा प्रयत्न केला. याचे मुख्य कारण म्हणजे जानेवारी १९७०, जानेवारी १९७१ व १९७२ मध्ये निधीच्या सभासदांना जे विशेष आहरण अधिकार' (Special Drawing Rights SDR) कागदी सुवर्ण (Paper Gold) मंजूर होणार होते व ते त्यांच्या वाट्यावर अवलंबून राहणार होते. आतापर्यंत सभासदांच्या वाट्याच्या आधारावर खालील गोष्टी निश्चित होत असत.

१) सभासदांनी निधीला दयावयाची वर्गणी

२) सभासदांचे आहरण अधिकार Drawing Rights)

३) सभासदांची मते (Votes)

परंतु अलीकडे IMF च्या नियमावली करारात जी दुरुस्ती करण्यात आली त्यानुसार SDR योजनेत भाग घेणाऱ्या सभासदांना हे अधिकार त्यांच्या वाट्याच्या आधारावर मंजूर करण्याचे ठरले सुमारे ३.४ बिलियन SDR ची पहिली वाटणी भाग घेणाऱ्या १०४ सभासदांमध्ये जानेवारी १९७० मध्ये करण्यात आली त्यानंतर सुमारे ३.० बिलियन SDR ची दुसरी वाटणी जानेवारी १९७१ व ३.०० बिलियन SDR ची तिसरी वाटणी जानेवारी १९७२ मध्ये ठरल्याप्रमाणे करण्यात आली. हा वाटणीचा क्रम

असाच दरवर्षी चालू असून १९८३ पर्यंत एकूण २१.३ बिलियन SDR ची वाटणी झालेली आहे.

IMF मधील काही निवड सभासद राष्ट्रांच्या वाट्याचे प्रमाण पुढील प्रमाणे दिलेले आहे.

(३१ डिसें. १९७२) आकडेवारी U.S. Doller or SDR मध्ये

	देश	वाटा (Quota)	सुवर्ण (Gold)
1.	USA	6.700	1,612
2.	U.K.	2,800	700
3.	Germany	1,600	400
4.	France	1,500	375
5.	Japan	1,200	300
6.	Canada	1,100	275
7.	Italy	1000	250
8.	India	940	162

1 SDR = 0.88671gram of fine gold.
Source = IMF International Financial statistics Feb 1973.

८.१० विशेष आहरण अधिकार SDR (Special Drawing Rights)

SDR चे मूळ शोधायला गेले तर ते केन्स यांनी १९४३-१९४४ साली प्रस्तावित केलेल्या 'बॅन्कॉर' (Bancor) या आंतरराष्ट्रीय चलन संकल्पनेत सापडले. युद्धोत्तर कालीन मैट्रिक व्यवस्थेला आधार म्हणून त्यांनी Bancor ही संकल्पना मांडली होती. त्यानंतर जागतीक मुद्राव्यवस्थेतील दोष दूर करण्याच्या दृष्टीने अनेक सुधारणा प्रस्ताव मांडण्यात आले. परंतु बलवान औद्योगिक राष्ट्रांच्या बैठकित वर्तमान आंतराष्ट्रीय मुद्रा निधी पद्धती मुलतः सुदृढ आणि निर्दोष असून त्यात केवळ सौम्य स्वरुपाचे बदल करण्याची गरज आहे. हाच विचार शेवटी प्रभावी ठरला आणि त्यानुसार १९६७ साली रायोडी जॅनेरो येथे आंतराष्ट्रीय मुद्रानीधीच्या झालेल्या बैठकीत विशेष आहरण अधिकारांची (Special Drawing Rignts) SDR निर्मिती करण्याची योजना सादर करण्यात आली. या योजनेला एप्रिल १९६८ मध्ये झालेल्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली.

यापूर्वी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांना आपली आंतराष्ट्रीय देणी व IMF च्या कर्जाची परतफेड सोने किंवा डॉलर्समध्ये करावी लागत होती. परंतू विकसनशील गरीब देशांकडे डॉलरमध्ये परिवर्तनीय विदेशी चलन किंवा सोने फारच थोडे असल्याने त्यांची फार कुचंबणा होत होती. ह्या वर उपाय म्हणून नाणेनिधीने SDR हे आंतराष्ट्रीय कागदी चलन काढण्याचा निर्णय घेऊन तो अमलात आणला.

ह्या योजनेमूळे IMF शी होणारे सर्व व्यवहार ह्या नव्या आंतराष्ट्रीय मुद्रेत होतात. त्यामुळे IMF ची आंतरराष्ट्रीय रोखता किंवा तरलता (Liquidity) वाढून विकसनशील राष्ट्रांना नाणेनिधीद्वारे अधिक मदत होत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात वस्तुंच्या व्यापारात दरवर्षी ८टक्के ने वाढ झाली. परंतु सुवर्णाच्या पुरवठ्यात केवळ २ टक्के ने वाढ झाली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या अधिकच जटील झाली. ही रोखतेची समस्या सोडविण्यासाठी आंतराष्ट्रीय मौद्रिक प्रणालीत सुधारणा करणे आवश्य झाले. म्हणून IMF च्या ७० मुख्य सदस्यांनी १९६७ मध्ये एक नवीन मौद्रिक योजना प्रस्तूत केली. या योजनेला विशेष आहरण अधिकार (SDR) असे नाव देण्यात आले. ही नवीन मुद्रा किंवा चलन म्हणजे 'कागदी सुवर्ण' (Paper Gold) होय. ही योजना IMF ने १९७० पासून लागू केली ह्यामुळे IMF कडे दोन प्रकारचे खाते तयार झालेत.

१)सामान्य खाते (General Account):

ह्या खात्यातून सुवर्ण व विदेशी चलनांच्या देण्या घेण्यांच्या व्यवहारांचा समावेश होतो.

२) विशेष उचल हक्क (SDR):.

(Special Drawing Account) ह्या खात्यातून SDR ची सुविधा प्राप्त होते.

आंतरराष्ट्रीय रोखतेत समाविष्ट होणाऱ्या राखीव संपत्तीला पुरक म्हणून खास उचल हक्क SDR निर्माण करण्यात आले. ह्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्य विस्तृत झाले.

८.१०.१ SDR योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये :

देशातील मौद्रिक गरजा पूर्ण करण्यासाठी किंवा रोखतेत वाढ करण्यासाठी मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना प्रत्यय निर्मितीच्या बाबतीत जशी मदत करतो त्याचप्रकारे विशेष उचल अधिकारांची निर्मिती आहे. नाणे निधीने Specia Drawing Account सुरु करुन त्यानुसार SDR निर्माण करण्यात आले.ह्या योजनेच्या अंतर्गत ज्या देशाला हिस्सा देण्यात येतो त्या देशाला अनौपचारिक राखीव संपत्ती' (Unconditional Reserve Asset) प्राप्त होते. हिच्या सहाय्याने (ज्यांनी SDR चा स्विकार केला आहे) अशा राष्ट्रांकडून चलन मिळवू शकतो की ज्यांचा उपयोग देणी फेडण्यासाठी करता येतो.

SDR ची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. SDR हे सूवर्ण पत्रासारखे किंवा कागदी सुवर्णासारखे (Paper Gold) मानले जाते. कारण ह्याची किंमत सुवर्णात ठरविण्यात येते. एक SDR ची किंमत ०.८८६७१ ग्रॅम सोने इतकी आहे.

२. SDR ही एक अशी संपत्ती आहे की ज्यामुळे सदस्य राष्ट्राला SDR च्या किंमती इतके विदेशी चलन मिळू शकते. ह्या विशिष्ट विदेशी चलनाचा उपयोग करण्याकरीता सदस्य राष्ट्राला IMF ची पुन्हा पारवानगी काढावी लागत नाही.

३. SDR योजना लागू करण्याकरीता तसेच जास्तीचे SDR काढण्याकरिता नाणेनिधीच्या एकूण मतांच्या ८५टक्के मतांची आवश्यकता असते.

४. सदस्य देशांच्या वर्तमान हिश्श्याच्या प्रमाणात IMF द्वार सदस्य देशांमध्ये SDR चे वाटप करण्यात आले आहे.

५. विशेष उचल हक्क धारक देशांना IMF चलन मागण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. ज्यांना IMF ने मान्यता दिली आहे. केवळ अशा देशांकडूनच SDR बदल्यात चलन मिळू शकते.

६. योजनेत समाविष्ट असलेल्या देशांचे व्यवहारशेष संतूलन व त्यांचा विनिमय कोष ह्यांची स्थिती पाहूनच IMF त्यांना एका निश्चित रकमेचे SDR स्वीकार रकण्याचा आदेश देते. कोणत्या देशाला किती मदत द्यावी हे ठरविण्याकरीता IMF ने काही मापदंड तयार केले आहेत.

७. केवल IMF शी विशेष प्रकारचा करार झाला असेल तर किंवा स्वेच्छेने कोणताही सदस्य राष्ट्र निर्धारीत मर्यादेपेक्षा जास्त चलन देऊ शकतो.

८. ह्याच्याशी संबंधित सर्व प्रकारची देणी घेणी IMF मार्फत सदस्य राष्ट्रांची मध्यवर्ती बँक करीत असते. ह्याचा उपयोग सदस्य राष्ट्र केवळ व्यवहार तोलातील अस्थायी असंतुलन सुधारण्याकरीता करु शकतो.

९. प्रत्येक देशाला आपल्या SDR च्या ७०टक्के किमंतीच्या विदेशी चलनाचा ५ वर्षे पर्यंत परतफेड न करताही उपयोग करण्याचा अधिकार देण्यात आला होता.

१०. ज्या देशांजवळ SDR आहेत अशा देशांना IMF कडून त्या SDR वर व्याज दिला जातो. SDR चा वापर करणाऱ्या देशांकडून मिळणाऱ्या उत्पन्नात हे व्याज देण्यात येते.

११. SDR च्या प्रत्येक सभासद राष्ट्राने ह्या योजनेत सामील झालेच पाहिजे अशी सक्ती नाही ह्या योजनेत सामिल झालेले देश ह्यातून केव्हाही बाहेर पडू शकतात.

१२. ह्या योजनेत योग्य त्या सुधारणा सतत होत असल्याने SDR चा उपयोग सतत वाढत आहे. करारानुसार आता SDR चे हस्तांतरण खरेदी विक्री, अनुदाने, अदलाबदली (Swaps) तसेच गहाण इ. करीता करता येते. मध्यवर्ती बँकेव्यतिरीक्त काही इतर संस्थांना सुद्धा SDR च्या अन्य धारकांमच्या रुपात मान्यता देण्यात आली आहे. हे धारक SDR स्वत:जवळ ठेऊ शकतात व उपयोगही करु शकतात.

८.१०.२SDR योजनेचा उपयोग :

ही योजना विशेषत: विकसनशील देशांकरिता लाभदायक होऊ शकते. ह्या देशांचा रोखता कोष मर्यादित असतो. परंतु ह्यांची आंतरराष्ट्रीय तरलतेची (रोखतेची) मागणी बरीच जास्त असते. परंतु विकसनशील देश ह्या व्यवस्थेबाबत समाधानी

नाहीत. कारण SDR च्या वितरणातील अधिकांस पाश्चात्य विकसित देशांकडे गेला आहे. योजनेच्या १९७०-१९७२ ह्या तीन वर्षाच्या काळात एकूण ९.३ SDR बिलिअन निर्मिती झाली. त्यापैकी २.३ बिलिअन म्हणजे केवळ २४.७टक्के SDR विकसनशील देशांना मिळाले. ह्यात भारताचा हिस्सा केवळ ३ टक्के होता.

१९७९ ते १९८१ पर्यंत दरवर्षी १९८९ मिलियन SDR चे वाटप मिळाल्यानंतर १९८१ च्या शेवटी भारताजवळ ४६७ मिलियन SDR चा कोष होता. मार्च १९९४ चा शेवटी भारताच्या विदेशी विनिमय कोषात ७६मिलियन चा कोष होता. ६ डिसें. १९९६ ला ही रक्कम ८७ मिलियन SDR म्हणजेच १२५ मिलियन डॉलर्स म्हणजेच ४४८.४६कोटी रु. होती. जुलै १९७६ ते जून १९७८ पर्यंतच्या २ वर्षाच्या काळात IMF ने विकलेल्या सुवर्णापासून मिळालेल्या लाभात भारताल ४२ मिलियन डॉलर्सचा हिस्सा मिळाला. भारताच्या सुवर्णाच्या मौद्रिक कोषात जाने. १९७७ ते डिसेंबर १९७९ च्या काळात जवळपास २१ कोटी रु. ची वृद्धी झाली.

अशा प्रकारे भारताला IMF पासून अनेक लाभ मिळाले आहेत. भारताच्या बाबतीत IMF चे धोरण नेहमीच सहानभूतीचे राहत आले आहे व भारताने सुद्धा कृतज्ञता भावनेने IMF च्या नियमांचे सतत पालन केलेले आहे.

८.११ राखिव विदेशी विनिमय धोरणाची उद्दिष्टे

राखिव विदेशी विनिमय जवळ बाळगण्याची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) चलनावरील विश्वास राखण्यासाठी:

देशातील लोकांचा चलनावरील विश्वास टीकवून ठेवण्यासाठी देशातील मौद्रिक अधिसत्तेला काही विशिष्ट प्रमाणात परकिय चलन राखिव स्वरुपात बाळगावे लागते.

उदा. भारताने १९५६ पर्यंत कागदी नोटांच्या निर्गमनासंदर्भात 'किमान राखिव निधी पद्धतीचा' अवलंब केला होता. या पद्धतीद्वारे देशातील मध्यवर्ती बँक म्हणजेच रिझर्व्ह बँक ऑप इंडीयाने नवीन नोटा छापण्यापूर्वी स्वत: जवळ ५१५कोटी रु. पर्यंत राखिव निधीसोने परकिय चलनाच्या संदर्भात ठेवणे बंधनकारक होते. या पैकी ११५ कोटी रु. किंमतीचे सोने व उर्वरीत ४०० कोटी रु. पर्यंतची रक्कम परकिय चलनाच्या स्वरुपात ठेवणे अपेक्षित होते.

१९५७ मध्ये किमान राखिव निधी पद्धतीचा त्याग करण्यात आला. आता नवीन चलन निर्गमनासाठी ५१५ कोटी रु. ऐवजी २००कोटी पर्यंतचा निधी राखिव ठेवणे बंधनकारक असून त्यापैकी ११५ कोटी रु. पर्यंतचे सोने व उर्वरीत ८५ कोटी रु पर्यंतची रक्कम परकिय चलनाच्या स्वरुपात ठेवणे अपेक्षित होते. अशा राखिव निधी ठेवल्यानंतर RBI कीतीही प्रमाणात चलन छपाई करु शकते.

२) विदेशी विनिमय दरातील चढ उतार रोखणे:

बहुतांश देशांनी व्यवस्थापित लवचिक विनमय दर पद्धतीचा अवलंब केलेला असल्याने देशातील मध्यवर्ती बँकेला विदेशि विनिमय दरातील चढ-उतार नियंत्रित ठेवणे बंधनकारक बनले आहे. व विनिमय दरातील हे चढउतार कमी करण्यासाठी मध्यवर्ती बँकेला स्वत:जवळ राखिव विदेशी चलन बाळगणे क्रमप्राप्त आहे.

३) सट्टे बाजी व्यवहारांवर नियंत्रण:

विदेशी विनिमय बाजारातील सट्टेबाजीच्या व्यवहारांमूळे विदेशी विनिमय बाजार व पर्यायाने देशाची अर्थव्यवस्था अस्थिर व विस्कळीत बनते. अशा सट्टेबाजीला आळा घालण्यासाठी देशातील मध्यवर्ती बँकेकडे विदेशी चलनाचे राखिव साठे असणे क्रमप्राप्त ठरते.

४) विदेशी विनिमय बाजारपेठेत विश्वासाचे वातावरण:

देशात व पर्यायाने विनिमय बाजारात विश्वासाचे वातावरण निर्माण होण्यासाठी देशातील मध्यवर्ती बँकेजवळ विदेशी चलनाचे साठे मजबूत असणे आवश्यक असते. कारण देशातील विदेशी चलनाचे साठे हे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या भक्कमतेसाठी किंवा कमजोरी साठी जबाबदार असतात.

विदेशी चलनाच्या साठ्यांचे प्रमाण हे त्या देशाने स्वीकारलेल्या विनिमय दर पद्धतीवर अवलंबून असते. जर देशाने स्थिर विनिमय दर पद्धतीचा स्विकार केलेला असेल तर त्या संबंधित देशाला विनिमय दर टीकवून ठेवण्यासाठी अधिक प्रमाणात राखिव परकिय चलन ठेवणे आवश्यक असते. याउलट ज्या देशात अस्थिर विनिमय दर पद्धती आहे. अशा देशांत मागणी पुरवठ्याच्या स्वयंचलित यंत्रणेमार्फत विनिमय दरात अनुकूल बदल घडून येत असल्याने विदेशी राखिव चलन साठ्यांची फारशी गरज नसते.

विदेशी चलन साठ्याचे प्रमाण हे काही प्रमाणात देशाची लोकसंख्या व स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचे GDP प्रमाण यावर देखिल असते. लोकसंख्या व GDP जितके जास्त तितके राखिव विदेशी चलन जास्त बाळगावे लागते.

आपली प्रगती तपासा:

१) राखिव विदेशी विनिमय ही संकल्पना स्पष्ट करा.

२) राखिव विदेशी विनिमय धोरणाची उद्दिष्टे स्पष्ट करा.

३) IMF च्या राखिव निधी वर टीप लिहा.

४) SDR चे महत्त्व स्पष्ट करा.

८.१२ विनिमय धोके

मुक्त विनिमय दर धोरणाच्या परिस्थितीत विदेशी विनिमय दरांच्या अस्थिरता व अनिश्चितता यामुळे विदेशी विनिमय बाजारात आयातदार आणि निर्यातदारांमध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. भविष्यातील विनिमय दर सतत बदलत असल्याने आयातदार व निर्यातदारांना नफ्या ऐवजी तोटा देखिल होऊ शकत असल्याने व्यापार व्यवहारातील धोक्यांचे प्रमाण वाढून विदेशी व्यापार व्यवहारांवर त्याचा विपरीत परिणाम दिसून येतो. हे धोके दोन कारणांमुळे निर्माण होऊ शकतात.

i) विदेशी विनिमयाच्या दरात सतत चढउतार घडून येतात.

ii) विदेशी व्यापारात आयातदार निर्यातदार परस्परांसाठी अनोळखी असू शकतात.

iii) त्यामुळे दोन्ही पक्षांना परस्परांची पतविषयक माहिती व हमी नसते.

अनेकदा बहुतांश देशांमध्ये राजकिय, आर्थिक समस्या, अंतर्गत अस्थिरता, दंगल किंवा युद्ध सदृश्य परिस्थिती, चलनवाढ, व्यापारचक्रे, बेरोजगारि दारिद्र्य, लोकसंख्या इ. मुळे देशांच्या कर्ज घेण्यावर किंवा कर्ज परतफेडीसंदर्भात विदेशी विनिमय दरातील अस्थिरतेमुळे इतर देशांचा विश्वास कमी होऊन अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. उदा. काही अफ्रिकन देश लॅटीन अमेरिकन देश अशा देशांची विदेशी देणी फेडण्याची क्षमता कमी झाल्याने अशा देशाना देणग्या, सवलती व अनुदाने, यासारख्या आर्थिक सहकार्यांवर अवलंबून रहावे लागते.

विदेशी विनिमय दरातील अस्थिरतेमुळे एका देशातील चलन दुसऱ्या देशातील चलनात बदलून देण्यात अडचणी निर्माण होतात. त्यातूनच विनिमय धोके हे प्रामुख्याने त्या चलनाची सशक्तता आणि राखिव विदेशी विनिमयाची परिस्थिती यावर अवलंबून असते.त्यामुळेच जर एखाद्या देशाच्या चलनामध्ये सतत अस्थिरता असेल, अल्प उत्पादकता, आंतरराष्ट्रीय बाजारातील कमकुवत पत इ. मुळे संबंधित देशाचा विनिमय दर अस्थिर बनून विनिमय धोक्यांचे प्रमाण वाढते. याउलट चलनाची सशक्तता, उच्च उत्पादकता इ. मध्ये संबंधित देशातील विनियम धोक्यांचे प्रमाण कमी राहते. उदा. अमेरिका, जपान इ.

ज्या वेळी एका देशातील चलनाचे देणे दुसऱ्या देशातील चलनात करतांना अस्थिर विनिमय दरामूळे अनिश्चिता निर्माण होते. त्यावेळी विनिमय धोके निर्माण होतात. म्हणजेच निर्यातदाराला स्वदेशी चलनात प्राप्त होणारी रक्कम किंवा आयातदाराला द्याव्या लागणाऱ्या देण्यांची रक्कम ज्यावेळी अनिश्चित असते. त्याचप्रमाणे एका देशातून दुसऱ्या देशात जाणाऱ्या किंवा येणाऱ्या निधीची रक्कम निश्चित करता येत नाही त्यावेळी विनिमय धोके निर्माण होतात.

अलीकडील काळात जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये विदेशी विनिमयाचा दर हा बाजारातील विदेशी चलनाच्या मागणी व पुरवठ्याच्या आंतरक्रियेतून निश्चित होत असल्याने तो सतत बदलणारा असतो. ज्यामुळे प्रत्येक देशाकडील विदेशी चलन

साठ्यानुसार त्याला नफा किंवा तोटा होत असतो. म्हणूनच हे बदलणारे विनिमय दर विनिमय धोक्यांच्या निर्मितीचे एक प्रमुख कारण मानले जाते.

८.१२.१ विदेशी विनिमय धोक्याचे प्रकार:

विदेशी विनिमय धोक्यांचे पुढील प्रकारांमध्ये वर्गीकरण करता येते.

१) ग्राहकांची पतविषयक जोखिम:

विदेशी विनिमय बाजारपेठेत चलनाचे व्यवहार करणाऱ्या बँका, मध्यस्थ, आंतराष्ट्रीय वित्तीय संस्था व इतर संस्था आंतराष्ट्रीय वित्तीय संस्था व इतर संस्था इ. च्या पतविषयक माहितीच्या अभावी काही धोके निर्माण होऊ शकतात. परंतु आंतरराष्ट्रीय पतमूल्यांकन संस्थांमार्फत अशा प्रकारच्या जोखिमांची तीव्रता कमी करता येते.

२) चलनविषय जोखिम:

अशा प्रकारचे धोके चलनाची सशक्तता किंवा अशक्तता, चलनस्थिती, देशातील तप्त पैशांची समस्या (Hot Money) किंवा सट्टेबाजी व्यवहार इ. मुळे निर्माण होते.

३) बाजार जोखिम:

वस्तू व सेवांविषयक दर्जा, सरकारी धोरणातील बदल, करविषयक धोरण, इ. मुळे निर्माण होणारी जोखीम.

८.१३ विदेशी विनिमय बाजारपेठेचे जागतिक दुवे

विदेशी विनिमय बाजारपेठ म्हणजेच असे ठिकाण की जेथे विदेशी चलनाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार पार पाडले जातात. या बाजारपेठेत एका देशातील चलनाच्या बदल्यात दुसऱ्या देशातील चलनाच्या विक्रीचा समावेश होतो. सध्या विदेशी विनिमय बाजारपेठ ही आंतराष्ट्रीय नाणेबाजाराची सर्वात मोठी वित्तीय बाजारपेठ समजली जाते की ज्यामध्ये मध्यवर्ती बँका, व्यापारी बँका, मध्यस्थ, सट्टेबाज, विविध देशातील सरकारे व इतर वित्तीय संस्थांचा समावेश असतो.

A) बाजारपेठेचा आकार व तरलता:

विदेशी विनिमय बाजारपेठ तीच्या पुढील वैशिष्ट्यांमूळे इतर वित्तीय बाजारपेठांपेक्षा वेगळी ठरते.

i) मोठ्या प्रमाणातील व्यवहार

ii) रोखतेचे प्रमाण अधिक

iii) भौगोलिक विविधता

iv) निरंतर कार्यरत (२४ तास सुविधा)

v) विदेशी विनिमय दरावर परिणाम करणाऱ्या घटकांची विविधता

vi) इतर बाजारपेठांच्या तुलनेत नफ्याचे प्रमाण अधिक

एप्रिल २००५-२००६ मध्ये विदेशी विनिमय व्यवहारांमध्ये सन २००७ च्या तुलनेत ३८टक्के नी वाढ घडून आली. या मागचे प्रमुख कारण म्हणजेच विदेशी विनिमय बाजारपेठेची अलिकडील कालातील वाढती लोकप्रियता होय.

B) बाजारपेठेतील सहभागी घटक :

विदेशी विनिमय बाजारपेठेचे व्यवहार वेगवेगळ्या घटकांमार्फत पूर्ण केले जातात. विनिमय बाजारपेठेतील महत्त्वाचे सहभागी घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.

i) **मध्यवर्ती बँका :**

कोणत्याही देशाची मध्यवर्ती बँक ही विनिमय बाजारातील व्यवहारांमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते. मध्यवर्ती बँक ही पैशाच्या पुरवठा चलनश्चिती इ. चे नियंत्रण करते. देशातील अर्थव्यवस्थेतील स्थिरता टीकवून ठेवण्यासाठी राखिव विदेशी विनिमय या साधनाचा योग्य वापर करण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकेला पार पाडावी लागते.

ii) **व्यापारी बँका:**

विदेशी विनिमय बाजारपेठेतील बहुतांश व्यवहार म्हणजेच जवळपास ५३टक्के व्यवहार हे आंतर बंक बाजारा मार्फत पार पाडले जातात.

iii) **व्यापारी कंपन्या:**

व्यापारी कंपन्यामार्फत देखिल विदेशी विनिमयाचे व्यवहार केले जातात. परंतु बँका व सट्टेबाज यांच्या तुलनेत हे व्यवहार अत्यंत कमी प्रमाणात केले जातात.

iv) **सट्टेबाज :**

विदेशी विनिमय बाजारपेठेतील जवळपास ७०टक्के ते ९० टक्के व्यवहार हे सट्टेबाजीचे व्यवहार असतात.

v) **गुंतवणुक व्यवस्थापक संस्था :**

ग्राहकांच्या वतीने त्यांच्या रकमा विदेशी कर्जरोख्यांसंदर्भात खरेदी विक्री करणाऱ्या गुंतवणूक व्यवस्थापक संस्था देखिल विनिमय बाजारपेठेतील एक सक्रिय घटक समजल्या जातात.

vi) **ब्रोकर :**

विनिमय खरेदी विक्रीचे व्यवहार करणाऱ्या मध्यस्थांचा देखिल विनिमय बाजारपेठेत समावेश होतो.

vii) **बँकेतर विदेशी विनिमय संस्था :**

अशा संस्था व्यक्तीगत संस्था किंवा वैयक्तिक गरजांसाठी विदेशी विनिमयांचे व्यवहार करीत असतात. अशा संस्था व्यापारी बँकांपेक्षा योग्य विनिमय दर व स्वस्त परतफेडीते व्यवहार करतांना दिसून येतात. युके मधील जवळपास १४टक्के चलनाचे हस्तांतरण व देणी देण्याचे व्यवहार अशा बँकेतर विदेशी विनिमय कंपन्यांद्वारे केले जातात.

viii) **विनिमय दराचे निर्धारण घटक:**

विदेशी विनिमय दर निश्चित करणाऱ्या मागणी पुरवठा या घटकांबरोबरच पुढील दोन घटक महत्त्वाचे मानले जातात.

ix) **आर्थिक घटक :**

यामध्ये देशाच्या अर्थव्यवस्थेचे स्वरुप, परिस्थिती आर्थिक धोरणे, मौद्रिक अधिसत्तेचे धोरण, आर्थिक निर्देशांक इ. चा समावेश होतो.

x) **राजकीय घटक :**

यामध्ये देशातील प्रदेशांमधील व आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकीय परिस्थिती, सत्ताधारी पक्षाची ध्येय धोरणे इ. चा प्रभाव विनिमय दरावर प्रभाव टाकू शकतो.

D) **वित्तीय साधने:**

विदेशी विनिमय बाजारात पुढील प्रकारच्या व्यवहारांचा समावेश होतो.

i) **तत्काळ (हजर) दर व्यवहार:**

यामध्ये विनिमयाच्या अल्पकालीन व्यवहारांचा समावेश होत असून या व्यवहाराद्वारे दोन वेगवेगळ्या चलनांचा त्याचवेळी विनिमय होत असल्याने अशा व्यवहारांना 'प्रत्यक्ष विनिमय' असेही म्हटले जाते.

ii) **वायदा दर व्यवहार**

विदेशी विनिमय दरातील सततच्या चढउतारामुळे निर्माण होणारे धोके टाळण्यासाठी भविष्यकालीन व्यवहारांसाठीचा विनिमय दर वर्तमान काळातच करारादारे निश्चित करुन भविष्यात निर्माण होणारी जोखिम टाकली जाते.

या व्यवहारांचा कालावधी एक दिवस, काही दिवस, काही महीने किंवा काही वर्षे असा असू शकतो.

iii) **अदलाबदलीचे व्यवहार (Swap):**

भविष्यकालीन व्यवहारांमध्ये लोकप्रिय मानला जाणारा व्यवहार म्हणजेच चलन बदलाबदलीचे व्यवहार होय. या प्रकारात दोन व्यक्ती एका ठराविक काळाकरीता आपल्याकडील चलनाची एका निश्चित दराला अदलाबदल करुन भविष्यातील विनिमय दर चढउतारांची जोखिम कमी करतात.

iv) **सट्टेबाजीचे व्यवहार :**

परकीय चलनाची मागणी ही वस्तू व सेवांची आयात करणारे आयात व्यापारी आणि सट्टेबाजी चे व्यवहार करणाऱ्या दलालांकडून केली जाते. हे दलाल परकीय चलनाची खरेदी वर्तमान काळातच करतात व भविष्यात विक्री करतात. तसेच परकीय चलनाचा पुरवठा वस्तु व सेवांची निर्यात करणारे व्यापारी आणि सट्टेबाजांकडून केली जाते. ज्यावेळी भविष्यात वायदा दर घसरण्याची शक्यता असते तेव्हा वर्तमान काळात मोठ्या प्रमाणात परकीय चलनाची विक्री केली जाते. त्यावेळी वायदा बाजारातील दलाल व सट्टेबाज किंमतीतील बदलानुसार आपापल्या जवळील विदेशी चलनाचे रुपांतर एका देशातून दुसऱ्या देशात करतात.

आपली प्रगती तपासा

१) विनिमय धोके ही संकल्पना स्पष्ट करा.

२) विनिमय धोक्यांचे प्रकार कोणते ?

३) विदेशी विनिमय बाजारपेठेची वित्तीय साधने कोणती ?

_____

_____

_____

_____

८.१४ सारांश

१) परिवर्तनिय कागदी चलन म्हणजेच असे चलन की जे इतर चलनांमध्ये रुपांतरीत करता येते.

२) अधिकृत परवानगीशीवाय नियंत्रित चलनाचे इतर चलनांमध्ये रुपांतरण करता येत नाही.

३) पूर्ण परिवर्तनियता याचा अर्थ कोणत्याही नियंत्रणाशिवाय एका निश्चित विनिमयाच्या दराला एका चलनाचे दुसऱ्या चलनाशी विनिमय करणे होय.

४) परिवर्तनियता ही आंशिक आणि पूर्ण परिवर्तनियता अशा दोन प्रकारांत वर्गीकृत केली जाते.

५) १ मार्च १९९२ पासून भारतीय रुपया अंशत: परिवर्तनिय करण्यात आला.

६) भांडवली खात्यावर रुपया पुर्णत: परिवर्तनिय करण्यासाठी तारापौरवाला समिती १९३७ मध्ये नियुक्त करण्यात आली.

७) राखिव विदेशी विनिमय ही आंतरराष्ट्रीय रोखतेची एक महत्त्वपूर्ण शाखा आहे.

८) राखिव विदेशी विनिमय धारणाची प्रमुख उद्दिष्टे म्हणजेच

i) चलनावरील विश्वास टीकविण्यासाठी

ii) विदेशी विनिमय दरातील चढउतार रोखण्यासाठी

iii) सट्टेबाजी व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी

iv) विदेशी विनिमय बाजारपेठ विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यासाठी

९) विदेशी विनियम दरातील अस्थिरतेमूळे एका देशातील चलन दुसऱ्या देशातील चलनात बदलून देण्यात अडचणी निर्माण होतात त्यातूनच विनिमय धोके निर्माण होतात.

१०) विनिमय राखिव विदेशी विनिमयाची परिस्तिती यावर अवलंबून असते.

८.१५ प्रश्न

१) तुमच्या मते परिवर्तनियता म्हणजे काय ? परिवर्तनियतेचे विविध प्रकार कोणते ?

२) पुढील प्रश्नांवर टिपा लिहा.

i) अंशिक परिवर्तनियता

ii) पूर्ण परिवर्तनियता

iii) तारापौरावाला समिती

३) राखिव विदेशी विनिमयाचा अर्थ स्पष्ट करा.

४ राखिव विदेशी विनिमय आणि आंतरराष्ट्रीय रोखता यांतील फरक स्पष्ट करा.

५) राखिव विदेशी विनिमय धारणाची उद्दिष्टे सांगा

६) टीप लिहा :

i) विशेष उचल अधिकार SDRs

ii) IMF कडील राखिव निधी

७) विदेशी विनिमय बाजारपेठेतील धोक्याची कारणे कोणती ?

८) विदेशी विनमय बाजार हा जागतिकरित्या कसा जोडला गेलेला आहे हे स्पष्ट करा.

*****

९

प्रकरण - ५

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि भांडवली प्रवाह

(International Monetory Fund & Capital Flow)

घटकरचना

९.० उद्दिष्ट्ये

९.१ प्रस्तावना

९.२ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

९.३ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि आंतरराष्ट्रीय रोखता.

९.४ विशेष उचल अधिकार (SDR)

९.५ आंतरराष्ट्रीय भांडवली हालचाली-परकीय भांडवलाचे प्रकार मार्ग

९.६ रोखारुपी गुंतवणूकीचा आंतरराष्ट्रीय प्रवाह

९.७ परकीय भांडवलाचे आर्थिक विकासातील महत्व

९.८ सारांश

९.९ शब्दकोश

९.१० प्रश्न

९.० उद्दिष्ट्ये

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना हा आंतरराष्ट्रीय जागतिक-आर्थिक सहकार्याच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा ऐतिहासिक टप्पा आहे. या पाठात आपण आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची आंतरराष्ट्रीय रोखतेच्या संदर्भातील भूमिका विशेष उचल अधिकारी (SDR), परकीय भांडवलाची भूमिका इत्यादी प्रमुख घटकांचा अभ्यास करणार आहोत.

या पाठाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. आंतरराष्ट्रीय नाणे निधीची भूमिका किंवा महत्व अभ्यासणे.
२. आंतरराष्ट्रीय रोखता ही संकल्पना समजावून घेणे.
३. विशेष उचल अधिकार ही संकल्पना अभ्यासणे.
४. आर्थिक विकासातील परकीय भांडवलाची भूमिका अभ्यासणे.

९.१ प्रस्तावना

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना १९४६ मध्ये करण्यात आली असून, नाणेनिधीची प्रत्यक्ष कार्यवाही १९४७ पासून सुरु झाली आहे. विनिमयदरात स्थैर्य प्रस्थापित करणे. आंतरराष्ट्रीय व्यापारात घडवून आणणे हा नाणेनिधीच्या स्थापनेचा प्रमुख उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत परकीय भांडवलाची भूमिका किंवा महत्व याला विशेष महत्व आहे. भारतामध्ये भांडवलबाजार अविकसित असल्यामुळे परकीय भांडवलाचा विविध प्रकारे ओघ वाढत आहे.

९.२ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

दुसऱ्या महायुध्दानंतर सुवर्णचलन पध्दती संपुष्टात येवून कागदी चलनपध्दती अस्तित्वात आल्यामुळे भिन्न देशातील चलनाचा विनिमय दर ठरविणे आणि तो स्थिर ठेवण्यासाठी स्वतंत्र अशा संस्थेची स्थापना करणे आवश्यक वाटू लागले. जुलै, १९४४ मध्ये अमेरिकेतील 'ब्रेटनवूड' येथे भरलेल्या जागतिक अर्थतज्ञ आणि मुत्सद्दी यांच्या परिषदेत झालेल्या चर्चेतून आंतरराष्ट्रीय पातळीवर दोन वित्तीय संस्थाची स्थापना करण्यात आली त्यापैकी :

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetory Fund)
२. आंतरराष्ट्रीय पूनर्रचना व विकास बँक/जागतिक बँक (International Bank for Reconstruction & Development - IBRD).

या दोन संस्था आहेत. या दोन्ही संस्था संयुक्त राष्ट्रसंघाच्या दुय्यम संस्था म्हणून कार्य करित आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना १९४६ मध्ये करण्यात आली असून तिच्या प्रत्यक्ष कार्यवाहीस १९४७ मध्ये सुरुवात झाली आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ही आंतरराष्ट्रीय चलनविषयक संस्था असून जागतिक व्यापाराचा विस्तार आणि संतुलित वृध्दी घडवून आणण्याच्या दृष्टीने स्थापन केलेली वित्तीय संस्था आहे. १९९६ मध्ये १८१ सभासद आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये सहभागी होते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्ट्ये (Objectives of IMF):

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या स्थापनेची मूलभूत उद्दिष्ट्ये म्हणजे चलनाचे स्पर्धात्मक अवमूल्यन टाळणे आणि विनिमय नियंत्रण करणे, व्यवहारतोलातील तुट कमी करणे तसेच देशांतर्गत उत्पन्न आणि रोजगारपातळीत वाढ करणे ही होती. नाणेनिधीच्या स्थापनेची पुढील तीन महत्वाची उद्दिष्ट्ये सांगितली जातात.

१. प्रचलित विनिमय नियंत्रणे कमी करणे.

२. विनिमय दर स्थिर राखण्यासाठी प्रयत्न करणे.

३. बहुपक्षीय व्यापारात वाढ करणे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या तिसऱ्या कलमामध्ये पुढील काही उद्दिष्टांचा समावेश आहे.

४. सभासद देशामंध्ये चलनविषयक सहकार्य वाढीस लावणे आणि चलनविषयक समस्या सोडविण्यसाठी परस्पर सहकार्य निर्माण करणे.

५. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे.

६. विनिमय दरात स्थैर्य प्रस्थापित करणे.

७. सभासद देशांचा व्यवहारतोल सुधारण्यासाठी सहकार्य करणे.

९. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार घडवून आणण्यासाठी व्यापारावरील संस्थात्मक नियंत्रणे (आयात जकाती, परवाना, कोटा इत्यादी) कमी करणे.

९. व्यापारावरील निर्बंध कमी करुन सभासद देशांच्या आर्थिक विकासाला हातभार लावणे.

१०. सभासद देशात चलनप्रणाली विकसित करुन देशाच्या व्यापारात वाढ घडवून आणणे.

१. आंतरराष्ट्रीय चलन विषयक सहकार्य:

विविध देशांमध्ये चलनविषयक सहकार्य प्रस्थापित करणे हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे महत्वाचे कार्य आहे. जगातील देशात चलनविषयक सहकार्याचा अभाव असल्यामुळे दुसरे महायुध्द घडून आले. भविष्यात युध्द टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय चलनविषयक सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने नाणेनिधीची प्रमुख भूमिका आहे. तसेच सभासद राष्ट्रांमधील व्यवहारतोलातील समतोल राखण्यासाठी (व्यवहारतोलातील तुट भरुन काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अल्पकालीन कर्जपुरवठा करते. कर्जपुरवठ्याचे प्रमाण देशाच्या स्वदेशी चलनाच्या साठ्यावर अवलंबून असते.

२. विनिमय दर स्थिर राखणे :

विनिमयात स्थैर्य हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे प्रमुख उद्दिष्ट्य होते. १९७१ पासून नाणेनिधीने स्थिर विनिमयदराऐवजी लवचिक विनिमय दर धोरणाचा स्विकार केल्यामुळे प्रत्येक देशाने आपल्या चलनाचे मूल्य सुवर्ण किंवा अमेरिकन डॉलरमध्ये ठरविले पाहिजे. आणि ते स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

३. तांत्रिक व आर्थिक मार्गदर्शन :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आपल्या सदस्य देशांना तांत्रिक व आर्थिक सल्ला देण्याचे कार्य करते. असा सल्ला विशेषतः चलनविषयक व वित्तीय धोरण ठरविण्याच्या दृष्टीने महत्वाचा असतो. ज्या देशांना व्यवहारतोल तुटीची समस्या असते, अशा देशांना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे तांत्रिक व आर्थिक मार्गदर्शन उपयोगी ठरते.

४. विदेशी चलनाचा साठा सांभाळणे :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे सदस्य राष्ट्रांकडून कोटा मध्यवर्ती बँक व सरकारकडून घेतलेला हप्ता कर्जाच्या स्वरुपात विदेशी चलन जमा होत असते. अशा विदेशी चलनाचा सांभाळ करणे आणि त्या चलनाची सभासद राष्ट्रांमध्ये खरेदी-विक्री करणे हे नाणेनिधीचे महत्वाचे कार्य मानले जाते.

५. व्यवहार तोलातील असमोल कमी करणे :

सभासद देशांच्या व्यवहारतोलात तूट असल्यास ती तूट भरुन काढण्यासाठी नाणेनिधी त्या देशांना विदेशी चलनाच्या स्वरुपात कर्ज देते. (तात्पुरता व्यवहारतोल असमतोल असेल तर) मात्र चलनाच्या अवमूल्यन धोरणामुळे व्यवहातोल असमतोल असेल तर नाणेनिधीकडून आर्थिक मदत केली जात नाही.

६. विनिमय नियंत्रणे दूर करणे :

दुसऱ्या महायुध्दापूर्वी जवळपास प्रत्येक देशाने आपला विनिमय दर विशिष्ट पातळीत राखण्यासाठी विनिमय नियंत्रणाचा अवलंब केला होता. त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर प्रतिकूल परिणाम आलेला होता. त्यामुळे अशी विनिमय नियंत्रणे दूर करणे हे नाणेनिधीचे महत्वाचे कार्य मानले जाते.

वरिल महत्वाच्या कार्याव्यतीरिक्त आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आंतरराष्ट्रीय व्यापारास प्रोत्साहन, खुल्या अर्थव्यवस्थेला चालना बहुपक्षीय व्यापार व्यवस्था स्थापन करणे इत्यादी महत्वाची कार्येही पार पाडीत असते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे यशापयश :[Achivements and Limitations of IMF]

अ) IMF चे यश:

१.विनिमय दरात स्थैर्य :

विनिमय दरात स्थैर्य हे नाणे निधीचे मूलभूत उद्दिष्ट होते. विनिमयदरातील स्पर्धात्मक घसरण थांबविण्यासाठी सभासद देशांवर चलनविषयक बंधने टाकल्यामुळे नाणेनिधीला काही प्रमाणात यश मिळाले आहे. तथापि, व्यवहारतोलातील मुलभूत असमतोल दूर करण्यासाठी विनिमय दरात बदल करण्यास नाणेनिधीने परवानगी दिलेली आहे.

२. व्यवहारतोलातील असंतुलनात सुधारणा :

नाणेनिधी स्थापनेपूर्वी व्यवहारतोलात समतोल राखण्यासाठी व्यापारावरील संस्थात्मक निर्बंध व विनिमय नियंत्रण साधनांचा वापर करण्यात येत असे. मात्र नाणेनिधीच्या स्थापनेनंतर नाणेनिधी व्यवहारतोलातील असमतोल दूर करण्यासाठी अल्पकालीन कर्जाची सुविधा निर्यात केली आहे. साहजीकच त्यामुळे नाणेनिधीला सभासद देशातील व्यवहारतोलातील असमतोल दूर करण्यात यश मिळाले आहे.

३. व्यापाराचा विस्तार :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार घडवून आणण्यात महत्वाची भूमिका पार पाडली आहे. अल्पकालीन कर्जसुविधा, व्यवहारतोलातील तूट दूर करण्यास मदत विदेशी चलनाचा पुरवठा इत्यादीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार होण्यास मदत झाली आहे.

४. तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ही तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन करणारी संस्था म्हणून कार्य करते. सभासद देशांचे वित्तीय धोरण व त्यांचा व्यवहारतोलावर होणारा परिणाम याविषयी नाणेनिधी मार्गदर्शन करते.

५. बहुविध विनिमय दर :

अलिकडच्या काळात नाणेनिधीने बहुविध विनिमय दर पध्दतीत सुलभता आणण्यास बरेच यश प्राप्त केले आहे त्यामुळे सभासद देशांना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून वित्तीय मदत झालेली आहे.

६. आंतरराष्ट्रीय रोखता :

१९६७ पर्यंत अनेक सदस्य देशांपुढे रोखतेची समस्या निर्माण झाली होती. ही रोखतेची समस्या सोडविण्यासाठी नाणेनिधीने विशेष आहरण (उचल) अधिकार (Special Drawing Rights - SDR) ही एक नविन व्यवस्था निर्माण केली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडवण्यास बऱ्याच प्रमाणात मदत झाली आहे.

७. आर्थिक विकासाला मदत :

नाणेनिधीच्या तज्ञ अधिकाऱ्यांमार्फत सभासद देशांना तांत्रिक व आर्थिक मार्गदर्शन करणे, देशाच्या व्यवहारतोलनीक असमतोल दूर करण्यासाठी अल्पकालीन कर्जसुविधा देणे, चलन व्यवस्थेत स्थैर्य प्राप्त करण्यास सहकार्य करणे इत्यादी अशा महत्वाच्या भूमिकांचा/कार्यांचा अनुकूल परिणाम सभासद देशांच्या आर्थिक विकासावर झालेला दिसून येत आहे.

ब) IMF चे अपयश :

आंतरराष्ट्रीय पातळीवर चलनविषयक संस्था म्हणून नाणेनिधीने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. रोखतेची समस्या सोडविण्यासाठी विशेष उचल अधिकार (SDR) ही नविन व्यवस्था निर्माण केली आहे. नाणेनिधीने उल्लेखनीय कामगिरी केली असली तरी नाणेनिधीच्या कार्यात अनेक दोष/उणिवा किंवा मर्यादा दिसून येतात. नाणेनिधीचे अपयश किंवा उणिवा पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. मर्यादीत क्षेत्र :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी सभासद देशांना व्यवहारतोलातील तात्पुरता असमतोल दूर करण्यासाठी अल्पकालीन कर्जाची सुविधा उपलब्ध करुन देते. मात्र जुने कर्ज, युध्दखर्च अशा इतर समस्या नाणेनिधीकडून सोडविण्यात सहकार्य मिळत नाही.

२. अधिक व्याजदर :

नाणेनिधीकडून सभासद देशांना जो कर्जपुरवठा केला जातो त्यावर व्याजदर अधिक असल्यामुळे अविकसित व विकासनशील राष्ट्रांचे नुकसान होते.

३. अमेरिकेचा वाढता प्रभाव:

अमेरिका, इंग्लंड, प. जर्मनी, फ्रान्स व जपान या विकसित देशांचा नाणेनिधींवर अधिक प्रभाव दिसून येतो. मात्र विकसनशील किंवा मागास देशांना नाणेनिधीकडून पुरेसा फायदा होत नाही.

४. कोटा ठरविण्याची सदोषपध्दती :

नाणेनिधीच्या सभासद देशांचा कोटा ठरविण्याच्या पध्दतीस कोणताही शास्त्रीय आधार नाही. कोटा ठरविताना देशाचा सुवर्णसाठा, डॉलरचा साठा व व्यापाराची स्थिती या गोष्टींना महत्व देण्यात आले. साहजीकच त्यामुळे अमेरिका, फ्रान्स, जर्मनी व जपानसारख्या विकसित देशांचे कोटा पध्दतीत वर्चस्व राहिले.

५. विनिमय नियंत्रणे कमी करण्यात अपयश :

आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणण्यासाठी नाणेनिधीने आयात-निर्यात, जकात, निर्यात प्रोत्साहन, परवानापध्दती (विनिमय नियंत्रण साधने) नष्ट करण्यावर भर दिला होता, परंतु नाणेनिधीला त्यामध्ये फारसे यश प्राप्त झाले नाही.

६. दुय्यम भूमिका :

जगातील दहा (१०) उद्योगप्रधान देशाच्या मध्यवर्तीबँकेने (Central Bank) दीर्घकालीन कर्जपुरवठा करण्याचे धोरण स्विकारले असल्यामुळे आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेत मध्यवर्ती बँकांची प्रमुख भूमिका तर नाणेनिधी अल्पकालीन कर्जाचा पतपुरवठा करत असल्यामुळे नाणेनिधीला दुय्यम भूमिका स्विकारावी लागत आहे. या नविन धोरणामुळेच जागतिक अर्थव्यवस्थेत डॉलरचे महत्व घटत आहे तर युरोडॉलरचे महत्व वाढत आहे.

७. आर्थिक विकासास हातभार :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे एक प्रमुख अपयश म्हणजे नाणेनिधीला चलनपध्दतीत स्थैर्य प्रस्थापित करण्यात आलेले अपयश होय.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्यपध्दतीत वरील उणिवा (अपयश) असल्या तरीही नाणेनिधीमुळे चलनविषयक सहकार्य निर्माण होण्यास मदत झाली आहे.

आपली प्रगती तपासा

प्र. १ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची उद्दिष्ट्ये व कार्ये अभ्यासा.

प्र. २ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे यशापयश थोडक्यात सांगा.

९.३ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि आंतरराष्ट्रीय रोखता [IMF and International Liquidity]

आंतरराष्ट्रीय रोखतेची संकल्पना आंतरराष्ट्रीय व्यवहारातून निर्माण होणाऱ्या देण्या-घेण्याच्या व्यवहाराशी संबंधित आहे. आंतरराष्ट्रीय हिशोबातील देणी किंवा कर्जे फेडण्यासाठी जी मालमत्ता आंतरराष्ट्रीयदृष्ट्या मान्य केली जाते अशा सर्व मालमत्तांचा समावेश आंतरराष्ट्रीय रोखतेत होतो. अशा मालमत्तेत सोने, आंतरराष्ट्रीय पातलीवर मुक्तपणे वापरता येण्यासारखी डॉलर, स्टर्लींग, येन, बार्क यासारखी मजबूत चलने व जी चलने कर्जाऊ देण्या-घेण्याच्या सवलती या सर्वांचा समावेश होतो.

आंतरराष्ट्रीय रोखता म्हणजे काय ?

'' आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी सर्वसाधारणपणे मान्य केले जाणारे अधिकृत साधन म्हणजे आंतरराष्ट्रीय रोखता होय.''

आंतरराष्ट्रीय राखीव व आंतरराष्ट्रीय रोखता ह्या संज्ञा समानार्थी नसून आंतरराष्ट्रीय रोखता हे आंतरराष्ट्रीय राखीवांचे वैशिष्ट्य आहे.''

आंतरराष्ट्रीय राखीव म्हणजे विभिन्न राष्ट्रातील प्रमुख चलनाचा साठा होय. विदेशी चलनालाच विदेशी विनिमय असे म्हणतात. किथ हार्स फिल्ड यांच्या मते '' आंतरराष्ट्रीय रोखतेचा अर्थ सुवर्ण, स्टर्लींग, पौंड इत्यादी विदेशी चलनाच्या देणी फेडण्यासाठी योग्य उपयोग कसा केला जावू शकतो.''

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) आंतरराष्ट्रीय रोखतेची केलेली व्याख्या ''शोधनशेषातील तुट भरुन काढण्याकरीता देशांच्या मौद्रिक सत्तेपाशी उपलब्ध असलेल्या सांधनसंपत्तीचा आंतरराष्ट्रीय रोखतेत समावेश होतो.

* आंतरराष्ट्रीय रोखतेची आवश्यकता (Need for International Liquidity):

आंतरराष्ट्रीय रोखतेची गरज पुढील कारणांसाठी भासू शकते.

१. विदेशी व्यापाराचा विस्तार :

गेल्या काही वर्षापासून विकसनशील देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होताना दिसून येत आहे. परंतु त्या मानाने आंतरराष्ट्रीय रोखतेच्या प्रमाणात वाढ झालेली नाही म्हणून रोखतेच्या पुरवठ्यात वाढ करणे आवश्यक आहे.

२. अमेरिकन डॉलरचे महत्व कमी झाले म्हणून :

युरोडॉलरचे वाढते वर्चस्व व अमेरिकन डॉलरचे घटते महत्व व सहाय्यता लक्षात घेता रोखतेच्या इतर साधनांचे महत्व वाढल्याचे दिसून येते.

३. आर्थिक विकासाच्या नवीन योजना :

गेल्या काही वर्षात आशिया, आफ्रिका दक्षिण अमेरिका इत्यादी विकासनशील देशांना आपल्या आर्थिक विकासाकरीता विकसित व संपन्न देशांच्या चलनाची जास्त प्रमाणात गरज भासू लागली त्यामुळे आंतरराष्ट्रीय रोखतेची मागणी वाढली.

वरील मुद्दे लक्षात घेता सर्वसाधारणतः असे म्हणता येईल की, ''नियंत्रणात्मक धोरणांचा अवलंब न करता, देशाच्या व्यवहारतोलातील तुट भरुण काढण्यासाठी आवश्यक असणारी रोखता राष्ट्राच्यादृष्टीने पुरेशी बाह्य रोखता होय.'' आणि बाह्य रोखतेकरीता सर्व देशांकडून येणारी परिणामकारक मागणी पूर्ण करता येईल. इतकी बाह्य रोखता असेल तर त्याला पुरेशी आंतरराष्ट्रीय रोखता मानता येईल.

सध्या जगातील बहुतांश राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या भेडसावत आहे.

आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या :

आंतरराष्ट्रीय रोखतेच्या समस्येकडे प्रथम सर रॉबट ट्रीफीन यांनी प्रथम लक्ष वेधून घेतले. दुसऱ्या महायुध्दानंतर या समस्येची सुरुवात झाली आंतरराष्ट्रीय रोखतेच्या समस्यकडे संख्यात्मक व गुणात्मक दोन्ही दृष्टीकोनातून पहावे लागेल. संख्यात्मक दृष्टिकोन हा आंतरराष्ट्रीय रोखतेच्या टंचाईशी संबंधित आहे. तर गुणात्मक दृष्टीकोनाशी संबंधित दुसरी बाजू मजबूत चलनांचा राखीव निधी म्हणून वापर करण्याची संबंधित आहे. आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या निर्माण होण्याची कारणे सर्वसाधारणतः पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. आंतरराष्ट्रीय रोखतेची अपर्याप्तता.
२. जगातील सुवर्णउत्पादन व जागतिक मुद्राकोष यामध्ये होणारी अत्यल्प वृध्दी.
३. विकसनशील देशांच्या सतत वाढत जाणाऱ्या गरजा.
४. डॉलर व पौंडस्टर्लिंग संकट.
५. तेलसंकट (कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती)
६. सुवर्णाचा अधिकांश हिस्सा.
७. विकसित राष्ट्रांचा कठोर निर्णय.

आंतरराष्ट्रीय रोखतेच्या समस्येची वरील कारणे लक्षात घेता आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) विशेष उचल अधिकार (Special Drawing Right - SDR) ही एक नविन व्यवस्था निर्माण केली तरीसुध्दा आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सुटू

शकली नाही. भविष्यकाळात ही समस्या अधिक तीव्र व गंभीर होईल असे मत व्यक्त करण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि आंतरराष्ट्रीय रोखत :

आंतरराष्ट्रीय नाणेनीधी ही सभासद देशांना आंतरराष्ट्रीय तरलता प्राप्त करुन देणारी एक महत्वाची संस्था आहे. आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने विशेष उचल अधिकार (SDR) ही नवीन व्यवस्था सुरु केली १९९९च्या वर्षाअखेरपर्यंत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने वित्तीय साधनांची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. ही आंतरराष्ट्रीय तरलता स्थिती पुढीलप्रमाणे दाखवलेली आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी - वित्तिय साधने आणि तरलता / रोखता स्थिती (अमेरिकन कोटी डॉलरमध्ये US $)

	(२००७)
एकुण साधने	२२४.६
सहभागी चलने	२०९.६
विशेष उचल अधिकार (SDR)	२.६
सोने (सुवर्ण)	५.९
इतर मालमत्ता	६.६
घट/कमी : न वापलेली साधने	५९.३
(त्यांची जी जमा)	६.०

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे एक महत्वाचे उद्दिष्ट्य म्हणजे वित्तीय मात्रांची सुविधा उपलब्ध करुन देऊन सभासद देशांच्या व्यवहारतोलातील तुट भरुण काढण्यासाठी सहकार्य करणे. तसेच विदेशी चलनाचा तुटवडा कमी करण्यासाठी विशेष उचल अधिकार / SDR यासारख्या वित्तीय साधनांची उपलब्धता करुन देणे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आंतरराष्ट्रीय रोखतेचा प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या सुविधा/प्रयत्न (Role of IMF with regards to the provision of International Liquidity):

अ) सामान्य सुविधा : आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडविण्यासाठी आंतरराष्टीय नाणेनिधी तिच्या स्थापनेपासून प्रयत्नशील आहे. या संदर्भात निधीने केलेल्या पुढील उपाय योजनांचा उल्लेख करता येईल.

१. सुवर्णधिष्ठित मदतीसंबंधीचे धोरण : (Golden Tranche)

सभासदराष्ट्राने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी जवळ जितके सोने ठेवले असेल त्या मर्यादेपर्यंत सभासद राष्ट्रनिधी कडून केव्हाही मदत घेऊ शेकतो. ही तरतूद १९५२ पासून करण्यात आलेली ही मदत विनाअट दिली जाते.

२. अटींसह दिलेली मदत :

सुवर्णाधिष्ठित मदतीपेक्षा अधिक सहाय्याची आवश्यकता असेल तर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून काही अटींवर कर्ज (मदत) उपलब्ध करुन दिले जाते.

३. कर्ज घेण्यासंबंधी सामान्य व्यवस्था : (The general Arrangement to Barrow) [GAB]

१९६४ पासून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने कर्ज घेण्यासंबंधी सामान्य व्यवस्था अवलंबण्यास सुरुवात केली आहे. या अंतर्गत अकरा श्रीमंत राष्ट्रांच्या गटाकडून कर्जाऊ घेऊन, गरजू सभासद राष्ट्रांना सहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. या योजनेचा आणखी विस्तार होवून १९८३ पर्यंत जी.ए.बी (GAB Fund) निधी ६ बिलीयन डॉलर्सपासून १९ बिलीयन डॉलर्सपर्यंत (SDR) वाढवला आहे. अविकसित देशानांही या योजनेतंर्गत सहाय्य उपलब्ध करुन दिलेले आहे.

४. कर्ज घेण्यासंबंधी नवीन व्यवस्था (New Arrangment to Barrow-NAB):

या योजनेतंर्गत २५ श्रीमंत राष्ट्रांच्या गटाकडून आणि वित्तीय संस्थाकडून ३४ बिलीयन डॉलर्सपर्यंत/SDR) आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. नवीन कर्जदेण्यासंबंधी नविन व्यवस्था १९९५ स्थापन झाली असली तरी नोव्हेंबर १९९८ पासून ही योजना प्रभावीपणे अवलंबण्यास सुरुवात झाली.

५. विशेष तेल मदत निधी : (Special Fund for Oil Help):

विभिन्न काळात उद्‌भवलेल्या तात्कालीन प्रसंगातून मार्ग काढण्यासाठी जी योजना निधीने आखल्या त्यामध्ये या योजनेचा समावेश करता येतील. १९७४-७५ मध्ये तेलाच्या किंमती वाढल्या याचा गंभीर परिणाम सभासद राष्ट्रांच्या व्यवहारतोलावर झाला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून ही समस्या सोडविण्यासाठी १९७४ मध्ये तेल आयत करणाऱ्या देशांना सवलतीच्या व्याजदराने अर्थसहाय्य दिले जाते. १९७६ मध्ये मात्र ही योजना बंद करण्यात आली.

६. तरतूद व्यवस्था : (Stand-by-Arrangment):

१९५२ पासून तरतूद व्यवस्थेचे धोरण अवलंबविले जात आहे. यानुसार आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून एखाद्या सभासद राष्ट्राला मदत मंजूर झाल्यानंतर त्या विशिष्ट काळात ती मदत पुन्हा अर्ज न करता केव्हाही घेता येते.

७. विशेष उचल अधिकार (Special Drawing Right-SDR):

आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडुन कार्यान्वित केलेली अत्यंत महत्वाची योजना म्हणजे विशेष आक / आहरण अधिकार (SDR) होय. विशेष उचल अधिकार हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने काढलेले काल्पनिक चलन आहे. विशेष उचल अधिकार याची निर्मिती सोन्याला पर्याय मानून केलेली असल्यामुळे याला कागदी सोने असेही म्हटले जाते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडविण्यासाठी सभासद देशांना निधीचे विविध मार्ग (Sources of Funds) उपलब्ध करुन दिले आहे. विविध योजनेतंर्गत कर्जे, विशेष सवलती योजना, वाढीव मदत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पुरविल्या आहेत.

विशेष सुविधा (Special Facilities):

सवलत खाते : (Subsidy Account)

वाढत्या तेलाच्या किंमतीमुळे अनेक राष्ट्रांना परकीय सहाय्य घ्यावे लागले. त्यामुळे कर्जावरील व्याज वाढले. कर्जावरील व्याजाचा भार कमी करण्यासाठी IMF ने एक स्वतंत्र तेल आर्थिक मदत निधी निर्माण केला. संकटग्रस्त देशांना या मदतनिधीचा विशेष फायदा झाला.

निर्यात मिळकतीत चढउतार होणाऱ्या देशांना भरपाई वित्त : (Compensatory Financing Facility)

सभासद राष्ट्रांच्या निर्यात उत्पन्नाचे वारंवार होणाऱ्या बदलांचे प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी सभासद राष्ट्रांना सर्वसामान्य पध्दतीनुसार मिळणाऱ्या सहाय्यापेक्षा आणखी अधिक सहाय्य निधीकडून दिले जाते.

वाढीव जादा सवलत : (Supplemental Resource Facility - SRF) :

१९८१ मध्ये तीन वर्षापुरती ही तात्कालीक सवलत योजना कार्यान्वीत केली गेली. गरीब राष्ट्रांकडून केल्या गेलेल्या मागणीमुळे ही योजना पुढे चालू ठेवली गेली.

विश्वस्त निधी :

अविकसीत देशांना सवलतीच्या व्याज दरात विशेष व्यवहारतोल भरत उपलब्ध करुन देण्यासाठी विश्वस्त निधी १९७६ मध्ये उभारण्यात आला. मात्र १९८१ मध्ये हा विश्वस्त निधी बंद करण्यात आला.

सारांश, आंतरराष्ट्रीय रोखतेचा पुरवठा करण्यासाठी सामान्य विशेष व सवलतीच्या आणि भरपाई अशा अनेक योजना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कार्यान्वित केलेल्या दिसतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय रोखेचे एकुण प्रमाण वाढण्यास मदत झाली म्हणून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडवण्यात एक महत्वाची भूमिका आहे असे म्हणावे लागेल.

विशेष उचल अधिकार (Special Drawing Right-SDRs):

१९६७ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जागतिक बँकेच्या मेळाव्यात आंतरराष्ट्रीय चलन स्थापित करण्याची योजना पुरस्कृत केली आणि विशेष उचल अधिकार (Special Drawing Right-SDR) या नावाने कागदी चलन काढण्याचा निर्णय अमलात आणला. एस्. डी. आर. हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने काढलेले काल्पनिक चलन आहे. याची निर्मिती सोन्याला पर्याय म्हणून केलेली असल्यामुळे याला **कागदी सोने** (Paper Gold) असेही म्हणतात.

विशेष उचल अधिकार ही संकल्पना पुढील कारणांसाठी निर्माण झाली.

१. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढत आहे. अशावेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य केली जाईल अशा विनीमय माध्यम म्हणून वापरल्या जाणाऱ्या साधनांची टंचाई जाणवू लागली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय रोखता वाढण्याच्या दृष्टीने प्रयत्न आवश्यक होते.

२. आंतरराष्ट्रीय राखीव म्हणून डॉलर व पौंड स्टर्लिंग या चलनावर पडणारा ताण कमी करण्याचा उद्देश साध्य करणे.

विशेष उचल अधिकाराची कल्पना केन्सच्या आंतरराष्ट्रीय निरसन केंद्र (International Clearing Union) व बँकर या आंतरराष्ट्रीय चलन एककाच्या योजनेतून साकार झाली या योजनेतंर्गत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने विशेष उचलखाते सुरु करुन त्यानुसार एस्. डी. आर. निर्माण करण्यात आले आहे.

एस्. डी. आर. च्या एका एककाचे मूल्य (Value of 1 unit of SDR 0.88671 gram of pure gold) ०.८८६७१ शुद्ध सुवर्णाइतके होते. आंतरराष्ट्रीय व्यवहारात मोठा हिस्सा असणाऱ्या काही देशांच्या चलनाच्या मूल्यांचा भारांकित निर्देशांक काढून SDR च्या एककाचे मूल्य ठरविण्यात येते.

आंतरराष्ट्रीय रोखतेत समाविष्ट होणाऱ्या संपत्तीला पूरक म्हणून विशेष आहरण अधिकार (SDR) निर्माण करण्यात आला असल्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्य विस्तृत झाले आहे.

SDR ची वैशिष्ट्ये : [Features of SDR]

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने SDR निर्माण केले आहे.

२. एका देशापुरते मर्यादित नसते. (Claim)

३. सहभागी देश SDR साठी दावा करु शकतात.

४. एस.डी.आर. चा उपयोग विविध हेतूसांठी करता येतो. (उदा. व्यवहारतोल सुधारणे, परकीय चलन खरीदणे इत्यादी)

५. एस.डी.आर. चे मूल्य डॉलरमध्ये ($) दिले जाते.

६. एस.डी.आर. साठी तारणाची आवश्यकता नसते.

७. परकीय चलन साठ्याचा एक भाग म्हणून SDR चा समावेश होतो.

<u>SDR चे मूल्य</u> :

SDR चे मूल्य काढण्याकरीता निर्देशांक पध्दती वापरली जाते.

SDR= US $ = 46, Euro € = 30
Japanese Yen ¥ = 13, Pound
Starling = 11 म्हणजेच

$$\boxed{46 + 30 + 13 + 11 = 100}$$

SDR चे प्रकार :

SDR च्या माध्यमातून देशांना कर्ज घेता येते, कर्जे ट्रान्ची पध्दतीनुसार (Tranchi System - Tranchi Rs. a <u>French</u> word) दिले जाते. SDR मध्ये दोन प्रकारचा समावेश करता येतो.

१९७४ पासून एका SDR चे मूल्य जगातील १६ प्रमुख राष्ट्रांच्या चलन टोपलीच्या (Basket of Currencies) मूल्याएवढे असते. आंतरराष्ट्रीय देणी मिटविण्यासाठी SDR वापरले जाणार असल्याने ते आंतरराष्ट्रीय रोखता म्हणून मान्य केले जातात.

एस.डी.आर. ची यंत्रणा अगदी साधी आहे. ज्या देशाला व्यवहारतोलात तुट येते असा देश SDR चा वापर करतो. SDR च्या योजनेत सुलभता, परिवर्तनीयता व लवचिकता आढळते. SDR मुळे आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था कोणत्याही प्रकारे विस्कळीत न करता आंतरराष्ट्रीय रोखतेत कायम व निव्वळ वाढ झाली आहे.

SDR वरील टिका :

SDR चे वाटप निधीच्या वर्गणीच्या प्रमाणात केल्याने SDR चा मोठा हिस्सा मूळातच भरपूर रोखना असणाऱ्या श्रीमंत राष्ट्रांना मिळाला आहे. त्यामुळे न्याय व समानतेच्या कसोटीला ही योजना उतरत नाही. गरीब व विकासनशील राष्ट्रांना त्यांच्या विकासासाठी SDR चे न्याय वाटप आवश्यक आहे.

आपली प्रगती तपासा

१. आंतरराष्ट्रीय रोखतेची संकल्पना अभ्यासा.

२ . आंतरराष्ट्रीय रोखतेचे विविध मार्ग कोणते ?

३ . विशेष उचल अधिकार (SDR) म्हणजे काय ?

९.५ आंतरराष्ट्रीय भांडवली हाचलचाली (International Capital Movement)

अविकसित व विकसनशील देशात बचतीचा दर कमी असल्यामुळे भांडवल निर्मिती कमी असते. त्यामुळे औद्योगिकीकरण घडून येण्यात अनेक अडचणी येतात त्यांचा विपरीत परिणाम अपेक्षित विकास दरावर होतो. अशा विषम परिस्थितीत देशाबाहेरुन आलेल्या भांडवलाचे स्वागत करणे हा मार्ग असू शकतो. म्हणून देशाबाहेरुन आलेल्या भांडवलाला परकिय भांडवल किंवा विदेशी गुंतवणूक असे म्हणतात.

परकीय भांडवलाचे स्त्रोत / मार्ग / स्वरुप / प्रकार :

साधारणतः विदेशी/परकीय भांडवलाचे स्वरुप किंवा विविध प्रकार पुढीलप्रमाणे सांगितले जातात.

१. परदेशी मदत :

परकीय भांडवलाचा सवलतीने मिळणारा अंश म्हणजे परकीय सहाय्य होय. हे कर्ज अथवा अनुदाने या स्वरुपात मिळते अनुदाने ही देणगीच्या स्वरुपात मिळतात. कर्जे सवलतीच्या दरात असतात. तसेच ती दीर्घमुदतीची असतात. हे सहाय्य विशेषतः प्रगत देशांची सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मिळते.

२. बाह्य व्यापारी कर्जे :

आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारातून बाजार निर्धारित व्याजदराने ही कर्जे घेतली जातात. ही कर्जे अल्पकालीन व महाग असल्यामुळे त्यासाठी सरकारची मान्यता आवश्यक असते.

३. अप्रवासी भारतीयांच्या ठेवी :

अप्रवासी भारतीयांकडून आलेल्या ठेवींमधून भारतातील आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या व्यवहारतोलातील असमतोल दूर करण्यासाठी महत्वपूर्ण मदत झालेली आहे. १९८९-९० मध्ये अप्रवासी भारतीयांच्या ठेवी १.३ दशलक्ष इतक्याच होत्या. त्या १९९० मध्ये २५० दशलक्ष इतक्या वाढल्या. आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय अर्थव्यवस्थेच्या उत्कृष्ट कामगीरीमुळे हा बदल झालेला दिसून येत आहे.

४. संस्थात्मक परकीय गुंतवणूकदार :

एका देशात नोंदणी झालेल्या संस्थेने दुसऱ्या देशाच्या वित्तीय बाजारपेठेत केलेल्या गुंतवणूकीस विदेशी संस्थात्मक गुंतवणूक असे म्हणतात. व्यापारी बँका, गुंतवणूक बँका, सहयोगनिधी, पेन्शन निधी, विमा कंपन्या अशा संस्था विदेशात गुंतवणूक करतात. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदाराची आर्थिक स्थिती खूपच मजबूत असते. आणि गुंतूवणूक क्षमता लक्षणीय असल्यामुळे वित्तीय बाजारपेठेमध्ये त्या गुंतवणूकीचा मोठा परीणाम होतो. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकीचा कोणताही कारखाना चालविण्याशी, तंत्रज्ञान आणण्याशी, रोजगाराशी, उत्पादनाशी, वितरणाशी संबंध नसतो.

५. रोखरुपी गुंतवणूक (Portfolio Investment):

यानुसार परकीय गुंतवणूकदारांकडून भारतीय शेअरबाजारात व काही प्रकल्पांमध्ये भाग भांडवलस्वरुपात अल्पकालासाठी परदेशी गुंतूवणूक केली जाते. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतात परकीय गुंतवणूक वाढली परंतु १९९६-९७ नंतर आशिया खंडातील संकट, वित्तीय संकट यामुळे त्यामध्ये अनेक चढउतार आहे.

६. युरो इश्यु :

भारतीय कंपन्याद्वारे तसेच परकीय चलन, परीवर्तनीय रोखे याद्वारे परदेशातून अमेरिकन डॉलरमध्ये (US - $) भांडवल उभारण्यासाठी परवानगी देण्यात आली. तसेच भारतीय कंपन्यांचे समभाग, जी.डी.आर. (GDR) यांची न्युर्याक व इतर आंतरराष्ट्रीय शेअरबाजारात नोंद करण्यात आली.

७. थेट विदेशी गुंतवणूक (Foreign Direct Investment - FDI)

थेट विदेशी गुंतवणूक ही दोन प्रकारची असते. रोखरुपी गुंतवणूक व प्रत्यक्ष परदेशी गुंतवणूक. परदेशी कंपन्या व वित्तीय संस्था आपल्या देशातील कंपन्यांचे भाग-भांडवल व कर्जरोखे यामध्ये गुंतवणूक करतात. ती रोखरुपी गुंतवणूक होय. यावर व्याज द्यावे लागत नाहीतर नफ्यातील वाटा द्यावा लागतो.

प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक परदेशी कंपनीची शाखा किंवा उत्पादनात देशी व परकीय भांडवलाचा एकत्रित सहभाग म्हणजेच परदेशी एकत्रीकरण (foreign collaboration) या स्वरुपात असते. इतर भांडवलात बहुराष्ट्रीय कंपनीने (MNC's) संलग्न कंपनीला दिलेल्या अल्पकालीन व दीर्घकालीन निधीचा समावेश होतो.

९.६ रोखरुपी गुंतवणूकीचा आंतरराष्ट्रीय प्रवाह (International Flow of Portfolio Investment)

जेव्हा विदेशी गुंतवणूकदार व गुंतवणूक संस्था देशाच्या दुय्यम भांडवल बाजारात शेअर्स, डिबेंचर्स, कर्जरोखे इत्यादी रोख्यांची व्याज, लाभांश आणि सट्टेबाजारातील नफा मिळविण्याच्या हेतूने दुय्यम खरेदी करतात तेव्हा त्यास रोखारुपी गुंतवणूक किंवा परकीय अप्रत्यक्ष गुंतवणूक असे म्हणतात.

रोखारुपी गुंतवणूकीतून रोख्यांच्या मालकी हक्कांचे व दाव्यांचे हस्तांतरण होते. ही गुंतवणूक सट्टेबाजीच्या हेतूने प्रेरित होवून केली जाते. हिचा हेतू कंपनीच्या व्यवस्थापनात सहभागी होणे, व्यवस्थापन ताब्यात घेणे, कंपनीची मालकी मिळविणे हा नसतो. ह्या गुंतवणूकीमुळे देशाच्या मालमत्तेत वाढ होत नाही. कारण यातून आहे त्याच रोख्यांची खरेदी केली जाते ही गुंतवणूक अल्पकालीन असते. ती देशातून केव्हांही बाहेर जावू शकते. रोखरुपी गुंतवणूकदारांचा सट्टेबाजीच्या हेतूबरोबरच स्वदेशी व विदेशी भांडवल बाजारातील जोखीम कमी करणे म्हणजेचे जोखमीचे विविधीकरण करणे हा हेतू असतो. या गुंतवणूकीसाठी कमीत कमी व्यवहारखर्च करावा लागत असल्यामुळे अशी गुंतवणूक गुंतवणूकदारांच्या दृष्टीने फायद्यांची असते.

रोखरुपी गुंतणूक एका देशात व्यक्ती आणि आर्थिक संस्था, इतर देशांचे समभाग आणि रोखे असतात. अशा रोख्यांना त्या देशाच्या सरकारची हमी असते. अलिकडच्या काळात अप्रत्यक्ष गुंतवणूकीची नवी पध्दत निर्माण झाली आहे.

भारतात एकूण आलेल्या विदेशी गुंतवणूकीचा तपशील पुढील तक्त्यामध्ये दर्शविलेला आहे.

तक्ता क्र. ९.१ एकूण विदेशी गुंतवणूक (Foreign Investment Inflows)

($ दशलक्षमध्ये)

वर्ष	थेट प्रत्यक्ष गुंतवणूक	रोखरुपी गुंतवणूक	एकुण विदेशी गुंतवणूक
१९९०-९१	९७	६	१०३
१९९५-९६	२१४४	२७४८	४८९२
२०००-०१	४०२९	२७६०	६७८९
२००५-०६	७७२२	१२४९२	२०२१४
२००६-०७	१९५३१	७००३	२६५३४

स्रोत - सेबी हॅन्डबूक - २००८

१९९० पर्यंत प्रत्यक्ष परकीय गुंतवणूकीचे महत्व कमी होते. मात्र १९९१ पासून सरकारच्या उदारीकरण धोरणामुळे या गुंतवणूकीचे महत्व वाढते. परकीय रोखारुपी गुंतवणूक GDR व ADR द्वारे येते. ही गुंतवणूक प्रामुख्याने संस्थात्मक आहे.

९.७ परकीय भांडवलाचे आर्थिक विकासातील महत्व / आवश्यकता (Importance (Role) of Foreign Capital in Economic Development)

१. नैसर्गिक साधनसामुग्रीचा उपयोग :

विविध विकसनशील देशांमध्ये खनिजे व इतर नैसर्गिक संपत्ती विपूल असते. परंतु आवश्यक तंत्रज्ञानाचा अभाव असल्यामुळे तिचा पर्याप्त वापर होत नाही. अशी नैसर्गिक संपत्ती क्रियाशील बनविण्यासाठी परकीय भांडवलाचे सहाय्य घ्यावे लागते.

२. तांत्रिक पोकळी भरुन काढणे :

निम्नस्तरीय संतुलन सापळ्यात (low level equilbrium trap) सापडलेल्या भारतासारख्या अनेक विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये अतिशय मागास असे तंत्रज्ञान वापरले जाते. यातून बाहेर पडण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आयात करावे लागते असे तंत्रज्ञान खाजगी परकीय गुंतवणूक या स्वरुपात येते.

३. गुंतवणूकीचा उच्च स्तर राखणे :

भारतात स्वदेशी भांडवलाची कमतरता असल्यामुळे, दारिद्रय व बचतीचा दर कमी असल्यामुळे देशी भांडवलाला पूरक भांडवल म्हणून परकीय भांडवल आवश्यक ठरते. देशी गुंतवणूक व आवश्यक गुंतवणूक यातील पोकळी भरुन काढण्यासाठी तसेच जलद औद्योगिकीकरण व आर्थिक विकासासाठी अशी गुंतवणूक महत्वाची आहे.

४. व्यवहारतोल सुधारण्यास :

भारतासारख्या विकसनशील देशांचा व्यवहारतोल (Balance of Payment) हा नेहमीच प्रतीकूल असतो. त्यामुळे परकीय चलनपोकळी निर्माण होते. निर्यात क्षेत्रास आवश्यक आयातीसाठी परकीय भांडवल हा अल्पकालीन उपाय ठरतो.

५. मुलभूत-पायाभूत सुविधांचा विकास :

संपर्कसाधने, वाहतूक, ऊर्जानिर्मिती व वितरण, जलसिंचन योजना यासारख्या पायाभूत आर्थिक सुविधांकरिता मोठ्या गुंतवणूकीची गरज असते. देशात तितके पुरेसे भांडवल उपलब्ध नसल्यामुळे जागतीक बँक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) यासारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांकडून परकीय भांडवल उभारावे लागते.

६. विकासाच्या इष्टमय आराखड्यास सहाय्यक :

परकीय गुंतवणूक नवीन उत्पादने आणते, नवीन गरजा निर्माण करते. त्याचप्रमाणे यजमान राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या विशिष्ट गरजा भागविण्यास सहाय्यकारी ठरते.

थोडक्यात परकीय भांडवलाचा प्रवाह संपूर्ण जगाच्या व यजमान राष्ट्राच्या कल्याणात भर घालतो. आंतरराष्ट्रीय व्यापारात विविध देशांना एकत्रित करतो. आर्थिक एकात्मीकरण, नवीन तंत्रज्ञान, आवडी-निवडी यांचे हस्तांतरण करण्यास सहाय्यभूत ठरतो याशिवाय एकात्मिक जागतीक अर्थव्यवस्थेकडे होणाऱ्या वाटचालीस प्रेरणा व चालना देतो. म्हणून आर्थिक विकासामध्ये परकीय भांडवल अनन्यसाधारण असे महत्व आहे.

आपली प्रगती तपासा

१. परकीय भांडवल ही संकल्पना अभ्यासा.
२. रोखारुपी गुंतुवणूक म्हणजे काय ?
३. परकीय भांडवलाचे विविध प्रकार व महत्व थोडक्यात अभ्यास.

९.८. सारांश

१. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार घडवून आणणे, विनिमय दरात स्थैर्यता राखणे आणि आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडविण्याच्या हेतूने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रत्यक्ष कार्यवाहीस १९४७ मध्ये सुरुवात झाली.

२. आंतरराष्ट्रीय रोखतेची संकल्पना आंतरराष्ट्रीय व्यवहारातील देण्या-घेण्याच्या व्यवहारातील संबंधातून निर्माण झाली आहे.

'' आंतरराष्ट्रीय रोखता म्हणजे विभिन्न राष्ट्रांतील प्रमुख चलनाचा साठा होय''.

''शोधनशेषातील तुट भरुन काढण्यासाठी देशाच्या मौद्रिक सत्तेपाशी उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा आंतरराष्ट्रीय रोखतेत समावेश होतो त्यास आंतरराष्ट्रीय रोखता असे म्हणतात.

३. १९६७ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जागतिक बँकेच्या मेळाव्यात आंतरराष्ट्रीय चलन स्थापित करण्याची योजना पुरस्कृत केली आणि विशेष उचल अधिकार (SDR) या नावाने कागदी चलन (Paper Currency) काढण्याचा निर्णय अमलात आणला.

४. आंतरराष्ट्रीय रोखतेत समाविष्ट होणाऱ्या राखीव संपत्तीत पुरक म्हणून एस.डी.आर. (SDR) निर्माण झाले आहे. SDR ची कल्पना लॉर्ड केन्स यांच्या आंतरराष्ट्रीय निरसन केंद्र व बँकार या आंतरराष्ट्रीय चलन एकाकाच्या योजनेतून साकार झाली.

५. आंतरराष्ट्रीय रोखता म्हणून SDR चा फायदा फक्त प्रगत राष्ट्रानांच मिळाला आहे.

६. अविकसित किंवा विकसनशील देशात भांडवल निर्मितीचा ओघ कमी असल्यामुळे आर्थिक विकास दर अपेक्षित नसतो. त्यामुळे अशा प्रतिकूल परिस्थितीत देशाबाहेरील भांडवलाचे स्वागत करणे अपरिहार्य ठरते. म्हणून देशाबाहेरुन आलेल्या भांडवल, परकीय भांडवल किंवा विदेशी गुंतवणूक असे म्हणतात.

७. परदेशी मदत, बाह्य व्यापारी कर्जे, अनिवासी भारतीयांच्या ठेवी युरो इश्यु, थेट विदेशी गुंतवणूक आणि रोखारुपी गुंतवणूक हे परकीय भांडवलाचे विविध स्त्रोत/मार्ग आहेत.

८. १९९०-९१ नंतर भारतात परकीय भांडवलाचा ओघ सातत्याने वाढलेला दिसून येतो.

९. थेट विदेशी गुंतवणूक किंवा परकीय भांडवलाचे तांत्रिक पोकळी भरुन काढण्यासाठी व्यवहारतोल सुधारण्यास पायाभुत विकास घडवून आणण्यासाठी इत्यादी अशा विविध कारणांसाठी अन्यय साधारण असे महत्व वाढत आहे.

९.९ शब्दकोश

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी - International Monetory Fund (IMF)
२. आंतरराष्ट्रीय रोखता/तरलता - International Liquidity
३. विशेष आहरण/उचल अधिकार - Special Drawing Rights
(आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने निर्माण केलेले रोखतेचा प्रश्न सोडविण्यासाठीचे एक मौद्रिक साधन) (SDR)
४. परकिय भांडवल - Foreign Capital/Foreign Investments
५. थेट विदेशी गुंतवणूक - Foreign Direct Investment (FDI)
६. रोखारुपी गुंतवणूक - Portfolio Investments

९.१० प्रश्न

१. आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या, थोडक्यात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची (IMF) भूमिका स्पष्ट करा. (ऑक्टोबर २००९ आणि एप्रिल २००९)
२. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची प्रमुख उद्दिष्ट्ये व कार्ये स्पष्ट करा.
३. विशेष उचल अधिकार (SDR) यावर थोडक्यात टिप लिहा.
४. आंतरराष्ट्रीय रोखता म्हणजे काय ? आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची रोखतेची समस्या सोडवण्यासाठीची भूमिका विशद करा. (ऑक्टोबर २००९)
५. परकीय भांडवलाचे विविध मार्ग स्पष्ट करुन परकीय भांडवलाची आर्थिक विकासातील भूमिका (महत्व) स्पष्ट करा. (एप्रिल २०११ व ऑक्टोबर २००९, एप्रिल २००९)
६. परकीय थेट गुंतवणूकीची भारतातील प्रगती थोडक्यात स्पष्ट करा.
७. आंतरराष्ट्रीय भांडवली हालचालींचे विविध घटक कोणते आहेत ? (एप्रिल२०११) आणि (एप्रिल २०१०)
८. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून दिल्या जाणाऱ्या विविध निधींचे परिक्षण करा. (एप्रिल २०१०).

*****

१०

प्रकरण - ६

चलनबाजार

(Currency Market)

घटक रचना

१०.० उद्दिष्ट्ये
१०.१ प्रस्तावना
१०.२ युरो चलन बाजार - स्वरुप आणि वैशिष्ट्ये
१०.३ युरो समभाग आणि युरो कर्जरोखे बाजार
१०.४ सारांश
१०.५ शब्दकोश
१०.६ प्रश्न

१०.० उद्दिष्ट्ये

युरो डॉलर मार्केट ही आंतरराष्ट्रीय बँकीगची निर्मीती आहे. युरो डॉलर मार्केट ही जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय चलनाची खरेदीविक्री (देवाणघेवाण) करणारी बाजारपेठ आहे. हा एक अल्पकालीन कर्जाचा चलनबाजार असून या बाजारात अमेरिकन डॉलर्सच्या कर्जाची देवाणघेवाण केली जाते. प्रस्तुत पाठात आपण युरोचलन बाजार त्याची वैशिष्ट्ये आणि युरो कर्जरोखे बाजार इत्यादी घटकांचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

१. युरो चलनबाजार ही संकल्पना समजावून घेणे.

२. युरो चलनबाजाराचे स्वरुप व वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

३. युरो चलन बाजाराच्या कार्यप्रणालीवर थोडक्यात चर्चा करणे.

१०.१ प्रस्तावना

युरो डॉलर बाजाराला परकीय चलन बाजार (foeign exchange market) असे संबोधले जाते. सध्याच्या युरोचलन बाजारात अमेरिकन डॉलर्स, ब्रिटिश पौंड, युरो फ्रान्स इत्यादी चलनाचे व्यवहार होतात.

युरो डॉलर ही अशी एक सामान्य संकल्पना आहे की ज्यामध्ये बाह्य बाजारात प्रमुख चलनांची देवाणघेवाण होत असते. म्हणजेच अमेरिकेबाहेरील व्यापारी बँकात डॉलरच्या युरो डॉलर मार्केटमध्ये ठेवी वाढवण्यासाठी ठेवींवर अधिक व्याज दिले जाते.

त्यात अधिक प्रमाणात लवचिकता आणि विस्तृत प्रमाणात गुंतवणुकीला वाव असतो. युरो चलन बाजारामध्ये व्यापारी बँका ज्या देशात कार्यरत असतात त्या चलनाबरोबरच इतर देशाच्या चलनात व्याज देणाऱ्या ठेवी स्विकारतात आणि त्या ठेवीचा कर्जे देण्यासाठी वापर करतात असे कर्ज देताना ज्या चलनात कर्जे पाहिजे त्या चलनामध्ये कर्जे देतात म्हणून युरोबाजार हा एक विस्तृत स्वरुपाचा चलन बाजार असून त्या बाजारात अल्पकालीन कर्जाची देवाण-घेवाण होत असते.

१०.२ युरोचलन बाजार

युरो डॉलर मार्केट ही जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय चलनाची खरेदी-विक्री करणारी बाजारपेठ आहे. हा बाजार प्रामुख्याने युरोपात पसरलेला असून त्यामध्ये प्रामुख्याने युरोपीयन देशांमध्ये डॉलरची देवाणघेवाण इतर चलनामध्ये उदा. ब्रिटिश पौंड (£), स्विडनचा फ्रँक, नेदरलँड गिल्डर इत्यादी चलनामध्ये देवाण-घेवाण होते.

युरो डॉलर्स म्हणजे अमेरिकन डॉलरमध्ये मोजले जाणारे परंतु युरोपात वापरात आणली जाणारी आर्थिक संपत्ती आणि देणी दिली जातात. युरोपियन चलन बाजारात आणि प्रामुख्याने लंडनच्या नाणेबाजारात केले जाणारे बहुसंख्य व्यवहार अमेरिकन डॉलर्समध्येच केले जातात. अमेरिकन डॉलर्सपेक्षा युरो डॉलरची व्याप्ती फार मोठी असल्यामुळे अलिकडच्या काळात युरोडॉलर किंवा युरोचलन बाजाराला अधिक महत्व प्राप्त झाले आहे.

युरोचलनबाजाराचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये :

युरोचलन बाजाराची पुढीलप्रमाणे महत्वाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

१. हा चलनबाजार आंतराष्ट्रीय अल्पकालीन स्वरुपाचा बाजार असतो.

२. हा बाजार सर्व प्रकारच्या बंधनापासून मुक्त असतो.

३. या बाजारात मोठ्या प्रमाणात कर्जाचे व्यवहार केले जातात.

४. युरो चलनबाजार हा स्पर्धात्मक बाजार असतो.

५. युरो चलनबाजार अधिक लवचिक भांडवल बाजार असतो.

६. युरो चलनबाजाराचे प्रमुख ग्राहक व्यावसायिक संस्था असतात. ज्या युरोपमध्ये कार्यरत असतात. ज्या बाजारात ठेवींवर अधिक व्याज मिळेल त्या ठिकाणी अशा संस्था पैसा गुंतवितात आणि बाजारातून कमी दराने कर्ज मिळतात त्यातून कर्जावू रकमा घेतात.

७. युरोचलन बाजार अतिशय संवेदनशील बाजार आहे. कारण व्याजदरातील थोड्या बदलामुळे चलनाच्या मागणी-पुरवठ्यात बदल घडून येत असतात.

८. युरोचलन बाजार हा कर्जरोख्यांच्या बाजाराला पूरक म्हणून कार्य करित असतो.

युरोचलन बाजाराच्या विकासास किंवा वाढीस (growth) कारणीभूत घटक (Reasons/factors to contribute for the development of Euro currency market):

युरो डॉलर बाजाराची सुरुवात १९२० च्या दशकात झाली. जर्मनी व ऑस्ट्रेलिया या देशात डॉलर ठेवले गेले आणि त्याचे रुपांतर स्थानिक चलनात होवून ते कर्जासाठी वापरले गेले. १९५०च्या दशकाच्या अखेर या बाजाराला गती प्राप्त झाली. तरीसुध्दा या बाजाराचा विकास प्रामुख्याने १९६७ नंतर अधिक वेगाने झालेला आहे. १९७०च्या दशकाच्या मध्यापासून पेट्रोलियम उत्पादक देशांनी आपले डॉलरचे उत्पन्न या बाजारात गुंतविण्यास सुरुवात केली. (Deposit of surplus funds by opec countries) १९६८ नंतर आंतरराष्ट्रीय चलनपेचप्रसंग (International currency crisis) आणि अमेरिकेच्या व्यवहारतोलातील तूट (Deficit BOP of USA) यामुळे डॉलरचा पुरवठा देशाबाहेर वाढला. बाजाराची कार्यक्षमता, स्पर्धात्मकता आणि नफा मिळण्याची खात्री यामुळे या बाजाराचा वेगाने विकास झाला. या वाढीला पुढील घटक जबाबदार आहेत.

१. १९५६च्या सुएझ कारवाईनंतर इंग्लडने कर्जावर बंधने घातली. ब्रिटिश नागरिकांजवळील डॉलरचा वापर कर्जाची गरज भागविण्यासाठी बँकामार्फत होवू लागला.

२. १९५८ नंतर युरोपमधील परकीय चलन नियंत्रणे कमी करण्यात आली आणि चलने परिवर्तनीय करण्यात आली. (Aboiition of the European payments Union & Restoration of currency convertibility) यामुळे देशादेशात कर्जव्यवहारात वाढ होवू लागली.

३. रशिया व अमेरिका यातील शीतयुध्दानंतर रशिया व साम्यवादी देश आपले डॉलरचे साठे अमेरिकेऐवजी युरोपमधील देशात ठेवू लागले. (Soviet deposit of doller in European banks - cold war).

४. १९५० पासून अमेरिकेच्या व्यवहारतोलात तूट येऊ लागली ज्या देशांना व्यवहारतोलात शिल्लक होती त्यांच्याकडे डॉलरचा ओघ सुरु झाला. (Convenient to hold balances abroad).

५. अमेरिकेत बँकावर बंधने घातली गेली बँकांनी द्यावयाच्या व्याजदरावर कमाल मर्यादा घातली गेली (Regulation Q-Interest Rate) अमेरिकन बँका व कंपन्यांनी परदेशात कर्जे न देण्यासाठी निवडक पतनियंत्रण लागू केले.

६. पेट्रोल दरवाढीमुळे डॉलरचा पुरवठा वाढला.

७. अमेरिकेपेक्षा युरोमधील बँका ठेवींवर जास्त व्याज देत असल्यामुळे अमेरिकन बँकानी आपल्या शाखा युरोपमध्ये उघडून अमेरिकेतील शाखांमधील ठेवी युरोपातील शाखांमध्ये हस्तांतरीत केल्या. थोडक्यात व्याजदराचा अधिक फायदा मिळाल्यामुळे युरोडॉलर बाजार विकसित होण्यास एक प्रकारे मदत झाली.

युरोचलन बाजाराचे फायदे :

युरो चलनबाजारात सहभागी झालेल्या देशांना पुढील फायदे मिळतात.

१. युरो चलन बाजार हा आंतरराष्ट्रीय अल्पकालीन बाजार असल्यामुळे युरो डॉलरची मोठ्या प्रमाणात हालचाल घडून येते.

२. युरो चलन बाजारामुळे आयात-निर्यात व्यापाऱ्यांना इतर बाजारापेक्षा स्वस्त दराने डॉलर्स प्राप्त करता येतात.

३. युरो चलन बाजार वित्तीय संस्थांना आपली रोखत टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त ठरतो.

४. आंतरराष्ट्रीय पातळीवरील बदलानुसार देशांतर्गत व्याज-दरात बदल घडवून आणता येतात.

५. युरो चलन बाजरामुळे बाजारातील दलालांना (Arbitragers) पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध होवू शकतो.

६. अपुरा राखीव निधी असलेल्या मध्यवर्ती बँकेला युरो चलन बाजारातून कर्ज घेऊन राखीव निधीत वाढ करता येते.

आंतरराष्ट्रीय वित्तव्यवस्थेवर युरोचलन बाजाराचा परिणाम:(Impact of Euro Currency Market on International Financial System)

१. डॉलरमध्ये अल्पकालीन सुधारणा झाल्यामुळे डॉलर जवळ बाळगण्याऐवजी त्याचा कर्ज देण्यासाठी वापर करता येत असल्यामुळे ते अधिक फायदेशीर ठरते.

२. युरो चलन बाजारामुळे आंतरराष्ट्रीय चलनविषयक सहकार्य वाढण्यास मदत होते. (Trading blocks & Economic Integration)

३. युरो चलनबाजारामुळे व्यवहारतोलातील शिल्लक आणि तुटीच्या दुरुस्तीसाठी (correcting disequilibrium BOP) मदत होते.

४. युरोचलन बाजारामुळे विनिमय नियंत्रणाच्या साठ्यावरील ताण कमी करणे शक्य होते.

५. आंतरराष्ट्रीय रोखतेची समस्या सोडवण्यासाठी युरो चलन बाजाराने मोठे कार्य केले आहे.

युरो चलनबाजाराचा आंतरराष्ट्रीय वित्तीय-व्यवस्थेवर अनुकूल परिणाम होत असला तरी युरोचलन बाजाराला पुढीलप्रमाणे काही मर्यादा येतात.

युरोचलन बाजाराच्या मर्यादा : (Shortcomings/Limitations of Euro Currency Market)

१. युरोचलन बाजारामुळे बँक व्यवसायातील शिस्त कमी होवून संपूर्ण बँक व्यवसाय कमकुवत होतो.

२. देशातील मोठ्या प्रमाणावरील पैसा देशाबाहेर गेल्याने अर्थव्यवस्थेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

३. युरो चलन बाजारामुळे भांडवलाचा आंतरराष्ट्रीय हालचालींना एक प्रकारची संधी मिळत असली तरी त्याचा विनिमय साठ्यावरील ताण वाढत जातो. त्यामुळे आर्थिक धोरणावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो.

४. युरोचलन बाजारामुळे चलनविषयक धोरणाची परिणामकारकता (effectiveness of monetary policy) कमी झाली आहे.

५. बँका व व्यापारी संस्था यांना युरो डॉलर बाजारामुळे पूर्णत: व्यापारी स्वरुप आले आहे.

आपली प्रगती तपासा :

प्र. १ युरो चलनबाजार ही संकल्पना अभ्यासा.

प्र. २ युरो चलनबाजाराच्या विकासास असलेले कारणीभूत घटक कोणते ?

१०.३ युरो समभाग आणि युरो कर्जरोखे बाजार (Euro Equity & Euro Bond Market)

१. युरो समभाग (Euro Equity):

परकीय कंपन्याचे भाग विकत घेऊन ते डिपॉजिटरांच्या (ठेवीदारांच्या) ताब्यात देतात. त्याबद्दल डिपॉजिटरने दिलेली हस्तांतरण पावती म्हणजेच जागतिक ठेव पावती (GDR) या पावतीची खुल्या रितीने खरेदी-विक्री (देवाण-घेवाण) करता येते. जागतीक ठेवपावतीची (GDR) विक्री करुन कंपनीला परकीय चलनात रक्कम उभारता येते. त्यामुळे परकीय बाजारपेठेत केलेल्या व्यवहारांच्या पूर्ततेसाठी या पावतीचा उपयोग होतो.

२. युरो इश्युज : (Euro Issues)

सध्याच्या काळात अनेक बंधने शिथिल करुन भांडवलबाजार परकीय गुंतवणूकदारांना खुला करण्यात आलेला आहे. शिथिलीकरण व जागतिकीकरणाच्या दृष्टीने भारत सरकारने काही महत्वाची पावले उचललेली आहेत ती म्हणजे :

अ. परकीय गुंतवणूकदारांना भारतीय भांडवल बाजारात गुंतवणूक करण्याची परवानगी देणे.

ब. भारतीय कंपन्यांना (गुंतवणूकदारांना) परदेशात प्रतिभूतींची (shares) विक्री करुन भांडवल उभारण्याची परवानगी देण्यात आली आहे.

परदेशात भांडवल उभारण्यासाठी भारतीय कंपन्यांनी दोन प्रकारच्या प्रतिभूतींची विक्री केलेली आहे. एक म्हणजे जागतिक ठेव पावत्या (Gobal Depository Receipts - GDR) आणि दोन म्हणजे परकीय चलन परिवर्तनीय विपत्रे (foreign currency convertible bonds) या दोन्ही प्रकारच्या प्रतिभुतींना 'युरो इश्यूज' असे म्हणतात.

३. युरो कर्जरोखे (Euro Bonds) :

आंतरराष्ट्रीय संस्था, सार्वभौमराष्ट्र, बहुराष्ट्रीय कंपन्या (MNCs) आणि जगातल्या गुंतवणूकदारांना विक्रीमार्फत देऊ केलेला आंतराष्ट्रीय कर्जरोखा म्हणजे युरो बॉन्ड (Euro Bond) होय.

भारतीय कंपन्यांनी विक्रीस काढलेल्या या प्रकारच्या दस्तऐवजांना परकीय चलन परिवर्तनीय विपत्र (convertible deposits) असे म्हणतात. ही विपत्रे समहक्क भागांशी निगडित असलेले कर्जाचे दस्तऐवज असतात आणि गुंतवणूकदारांना त्यांचे समभागात किंवा डिपॉजीटरीच्या पावतीमध्ये रुपांतर करण्याचा पर्याय दिलेला असतो. मात्र या पर्यायाचा वापर ठराविक कालावधीनंतरच करता येतो. या विपत्रांवर निश्चितदराने व्याज दिले जाते. मात्र हा व्याजदर अपरिवर्तनीय कर्ज रोख्यावरील व्याजदरापेक्षा कमी असतो. या विपत्रांची विक्री करणारी संस्था आपल्या आवश्यकतेनुसार व सोयीनुसार त्यांची विक्री करु शकते.

आपली प्रगती तपासा

प्र. युरो इक्विटी, युरो इश्युज व युरो कर्जरोखे या संकल्पनांचा अर्थ अभ्यासा

१०.४ सारांश

१. युरो डॉलर मार्केट ही जगातील सर्वात मोठी आंतरराष्ट्रीय चलनाची खरेदीविक्री करणारी बाजारपेठ आहे.

२. युरो डॉलर म्हणजे अमेरिकन डॉलरमध्ये मोजले जाणारे परंतु युरोपात वापरात आणली जाणारी आर्थिक संपत्ती आणि देणी दिली जातात. अमेरिकन डॉलरपेक्षा युरोडॉलरची व्याप्ती फार मोठी असल्यामुळे अलिकडच्या काळात युरो चलनबाजाराला अधिक महत्व प्राप्त झाले आहे.

३. युरोचलन बाजाराची अल्पकालीन स्वरुपाचा बाजार, स्पर्धात्मक बाजार, मोठ्या प्रमाणावरील कर्जाचे व्यवहार, अधिक फायदेशीर बंधनमुक्त बाजार इत्यादी विविध वैशिष्ट्ये महत्वाची आहेत.

४. युरोचलन बाजाराच्या विकासास/वृध्दीस पेट्रोलियमच्या किंमतीतील वाढ, आंतरराष्ट्रीय चलन पेचप्रसंग, निर्बंध, अमेरिकेच्या व्यवहार तूट, अमेरिकन डॉलरचे घटते मूल्य इत्यादी घटक कारणीभूत ठरली.

५. युरोचलन बाजारामुळे विविध सकारात्मक व नकारात्मक परिणाम दिसून येतात.

६. युरो चलन बाजारात, युरो कर्जरोखे, युरो समभाग, युरो इश्युज आणि विविध प्रकारच्या ठेवींचा समावेश होतो.

७. आंतरराष्ट्रीय एकात्मीकरण, आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ, आंतरराष्ट्रीय रोखता इत्यादीबाबत युरोचलन बाजाराचे कार्य महत्वाचे आहे.

१०.५ शब्दकोश

१. युरो डॉलर मार्केट Euro Dollar Market म्हणजेच Euro Corrency Market युरो चलन बाजार Euro हे चलन € या चिन्हाने ओळखले जाते.

२. अमेरिकन डॉलर - $ U.S.A. ($ हे डॉलरचे चिन्ह आहे) अलिकडच्या काळात अमेरिकन डॉलरचे ($) महत्व कमी होत आहे.

३. युरो समभाग - Euro Equity

४. युरो कर्जरोखे - Euro Bonds

१०.६ प्रश्नावली

१. युरो चलनबाजाराची संकल्पना स्पष्ट करुन युरोचलन बाजाराचे स्वरुप आणि वैशिष्ट्य स्पष्ट करा. (एप्रिल २०११).

२. युरोचलन बाजाराच्या विकासास/वृध्दीस असणारे कारणीभूत घटक कोणते? (एप्रिल २०१० आणि एप्रिल २०११)

३. युरोचलन बाजाराचे फायदे-तोटे (मर्यादा) थोडक्यात स्पष्ट करा.

४ युरो चलन बाजार म्हणजे काय? आंतरराष्ट्रीय वित्तव्यवस्थेवरील युरोचलनबाजाराचे परिणाम स्पष्ट करा.

५ युरो कर्जरोखे, युरो इश्युज आणि युरो समभाग या संकल्पना स्पष्ट करा.

६ युरोचलन बाजाराची महत्वाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा आणि या बाजाराच्या वृध्दीस असणाऱ्या जबाबदार घटकांचे परिक्षण करा. (एप्रिल २०११ - २० गुणांचा सलग एकच प्रश्न)

*****

११

चलनक्षेत्र

(Currency Areas)

घटक रचना

११.० उद्दिष्ट्ये

११.१ प्रस्तावना

११.२ चलनक्षेत्र

११.३ सामाईक चलन आणि युरोपियन मौद्रिक संघटना

११.४ युरोपियन संघटनेच्या संदर्भातील आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरण

११.५ सारांश

११.६ शब्दकोश

११.७ प्रश्न

११.० उद्दिष्ट्ये

चलनक्षेत्र म्हणजे ज्या भौगोलिक क्षेत्रात एक चलन वापरले जाते किंवा ज्या क्षेत्रातील देश आपल्या चलनात स्थिर विनिमय दर ठेवण्याचे मान्य करतात असे भौगोलिक क्षेत्र होय. चलनक्षेत्र या पाठात आपण चलनक्षेत्राची संकल्पना, सामाईक चलन आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरण इत्यादी अशा महत्वाच्या घटकांचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१. चलनक्षेत्र ही संकल्पना अभ्यासणे.

२. सामाईक चलनक्षेत्र व पर्याप्त चलनक्षेत्र ह्या संकल्पना अभ्यासणे.

३. युरोपियन संघटनेच्या संदर्भातील आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरणाचे महत्व अभ्यासणे.

११.१ प्रस्तावना

चलनक्षेत्र निर्माण करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे बर्हिगत समतोल किंवा देशाच्या व्यवहारतोलाचा समतोल आणि अंतर्गत समतोल किंवा देशात बेकारी किंवा भाववाढ (unemployment or inflation) यापैकी कोणताही प्रश्न नसणे. असे दोन्ही समतोल एकाचवेळी प्रस्थापित होणे गरजेचे असते. कोणती परिस्थिती असलेले देश एकत्र येणे योग्य ठरते यावरुन चलनक्षेत्राचा विस्तार किती असावा हे ठरते. यातूनच 'पर्याप्त चलनक्षेत्र' ही संकल्पना पुढे आली. पर्याप्त चलनक्षेत्रासंदर्भात विविध

अर्थतज्ञांनी विविध सिध्दांत मांडले आहेत. युरोपमधील १५ देशांनी 'युरो' (Euro-€) हे एक चलन स्विकारण्याचे मान्य केले आणि १ जानेवारी २००० या दिवसापासून ११ देशांनी त्याची अंमलबजावणी केली. या देशांचे परदेशांशी व्यवहार युरो (Euro-€) या चलनातच होतात म्हणून आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरण घडून येण्यास युरोपियन संघटना व इष्टतम चलनक्षेत्र (optimum currency area) हे अत्यंत उपयोगी ठरतात.

११.२ चलनक्षेत्र आणि युरोपिय मौद्रिक संघटना

चलनक्षेत्र याचा अर्थ ''ज्या भौगोलिक क्षेत्रात एक चलन वापरले जाते किंवा ज्या क्षेत्रातील देश आपल्या चलनात स्थिर विनिमय दर ठेवण्याचे मान्य करतात असे भौगोलिक क्षेत्र होय''. या क्षेत्राच्या बाहेरील देशांशी विनिमय दर बदलता ठेवला जातो. इष्टतम चलनक्षेत्रामुळे देशाचे परस्परांशी व्यवहार सोपे होतात. तसेच चलनाच्या बदलत्या दरांचा प्रश्न मिटल्यामुळे हिशोब ठेवण्याचे व परकीय चलन व्यवहारांचे काम सोपे होते. क्षेत्रातंर्गत व्यापारात वाढ होते हे फायदे मिळविण्यासाठी चलनक्षेत्राचा पर्याप्त आकार (optimum size) किती असावा याबाबत विविध अर्थतज्ञानी निरनिराळे सिध्दांत मांडले आहेत. इष्टतम चलक्षेत्रासाठी सरकारी धोरणांचा विचार व्हायला पाहिजे असे मत मंडेल, मॅकीनॉन आणि केनन या अर्थतज्ञांचे होते तर सरकारी धोरणांच्या विचाराची इष्टतम चलनक्षेत्रासाठी आवश्यकता नाही असे मॅग्नीफिसो आणि वुड या अर्थतज्ञानी प्रतिपादन केले.

युरोपियन मौद्रिक संघटना :

युरोपियन देशांनी प्रथम युरोपिय आर्थिक समुदाय (European Economic Union - EEU/EEC) नंतर युरोपियन सामाईक बाजारपेठ (European Common Market) व शेवटी स्थिर विनिमयदराच्या माध्यमातून सामाईक चलनापर्यंत (common currency) मजल मारली आहे. युरोपियन कॉमन मार्केट किंवा संक्षिप्तपणे 'युरोमार्ट' नावाने ओळखला जाणारा हा संघ रोम येथे १९५७ मध्ये 'युरोपियन कोल ॲन्ड स्टीलकम्युनिटी'च्या सहा सदस्य राष्ट्रात झालेल्या एका करारान्वये संलग्न करण्यात आला. युरोपियन आर्थिक / मौद्रिक संघटना हे जगातल्या सर्वात मोठ्या संघटनेचे उदाहरण आहे. सामाईक बाजार पेठ हा जकात संघाचा एक विशेष प्रकार म्हणता येईल.

युरोपिय संघाच्या (European Union - EU) जर्मनी, फ्रान्स इटली यांच्यासह बारा देशाचे हे सामाईक चलन आहे. जानेवारी १९९९ मध्ये विनिमयाचे सामाईक चलन म्हणुन युरोचा (Euro-€) स्वीकार करण्यात आला. युरोचलनामुळे युरोचे आर्थिक बळ वाढेल. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होईल व संपूर्ण युरोपमध्ये वस्तुंच्या किंमतीत समानता येईल असा तज्ञांचा अंदाज आहे.

युरोपियन संघाची सदस्य राष्ट्रांनी १९७९ पासून युरोपिय चलनविषयक व्यवस्था (European Monetary Union) अनुसरलेली असून त्यांच्या चलनांच्या विनिमयदराचे सापेक्ष स्थैर्य आणि त्याद्वारे परस्परांना लाभ ही त्या व्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. सदस्य राष्ट्रांच्या मध्यवर्ती बँकाचे अध्यक्ष 'संघा' च्या आर्थिक धोरणासंबंधी परस्पर सल्लामसलत करीत असतात. जर्मनीतील 'फ्रँकफर्ट' शहरातील 'युरोपियन चलन संस्था' (European Monetory Institute) म्हणजे अशा विचारविनिमयासाठी उपलब्ध व्यासपीठच होय. ही व्यवस्था आता 'युरोपीय मध्यवर्ती बँक व्यवस्था' (शिखर बँक) म्हणून ओळखली जाते.

सामाजिक द्रव्यविषयक (चलनविषयक / मौद्रिक) धोरणाची जबाबदारी सदस्य राष्ट्रांच्या मध्यवर्ती बँकाच्या सर्वोच्च मंडळाकडे आहे. 'युरो' (€) मुलतः डॉलरशी ($) प्रतिस्पर्धी म्हणून सुरु करण्यात आलेले नसून एककेंद्राभिमुखतेच्या कसोटीस उतरण्याची प्रबळ राजकीय इच्छाशक्ती प्रत्यक्षात दाखवून ते स्वप्न साकार करण्याचा हेतू त्यामागे आहे. म्हणून सध्या 'युरोचलन' म्हणजे अमेरिकन डॉलरमध्ये मोजण्यात येणारी परंतु युरोपात वापरात आणलेली आर्थिक संपत्ती किंवा देणी आहे. त्यामुळेच युरोचलन हे एक सामाईक चलन म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय होत आहे.

११.४ युरोपियन संघटनेच्या संदर्भातील आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरण (International Financial Intearation with Respect to European Union-Eco)

जागतिक सारीपाटावर ज्या मोजक्या संघटना किंवा देशाचे ताकतवान गट आहेत. त्यामध्ये युरोपीय संघाचा पहिला क्रमांक लागतो. दुसऱ्या महायुध्दाचे अपत्य म्हणून ओळख असलेल्या युरोपीय संघाने नुकतीच ५० वर्षे पूर्ण केली आहेत.

युरोपिय संघ हा चीन आणि भारतानंतर जगातील सर्वात मोठा समूह आहे. जगातील हे सर्वात मोठे राजकीय व आर्थिक संघटन आहे. युरोपिय संघातील युरोपियन मुक्त व्यापार संघटना (EFTA-1960), सदस्य देशात सीमाशुल्क समाप्ती (१९६८) युरोपच्या एकत्रीकरणाचा ठराव -१९६९, युरोचलन (€) अस्तित्वात-१९९९ हे महत्वाचे टप्पे आहेत.

युरोपियन देशांनी प्रथम युरोपियन आर्थिक समुदाय (European Economic Community - EEC) नंतर युरोपीय सामाईक बाजारपेठ (European Common Market), आणि शेवटी स्थिर विनिमयदराच्या माध्यमातून सामाईक चलनापर्यंत घौडदौड केली आहे. १ जानेवारी २००० पासून १५ देशांनी करार करुन युरो हे एकच चलन स्विकारण्याचे मान्य केले. १९७१ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची पध्दत डळमळीत झाल्यावर पर्यायी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे झाले होते. चलनाचा विनिमय दर शोधून काढण्यासाठी काही काळ तो बदलता

किंवा तरता (flexible) ठेवणे आणि शेवटी विनिमयदर तरताच (flexible) ठेवणे असे विविध मार्ग वापरले गेले. या काळात युरोपमधील देश व्यापाराच्यादृष्टीने दोन गटात विभागले गेले होते. युरोपिय सामाईक बाजरपेठ (ECM) आणि युरोपिय मुक्त व्यापार संघटना (EFTA- European Free Trade Area) यापैकी पहिल्या संघटनेने व्यापाराखेरिज मौद्रिक व राजकोषिय धोरणात सुसूत्रीकरण केले होते (financial intearetions) त्यामुळे अंतर्गत व बर्हिर्गत समतोल एकाचवेळी प्रस्थापित होण्यास मदत झाली. एक चलन किंवा सामाईक चलन स्विकारल्याने मिळणारे फायदे जास्त होते. दुसरी संघटना इंग्लंडच्या नेतृत्वाखाली स्थापन झाल्याने पहिल्या संघटनेला प्रतिस्पर्धी असे तिचे स्वरुप होते. व्यापार मुक्त करण्यापलीकडे तिचा फारसा उपयोग झाला नाही. कालांतराने पहिल्या संघटनेच्या यशामुळे बहुत्तंश देशांनी इंग्लंड सोडून पहिल्या संघटनेत सहभागी होऊन सामाईक चलन म्हणून युरोचलन (€) स्विकारले आहे. बहुतेक देश प्रगत व औद्योगिकदृष्ट्या संपन्न असल्यामुळे त्यांचा जागतिक व्यापराशी जास्त संबंध आहे. त्यामुळे या देशांचे चलनक्षेत्र इष्टतम (optimum currency area) चलनक्षेत्र ठरण्याची शक्यता जास्त आहे. एका बाजूला अमेरिका व दुसऱ्या बाजूला इंग्लंड यांच्यावर युरोपिय देशांनी मात केली आहे. युरो हे चलन सध्या अमेरिकन डॉलरपेक्षा भक्कम आहे. यावरुन युरोपमधील देशांचे चलनक्षेत्र इष्टतम आहे हे सिध्द होते. इंग्लंडने युरोपिय देशांच्या संघटनेत सामील होणे हे या संघटनेचे मोठे यश आहे.

युरोपियन ॲण्ड स्टील कम्युनिटी (१९५२), युरोपियन ॲक्ट (१९९०) इत्यादीमुळे युरोपच्या एकात्मीकरणाची प्रक्रीया सुरु झाली. परिवर्तनाच्या आणि विस्ताराच्या अनेक महत्वाकांक्षी भूमिका युरोपियन समूहाने दृष्टीसमोर ठेवल्या आहेत. उत्पादनघटकांच्या गतीक्षमतेतील अडथळे किंवा राष्ट्रीय सीमांमुळे येणाऱ्या मर्यादा दूर करण्याच्या दृष्टीने आखिल युरोपिय एकात्मीकरणाची ठोस पावले उचलली जात आहे.

युरोचलनाचे आगमन होण्यापूर्वी अमेरिकरन डॉलरचे महत्व वाढले होते. त्यामुळे अमेरिकेकडे आर्थिक नेतृत्व होते. मात्र २००० पासून 'युरोचलन' वापरात आल्यामुळे आखिल युरोपीय आर्थिक एकात्मीकरणाचे नवे पर्व सुरु झाले.

युरोपियन आर्थिक एकात्मीकरणासाठी सदस्य देशांत अतंर्गत प्रशुल्क, जकात, कोटा समाप्त करणे, कृषीविषयक सामाईक धोरण, राजकोषीय व मौद्रिक सामाईक धोरण आखणे त्यामध्ये एकसुत्रता आणि समन्वय साधणे अशा अनेक तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या होत्या. युरोपियन आर्थिक समुदायाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील सभासद राष्ट्रांचा व्यापार एकुण जागतिक व्यापाराच्या एकतृतीअंश भरतो. या समुहातील राष्ट्रांचे उत्पादन संपूर्ण जगाच्या उत्पन्नाच्या एकपंचमांश आहे ही सर्वात उल्लेखणीय बाब आहे.

मागच्या काही वर्षात युरोपीय आर्थिक समुदाय, युरोपीय सामाईक बाजारपेठ, युरोचलन इत्यादीमुळे युरो समभाग, युरो इश्युज, युरो कर्जरोखे यामध्ये मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय स्तरावर वित्तीय एकात्मीकरण घडून येत आहे.

आपली प्रगती तपासा :

प्र. १. चलनक्षेत्र ही संकल्पना अभ्यासा.

प्र. २. आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरणात युरोपीयन संघटनेची भूमिका काय आहे ?

११.५ सारांश

१) चलनक्षेत्र म्हणजे ज्या भौगोलिक क्षेत्रात एक चलन वापरले जाते किंवा ज्या क्षेत्रातील देश आपल्या चलनात स्थिर विनिमयदर ठेवण्याचे मान्य करतात असे भौगोलिक क्षेत्र होय.

२) चलनक्षेत्राची निर्मिती करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे सदस्य राष्ट्रातील व्यवहारतोलाचा अंतर्गत व बर्हिर्गत समतोल साधणे.

३) पर्याप्त चलनक्षेत्र आणि सामाईक चलन ह्या संकल्पना चलनक्षेत्राच्या निर्मितीतूनच साकारलेल्या आहेत.

४) पर्याप्त चलनक्षेत्राच्या संदर्भात विविध अर्थतज्ञानी सरकारी धोरणांचा विचार असावा किंवा असू नये याबाबत विविध मते मांडली आहेत.

५) सामाईक चलन किंवा इष्टतम चलनक्षेत्राचे 'युरोचलन' (Euro - €) हे उत्तम उदाहरण देता येईल.

६) १ जानेवारी २००० पासून युरोपधील ११ देशांनी इंग्लंड वगळता 'युरोचलन' हे सामाईक चलन म्हणून मान्य केले.

७) युरोपियन देशांनी प्रथम युरोपीय आर्थिक समुदाय (EEC) युरोपियन सामाईक बाजारपेठ (ECM) युरोपियन युनियन / संघटना (EU) इत्यादी आर्थिक संघांच्या व शेवटी स्थिर विनिमय दराच्या (fixed exchange rate) माध्यमातून सामाईक चलनापर्यंत मजल मारली आहे.

८) जागतिक अर्थव्यवस्थेत काही मोजक्या ताकदवान (strong economy) अर्थव्यवस्थेत जे काही व्यापारीगट आहेत त्यापैकी युरोपिय संघाचा (European Union) प्रथम क्रमांक लागतो. युरोपियन संघ हा सर्वात मोठा व्यापारी समुह असून जगातले सर्वात मोठे आर्थिक व राजकीय संघटन आहे.

९) युरोपियन संघाची आंतरराष्ट्रीय मौद्रिक व्यवस्था वित्तीय एकात्मीकरणासाठी महत्त्वाकांक्षी अशी महत्वाची धोरणे अमलात आणत आहे.

१०) मागील काही वर्षापासून युरोपियन संघाकडून युरोपियन कर्जरोखे, युरो समभाग, युरो इश्युज, विविध ठेवी, समभाग इत्यादीबाबत मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय स्तरावर वित्तीय एकात्मीकरण घडून येत आहे.

११.६ शब्दकोश

१. Optimum Currency - इष्टतम किंवा पर्याप्त चलनक्षेत्र
(स्थिर विनिमयदर पध्दतीचा वावर, एकच चलन वापरले जाते)

२. Common Currency - सामाईक चलन किंवा एकच चलन (व्यापारी समूहामध्ये एका समान चलनाचाच वापर केला जातो. उदा. युरो चलन (€).

३. European Monetary Union - युरोपियन मौद्रिक / चलनविषयक संघटना.

४. International Financial Inteqration - आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरण (युरोपियन संघाची महत्वाची कामगिरी आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरणाबाबत आहे.)

११.७ प्रश्न

१. चलनक्षेत्र ही संकल्पना सविस्तरपणे स्पष्ट करा.

२. सामाईक चलन म्हणून 'युरोचलन' यावर सविस्तर टिप लिहा.

३. आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरणात युरोपियन मौद्रिक संघटनेची भूमिका (role) स्पष्ट करा. (एप्रिल २००९)

४. युरोपियन संघाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरणावर टिप लिहा (एप्रिल २०१०)

५. चलनक्षेत्र म्हणजे काय? चलनक्षेत्र निर्माण होण्याची प्रवृत्ती स्पष्ट करा. (ऑक्टोबर २००९).

*****

१२

प्रकरण ७

जागतिक वित्तव्यवस्थेतील वादविवाद

[Emerging Issues in Global Finance]

घटक रचना

१२.० उद्दिष्ट्ये
१२.१ प्रस्तावना
१२.२ जागतिक वित्तरचनेचा (आराखडा) उदय
१२.३ विकसनशील देशांनी आंतरराष्ट्रीय आपत्तीपासून घेतलेला धडा
१२.४ जागतिक वित्तिय प्रणाली /आराखड्याच्या मर्यादा/दोष
१२.५ सारांश
१२.६ शब्दकोश
१२.७ प्रश्न

१२.० उद्दिष्ट्ये

देशादेशात भांडवलाची देवाण-घेवाण होणे हे आंतरराष्ट्रीय व्यवहार सुरु झाल्यापासून चालु आहे. पहिल्या महायुध्दापासून ते आजच्या आधुनिक काळापर्यंत आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीमध्ये अनेक बदल घडून आले. आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थेतील बदलत्या प्रवृत्ती ह्या देशोदेशातील सकारात्मक व नकारात्मक परिणामांना कारणीभूत आहे. प्रस्तुत पाठात आपण आंतरराष्ट्रीय वित्तरचना व आराखडा तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीमूळे झालेले वादविवाद यांचा प्रामुख्याने अभ्यास करणार आहोत. या पाठाची ठळक उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१. जागतिक वित्तरचनेचा आराखडा अभ्यासणे.
२. जागतिक वित्तव्यवस्थेतील वादविवाद (Issues) जाणून घेणे.
३. विकसनशील देशांनी आंतरराष्ट्रीय आपत्तीपासून घेतलेला धडा (शिकवणे) अभ्यासणे.

१२.१ प्रस्तावना

पूर्वीच्या जागतिक वित्तीय रचनेचा आराखडा दुसरे महायुध्द संपण्याच्या सुमारास तयार करण्यात आला होता. ब्रेटनवूडस् पध्दत ही त्या आराखड्यातील एक

महत्वाचा घटक आहे. जागतिक बँक (World Bank) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळ (IFC) इत्यादी अशा अनेक वित्तीय संस्थांचा समावेश जागतिक वित्तीय रचना प्रणालीमध्ये आहे. जागतिक वित्तीय प्रणालीचा आराखडा हा आर्थिक वाढ, वित्तीय स्थैर्य, जागतिकीकरण इत्यादी विविध उद्देशाने तयार केला आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय रचनेतील दोषांमुळे आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्ट्य, आंतरराष्ट्रीय कर्ज आरिष्ट्य आणि चलन पेचप्रसंग अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. विकसनशील देशांना या जागतिक वित्त आरिष्ट्याचा मजबूत आर्थिक फटका बसला आहे. विकसित देशांपेक्षा विकसनशील देशांना आंतरराष्ट्रीय वित्त आरिष्ट्यामुळे जास्त धोका आहे. म्हणूनच भारतासारख्या विकसनशील देशांनी वित्तीय आपत्तीपासून संरक्षण मिळविण्यासाठी देशाची वित्तीयरचना सुधारली पाहिजे.

१२.२ जागतिक वित्तीयरचना (प्रणाली)

जागतिक वित्तीय प्रणाली म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर वित्तीय संस्था स्थापन करणे, करार करणे, प्रलोभणे ठरविणे आणि वित्तीय धोके कसे घ्याल? त्याचप्रमाणे त्यापासून मिळणाऱ्या फायद्या-तोट्यांचे कसे वाटप कराल? हे स्पष्ट करणारा आराखडा होय.

दुसऱ्या महायुध्दाच्या सरतेशेवटी पूर्वीचा जागतिक वित्तीय रचनेचा आराखडा तयार करण्यात आला होता. या आराखड्यामध्ये ब्रेटनवूड्स पध्दत, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक इत्यादी महत्वाचे घटक होते. १९९५ मध्ये स्थापन केलेली जागतिक व्यापार संघटना ही सुध्दा जागतिक वित्तरचनेच्या पध्दतीतील महत्वाचा भाग आहे.

आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीचा मुख्य उद्देश आर्थिक वाढीस उत्तेजन देणे, वित्तीय स्थैर्य, वादनिवारण पध्दतीत बदल, देशाच्या अर्थव्यवस्थेतील बदलांची गरज आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील निर्माण होणारी गुंतागुंत कमी करणे हा होता. परंतु ही प्रणाली फक्त आंतरराष्ट्रीय मौद्रिक व वित्तीय स्थैर्य निर्माण करण्यात काही प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसून येते. जागतिक अर्थव्यवस्थेत वेळोवेळी आर्थिक संकटे निर्माण झाली. विशेषतः पूर्व आशिया देशातील संकटे, जुन्या जागतिक वित्तीय प्रणालीतील हा एक दोष किंवा मर्यादा आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय वित्तीय समुदाय आणि राष्ट्रीय तज्ञ यांनी आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्ट्ये कमी करण्यासाठी किंवा आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीच्या आराखड्यात सुधारणा करण्यासाठी विविध उपाय योजले. साहजिकच त्यामुळे नविन वित्तीय प्रणालीद्वारे पुढील घटकाच्या संदर्भात महत्वाची भूमिका अपेक्षित आहे.

१. आरिष्ट्यांची शक्यता/संभाव्यता कमी करणे.

२. सातत्यपूर्ण जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये राष्ट्रीय मंडळ किंवा तज्ञांची विश्वास पातळी संपादन करणे.

३. ज्या वेळेला प्रखर वित्तीय आरिष्ट्ये घडून येतात ती ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करणे.

४. आरिष्ट्यांपासून जागतिक अर्थव्यवस्थेला शक्य तितक्या दूर ठेवणे.

आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्ट्य किंवा संकट (International Financial Crisis):

मागिल २० वर्षे वित्तीय आरिष्ट्याच्या अनुभवास साक्षीदार आहेत. जागतिक वित्तीय प्रणालीमध्ये कर्जे आरिष्ट्य आणि वित्तीय आरिष्ट्य टाळण्यासाठी आणि त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.

१९९० चे कर्ज आरिष्ट्य :

१९९० नंतर अनेक देशांना आंतरराष्ट्रीय कर्जाच्या तीव्र समस्येला सामोरे जावे लागले. काही देशांनी कर्ज परत फेडी बाबत असमर्थता दर्शविली कर्जामध्ये सातत्याने वाढ होत आहे. १९७० मध्ये १०० अब्ज डॉलर असलेले कर्ज १९९७ मध्ये १७४४ अब्ज डॉलरपर्यंत वाढले. यापैकी २० देशांचे कर्ज जवळपास ५७ टक्के होते. १५ देशांची गणना सर्वात जास्त कर्जबाजारी देश म्हणून केली गेली होती. १९८८ ते १९९० या काळात कर्जाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण ५० टक्क्यापेक्षाही जास्त होते. तसेच वस्तू व सेवांच्या निर्यात उत्पन्नाच्या २७५ टक्यापेक्षांही जास्त होते. असे देश कर्जबाजारी देशांच्या यादीत होते. दक्षिण अमेरिका आणि आफ्रिका खंडातील हे देश होते. याबाबत सुधारणा केल्यानंतर काही प्रमाणात यशही मिळाले.

१९९० चे वित्तीय आरिष्ट्य :

आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्ट्यांचे कर्ज आरिष्ट्य हे एक प्रमुख कारण होते. कर्जबाजारी देश म्हणून १५ देशांचा समावेश होतो. या १५ देशांमध्ये ब्राझील, मेक्सीको, अर्जेंटिना, चीली, कोलंबिया, पॉलंड, फिलिपाइन्स आणि साऊथ कोरिया इत्यादी देश समाविष्ट होते. १९८८-९० मध्ये पहिल्या तीन देशांचे ५० टक्के कर्ज एकूण १०० टक्के कर्जाशी होते. तर २५ टक्के कर्ज तेल न निर्यात करणाऱ्या विकसनशिल देशांचे होते. आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्ट्याची काही उदाहरणे :

१. १९९४ मधील - मेक्सीको आरिष्ट्य
२. १९९७ मधील पूर्व आशियातील आरिष्ट्य
३. १९९८ मधील रशियन आणि ब्राझील आरिष्ट्य
४. २००१ मधील अर्जेंटीना आणि टर्किश आरिष्ट्य

वित्तीय आरिष्ट्यांची कारणे (causes of financial crisis):

१९८० आणि १९९० च्या आंतरराष्ट्रीय कर्ज आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्ट्यास जबाबदार कारणे एकत्रितरित्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. १९८० च्या कर्ज आरिष्ट्यातील कर्जबाजारी देश कर्ज परत फेडण्यासाठी असमर्थता दाखवत होते. सिंडीकेट बँकेचे कर्ज फेडण्याची तयारी या कर्जबाजारी देशांची नव्हती.

२. १९९० च्या वित्तीय आरिष्ट्यांचे त्वरीत होणारा भांडवली प्रवाह हे एक महत्वाचे कारणे होते. अल्पकालिन कर्जरोखे आणि रोखारुपी गुंतवणूकीचे प्रमाण मोठे होते.

३. देश अल्पकालीन भांडवली प्रवाहाचे धोके हाताळण्यास अपयशी ठरले.

४. देशाचे अयोग्य विनिमय धोरण कर्ज व वित्तीय आरिष्ट्यास कारणीभूत ठरले.

५. कर्जबाजारी देशांच्या बँक व्यवस्थेवर किंवा बँकीग क्षेत्रावर पुरेसे नियंत्रण नव्हते.

६. कर्जबाजारी देशांच्या विविध धोरण व अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता नव्हती.

७. पूर्व आशियातील वित्तीय उद्दिष्टांचे प्रमुख आणि महत्वाचे कारण म्हणजे तकलादू (निष्क्रिय) कंपनी प्रशासन.

जागतिक विक्रीय प्रणालीचा (आराखडा) उदय (Emerging Global Financial Architecture):

अपुऱ्या जागतिक वित्तीय आराखड्याला नव्या प्रतिमेने रेखांकित करणे गरजेचे आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय वित्तीय समुदाय आणि राष्ट्रीय अधिकारी यांच्याकडून जागतिक वित्तीय प्रणालीच्या आराखड्यातील दुर्बलता कमी करण्याच्यादृष्टीने विविध उपाय योजले गेले. संपत्तीचे समान वाटप, भरभराट व वृध्दीस उत्तेजन, वस्तू व मालमत्तांचा जलद जागतिक व्यापार, जागतिक मौद्रिक आणि वित्तीय स्थैर्य, जागतिक अस्थिर भांडवली प्रवाहाबाबत नवीन आव्हाने इत्यादीमूळ उद्दिष्ट्ये जागतिक वित्तीय आराखड्याची सातत्याने पुढे चालवण्यात आली.

अलिकडच्या काळात वित्तीय आरिष्ट्ये कमी करण्यासाठी जागतिक वित्तीय प्रणाली बाजारभिमूख अर्थव्यवस्थेला निर्यात करण्यात समाविष्ट आहे. जागतिक वित्तीय प्रणाली केंद्रस्थानी असून त्याचे सहा मुख्य मुद्दे आहेत.

१. पारदर्शक आणि स्थीर जागतिक विक्रीय प्रणाली (आरिष्ट्यांचा धोका कमीतकमी करण्यासाठी).

२. खाजगी क्षेत्रातील आरिष्ट्यांची काळजी आणि ठराव यांचा समावेश आरिष्ट्यांच्या घटनांचा कर्जभार ऋणको आणि कर्जदार यांच्यावर समान राहील.

३. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्यप्रणालीची वित्तीय स्थैर्यांसाठी प्रभावी अमंलबजावणी होण्याकडे लक्ष.

४. आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीचा विस्तार करण्यासाठी तत्व, दर्जा यामध्ये सुधारणा व पारदर्शकता आणणे.

५. वित्तीय प्रणालीचे मजबुतीकरण आणि विस्तारीकरण करणे.

६. कर्जरोखे बाजार हा वित्तीय क्षेत्रातील वित्तीय स्थैर्यासाठीचा एक महत्वाचा घटक आहे.

वैयक्तिक देशांनीसुध्दा जागतिक वित्तीय प्रणालीच्या आराखड्यामध्ये सुधारणा, दर्जा, प्रमाणीकरण, पारदर्शकता आणि वित्तीय स्थैर्य आणण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली आहेत.

१२.३ आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्ट्यांपासून घेतलेला धडा (Lessons from International financial crisis - Especially Asian Crisis)

वित्तीय आरिष्ट्यांकडून पुढील कारणांच्याबाबतीत घेतलेले धडे.

१. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांची अपूरी कर्ज सुविधा:

१९८० ते १९९० च्या दशकात व्यापार आणि वित्त यामध्ये तीव्रतेने वाढ झाली तरीसुध्दा आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांनी राष्ट्रांना किंवा देशांना त्याप्रमाणात कर्जसुविधा पुरविल्या नाहीत.

२. भांडवली प्रवाहाची अस्थिरता :

विनिमय बाजार, विनिमयदर, वित्तीय तेजीचे चक्रे इत्यादीमुळे भांडवली प्रवाहाची अस्थिरता निर्माण झाली. भांडवली प्रवाहात स्थैर्य आणण्याच्या दृष्टीने देशांनी अपेक्षा ठेवल्या होत्या.

३. वित्तीय आजारपणातून दूर आणि सरस देशांच्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल (contagious and bandwagan effects):

ज्या देशांना वित्तीय आरिष्ट्यांना सामोरे जावे लागले त्याचे दुष्परिणाम टाळणे यासाठी इतर देश प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे ज्या देशांना वित्तीय आरिष्ट्यांचा परिणाम जाणवला नाही. त्या देशांशी आंतरराष्ट्रीय व्यापार करण्याकडे इतर देशांचा कल/प्रवृत्ती असल्याचे दिसून आले.

४. अर्थव्यवस्थेवरील सामाजिक कार्य :

वित्तीय आरिष्ट्यांचा प्रतीकूल परिणाम त्या देशांच्या अर्थव्यवस्थेवरील सामाजिक खर्च वाढण्यावर झाला. साहजीकच त्यामुळे इतर देशांनी वित्तीय आरिष्ट्यांपासून कसा बचाव करता येईल ? यादृष्टीने धोरणे आखली.

५. पूर्वीच्या वित्तीय संस्थाची उणिव/कमतरता :

वित्तीय जागतिकीकरणासाठी स्वदेशी व परकीय वित्तीय संस्थांची कमतरता तसेच वित्तीय रोखारुपी गुंतवणूक ही अपूरी असल्याने वित्तीय आरिष्ट्ये जास्त प्रतिकूल परिणामकारक झाली.

६. सुयोग्य देशी धोरणांची गरज :

वित्तीय उदारीकरण परिणामकारक, मौद्रिक आणि राजकोषिय धोरण, सुयोग्य समग्रलक्षी धोरण आणि वित्तीय धोरण इत्यादी अशा सुयोग्य देशी धोरणांची नितांत गरज वित्तीय आरिष्टपासून दुर राहण्यासाठी आहे.

७. वित्तीय धोरणाच्या समन्वयाची गरज :

वित्तीय आरिष्ट्यांचा धोका कमी करण्यासाठी किंवा वित्तीय आरिष्ट्यापासून दूर राहण्यासाठी देशाच्या वित्तीय धोरणामध्ये समन्वय असावयास पाहिजे त्याचप्रमाणे आर्थिक स्वातंत्र्य वाढविण्यासाठी आर्थिक आणि वित्तीय धोरणांमध्ये सुसुत्रता आणली पाहिजे.

८. पारदर्शक धोरणांची गरज :

पारदर्शकतेचा अभाव असल्यामुळे बहुतेक राष्ट्रांना वित्तीय आरिष्ट्यांना तोंड द्यावे लागते म्हणून वित्तीय आरिष्ट्यांचा धोका कमी करण्यासाठी देशाच्या राजकीय आर्थिक वित्तीय व सामाजिक धोरणात पारदर्शकता असणे आवश्यक आहे.

९. बँकींग प्रणालीमध्ये चांगल्या पर्यवेक्षणाची गरज :

बँकीग व्यवस्थेवरील अपुऱ्या पर्यवेक्षणांमुळे (supervision) बऱ्याच देशांना वित्तीय आरिष्ट्यांचा सामना करावा लागला. म्हणून देशांनी त्यांच्या वित्तीय धोरणातील बँकीग प्रणालीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

१०. चांगले कंपनी प्रशासन :

आशियातील बऱ्याच देशांचे राजकीय धोरण पारदर्शक व प्रभावी नसल्यामुळे वित्तीय आरिष्ट्यांना सामोरे जावे लागले म्हणून वित्तीय आरिष्ट्यांची समस्या कमी करण्यासाठी कंपनी प्रशासकावर वचक असणे, सहकार्य असणे गरजेचे आहे. अर्थव्यवस्थेच्या चिरंतन वाढीसाठी चांगल्या कंपनी प्रशासनाची नितांत गरज आहे.

थोडक्यात वित्तीय आरिष्ट्यांपासून विविध देशांनी राजकीय, आर्थिक, मौद्रिक, राजकोषिय धोरणे कशी असावीत याबाबत धडे घेतले.

आपली प्रगती तपासा:

१ जागतिक वित्तीय प्रणाली म्हणजे काय ?

२. आंतरराष्ट्रीय वित्तीय संकटे म्हणजे काय सांगून त्याची विविध कारणे स्पष्ट करा.

३. आंतरराष्ट्रीय वित्तीय संकटापासून घेतलेला धडा अभ्यासा.

१२.४ जागतिक वित्तीय प्रणाली / आराखड्याच्या मर्यादा / दोष (weakness of existing Global Financial Architecture)

१९८० आणि १९९० च्या कर्ज आणि वित्तीय आरिष्ट्यांमुळे बँकीग व्यवस्था स्थिर विनिमय दर कोलमडले.

कर्ज व वित्तीय आरिष्ट्यांमुळे जागतिक वित्तीय प्रणाली ही दुर्बल झाली. परकीय भांडवल, उदारीकरण, अल्पकालीन कर्जे, अपूरे स्वदेशी वित्तीय धोरण, विनिमय बाजार आणि विनिमय दर इत्यादीमुळे जागतिक वित्तीय प्रणालीवर मर्यादा आल्या. यातील काही मर्यादा पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. वित्तीय जामीनदार

२. रोखता आरिष्ट्यामुळे बँकींग प्रणालीमध्ये भिती

३. अपूरे वित्तीय सहाय्य

४. अल्पकालीन सरकारी कर्जरचना

५. बहुपार्श्विक (Multinational Institutions) संस्थांची अपूरी धोरणे (आंतरराष्ट्रीय नाणेनिधी - अपूरी बहुपार्श्विक व्यापार व्यवस्था)

६. इतर मर्यादा (कडक मौद्रिक धोरणांचा अभाव, प्रभावी कर्जठराव यंत्रणेचा अभाव इत्यादी)

जागतिक वित्तीय प्रणालीमध्ये वरीलप्रमाणे दोष किंवा मर्यादा आहेत. या मर्यादा कमी करण्यासाठी काही परिणामकारक सुधारणा (Reforms) करणे आवश्यक आहे. जागतिक वित्तीय प्रणालीमध्ये प्रामुख्याने दोन प्रकारच्या सुधारणा सांगता येतील.

१. बहुपार्श्वीक वित्तीय संस्थांच्या सुधारणा :

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून वित्तीय एकात्मीकरण, वित्तीय स्थैर्य, विनिमय दर स्थैर्य, बहुपार्श्वीक व्यापार, विशेष उचल अधिकार (SDR) इत्यादीबाबत प्रभावीपणे सुधारणा होणे आवश्यक आहे.

२. इतर सुधारणा (Other Reforms):

कर्जबाजारी देशांनी तसेच अविकसित व विकसनशील देशांनी आपल्या देशाची देशांतर्गत धोरणे प्रभावी करणे आवश्यक आहे. तसेच अर्थव्यवस्थेमध्ये स्थुल/समग्रलक्षी धोरणे सुधारणे अत्यंत गरजेचे आहे. समग्रलक्षी धोरणातील मौद्रिक, राजकोषिय, वित्तीय आणि आर्थिक धोरणांमध्ये बदल करणे क्रमप्राप्त आहे.

आपली प्रगती तपासा

१ जागतिक वित्तीय प्रगतीच्या मर्यादा/दोष स्पष्ट करा.

१२.५ सारांश

१. पहिले महायुध्द ते आजच्या आधुनिक काळापर्यंत आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीमध्ये अनेक बदल घडून आले.

२. जागतिक वित्तीय प्रणाली म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवर वित्तीय संस्था स्थापन करणे, करार करणे, प्रलोभणे ठरविणे आणि वित्तीय धोके कसे घ्याल? त्यापासून मिळणाऱ्या फायदा-तोट्यांचे वाटप कसे कराल? हे स्पष्ट करणारा आराखडा होय.

३. आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीचा मुख्य उद्देश आर्थिक वाढ, वित्तीय स्थैर्य, वाद निवारण पध्दतीत बदल, मौद्रिक स्थैर्य इत्यादी गोष्टींना उत्तेजन देणे हा आहे.

४. आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीमध्ये १९८०मध्ये कर्ज आरिष्ट्य आणि १९९०चे वित्तीय आरिष्ट्य, तसेच चलनपेचप्रसंग इत्यादी अशी अनेक वित्तीय संकटे आली. अर्थातच त्यामुळे आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रणालीवर प्रतीकूल परिणाम झाला. या प्रणालीच्या यशस्वीतेला काही मर्यादाही आल्या त्यामुळे नविन जागतिक वित्तीय प्रणालीचा आराखडा तयार करण्याची गरज निर्माण झाली.

५. १९९०च्या आंतरराष्ट्रीय कर्जउद्दिष्टांमुळे १९९० मध्ये वित्तीय आरिष्ट्यांची तीव्रता अधिक वाढली आशियातील देशांना या कर्ज व वित्तीय आरिष्ट्यांचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागला.

६. आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्टांपासून सावधगिरी बाळगण्यासाठी इतर देशांनी धडे घेतले उदा. आर्थिक, राजकीय, वित्तीय, बँकीग, राजकोषिय धोरणामध्ये सुधारणा घडवून आणणे.

१२.६ शब्दकोश

१. International Debt Crisis - आंतरराष्ट्रीय कर्ज आरिष्ट्य / कर्ज पेचप्रसंग / कर्ज संकट (एकुण १५ देश कर्जबाजारी म्हणून ओळखले जातात.)

२. International Financial Crisis - आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्ट्य किंवा संकट (१९९०च्या दशकातील)

३. International Financial Arichitecture - जागतिक वित्तीय रचनेचा आराखडा

१२.७ प्रश्न

१. जागतिक वित्तीय प्रणाली म्हणजे काय ?

२ १९९० च्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संकटाच्या स्वरुपाचे परिक्षण करा. त्यापासून काय धडा घेतला ? (एप्रिल २००९)

३ जुना जागतिक वित्तीय आराखडा थोडक्यात स्पष्ट करा. या क्षेत्रात सुधारणांची गरज स्पष्ट करा. (ऑक्टोबर २००९)

४. १९९० च्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संकटाची कारणे परिणाम आणि उपाय स्पष्ट करा (ऑक्टोबर २००८)

५. जागतिक वित्तीय आराखड्याचा उदय स्पष्ट करा. (एप्रिल २०११)

६ जागतिक वित्तीय आराखड्याची गरज आणि सुधारणा स्पष्ट करा. (एप्रिल २०११)

*****

१३

आंतरराष्ट्रीय कर्जे

International Debt

घटक रचना

१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रस्तावना
१३.२ आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या : कारणे, परिणाम आणि उपाय
१३.३ जागतिक बँकेची भूमिका
१३.४ आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थाने : न्युर्याक आणि सिंगापूर
१३.५ सारांश
१३.६ शब्दकोश
१३.७ प्रश्नावली

१३.० उद्दिष्ट्ये

१९८० नंतर अनेक देशांना आंतरराष्ट्रीय कर्जाच्या तीव्र समस्येला तोंड द्यावे लागले. काही देशांनी कर्जाची परतफेड करण्याबाबत असमर्थतता व्यक्त केली. आंतरराष्ट्रीय कर्जाचा प्रश्न सोडविण्यासाठी अनेक अर्थतज्ज्ञांनी उपाय सूचविले त्याप्रमाणे काही प्रमाणात यशही मिळाले. या पाठात आपण आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या आणि न्युर्याक आणि सिंगापूर ह्या आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थानांचा तसेच आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या सोडविण्यात जागतिक बँकेची भूमिका अशा महत्वाच्या घटकांचा अभ्यास करणार आहोत. या पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१. आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या म्हणजे काय ? हे अभ्यासणे.

२. जागतिक बँकेची आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या सोडविण्यासाठीची भूमिका अभ्यासणे.

३. आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थाने म्हणून न्युर्याक व सिंगापूर या देशांचा अभ्यास करणे.

१३.१ प्रस्तावना

जगातल्या अनेक देशांना १९८० नंतर आंतर राष्ट्रीय कर्जाच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. १९७० मध्ये १०० अब्ज डॉलर असलेले कर्ज १९९७ मध्ये १७४४ अब्ज डॉलरपर्यंत वाढले. यापैकी २० देशांचे कर्ज ५७ टक्के होते.

जवळजवळ १५ देश कर्जबाजारी देश म्हणून ओळखले जातात. वित्तपुरवठ्याच्या रचना, खनिज तेलाच्या किंमतीत वाढ आणि देशाची अंतर्गत धोरणे ही आंतरराष्ट्रीय कर्जसमस्येला कारणीभूत घटक आहेत. जागतिक बँकेची स्थापना, भूमिका आणि कार्यप्रणाली ही आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या सोडवण्यात जबाबदार आहे. थोडक्यात आंतरराष्ट्रीय कर्जसमस्या, वित्तीय आरिष्ट्य चलनपेचप्रसंग हे जागतिक स्तरावरील महत्वाचे असे चर्चेचे मुद्दे आहेत.

१३.२ आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या - कारणे, परिणाम व उपाय

आजच्या काळात कर्जे ही वैयक्तिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरुपाची असतात. ती शासनातंर्गत असु शकतात. सरकार, व्यावसायिक, वित्तीय संस्था यांच्यामध्येही कर्जे दिली-घेतली जातात. तर आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक बँक, आशिया विकास बँक, परकिय बँका आणि परकीय भांडवल बाजार यांच्यामध्ये ही कर्जाची देवाण-घेवाण होत असते. आंतरराष्ट्रीयदृष्ट्या वार्षिक देणी आणि पुर्णदेणी यांचा समावेश होतो. ही देणी साधारणतः अमेरिकन डॉलरमध्ये फेडली जातात. विकसनशील देशांची बर्हिगत कर्जे ही विकसित देश व विकसनशील देशांना भरभराटीचे आणि अडथळयांना कारणीभूत ठरली.

१९८० नंतर अनेक देशांना आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्येला तोंड द्यावे लागले. आंतरराष्ट्रीयदृष्ट्या १५ देशांची गणना कर्जबाजारी देश म्हणून केली गेली होती. १९७० पासून सातत्याने आंतरराष्ट्रीय कर्जामध्ये वाढ होत आहे त्याची विविध कारणे पुढीलप्रमाणे.

आंतरराष्ट्रीय कर्जाची कारणे:

१. खनिज तेलाच्या किंमतीत वाढ (Oil price shock) :

खनिज तेलाच्या किंमतीतील वाढीमुळे आयातीचा खर्च प्रचंड प्रमाणात वाढला. १९७०-७१ मध्ये भारताच्या निर्यातीच्या ९ टक्के खनिजतेल व पेट्रोलजन्य पदार्थाच्या आयातीवर खर्च झाले. तर १९८०-८१ मध्ये ८० टक्के व्यापारातील तुट ५७०० कोटी रुपये इतकी वाढली यासाठी कर्ज द्यावे लागले. इतर विकसनशील देशांना खनिज तेलाच्या किंमतीतील वाढीचा जबरदस्त धक्का सहन करावा लागला (first oil is original debt prloblem).

२. वित्तपुरवठ्याची रचना:

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (IMF) निधीतून विकसनशील देशांची तुट भरुन काढणे शक्य नव्हते. त्यामुळे विकसनशील देशांनी व्यापारी तत्वावर कर्जे घेण्यास सुरुवात केली व्याजाचा जास्त दर (Rise in interest rate) आणि मुदत कमी यामुळे कर्जाचे ओझे वाढले. बदलत्या व्याजदराने कर्जे घ्यावी लागल्याने व्याजदर वाढणे,

चलनाच्या विनिमय कमी होणे आणि अनुत्पादक प्रकल्पांसाठी कर्जे वापरली जाणे असे धोके निर्माण झाले. १९८० ते १९८५ या काळात औद्योगिक अर्थव्यवस्थेत वास्तव व्याजदर ४ टक्के होते तर विकसितशील देशात १७ टक्के होते.

३. व्यापार संबंधित घटक :

विकसनशील देशांच्या संरक्षणाच्या धोरणामुळे विकासनशील देशांची निर्यात कमी झाली, बिगरजकात किंवा प्रशुल्केत्तर अडथळे (Non-Tarift Barriers) निर्माण केले गेले. १९९० मधील किंमतीच्या आधारावर १९९० मध्ये विकासनशील देशांची बिगरजकात धोरणामूळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. व्यापारशर्ती (Terms of Trade) विकसनशील देशांना प्रतिकूल झाल्या. त्यामुळे विकसनशील देशांच्या व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला.

४. देशांची अंतर्गत धोरणे (Domestic Economic Management):

विस्तारात्मक समग्रलक्षी धोरणांमुळे मागणी वाढून आणि भाववाढ होऊन व्यापारातील तुट वाढली, प्रकल्पांची अयोग्य निवड, खाजगी उद्योगांना विचार न करता कर्जे घेण्याची परवानगी, राजकीय व आर्थिक स्थर्याचा अभाव, चुकीची व्यापारीधोरणे यामुळे परकीय कर्जाचा प्रश्न बिकट होत गेला.

५. मोठ्या औद्योगिक देशातील मंदी (Recession in Major Industrial Countries):

१९८० आणि १९८२ च्या दरम्यान कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, यु.के. आणि अमेरिका या मोठ्या औद्योगिक देशांना आर्थिक मंदीचा फटका बसला. त्यामुळे विकसनशील देशांची निर्यातीपासूनचे उत्पन्न कमी झाले. तसेच वस्तूंची मागणी कमी झाल्यामुळे निर्याट घटली. या देशांच्या संरक्षणात्मक धोरणाचा विपरीत परिणाम विकसनशील देशांच्या आर्थिक विकासावर झाला. औद्योगिक देशातील मंदीचा परिणाम विकसनशील देशांच्या बहिर्गत कर्जवाढीवर झाला.

वरील कारणाव्यतिरिक्त अमेरिकन डॉलरचे वाढते वर्चस्व, अकार्यक्षम, सरकारी धोरणे, आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे दर्जात्मक कर्जअटींची धोरणे आणि देशांतर्गत आर्थिक व्यवस्थापन इत्यादी कारणे आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्येला कारणीभूत ठरली.

परिणाम :

आंतरराष्ट्रीय कर्जाच्या वाढत्या समस्येचा विपरित/प्रतिकूल परिणाम जागतीक अर्थव्यवस्थेवरचा झाला. परंतु यामध्ये प्रामुख्याने विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेवर त्यांच्या आर्थिक विकासावर, व्यापारावर त्यांचा प्रतिकूल परिणाम

झाला. औद्योगिक देशांमध्ये १९९२ मध्ये तीन देशांनी परतफेड न केल्यामुळे अमेरिकेतील ९ बँकाना अडचण निर्माण झाली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने सरकारचा खर्च कमी करणे, वेतन कमी करणे आणि पैशाचा पुरवठा कमी करणे हे उपाय देशांवर लादले गेले. या दशकात (१९८०) दक्षिण अमेरिकेच्या उत्पन्नात २० टक्के घट झाली. अमेरिकन बँकेचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

आंतरराष्ट्रीय कर्जसमस्येवर उपाय किंवा आंतरराष्ट्रीय कर्ज समस्येचे व्यवस्थापन (Solution or Management of International debt Crisis):

आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्येवर उपाय शोधण्यासाठी टप्प्याटप्प्याने व्यवस्थापन करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने पुढील उपाययोजना केल्या गेल्या.

१. कर्जफेडीचे पूनर्पत्रक (Rescheduled the debt repayment) :

१९८५ मध्ये अमेरिकन वित्तमंत्री बेकर यांनी एक योजना तयार केली. ती म्हणजे तीन वर्षात २० अब्ज डॉलरची नवी कर्जे देणे आणि कर्जदार देशात आर्थिक सुधारणा कार्यक्रम लागू करणे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने कर्जफेडीच्या तरतूदीचे एक पूर्नपत्रक तयार करावे असे सुचविले गेले.

२. पर्यायी रचना आणि कर्जाचे स्वरुप : (Nature of Debt)

१९८९ मध्ये विकसित देशांनी कर्ज माफिच्या स्वरुपात काही मदत आफ्रिकेतील गरीब देशांना द्यावी. अमेरिकन वित्तमंत्री ब्रँडी यांनी एक नविन योजना तयार केली. या योजनेनुसार जुन्या कर्जाचे रुपांतर नव्या कमी व्याजदराच्या कर्जात करणे काही अटींवर कर्जाच्या अटी शिथील करणे, २० ते २५ अब्ज डॉलरची मदत करणे इत्यादी परंतु बँकाना नवी कर्जे देण्यापेक्षा जुन्या कर्जावर व्याज व परतफेड महत्वाची वाटत होती.

आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या एक समीतीच्या मते प्रत्येक देशासाठी एक गट तयार करुन उपाययोजना सुचवावी. तोपर्यंत तात्पुरती मदत व्याज व परतफेड याबाबत करावी.

३. कर्जदार देशातील आर्थिक सुधारणा (Economic Reforms of Debtor Countries):

कर्जदार देशांनी आपल्या आर्थिक धोरणात बदल करणे आणि सुधारणा घडवून आणणे अत्यंत आवश्यक आहे. देशांतर्गत मौद्रिक, राजकोशिय, राजकीय, आर्थिक, वित्तीय धोरणांमध्ये परिणामकारक सुधारणा घडवून आणणे आंतरराष्ट्रीय कर्जाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी महत्वाचे होते.

४. कर्जफेडीबाबत धोरण (Debt Forgivness):

कर्जदार देशांना कर्जफेडीबाबत काही सवलत देणे काही शर्तीवर कर्जाच्या अटी शिथिल करणे नवीन कर्जे कमी व्याजदराने आणि सवलतीने देने जुन्या कर्जाचे रुपांतर नवीन कमी व्याजदराच्या कर्जात करणे इत्यादी कर्जफेडीबाबतची धोरणे अवलंबवावी असे सुचविले गेले.

वरील उपायांव्यतिरिक्त पुढील काही उपाय आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या टाळण्यासाठी उपयोगी ठरते.

अ. परकिय गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे.

ब. विकसनशील देशांनी पर्यटन अशा क्षेत्रांमधून निव्वळ अदृश्य प्राप्ती मिळविण्यासाठी परिणामकारक आणि योग्य असे धोरण आखणे.

क. निर्यात वाढ - कर्जदार आणि विकसनशील देशांनी निर्यात वाढीबाबतचे धोरण आखणे.

३. कार्यालयीन विकास खर्च / (संरक्षण खर्च):

हे एक आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्येचे महत्वाचे कारण होते म्हणून कर्जदार देशांनी संरक्षणावरील खर्च कमी करणे आवश्यक आहे. तसेच विकसनशील देशांनी आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्येतून सोडवणूक करण्यासाठी कर्जदार देशांकडून आणि त्याच्या धोरणांमधून योग्य मार्ग शोधला पाहिजे.

सारांश, वरील विविध उपाय योजना केल्या तरी व्याजाची थकबाकी वाढतच आहे. आंतरराष्ट्रीय कर्जाचा प्रश्न न सुटण्यात कर्जदार (४५ को) आणि धनको (creditors) सारखेच दोषी किंवा जबाबदार आहेत. कर्जदार देशांनी सुसंगत धोरणे ठेवली नाहीत, तर धनको देशांनी कर्जदार देशांकडून आयातीवर बंधने घातली त्यामुळे आंतरराष्ट्रीय कर्जाचा प्रश्न अधिकाच बिकट झाला.

आपली प्रगती तपासा

१. आंतरराष्ट्रीय कर्जसमस्या म्हणजे काय ?

२. आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्येची कारणे आणि उपाय थोडक्यात अभ्यासा.

_____

_____

_____

_____

१३.३ जागतिक बँकेची भूमिका (Role of World Bank)

विकसनशील देशांना आर्थिक मदत देऊन त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी जगातील १४८ देशांनी स्थापन केलेली बँक म्हणजे जागतिक बँक (world bank) किंवा विश्व बँक होय. या जागतिक बँकेलाच आंतरराष्ट्रीय पूर्नरचना आणि विकास बँक (International Bank for Reconstruction & Development - IBRD) असेही म्हणतात. या बँकेचे कार्यालय वाशिंग्टन येथे आहे. या बँकेमार्फत अविकसित व तिसऱ्या जगातील देशांना विकासनिधी (Devlopment Funds) दिला जातो. त्यामध्ये कर्जरुपाने व तांत्रिक सहकार्य दिले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात आर्थिक धोरणांना महत्व आहे. त्यामुळे विकसित देश अविकसित देशांवर आपला प्रभाव टाकण्यासाठी विश्वबँकेचा (World Bank) चा अवलंब करतात. तसेच कर्जे देताना विविध अटी त्यांच्यावर लादल्या जातात.

जागतिक बँक अंतर्गत पुढील आंतरराष्ट्रीय संस्थांचा समावेश केला जातो.

१. आंतरराष्ट्रीय पुर्नरचना आणि विकास बँक (IBRD)

२. आंतरराष्ट्रीय विकास संघटना (International Development Association - IDA)

३. आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ (International Financial Corporation (IFC)

४. बहुपार्श्विक गुंतवणूक हमी संस्था (MIGA)

५. गुंतवणूक वाद निवारण आंतरराष्ट्रीय केंद्र (ICSID)

जागतिक बँकेची संज्ञा म्हणून आंतरराष्ट्रीय पूनर्रचना आणि बँक (IBRD) आणि आंतरराष्ट्रीय विकास संघटना (IDA) म्हणून केला जातो. आज जागतिक बँकेचे १८५ इतके सदस्य आहेत.

जागतिक बँकेची भूमिका (Role of World Bank) :

जागतिक बँकेच्या स्थापनेचा मुख्य उद्देश्य म्हणजे अविकसित देशांचा आर्थिक विकास घडवून आणण्यास मदत करणे, दारिद्रय कमी करणे, गुंतवणूकीद्वारे आर्थिक वृध्दीस उत्तेजन देणे हा आहे. जागतिक बँकेची एक विकास संस्था म्हणून पुढील भूमिका महत्वाची आहे.

१. आर्थिक व सामाजिक विकास (Economic & Social Development) :

जागतिक बँक एक वित्तीय स्त्रोत म्हणून अत्यंत उपयोगी आहे. अविकसित देशातील शाश्वत व समान वृध्दी घडवून आणण्याच्या दृष्टीने दारिद्रयाची समस्या कमी करण्यासाठी आणि राहणीमान दर्जा उंचावण्यासाठी जागतिक बँक महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे.

अविकसित देशांना नेहमीच भांडवलाची समस्या भेडसावत असते म्हणून जागतिक बँक परकीय गुंतवणूकीला उत्तेजन देण्यासाठी प्रयत्नशील आहे. अविकसीत किंवा विकासनशील देशामध्ये मुलभूत आणि पायाभूत सुविधांचा विकास घडवून आणण्यासाठी सर्वतोपरी मदत किंवा सहकार्य करते म्हणूनच अविकसित देशांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यात जागतिक बँकेची भूमिका महत्वाची आहे.

२. दारिद्रयाची समस्या कमी करण्यासाठी प्रयत्न (Poverty Reduction) :

बहुतेक सर्वच अविकसित व विकसनशील देशांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दारिद्रय या जुनाट समस्येला तोंड द्यावे लागत आहे. जागतिक बँक अविकसित देशातील दारिद्रयाची समस्या सोडविण्यासाठी महत्वाच्या आधार सुविधा देत असते. अशा देशातील निम्न व मध्यम वर्गीय लोकांचे उत्पन्न वाढवण्यासाठी भांडवल पुरविते. चिरतंन आर्थिक विकासासाठी आर्थिक, सामाजिक, वित्त, मौद्रिक आणि राजकोशिय धोरणांसाठी भांडवलाची सोय उपलब्ध करुन देते. अविकसित देशातील दारिद्रय निवारण हे जागतिक बँकेचे एक प्रमुख उद्दिष्ट्य आहे.

३. कर्जमुक्तीय पाठिंबा (Supports debt Relief) :

१९८० पासून आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या सोडविण्यासाठी एक उपाय म्हणून जागतिक बँक कर्जमुक्तीसाठी लक्ष केंद्रित करुन समर्थपणे पाठिंबा देत आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) अवजड उपकारबध्द गरिब देश (Heavily Indebted Poor Countries) (HIPC) प्रारंभीपासूनच सुरु केले आहे. २००२-२०२६ या दरम्यान कर्जदार देशांना बर्हिर्गत कर्जसमस्येपासून मुक्तता (relief) मिळेल. अशी अपेक्षा एच.आय.पी.सी. (HIPC) ची आहे.

४. सुखी-समृध्द विकासाचे ध्येय मिळवणे (Achievments of Millenium Development Goal's - MDG's) :

आज जागतिक बँक सुखी-समृध्द विकास या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करत आहे. १८९ राष्ट्रांनी या ध्येयाकरीता स्वाक्षरी केल्या आहेत. यामध्ये सामान्यपणे प्रमुख आठ (८) ध्येयांचा किंवा उद्दिष्टांचा समावेश आहे.

१. दारिद्रय निवारण
२. वैश्विक प्राथमिक शिक्षण
३. समानता आणि महिला सक्षमीकरण (Women Empowerment)
४. बाल मृत्युदर कमी करणे (Reduce Child Mortality)
५. आरोग्य सुधारणा (Improve matemal Health)
६. मलेरिया, एच.आय.व्ही./(AIDS) यावर नियंत्रण
७. शाश्वत पर्यावरणाची हमी
८. विकासासाठी जागतिक भागीदारीचा विकास

२०१० पर्यंत सुख-समुध्दी विकासाचे उद्दिष्ट्य पूर्ण करण्याचे किंवा मिळवण्याचे जागतिक बँकेचे ध्येय आहे. त्यासाठी जागतिक बँकेने अविकसित देशांच्या सर्वांगिण विकासासाठी पुढील शोधले आहेत.

अ. वैश्विक प्राथमिक शिक्षण मिळवणे.

ब. एच.आय.व्ही आणि एड्स (H.I.V. आणि AIDS) शी मुकाबला करणे.

क. आरोग्य कार्यक्रमांना निधी पुरविणे.

ड. जैवविविधतेचे संवर्धन

५. भ्रष्टाचारविरोधी सामना (Fight Against Corruption) :

अविकसित किंवा विकसनशील देशांत भ्रष्टाचाराची समस्या बळावत असते. भ्रष्टाचार विरोधी सामना करण्यासाठी जागतिक बँक महत्वाची भूमिका बजावत आहे.

६. संघर्षमय देशांना मदत :

३९ संघर्षमय देशांना जागतिक बँक पाठिंबा देत आहे. या देशांना संघर्षापासून किंवा युध्दापासून दूर राहण्यासाठी शिक्षण-प्रशिक्षण सोय उपलब्ध करुन देणे असे उपक्रम जागतिक बँकेने राबविले आहेत.

थोडक्यात, जागतिक बँक अविकसित देशांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय अशा सर्वांगीण विकासासाठी भूमिका बजावत आहे तरीही भविष्यकालात विकसनशील देशांच्या विकासाबाबत नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. जागतिक बँकेचे कार्यक्रम योजना, उपक्रम ह्या देशाच्या आर्थिक विकासासाठी (चिरंतन) दारिद्रय निर्मूलनासाठी आणि मानवी विकासासाठी आहेत हे महत्वाचे आहे.

आपली प्रगती तपासा.

१ जागतिक बँकेची भूमिका थोडक्यात अभ्यासा.

१३.४ आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थाने (International Financial Hub) :

आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रे ही गुंतवणूकदारांना जागतिक पातळीवर वित्तीय सेवा पुरवितात. मोठ्या प्रमाणावर स्थानिक आणि परकीय दलालांना विविधपरीने सेवा घेण्यासाठी आकर्षित करतात. एका बाजूने जागतिक बहुराष्ट्रीय कंपन्यांनसारख्या वित्तीय संस्था यांनी वित्तीय कार्यवाहीसाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रांची प्रादेशिक कोषागार कार्यालये स्थापन केली आहेत.

विशिष्ट हेतू धारण किंवा डावपेच या अनुषंगाने वित्तीय केंद्रे स्थापन केली जावीत. बँकींग, परकीय चलन, विमा इत्यादी संदर्भात वित्तीय संस्थांची दमदार वित्तीय उत्पादने असावयास हवी तसेच चांगले कंपनी प्रशासन प्रगतीशील नियम व्यावसायिक वित्तीय संस्थांच्या व्यावसायिक व्यवहारांसाठी असणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रे ही प्रादेशिक आणि जागतिक संधीची प्रवेशद्वारे असणे आवश्यक आहे. वित्तीय क्षेत्रातील कामगारवर्ग हा बुध्दीवंत व हुशार असणे त्यांना शिक्षण-प्रशिक्षण सुविधा पुरविल्या जातात. वित्तीय केंद्रे, पायाभूत नियम, वित्तीय स्पर्धकांची कार्यक्षमता आणि प्रोत्साहन वाढवण्यासाठी पायाभूत नियम असणे आवश्यक आहे. तसेच एकात्मता आणि स्थैर्य आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रामुळे शक्य होऊ शकते. आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थानांमध्ये पूढील गोष्टी अंतर्भूत आहेत.

१. वित्तीय क्षेत्रात कार्यक्षमता आणि स्थैर्य यांच्यात समतोल.

२. धोरणात्मक पर्यवेक्षण आणि व्यवस्थापनाची गरज.

३. वित्तीय क्षेत्रातील बदलते स्पर्धात्मक धोरण.

जगभर अनेक आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रे आहेत. लंडन आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्राचा प्रथम नंबर तर न्युर्याक वित्तीय केंद्राचा दुसरा क्रमांक आहे. हाँगकाँग आणि सिंगापूर ही सुध्दा लोकप्रिय आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रे आहेत. भविष्यात भारतातील मुंबई हे सुध्दा आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र म्हणून पाहिले जाईल.

न्यूयॉर्क आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र (International Financial Hub, New York):

न्युयॉर्क हे एक महत्वाचे आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र आहे. जगातील हे दुसरे मोठे महत्वाचे वित्तीय केंद्र आहे. जागतिक वित्तीय क्षेत्रात हे केंद्र महत्वाची भूमिका बजावत आहे. जगामध्ये न्युर्याक वित्तीय केंद्राची उच्चदर्शक बाजारपेठ व गुंतवणूक बँका आहेत, व्यापारी आणि अर्थतज्ञांचा न्युयॉर्क वित्तीय केंद्रासाठी वैश्विक आर्थिक कल वळलेला आहे.

न्युर्याक शेअर बाजार (New York Stock Exchange - NYSE) हा अमेरिकेच्या शेअर बाजारापेक्षा जुना आहे. न्युयॉर्क शेअर बाजार हा जागतिक वित्तीय व्यवसाय, बँकीग व्यवसाय आणि विमा याबाबत यशस्वी आहे. न्यूयॉर्क वित्तीय केंद्र हे न्यूयॉर्क शेअर बाजारासाठी मुख्य (वर्चस्व) नसून ते अमेरिकन शेअर बाजारासाठीही मुख्य आहे. त्याचप्रमाणे न्युर्याक हे व्यापारी आणि वस्तूविनिमय (NYMEX) ह्यासाठीही प्रमुख आहे. न्युयॉर्क हे सर्वात महत्वाचे परकिय विनीमय, शेअर बाजार आणि व्यापारासाठी यशस्वी वित्तीय केंद्र आहे.

न्युयॉर्क केंद्र हे आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी खुले आहे. न्युयॉर्क हे वित्तीय व्यवसायाचे शहर असून तेथे अनेक आंतरराष्ट्रीय बँका कार्यरत आहेत. न्युयॉर्कला

चांगल्या दर्जाचे वित्तीय जाळे आहे. त्यामुळे विश्वसनीय माहितीचा प्रवाह जलदगतीने होऊ शकतो. कंपनी संस्कृती आणि सामाजिक संस्थामध्ये चांगले संबंध कसे निर्माण होतील, व्यावसायिक क्षेत्र आणि शासकीय संस्था एकत्रितपणे कसे कार्य करतील. याबाबत माहिती पुरविली जाते. थोडक्यात न्युयॉर्कमध्ये वित्तीय संस्थांचे जाळे उत्तम प्रकारे निर्माण झाले आहे.

मागील काही वर्षात जागतिकीकरणाच्या नियमामुळे जागतिकीकरणाचे तंत्रज्ञान अनुसरले आणि २००२ पासून भांडवल बाजाराचे जागतिकीकरण झाले. जागतिक अर्थव्यवस्थेत ९५ टक्के मुक्त भांडवली प्रवाहाच्या साधनांची नवनिर्मिती झाली. अर्थव्यवस्थेच्या सीमारेषा किंवा मर्यादा पुसून टाकणे, अर्थव्यवस्थेला नैसर्गिक लाभ प्राप्त होणे यादृष्टीने न्यूयॉर्क प्रमुख वित्तीय केंद्र म्हणून ओळखले जाते.

द्रव्य किंवा तरलता विषयक खात्यावरील वित्तीय गडबड गोंधळाला वित्तीय क्षेत्राला तोंड द्यावे लागत आहे. वित्तीय प्रणालीच्या कार्यक्षमतेतील विश्वासासह तरलता वृध्दी. धनको आणि ऋणको यांच्यामधील निधीच्या प्रवाहात एकसंधता आणि पध्दतशीरपणा असणे, वित्तीय प्रगतीत विश्वास, तरलता भरभराट किंवा विश्वासातील बिघाड अशा समस्या अमेरिकेतील वित्तीय क्षेत्रातील सब प्राईम कर्जामूळे (Sub Prime Loans) मुळे उद्‌भवल्या होत्या. त्याचा अमेरिकेच्या वित्तीय क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम झाला. मुबलक तरलता यामुळे झालेली गडबड, अस्थिर वित्तीय तरलता आणि उच्च व्यवहार यामुळे वित्तीय क्षेत्र महत्वाच्या फायद्यांपासून वंचित राहिले.

वित्तीय क्षेत्राची बदलती रचना वित्तीय संस्थाची व्यावसायिक प्रतीमानाची वाटचाल, निधीचा दर्जा तज्ञांचा गट इत्यादीमध्ये बदल झाल्यामुळे सध्याचे न्यूयॉर्क हे महत्वाचे आंतरराष्ट्रीय केंद्र झाले आहे.

सिंगापूर : आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र (International Financial Hub- Singapore):

सिंगापूर हे एक महत्वपूर्ण आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र असून जगातल्या सर्व गुंतवणूकदारांना वित्तीय सेवा पुरविते. ६०० पेक्षा जास्त स्थानिक आणि परकीय प्रतिनिधींना वित्तीय सेवा घेण्यासाठी आकर्षित करतात. जे प्रतिनिधी जगातल्या मोठ्या वित्तीय संस्था ते छोट्या बँका तसेच बहुराष्ट्रीय कंपन्या अंतर्भूत (MNC's) ५०० चांगल्या कंपन्यांनी त्यांची प्रादेशिक कोषागरे कार्यालये सिंगापूरमध्ये स्थापन केली आहेत.

आज सिंगापूर हे एक महत्वाचे संपत्ती व्यवस्थापन केंद्रच नाहीतर जगातील चौथ्या क्रमांकाचे अतिशय मोठे असे परकीय विनिमय व्यापार केंद्र (foreign exchange trading centre) आहे. विश्लेषक आणि भाष्यकार किंवा टिकाकारांच्या मते सिंगापूर हे एक ताकतीचे आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र असून वित्तीय संस्थांकडून ते अधिकृत झाले आहे.

सिंगापूरमध्ये ७०० पेक्षा जास्त स्थानिक आणि परकीय वित्तीय संस्था स्थापन झाल्या आहेत. या वित्तीय संस्थांद्वारे मोठ्या विस्ताराने वित्तीय उत्पादने सिंगापूर मध्ये घेतली जात आहे. यामध्ये व्यापारी वित्त, परकीय चलन, अनुजात उत्पादन (Derivatives Product) मालमत्ता व्यवस्थापन, कर्ज किंवा व्यापारी मंडळाचा संघ, कर्जरोखे व्यापार, वित्तीय सल्लागार सेवा आणि विशेष विमा सेवा इत्यादींचा समावेश होतो. सद्यपरिस्थितीत सिंगापूरच्या वित्तीय क्षेत्रातील वित्तीय संस्था त्यांच्या योगदानाबाबत दोलायमान झाल्या आहेत. मागिल चार वर्षात सातत्याने वित्तीय क्षेत्राची वाढ विशेषतः बँकिग, परकीय विनिमय आणि विमा या क्षेत्रात होत आहे.

सिंगापूर एक महत्वाचे आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र म्हणून महत्वाची वैशिष्ट्ये (Important Features Making Singapore an Important Financian Hub):

१. धोरणात्मक स्थानीकीकरण (Strategic Location):

एशियन अर्थव्यवस्थेच्या तेजीच्या मध्यात सिंगापूरचे धोरणात्मक दृष्ट्या वित्तीय केंद्र म्हणून स्थानीकीकरण झाले. हे भौगोलिक स्थानिकीकरण दक्षिणपूर्व आशियातील ५०० लाख लोकांच्या बाजारपेठेत झाले आहे. सिंगापूर हे एकमेव वित्तीय धोरणात्मक ठिकाण असून अत्याधूनिक दळणवळण आणि संपर्क साधनांची परवानगी वित्तीय संस्थांना त्यांच्या दैनंदिन व्यवहारासाठी मिळाली आहे. २४ तास व्यापार आणि परकीय विनिमय केंद्र आहे. उद्योजक मंडळ, शिस्तबध्द रचना, स्पर्धात्मकता आणि त्याबरोबर सखोल ज्ञान असलेले तज्ञ इ. अशा उत्कृष्ठ पायाभूत सुविधा सिंगापूर या वित्तीय केंद्रात आहेत. प्रादेशिक आणि जागतिक संधी प्राप्त करुन देणारे हे एकमेव आंतरराष्ट्रीय पातळीचे वित्तीय केंद्र आहे. त्याचप्रमाणे जागतिक संबंध जागतिक श्रेणीचे दळणवळण किंवा संपर्कसाधने असल्यामुळे प्रादेशिक आणि जागतिक प्रक्रियेसाठी सिंगापूरची एक वित्तीय स्थानीकीकरण म्हणून निवड योग्य आहे.

२. मजबुत बँकीग (Strong Banking):

सिंगांपूरमध्ये बँकीगक्षेत्र अतिशय विकसित आहे. त्याचप्रमाणे कर्जे आणि ठेवी या पारंपारिक कार्याबरोबर आधुनिकदृष्ट्या कार्पोरेट आणि गुंतवणूक बँकींग सेवांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होत आहे. सिंगापूरमधील बँकिंग क्षेत्रात ४०० पेक्षा जास्त परकीय बँका कार्यरत आहेत. या बँकाचा विस्तार प्रामुख्याने आशिया पॅसिफिक प्रदेशामध्ये झालेला आहे. एशियन संयुक्त किंवा सामुदायिक रमणीय भुप्रदेशाबरोबर धोक्यांचीही आहे.

३. एशियन डॉलर मार्केट (Asian Dollar Market):

सिंगापूर हे एक एशियन डॉलर मार्केट आहे. आंतरराष्ट्रीय चलनातील व्यवहारासाठी आंतरबँक बाजार आहे.

४. परकिय विनिमय बाजार (Foreign Exchange Market) :

सिंगापूर हे जगातील चौथे मोठे परकीय विनिमय व्यापाराचे केंद्र आहे. २००५ मध्ये दरदिवशी २४२ कोटी डॉलर इतकी सरासरी उलाढाल परकिय विनिमयाची होत होती.

५. अनुजात आणि वस्तुबाजार (Derivatives & Commodity Market) :

सिंगापूर हे आशियातील दुसरे मोठे अनुजात किंवा विकलज बाजारपेठ आहे. तसेच जगातील तिसरे मोठे तेलशुद्धीकरण (Oilrefining - Commodity Market) केंद्र आहे. तेल आणि रबर यांच्या किंमती आणि व्यापारासाठी एशिया पॅसीफिक केंद्र आहे.

६. मालमत्ता व्यवस्थापन (Assets Management):

१९९८ पासून सिंगापूर या केंद्राने ५ वेळा वित्तीय क्षेत्राद्वारे मालमत्ता व्यवस्थापन केले आहे. स्थुल आर्थिक मुलभूत विकासासाठी राजकीय स्थैर्य, वाहतूक, निपक्षपाती समतोल रचना, वित्तीय क्षेत्रावरील उच्च दर्जाचे पर्यवेक्षण आणि नियमन आणि संपत्ती व्यवस्थापन उपक्रमासाठी चांगल्या पर्यावरणाची सुविधा इत्यादीबाबत सिंगापूर अत्यंत विकसित आहे. १०० पेक्षा जास्त निधी व्यवस्थापन दलाल आहेत.

७. मजबुत विमाक्षेत्र (Strong Insurance Sector)

सिंगापूरमध्ये मजबुत किंवा अत्यंत विकसित असे विमाक्षेत्र आहे. ६१ विमाकंपन्या आहेत. सिंगापूरमध्ये २५ उच्च पूर्णविमागुंतवणूक केंद्रे आहेत. तसेच विमादलालांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

८. वित्तीय क्षेत्रात सखोल बुद्धीवतांचे मंडळ (Deep Financial Talent Pool) :

सिंगापूरने, सिंगापूरमध्ये काम करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीच्या बुद्धीवंतांना प्रवेश देण्यासाठी खुले धोरण स्विकारलेले आहे. अमेरिकेनंतर सिंगापूर हे याबाबत दुसऱ्या क्रमांकाचे केंद्र २००५ मध्ये होते. बुध्दीवतांच्या या मंडळाचा परिणाम उत्कृष्ट शिक्षण पध्दती, मजबुत शिक्षण प्रणाली आणि कार्यक्रम तसेच दर्जात्मक कोर्ससाठी प्रशिक्षण सुविधाही पूरविल्या जातात.

सिंगापूर मौद्रिक अधिकारी मंडळाने घेतलेला पुढाकार किंवा सुखात (Monetary Authority Singapore - MAS)

वित्तीय क्षेत्रातील प्रगतीसाठी सिंगापूरने काही महत्वाची पाऊले उचलली आहेत. २००१ मध्ये उत्कृष्ट प्रशिक्षण आणि वित्तीय क्षेत्र विकास निधीसाठी वित्तीय संपर्क स्थापन करण्याचा निर्णय घेतला, वित्तीय क्षेत्र विकास निधीमध्ये तीन महत्वाच्या मनुष्यबळ विकास योजना होत्या. २००० मध्ये मरिल लिंच मरक्यूरी मालमत्ता व्यवस्थापन (Merill Lunch Mercury Asset Management-MLM) आणि डॉइश मालमत्ता व्यवस्थापन (Deutsche Asset Management) सन्मानित झाले. MAS ने विविध उपाय उदारी कर्जबाजाराबाबत ही केले आहेत.

सारांश, सिंगापूर हे उच्च दर्जाचे आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र असून वित्तीय क्षेत्राच्या पायाभूत विकासामध्ये सिंगापूरचा सर्वात जास्त सहभाग आहे. उत्कृष्ठ पायाभूत सुविधा, वाहतूक, दळणवळण, संपर्क साधने, व्यवसायाचे उत्कृष्ट ठिकाण यामुळे सिंगापूर हे स्पर्धेच्या राष्ट्राच्या यादीत उच्चश्रेणीचे केंद्र आहे.

आपली प्रगती तपासा

१. आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थाने म्हणजे काय ?

२. न्युयॉर्क - आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र - अभ्यासा.

३. सिंगापूर - आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र - थोडक्यात अभ्यासा.

१३.५ सारांश

१. १९८० नंतर नेक राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्येला तोंड द्यावे लागले. १९७० पासुन आंतरराष्ट्रीय कर्जामध्ये सातत्याने वाढ होत आहे. १५ देशांचा कर्जबाजारी देश म्हणून समावेश केला जातो.

२. खनिजतेलाच्या किंमतीत वाढ, वित्तपुरवठ्याची रचना, व्यापारीसंबंधी घटक, अमेरिकासारख्या मोठ्या देशातील मंदी इत्यादी कारणांमुळे आंतरराष्ट्रीय कर्जाची समस्या तीव्र झाली कर्जबाजारी देश म्हणून ब्राझिल, मेक्सिको, अर्जेंटिना, चिली, कोलंबिया, पॉलंड, फिलिपाईन्स आणि दक्षिण कोरिया हे देश यादीत होते. तसेच डॉलरचा वाढता दर, भांडवली तुटवडा, देशांतर्गत धोरणे आणि व्यवस्थापन, परकिय विनिमयातील अंतर इत्यादी कारणेही आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्येला जबाबदार आहेत.

३. आंतरराष्ट्रीय कर्जसमस्येचे प्रतिकूल परिणाम जागतिक अर्थ व्यवस्थेवर झाले त्याचा सर्वात परिणाम विकसनशील देशांवरही झाला. त्यामुळे विकसनशील देशांनी आंतरराष्ट्रीय कर्जसमस्येपासून आपल्या देशाचे कसे संरक्षण होईल ?

यासाठी परकीय विनिमय व्यापारसंबंधीत घटक, देशातंर्गत धोरणे आणि व्यवस्थापन इत्यादीबाबत महत्वाचे धोरण अवलंबविले.

४. आंतरराष्ट्रीय कर्जसमस्येवर कर्जफेडीचे पूर्वपत्रक, पर्यायी रचना आणि कर्जाचे स्वरुप, कर्जदार देशातील आर्थिक सुधारणा, निर्यातीत वाढ इत्यादी उपाययोजना सुचविण्यात आल्या.

५. विकसनशील देशांना आर्थिक मदत देऊन त्यांचा आर्थिक सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकास (सर्वांगिण विकास) घडवून आणण्याच्या दृष्टीने १४८ देशांनी स्थापन केलेली बँक म्हणजे जागतिक बँक किंवा विश्व बँक होय. या जागतिक बँकेलाच आंतरराष्ट्रीय पूर्नरचना आणि विकास बँक असे म्हणतात.

६. जागतिक वित्तीय व्यवस्थेत मजबुत आणि सक्षम वित्तीय केंद्रस्थाने म्हणून न्यूयॉर्क आणि सिंगापूर या देशांचा उल्लेख केला जातो. भविष्यात भारतातील मुंबई ह्या शहराकडेही एक मजबुत आणि विकसित वित्तीय केंद्रस्थान म्हणून पाहिले जाईल.

न्यूयॉर्क व सिंगांपूर या देशांचा भांडवली बाजार, नाणेबाजार तसेच शेअर बाजार अतिशय विकसित आहे. वित्तीय रचनेतील पारदर्शकता, लवचिक धोरण, प्रगततंत्रज्ञान, बुध्दीवंत मनुष्यबळ व्यावसायिक अधिकारी वर्ग इत्यादीमुळे न्युयॉर्क आणि सिंगापूर हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील वित्तीय केंद्र मानली जातात.

सिंगापूर हे आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थान तेथील प्रगत तंत्रज्ञान, उत्तम दळणवळण व संपर्कसाधने, प्रगत विमाक्षेत्र, वस्तुबाजार, अनुजानपत्र बाजार, भांडवलबाजार, हुशार व व्यावसायिक बुध्दीवंतांचे मंडळ, एशियन डॉलर मार्केट इत्यादीमुळे अत्यंत विकसित झाले आहे.

१३.६ शब्दकोश

१. International Debt Crisis:

आंतरराष्ट्रीय कर्जआरिष्ट्य किंवा आंतरराष्ट्रीय कर्जसमस्या किंवा आंतरराष्ट्रीय पेचप्रसंग.

२. International Financial Hub:

आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थाने न्युयॉर्क आणि सिंगापूर ही दोन प्रगत वित्तीय केंद्रे आहेत. भारतातील मुंबई आंतरराष्ट्रीय पातळीचे वित्तीय केंद्रे होण्याच्या मार्गावर आहे. अशा वित्तीय केंद्रामध्ये विमा, बँक, शेअरबाजार व भांडवलबाजार, परकीय विनिमय इत्यांदिचा विकास झपाट्याने होत असतो.

३. World Bank - जागतिक किंवा विश्व बँक :

अप्रगत देशांच्या सर्वांगिन विकासाच्या दृष्टीने स्थापित झालेली बँक ही बँक आंतरराष्ट्रीय पूर्नरचना आणि विकास बँक (IBRD) म्हणूनही ओळखली जाते.

१३.७ प्रश्न

१. आंतरराष्ट्रीय कर्जसमस्या म्हणजे काय सांगुन त्याची कारणे आणि परिणाम स्पष्ट करा.

२. विकसशील देशांच्या कर्जसमस्येची चर्चा करा आणि आंतरराष्ट्रीय कर्जआरिष्ट्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी उपाय सुचवा. (ऑक्टोबर २००९)

३. आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्या आणि व्यवस्थापन स्पष्ट करा. (एप्रिल २०१०)

४. १९९०च्या आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्ट्यांच्या स्वरुपाचे परिक्षण करा. यापासून काय धडा घेतला आहे. (एप्रिल २००९)

५. सिंगापूर या आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थानाची विविध वैशिष्ट्यांची चर्चा करा.(एप्रिल

६. सिंगापूर या आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्राचे प्रमुख घटक कोणते ? (एप्रिल २०१०)

७. न्यूयॉर्क-आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्राची विविध वैशिष्ट्ये स्पष्ट करा. (२००९)

*****

१४

प्रकरण - ८

जागतिक व्यापारातील वादविवाद

Emerging Issues in Global Trade

घटक रचना

१४.० उद्दिष्ट्ये

१४.१ प्रस्तावना

१४.२ जकाती व जकातीचे परिणाम

१४.३ नवीन संरक्षणवाद : बिगर जकात बंधने

१४.४ सारांश

१४.५ शब्दकोश

१४.६ प्रश्न

१४.० उद्दिष्ट्ये

बिगर जकात अडथळे म्हणजे जकात किंवा आयातीवर कर न वापरता अन्य मार्गानी आयातीवर निर्बंध घालणे. बिगरजकात निर्बंधामुळे निर्यात देशांचे नुकसान होवू शकते, तसेच आयातदार देशांनाही वस्तु जास्त दराने (किंमतीने) खरेदी कराव्या लागतात. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा जलदगतीने विस्तार घडून येण्याच्या दृष्टीने नविन संरक्षणवाद ही व्यापारनीती देशांनी अवलंबवावी असेही सूचविले जात आहे. बिगर जकात बंधने आणि नविन संरक्षणवाद ह्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्याच बाजू आहेत. प्रस्तुत पाठाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. जकाती व बिगरजकाती बंधने ह्या संकल्पना अभ्यासणे.

२. नविन संरक्षणवाद ही संकल्पना आंतरराष्ट्रीय व्यापारातील युक्तीवाद संदर्भात अभ्यासणे.

३. जागतिक व्यापारातील जकाती, बिगर जकाती बंधने आणि नविन संरक्षणवाद याविषयीची मतमतांतरे जाणून घेणे.

१४.१ प्रस्तावना

आयातीवर लादण्यात येणाऱ्या करारास जकात असे म्हणतात. आयात शुल्कालाही 'जकात' असे समानार्थी शब्दाने संबोधले जाते. जकाती धन (+) किंवा ऋण (-) स्वरुपाच्या असतात. पर्याप्त जकात (optimum tariff) सीमाशुल्क

सिध्दांत ही जकातीचेच प्रमुख भाग आहेत. बिगरजकात अडथळे किंवा निर्बंध ही आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्वाची बाब मानली जाते. म्हणून बिगरजकात बंधने म्हणजे आयातीवर कर न लादता अन्य मार्गानी आयातीवर कर लादणे होय. स्वेच्छा निर्यात बंधने वस्तूकरार, अर्थसहाय्य, निर्यात अनुदान इत्यादी घटकांचा समावेश बिगरजकात बंधनांमध्ये केला जातो. देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आयातीवर विविध मार्गानी नियंत्रण बसवले जाते. म्हणून संरक्षणवाद किंवा संरक्षित व्यावार देशी उद्योगांच्या दृष्टीने अनुकूल असतो.

१४.२ जकाती म्हणजे काय?

संरक्षित व्यापार धोरणांतर्गत देशांतर्गत उद्योगांना संरक्षण देण्याचे जे उपाय आहेत त्यात जकातीचे स्थान महत्वाचे आहे. व्यापक अर्थाने जकातींमध्ये आयात जकाती, निर्यात जकाती व पारगमन शुल्क (transit duty) म्हणजे एका देशातील वस्तू दुसऱ्या देशातील सीमतून जेव्हा नेली जाते तेव्हा आकारला जाणारा कर या सर्वांचा समावेश होतो. त्यापैकी पारगमन शुल्काचे महत्व आता संपुष्टात आले आहे. निर्यात जकाती कमी प्रमाणात व बहुतांशी महसुली उत्पन्नात वाढ करण्याच्या हेतूने लावल्या जातात. त्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीकोनातून आयात जकातींना सर्वाधिक महत्व आहे व त्यांचाच उल्लेख सर्वसाधारणपणे जकाती असा केला जातो.

जेव्हा वस्तू देशाच्या राजकीय सीमा ओलांडतात तेव्हा व्यापारी धोरणाचे एक साधन म्हणून जे शुल्क लादले जाते त्या शुल्काचा एक प्रकार म्हणजे जकाती होय. जकाती आयात आणि निर्यात अशा दोन्ही वस्तूंवर लादल्या जातात. तथापि सर्वसाधारणपणे देशाचे सरकार त्यांच्या आयातीवरच जकाती लादत असते. त्यामुळे जकाती आणि आयात शुल्क यांचा एकमेकांऐवजी वापर करण्यात येतो. ''परदेशात उत्पादित होणाऱ्या वस्तु की ज्या शुल्क लादणाऱ्या देशांमध्ये येणार आहेत त्या शुल्कालाच 'आयात शुल्क' असे म्हणतात''.

जकातीचे परिणाम :

आयात जकातींची दोन प्राथमिक उद्दिष्टे म्हणजे सरकारला कररुपी उत्पन्न आणि देशी उद्योगांचे परकीय स्पर्धेपासून संरक्षण, म्हणजे उत्पन्न परिणाम आणि संरक्षण परिणाम हे दोन प्रमुख परिणाम. ह्या शिवाय जकातीचे उपभोग, रोजगार, किंमती इत्यादीवरही महत्वाचे परिणाम अनुभवास येतात. सारांश, आयात जकाती अर्थव्यवस्थेवर दूरगामी स्वरुपाचे अनेक परिणाम करतात.

इतर कोणत्याही कराप्रमाणे जकातीमुळे संबंधीत वस्तूच्या किंमतीत वाढ होते. ही वाढ म्हणजे किंमत परिणाम होय. आयातदर जकातीचे पूर्ण ओझे ग्राहकांवर टाकू शकत असेल तर वस्तूची किंमत कराच्या रकमेएवढी वाढेल. इतर वेळी किंमत काही प्रमाणात वाढेल. संबंधीत वस्तूच्या मागणीचे स्वरुप कसे आहे ह्यावरुन किंमत परिणामाचे आकारमान अवलंबून असते.

देशी उद्योगांना संरक्षण हे आयात जकातींचे एक प्रमुख उद्दिष्ट असते. जकातीनंतर आयात किंमती वाढून आयात कमी होते व त्यामुळे देशीबाजारपेठ देशी उत्पादकांना प्राप्त होते. हाच आयात जकातींचा संरक्षण परिणाम होय म्हणजे जकात्तोतर परिस्थितीत देशीमालाच्या पुरवठ्यातील वाढीला संरक्षण परिणाम असे म्हटले जाते.

बऱ्याचवेळा आयात जकाती सार्वजनिक उत्पन्न मिळवण्यासाठी वापरल्या जातात. ज्याप्रमाणे विक्रीकर, उत्पादनशुल्क इत्यादी अप्रत्यक्ष करांकडे सार्वजनिक उत्पन्नांचे साधन म्हणून पाहिले जाते. त्याप्रमाणे आयात जकातींपासूनही सरकारला उत्पन्न प्राप्त होऊ शकते.

जकातींचा उपभोगावर निश्चितपणे प्रतिकूल परिणाम होतो. म्हणजे उपभोगात घट होते. जकातींमुळे उपभाक्त्यांना तोटा सहन करावा लागतो.

आयात जकातीमुळे व्यापार अटी देशाला अनुकूल करुन घेता येतात. आयात जकातींमुळे वस्तूंची देशांतर्गत मागणी कमी होते. अनुकूल किंवा प्रतिकूल व्यापार शर्ती वस्तूच्या मागणी पुरवठ्याच्या लवचिकतेवर अवलंबून असतात.

व्यवहारतोल प्रतिकूल असणारे देश तूट भरुन काढण्यासाठी जकातींचा वापर करतात. जकातींमुळे व्यापार शर्ती अनूकूल होतात तसेच आयाती कमी झाल्यामुळे व्यापारतोलातील तूट भरुन निघते.

आयात जकातींमुळे देशाची कमी होणारी आयातींची मागणी देशांतर्गत वस्तूंसाठी संक्रमित होते. परकीय स्पर्धेपासून संरक्षण होऊन स्वदेशी उद्योगांचा विकास होतो. त्यांच्या उत्पादनात वाढ होते व उत्पादनाबरोबर रोजगार व उत्पन्नात वाढ होते.

वरील परिणामांपैकी किंमतपरिणाम, संरक्षण परिणाम, उपभोग परिणाम, महसूल परिणाम व पुर्नवाटणी परिणाम खालीलप्रमाणे आकृतीच्या साहाय्याने दाखविता येतात.



आकृती क्र. १४.१

वरील आकृतीत मम - स्वदेशी मागणी वक्र पप - स्वदेशी पुरवठा वक्र
अप आणि पप, - किंमत परिणाम

▭ मबसन, - महसूल परिणाम

▽ प, पअम - पुर्नवाटणी परिणाम

△ न,सत - उपभोक्ताच्या संतोषाधिक्याचे निव्वळ नुकसान

आपली प्रगती तपासा

१. जकात म्हणजे काय ? तिचे विविध परिणाम अभ्यासा .

१४.३ नवीन संरक्षणवाद

बिगरजकात बंधने (फायदे /तोटे) :

अलिकडे अमेरिकेसारखे विकसीत देश जकाती खेरीज इतर मार्गानी इतर देशांकडून आयात रोखण्याचा प्रयत्न करित आहेत. ज्यांच्या उत्पादनात श्रमाचा वापर जास्त होतो आणि ज्यांच्या बाबतीत अल्पविकसीत देशात खर्चाच्या दृष्टीने निर्यातीस अनुकूल परिस्थिती असते अशा वस्तुंच्या बाबतीत विकसित देश असे मार्ग वापरतात.

त्याबरोबर अन्य विकसीत देशांवरही या प्रकारचे निर्बंध लादतात. त्यामुळे जकातीत कपात केल्याचे फायदे नाहिसे होतात.

शासनाने देशांतर्गत वस्तूला अनूकूल आणि परकीय वस्तूला प्रतिबंधक अशी जी प्रशासकीय उपाययोजना केलेली असते, ती म्हणजे जकात व्यतिरिक्त अडथळे होय. या उपाय योजनांमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे येतात. अलीकडच्या काळात आयात नियंत्रणासाठी हा उपाय केला जातो.

यामध्ये दोन प्रकार सांगता येतील:

१) विकसनशील देश परकीय चलन सुरक्षित राखण्यासाठी किंवा आर्थिक विकासाचे धोरण म्हणून अवलंबवितात यात आयात परवाने, आयातीवर संख्यात्मक निर्बंध, परकीय चलन नियम व एकाच संस्थेमार्फत आयात यांचा समावेश होतो.

२) विकसित देश विविध मार्गानी आयातीवर निर्बंध घालतात ज्या उद्योगांची स्पर्धाक्षमता कमी झाली आहे किंवा जोडउद्योग राजकिय दृष्टीने संवेदनशील ठरतात त्यांना संरक्षण देणे हा उद्देश असतो. स्वेच्छेने निर्यातीवर निर्बंध घालणे आंतरराष्ट्रीय करारातून निर्बंध उदा. वस्त्रांच्या व्यापारांवरील निर्बंध, तांत्रिक स्वरुपाचे निर्बंध असे उपाय या प्रकारात मोडतात.

परिणाम : बिगरजकात निर्बंधामुळे निर्यातदार देशांचे नुकसान होतेच परंतु आयातदार देशांना वस्तु महाग घ्याव्या लागतात. सरकारचे जकातीचे उत्पन्न बूडते. साधनसामग्रीची वाटणी अकार्यक्षमतेने होते तसेच स्पर्धात्मकता कमी होते.

बिगरजकात निर्बंधाचे विविध मार्ग (various sources of non-tariff barriers):

१) ऐच्छीक निर्यात निर्बंध (voluntary export tariff) :

दोन किंवा जास्त देशात विशिष्ट वस्तूंची निर्यात कमी करण्याचे करार. उदा : वस्त्रांच्या निर्यातीबद्दल करार. जपान व आग्नेय आशियातील देशांशी करार करुन अमेरिकाने आयात कमी केली आहे. यास ऐच्छीक निर्यात निर्बंध (voluntary export tariff) असे म्हणतात.

२) प्रशासकीय निर्बंध (Administrative Tariff) :

आंतरराष्ट्रीय करारात काही परिस्थितीत आयातीवर निर्बंध घालता येतात. सुरक्षितता, आरोग्य, पर्यावरण व ग्राहक संरक्षण यासाठी मानके (standards) तयार करता येतात. विशेषत: विकसनशील देशांविरुध्द केला जातो. जकातीचे नियम वारंवार बदलून आयात कमी केली जाते. सरकारने स्वत: आयात करणे परकीय चलन नियंत्रणे असेही मार्ग आयात कमी करण्यासाठी वापरले जातात. काही देश निर्यात करणाऱ्या देशांतील आपल्या वकिलातींच्या प्रमाणपत्राचा आग्रह धरतात. परवानापध्दत

सरकारने स्वतः आयात करणे हे मार्गही या प्रकारचे आहेत. कर्जविषयक धोरणात जास्त व्याज आकारुन किंवा आयातदारांना जास्त पैसा स्वतः खर्च करावयास लावून आयात कमी करता येते. परकिय चलननियंत्रणे हा आणखी एक मार्ग सांगता येईल.

३) आयातीवर संख्यात्मक नियंत्रणे:

आयातीवर संख्यात्मक नियंत्रणे लादली जातात. किती आयात करावयाची त्याचे प्रमाण ठरवून दिले जाते. याचे अनेक प्रकार आहेत. एका मर्यादेपर्यंत आयातीवर कर नसतो किंवा कमी दराने असतो. यापेक्षा जास्त आयात झाल्यास जास्त दराने कर आकारला जातो. एक देश एकतर्फी आयातीचे प्रमाण ठरवतो. दोन देश कराराने आयातीचे प्रमाण ठरवतात. उत्पादकांना उत्पादनासाठी कच्चा माल काही प्रमाणात देशात खरेदी करावयास लावला जातो.

संख्यात्मक निर्बंधाचे पुढील परिणाम होतात :

अ) देशाचा व्यवहारतोल सुधारतो.

ब) देशांतील किंमती वाढतात.

क) ग्राहकांना आपली खरेदी कमी करावी लागते.

ड) देशातील उद्योगांना संरक्षण मिळून त्यांचा विस्तार होतो.

इ) किंमती वाढल्याने उत्पन्न ग्राहकांकडून उत्पादकांकडे वळविले जाते.

फ) सरकार परवान्यातून आयात कमी करीत असल्याने सरकारला आयात परवान्यांच्या फी चे उत्पन्न मिळते.

४) अवपुंजन (Dumping) :

अवपूंजन म्हणजे वस्तूच्या उत्पादन खर्चापेक्षा कमी किंमतीला वस्तूची निर्यात करणे. एखादा देश अशा पध्दतीने वस्तूची निर्यात करीत असेल तर त्यामुळे दुसऱ्या देशाचे नुकसान होते. अशी निर्यात ही आंतरराष्ट्रीय व्यापारातील अनुचित प्रथा आहे. सर्वच देश अशा मार्गानी आपली निर्यात वाढवू लागले तर आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मूलभूत तत्व (जो देश वस्तू कमी खर्चात तयार करतो त्याच्याकडून इतर देशांनी वस्तू विकत घ्यावी) दूर ठेवले जाते आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातून साधनसामुग्रीचा जास्त उचित वापर साधणे अशक्य बनते. यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार करारात अवपूंजन अंतर्गत विक्रीवर उपाय योजण्यास इतर देशांना परवानगी दिली जाते. सामान्यपणे अशा परिस्थितीत दुसरे देश आयातकर (जकात) लादून अशा कारवाईला प्रत्युत्तर देऊ शकतात. जागतिक व्यापार संघटना अस्तित्वात आल्यामुळे याबाबत नियम केले गेले आणि सर्वसामान्य तत्वे ठरविली गेली त्यांना मूल्यावपाती (अवपुंजन) विक्रीविरोधी संहिता असे म्हणतात.

५. अर्थसाह्य (Subsidy):

निर्यात वाढविणे किंवा आयातीला प्रतिबंध करणे यासाठी दुसरा मार्ग म्हणजे अर्थसाह्य. ज्या देशात शेतीचे उत्पादन वाढवून शेतमालासाठी उत्पादकांना जास्त किंमत देणे शक्य ठरावे म्हणून सरकार शेतीला अर्थसाह्य देते आणि ग्राहकाला शेतमाल कमी किंमतीत उपलब्ध करुन देते. आयात शेतमाल स्वस्त असला तर अर्थसहाय्यामुळे तो देशात येऊन उत्पादकांवर अनिष्ट परिणाम होत नाही. याचप्रमाणे निर्यातीसाठी अर्थसाह्य (export subsidy) देऊन उत्पादनखर्चापेक्षा कमी किंमतीला वस्तू परदेशात विकणे शक्य केले जाते. अशी प्रथाही योग्य प्रथा असल्यामुळे अर्थसाह्यविरोधी संहिता जागतिक व्यापार संघटनेच्या करारात सामील केली गेली आहे. अर्थसाह्य मर्यादित ठेवावे आणि त्याचा वापर अपवादात्मक परिस्थितीत केला जावा हे सर्वसाधारण तत्व मान्य केले गेले आहे. विविध देशांचे हितसंबंध निरनिराळे असल्याकारणाने वादाचे मुद्दे निर्माण झाले. यातून मार्ग काढण्यासाठी वाटाघाटी सुरु असताना अवपुंजन (dumping) आणि अर्थसाह्य (subsidy) हे महत्वाचे मुद्दे होते.

मूल्यावपाती किंवा अवपुंजनाच्या माध्यमातून विक्री करणारे देश आणि दुसऱ्या देशाला अर्थसाह्य देणारे देश दुसऱ्या देशांना उत्पादनाबाबत अडचणी निर्माण करतात. तथापि, अवपुंजन व अर्थसाह्य याबाबत धोरण आखताना सर्वांना सारखे नियम लावता काम नये. विकसनशील देशांच्या हिताच्या दृष्टीने नियम असावेत. थोडक्यात कोणत्या परिस्थितीत अवपुंजन आणि अर्थसाह्य ह्या दोन्ही कृती चालु शकतील आणि कोणत्या परिस्थितीत दंडणीय ठरु शकतील याबाबत सर्वसामान्य निर्णय करण्यासाठी व्यापारी वाटाघाटीत त्यांचे महत्व आहे.

अर्थसाह्य किती व कसे द्यावे हे ठरविण्यासाठी परदेशी मागणीच्या लवचिकपणाचा योग्य अंदाज घेणे आवश्यक असते. नाहीतर अर्थसाह्याचा अपेक्षित परिणाम होत नाही. अर्थसाह्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापार आणि किंमतीवर कसा होतो हे पुढील आकृतीत दर्शविले आहे.



आकृती क्र. १४.२अर्थसाह्य

वरिल आकृतीत एका विशिष्ट वस्तूचा जागतिक मागणीवक्र दर्शविलेला आहे. 'पप' हा स्वदेशी पुरवठा वक्र असून सरकार स्वदेशी उद्योगाला प्रती एकक 'कख' अर्थसाह्य देऊ शकते. किंवा 'कखगघ' या चतूर्भुजाएवढे अर्थसाह्य देऊ शकते. अर्थसाह्य किंमत 'कखगघ' या क्षेत्रफळाइतकी द्यावी लागते. त्यामुळेच स्वदेशी किंमत जागतिक पातळीपर्यंत खाली येऊ शकते आणि देशाची स्पर्धात्मक शक्ती वाढू शकते. हा विचार निर्यात प्रोत्साहनाच्या (export promotion) दृष्टीने केला आहे. आंतरराष्ट्रीय संघटनेच्या नियमानुसार निर्यात अर्थसाह्य केलेल्या कोणत्याही बदलाची माहिती त्या संस्थेकडे पाठविणे बंधनकारक आहे. अर्थसाह्य हा संरक्षण प्रकार आता सर्वत्र रुढ झाला आहे. अनेक देशात वस्तूंच्या निर्यात वाढीपेक्षा सेवांच्या निर्यातवाढीसाठी यामाध्यमाचा प्रभावीपणे उपयोग केला जातो.

६. स्वेच्छा निर्यात बंधने : (Voluntary Export Restraints)

स्वेच्छा निर्यात बंधने म्हणजे जकात किंवा आयातीवरील कर न वापरता अन्य मार्गाने आयातीवर निर्बंध घालणे, बिगरजकात निर्बंधाचे ऐच्छिक निर्यात बंधन असे विविध मार्ग आहेत. यापैकी स्वेच्छा निर्यात बंधने हा महत्वाचा स्रोत आहे. दोन किंवा जास्त देशात विशिष्ट वस्तूची निर्यात कमी करण्याचे करार होतात. वस्त्रांच्या निर्यातीबद्दल करार हे स्वेच्छा निर्यात बंधनाचे एक उत्तम उदाहरण आहे. जपान व आग्नेय आशियातील देशांशी अमेरिकेने करार करुन आयात कमी केली आहे. अशा करारांनाच ऐच्छिक निर्यात बंधने (voluntery export restraints) असे म्हणतात. वरील बिगरजकात निर्बंधाचे दोन प्रकार पडतात.

१) विकसनशील देश परकीय चलन सुरक्षित राखण्यासाठी किंवा आर्थिक विकासाचे धोरण म्हणून वापरतात. यामध्ये आयात परवाने, आयात कोटा, परकीय चलन आणि एकाच संस्थेमार्फत आयात इत्यादींचा समावेश होतो.

२) विकसित देश विविध मार्गांनी आयातीवर निर्बंध लादतात. स्वेच्छेने निर्यातीवर निर्बंध लादणे, आंतरराष्ट्रीय करारातून निर्बंध लादणे, तांत्रिक स्वरुपाचे निर्बंध आणि आयात वस्तूंच्या किंमतीचे परिक्षण करुन आयात निर्बंधासाठी त्याचा वापर करणे.

७. आयात कोटा किंवा कोटापध्दत (Quotas / Import Quota):

प्रशुल्क किंवा जकातीप्रमाणेच कोटा हा प्रकार व्यापरावर नियंत्रण ठेवण्याचा महत्वाचा प्रकार आहे. आयात किंवा निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंचे प्रमाण निर्धारित करण्याच्या पध्दतीस कोटा किंवा वाटा असे म्हणतात. कोटापध्दत ही एक संरक्षणपध्दत (protection method) म्हणून वापरली जाते. देशी उद्योगांना संरक्षण सध्या दुर्मिळ अशा परकीय चलनाचा पर्याप्त करुन दुरुपयोग टाळण्यासाठी कोटापध्दत स्विकारण्यात आली आहे.

दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक युरोपियन देशांनी व्यवहारतोलात सुधारणा घडवून आणण्यासाठी 'आयात कोटा' पध्दतीचा वापर केला. आयात कोटा प्रमाणेच निर्यात कोटापध्दतीचाही संरक्षण साधन म्हणून वापर केला जातो. ज्या वस्तूंचे उत्पादन देशात गरजेच्या मानाने कमी होते अशा वस्तूंची इतर देशात निर्यात होऊ नये म्हणून निर्यात कोटा ठरवून दिला जातो.

कोटापध्दतीमुळे जरी आयात आणि निर्यात कोट्याचा समावेश होत असला तरी संरक्षण साधन म्हणून आयात कोट्यालाच महत्वाचे स्थान आहे. एका विशिष्ट काळात एखाद्या विशिष्ट वस्तूचे विशिष्ट परिमाण आयात करणे यास आयात कोटा किंवा कोटा (Import Quota / Quota) असे म्हणतात.

जकातकोटा, एकपक्षीय आयातकोटा, द्विपक्षीय आयात कोटा, संमिश्र कोटा आणि आयात परवाना असे कोट्याचे विविध प्रकार आहेत. आयात कोटा पध्दतीचे वस्तूंच्या किंमतीवर, उपभोगावर, सरकारच्या महसुलावर, व्यवहारतोलावर, व्यापारशर्तीवर अनुकूल आणि प्रतिकूल असे परिणाम होत असतात.

विकसनशील देशांच्या व्यापारावर परिणाम (Effects on Developing Coujntries Trade):

विकसनशील देशांना पारंपारिक वस्तूंची निर्यात वाढविण्यात इतर विकसनशील देशांच्या वाढत्या स्पर्धेला तोंड द्यावे लागते. यातून निर्यात वस्तूंच्या किंमती घसरत गेल्या. तसेच वस्तूच्या मागणी-पुरवठ्यात ही चढउतार होऊ लागले. त्यामुळेही किंमतीत घट होऊ लागली.

विकसित देशांनी अवलंबलेली संरक्षणाची भूमिका ही एक मोठी अडचण विकसिनशील देशांना जाणवते. आयातीसाठी आरोग्य व स्वच्छता, विकसनशील देशातील निर्यात उद्योगांत कामगारांची परिस्थिती अशा मुद्यांवरुन विकसित देश अडथळे निर्माण करु शकतात.

आयात होणाऱ्या वस्तूंचे उत्पादन देशात होण्यासाठी विकसित देश देशातंर्गत उत्पादकांना अर्थसाह्य किंवा इतर मदत देत असल्यामुळे विकसनशील देशांकडून होणारी निर्यात अडविली जाते. प्रसंगी कराराने संख्यात्मक निर्बंध (Quantitative Restriction) आयातीवर लादले जातात. यातून मार्ग काढण्यासाठी विकसनशील देशांना अपारंपारिक वस्तूची निर्यात वाढविणे हा एक मार्ग असू शकतो. तथापि, विकसित देशांतील अशा प्रस्थापित उद्योगांशी स्पर्धा करावी लागते. विकसनशील देश प्रतिकूल परिस्थितीत उत्पादन घेत असल्यामुळे त्यांचा उत्पादनखर्च जास्त येतो. त्यामुळे विकसित देशही औद्योगिक वस्तुची निर्यात करण्यास तयार नसतात. विकसित देशांकडून भांडवली वस्तूची आयात, उत्पादनदर्जा, किंमत इत्यादीमुळे विकसित देशांच्यापेक्षा विकसनशिल देशांच्या व्यापारावर प्रतिकूल परिणाम होतो. व्यापारातून लाभ मिळविण्यासाठी, व्यापारशर्ती अनुकूल करुन घेण्यासाठी विकसित देश प्रशुल्केतर

बंधने (non tariff barriers) घालतात. याचाही प्रतिकूल परिणाम विकसनशील देशांच्या व्यापारावर होतो.

थोडक्यात, व्यापारातील लाभ सर्व देशांच्या बाबतीत सारखाच होतो असे नाही. ज्या देशांशी व्यापार करण्यास फारसा वाव नसेल त्यांच्याशी व्यापार कमी करण्यासाठी आणि ज्या देशांशी व्यापारातून जास्त लाभ मिळत असेल त्या देशांकडे व्यापार वळवण्यासाठी बिगरजकात बंधनाचा वापर करणे सोयीचे असते. प्रशुल्कांचा परिणाम सर्व देशांच्या व्यापारावर होतो. विशिष्ट देशांविरुध्द बिगर जकात निर्बंध व इतर देशांशी खुला व्यापार हे धोरण वापरल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारापासून जास्त लाभ मिळवणे शक्य असते.

आपली प्रगती तपासा :

१. बिगरजकात बंधनाचे विविध मार्ग अभ्यासा.

१४.४ सारांश (summary)

१. आंतरराष्ट्रीय व्यापारात जकाती, जकातीकेतर बंधने किंवा बिगर जकात बंधने, संरक्षण धोरण आणि व्यापारनिती इत्यादी संकल्पना महत्वाच्या आहेत. यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारापासून जास्त लाभ मिळविता येतात.

२. आयातीवर लादण्यात येणाऱ्या करारास जकात असे म्हणतात तसेच जकातीला आयात शुल्क असेही समान अर्थाने संबोधले जाते. जकाती ह्या धन किंवा ऋण प्रकारच्या असतात.

३. जकातीचे उत्पन्नावर, किंमतीवर, उपभोगावर देशाच्या व्यवहारतोलावर, सरकारच्या महसुलावर, संरक्षणावर अनुकूल व प्रतिकूल परिणाम होत असतात.

४. नविन संरक्षणवाद किंवा धोरण हा आंतरराष्ट्रीय व्यापारातील एक महत्वाचा घटक आहे. देशाचा व्यवहारतोल सुधारण्यासाठी, व्यापारशर्ती अनुकूल करुन घेण्यासाठी, आयात कमी करुन निर्यात वाढण्यासाठी सरंक्षणधोरणातंर्गत बिगरजकात निर्बंधाचा वापर देशांकडून केला जातो.

५. बिगरजकात निर्बंध म्हणजे जकात किंवा आयातीवर कर न वापरता अन्य मार्गानी आयातीवर निर्बंध घालणे होय. बिगर जकात निर्बंध यालाच बिगर जकात अडथळे किंवा प्रशुल्केतर निर्बंध असेही म्हणतात.

६. बिगर जकातीबंधनाचे प्रशासकीय निर्बंध, स्वेच्छा निर्यात बंधने, आयात परवाना, कोटा पध्दत, अवपूंजन किंवा मूल्यावपाती विक्री, अर्थसहाय्य आणि आयातीवर संख्यात्मक बंधने असे विविध मार्ग आहेत.

७. बिगरजकात बंधनाचे अनुकूल व प्रतिकूल असे परिणाम देशाच्या व्यापारावर होतात. विशेषतः विकसित देशांना बिगरजकात बंधनामुळे व्यापारासाठी जास्त फायदा होतो तर विकसनशील देशांना या संरक्षणधोरणांचा (बिगरजकात अडथळ्यांचा) विशेष फायदा होत नाही.

८. थोडक्यात संरक्षण धोरणामधील प्रशुल्केतर अडथळयांचा वापर विशिष्ट देशांविरुध्द तर खुला व्यापार इतर देशांशी करण्याचे धोरण अवलंबणे आवश्यक ठरते.

१४.५ शब्दकोश

Tariff - जकात किंवा आयात शुल्क

Non Tariff Barriers (NTB) - बिगर जकात बंधने / अडथळे यालाच प्रशुल्केतर निर्बंध असेही म्हणतात.

Quota or Import Quota - कोटा किंवा वाटा, या पध्दतीलाच आयातकोटा असे म्हणतात.

New Protetionnism - नविन संरक्षणवाद - देशाने आयात कीम करुन निर्यात वाढवण्यासाठी किंवा देशाचे आर्थिक धोरण ठरविण्यासाठी वापरलेले सरंक्षण धोरण, बिगरजकान बंधने हा संरक्षण धोरणाचा प्रकार आहे.

Subsidy - अर्थसहाय्य, देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी केलेली (शासनाने) आर्थिक मदत.

Voluntary Export Restreints - स्वेच्छा निर्यात बंधने किंवा ऐच्छिक निर्यात बंधने.

१४.६ प्रश्न

१. जकात म्हणजे काय ? जकातीचे विविध परिणाम अभ्यासा.

२. बिगर जकात बंधने म्हणे काय ? थोडक्यात स्पष्ट करा (एप्रिल २००९).

३. बिगर जकात बंधनाचे विविध मार्ग कोणते ?

४. बिगर जकात बंधनाचा विकसनशील देशांच्या आयात-निर्यातीवरील परिणाम स्पष्ट करा (एप्रिल २०१०).

*****

१५

व्यापारनीतीची व्यूहरचना आणि परिणाम

[Strategic Trade Policy & It's Implications]

घटक रचना

१५.० उद्दिष्ट्ये

१५.१ प्रस्तावना

१५.२ व्यापारनीती : व्यूहरचना आणि परिणाम

१५.३ भारत आणि चीनमधील जागतिकीकरणाच्या समस्या आणि अपेक्षा

१५.४ सारांश

१५.५ शब्दकोश

१५.६ प्रश्न

१५.० उद्दिष्ट्ये

परकीय व्यापार आपल्या देशाला अनुकूल ठरण्यासाठी आयात कमी व निर्यात वाढवणे आवश्यक असते. त्यासाठी व्यापाराची व्यूहरचना अशा पध्दतीने करणे आवश्यक असते. अनुकूल व्यापारनीतीमुळे देशाचा व्यवहारोल सुधारतो तसेच अंतर्गत व बहिर्गत बचतीही निर्माण होण्यास मदत होते. या पाठात आपण व्यापारनीती, व्यापार व्यूहरचना आणि त्यामुळे होणारे संभाव्य परिणाम. तसेच चीन व भारत यांच्यातील आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास करणार आहोत.

या पाठाची ठळक उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१. व्यापारनीती अर्थ स्वरुप समजावून घेणे.

२. व्यापारी व्यूहरचना - धोरणे व परिणाम अभ्यासणे.

३. भारत आणि चिनमधील जागतिकीकरणाच्या संदर्भातील आंतरराष्ट्रीय संबंधाचा थोडक्यात आढावा घेणे.

१५.१ प्रस्तावना

आंतरराष्ट्रीय व्यापार हा स्वतंत्र राजकीय अस्तित्व असलेल्या राष्ट्रांमध्ये होत असतो. आंतरराष्ट्रीय व्यवहार कसे पार पाडावेत यासंबंधी प्रत्येक देश स्वतंत्रपणे धोरण आखत असतो. ही धोरणे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दोन्ही बाजू (आयात व निर्यात संबंधी) विचारात घेवून ठरविली जातात. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विविध

गोष्टींविषयी सरकारणे घेतलेल्या विविध धोरणात्मक निर्णयाचा एकत्रितरित्या उल्लेख व्यापारविषयक धोरण असा केला जातो. आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरणांमध्ये मुक्त व्यापार (free trade) आणि संरक्षित व्यापारधोरणाचा (protected trade policy) समावेश असतो. जागतिकीकरणाचा चीन व भारत या विकसनदेशांचा आंतरराष्ट्रीय व्यवहारावर कसा प्रभाव पडू शकतो. त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या व या समस्या सोडवण्यासाठी दोन्ही देशांनी परस्परांकडून गृहित धरलेल्या अपेक्षा पूर्णत्वाला नेण्यासाठी कोणती व्यापारी धोरणे आखावित हे महत्वाचे ठरते.

१५.२ व्यापारनीती (Trade Policy)

परकीय व्यापाराला कोणत्याही अर्थव्यवस्थेत आणि खास करुन विकसनशील अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान असते. परकीय व्यापाराच्या संदर्भात म्हणजेच आयात आणि निर्यातीच्या संदर्भात मूल्य (value), आकरमान (volume), रचना (composition) आणि दिशा (direction) ह्या बाजूंचा विचार केला जातो.

आधुनिक अर्थव्यवस्थेत आंतरराष्ट्रीय व्यापारात अतिशय महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. तरी व्यापार कसा असावा, सरकारचे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण कसे असावे याविषयी अर्थतज्ञांमध्ये दोन परस्पर विरोधी विचार-प्रवाह दिसून येतात. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ व्यापार सर्व देशांसाठी खुला किंवा मुक्त असावा, सरकारची कुठलीही बंधने असू नयेत असे मत व्यक्त करुन मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन करतात तर आधुनिक व राष्ट्रवादी विचाराचे अर्थशास्त्रज्ञ व्यापारावर सरकारचे नियंत्रण असले पाहिजे असे स्पष्ट करुन संरक्षित व्यापाराच्या धोरणाचा पुरस्कार करतात.

आयात व निर्यात यांचे आकारमान, रचना, दिशा व व्यवस्थापन यासंबंधी सरकारने घेतलेले निर्णय म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण होय. आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक धोरणासंबंधी दोन दृष्टिकोन मांडले जातात. १) मुक्त व्यापार व २) संरक्षित व्यापार धोरण .

आर्थिक राष्ट्रवादाची भावना प्रबळ ठरल्याने, खुल्या व्यापाराचे कितीही फायदे असले तरी सर्व देश संरक्षित व्यापार धोरणाकडे झुकले आहेत. देशांतर्गत उद्योगाच्या संरक्षणासाठी सरकारचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील हस्तक्षेप या धोरणाने अपरिहार्य व योग्य मानला आहे.

व्यापाराची व्युहरचना : (Strategic Trade Policy)

परकीय व्यापार आपल्या देशाला अनूकूल ठरण्यासाठी आयात कमी व निर्यात वाढविणे आवश्यक असते, त्यासाठी व्यापाराची व्युहरचना अशा पध्दतीने करणे आवश्यक असते. आयात जास्त व निर्यात कमी अशी परिस्थिती निर्माण झाल्यास व्यवहारतोल प्रतिकूल होतो. आयात-निर्यातीमधील दरी भरुन काढण्यासाठी विकसनशील देश निर्यातीस उत्तेजन व आयात पर्यायीकरण यावर भर देतात. निर्यात

उत्तेजनास बाह्य बचती अथवा डावपेच / व्युहरचना असे म्हणतात. आयात पर्यायीकरणास अंतर्गत बचती अथवा डावपेच / व्युहरचना म्हणतात. आयात पर्यायीकरण व निर्यात प्रोत्साहन या दोन्ही मार्गानी विकसनशील देश आपल्या परकिय व्यापारात वाढ घडवून आणतात.

अ. आयात पर्यायीकरण : (Import Substitution)

ज्या वस्तूंची आपण आयात करतो, त्या आयात वस्तूंनाच स्वदेशात पर्यायी वस्तू तयार करणे म्हणजे आयात पर्यायीकरण होय.

आयात पर्यायीकरणाकरिता देशाची उत्पादनक्षमता कृषी व औद्योगिक क्षेत्रात वाढायला हवी. जर देशातील एकूण पुरवठ्यात आयातीचे प्रमाण पूर्वीपेक्षा घटत असेल तर आयात पर्यायीकरण धोरण यशस्वी झाले आहे असे म्हणता येईल.

आयात पर्यायीकरणाचे दोन प्रमुख उद्देश :

१) देशाच्या अर्थव्यवस्थेला आत्मनिर्भर करण्यासाठी देशाच्या औद्योकिकरणाला प्रोत्साहन देणे.

२) विदेशी चलनाची बचत करणे.

आयात पर्यायीकरणात उपभोग नियमन, देशांतर्गत उत्पादनावर भर, स्वदेशी तंत्राज्ञानाचा विकास यावर भर देण्यात येतो. परकीय व्यापाराची व्युहरचना म्हणून या मार्गांचा अवलंब केला जातो.

ब. निर्यात उत्तेजन / निर्यात संवर्धन (Export Promotion):

विकसित देशात बाजारपेठेची पाहणी करुन अपेक्षित बाजाराचे स्वरुप समजावून घेतले जाते. प्राथमिक वस्तूंची प्रक्रिया आणि दर्जा सुधारुन पारंपारिक निर्यात वाढविली जाते. अपारंपारीक वस्तूंच्या निर्यातीला उत्तेजन दिले जाते.

निर्यात वाढविण्यासाठी पुढील मार्गांचा अवलंब केला जातो.

१) शेती, खाणकाम व औद्योगिक सेवा इ. क्षेत्रांची निश्चिती केली जाते.

२) उपभोगातील वाढ मर्यादित केली जाते.

३) अंतर्गत किंमत पातळी स्थिर ठेवणे.

४) निर्यातक्षम उद्योगांचे आधुनिकीकरण करणे व अनुदान देणे.

५) निर्यातीतील बंधने शिथिल करणे.

६) निर्यातक्षम उद्योगांना आयात औद्योगिक कच्चा माल वापरण्यास सवलत देणे.

७) निर्यातक्षम वस्तूंच्या किंमती स्थीर ठेवणे.

८) व्यापारी कंपन्या परदेशात स्थापन करणे.

९) औद्योगिक व व्यापारी प्रदर्शन परदेशात भरवणे.

१०) निर्यात प्रोत्साहन मंडळे स्थापन करणे.

व्यापारनितीचे परिणाम :

१) १९८० पासून भारतीय व्यापाराच्या दिशेत लक्षणीय बदल आढळतात.

२) अमेरिका आणि पश्चिम युरोप वरील अवास्तव अवलंबित्वात लक्षणीय घट.

३) पूर्व युरोपिअन समाजवादी राष्ट्रांबरोबरच्या व्यापार संबंधात वाढ.

४) रशियन महासत्तेच्या विघटनामुळे पश्चिम युरोप आणि अमेरीका ह्यांचे भारतीय परकीय व्यापारातील महत्त्व वाढताना आढळत आहे.

५) २००४-०५ मध्ये पश्चिम युरोप आणि अमेरीका यांचा भारतीय निर्यातीमधील वाटा ४४% तर आयातीमधील १५ % होता.

६) आशिया आणि आफ्रिका खंडातील विकसनशील देशांचा भारतीय परकीय व्यापारात वाढता सहभाग. भारताची निर्यात १५.२ % वरुन (८७-८८) ३७ % (२००४-०५) वाढली आहे. ह्यात आशियन राष्ट्रांचा वाटा लक्षणीय आहे.

७) भारताशी व्यापार करणाऱ्या देशांची संख्या वाढत आहे. अनेक नवीन देशांचा, विशेषतः विकसनशील देशांचा सहभाग वाढत आहे. आपले शेजारी राष्ट्रे भारताबरोबर व्यापार वाढवण्यास उत्सूक.

८) विशिष्ट देशांची मक्तेदारी कमी होत आहे.

ह्यांच्या परिणाम स्वरुप परकीय व्यापारातील दिशा बदलाच्या संदर्भात आपली वाटचाल प्रगतीच्या योग्य दिशेने होत आहे.

व्यापारनितीच्या व्युहरचनेचे महत्व (Significance of Strategic Trade Policy) :

आंतरराष्ट्रीय व्यापारात समाविष्ट होणाऱ्या वस्तूंच्या बाबतीत आकारमान (किती), घटना (काय) आणि दिशा (कोठे अथवा कोठून) ह्या विषयी देशाचे धोरण म्हणजेच व्यापारनीती होय.

स्मिथ, रिकार्डो आणि त्यांचे सनातनवादी अनुयायी इत्यादींचा मुक्त व्यापारनीतीच्या समाजहितकारी स्वरुपावर पूर्ण विश्वास होता.

''मुक्त व्यापार धोरण म्हणजे, कोणत्याही बाह्य हस्तक्षेपाविना, आयात-निर्यातीत नैसर्गिक स्वातंत्र्य''.

मुक्त व्यापारनीतीमुळे मक्तेदारीची निर्मिती आणि वाढ ह्यावर परिणामकारक आळा घालता येतो. आंतरराष्ट्रीय व्यापारावर कोणतेही निर्बंध नसल्याने कोणत्याही देशाला, लाभदायक वस्तूंचे उत्पादन आणि निर्यात ह्यावर लक्ष केंद्रित करता येते.

आयात-निर्यातीवरील सर्व कृत्रिम बंधने दूर करुन मुक्त व्यापारनीती निर्विवादपणे पूर्ण स्पर्धेच्या विकासाला हातभार लावते. पूर्ण स्पर्धेमुळे जागतिक बाजारपेठेची संख्यात्मक तसेच गुणात्मक वाढ होते. मुक्त व्यापारनीतीचा हा मोठा फायदा आहे.

मुक्त व्यापार धोरणामुळे जगातील विविध राष्ट्रांमधील परस्परावलंबन वाढीस लागून त्याचा अनुकूल परिणाम जागतिक सहकार्य आणि समजुतदारपणा ह्यावर होतो.

मुक्त व्यापारनितीमुळे जागतीक पातळीवर उपभोगाच्या कक्षा रुंदावतात. मुक्त व्यापाराअभावी जगातल्या कित्येक उपभोक्त्यांना अनेक वस्तूंच्या उपभोगापासून वंचित रहावे लागते किंवा अवास्तव किंमत मोजावी लागते.

मुक्त व्यापार नीतीमुळे अविकसित, अल्पविकसित तसेच विकसनशील राष्ट्रांना अगणित लाभ प्राप्त होतात. ह्यामध्ये भांडवल, आधुनिक तंत्रज्ञान, आवश्यक कच्चा माल इत्यादींच्या आयातीचा समावेश होतो. मुक्त व्यापाराअभावी ह्या देशांच्या विकास प्रक्रियेला खीळ बसते.

मुक्त व्यापारामुळे साधनसामुग्रीचा दुरुपयोग टाळून पर्याप्त वापर शक्य होतो.

सारांश, मुक्त व्यापार धोरण, उपभोक्ते, उत्पादक तसेच विविध देश ह्या सर्वांच्या दृष्टीने लाभदायक ठरते. सनातनवादी विचारवंतांनी शुध्द आर्थिक दृष्टीकोनातून ह्या धोरणाचा पुरस्कार केला.

संरक्षण धोरण ही सनातनवाद्यांचा मुक्त व्यापार धोरणांचे अंधानुकरण करण्याच्या प्रवृत्ती विरुध्द अडलेली प्रतिक्रिया होय.

आयात नियंत्रण आणि निर्यातवृध्दीसाठी सहेतूक केलेला कृत्रिम उपायांचा अवलंब म्हणजे संरक्षणनीती.

संरक्षण धोरणाच्या समर्थनार्थ केल्या जाणाऱ्या विविध युक्तीवादामध्ये हा सर्वात महत्वाचा प्रबळ आणि मूलभूत युक्तीवाद असून तो फ्रेडरीक लिस्टेन मांडला आहे.

सुरुवातीच्या काळात आयातबंधने आणि निर्यात प्रोत्साहन ह्याद्वारे अशा उद्योगांना संरक्षण देणे आवश्यक आणि समर्थनीय ठरते. अर्थात ह्या बाबतीत दोन पथ्ये पाळावयास हवी.

१) संरक्षण कायमस्वरुपी नसावे.

२) ज्यांचा विकास परकीय स्पर्धेमुळे थांबला आहे आणि ज्यांच्यात विकासाची क्षमता आहे अशा निवडक उद्योगानांच संरक्षण द्यावे.

विविध आणि विस्तृत औद्योगिकरणाच्या पायावरच समृध्द अर्थव्यवस्था उभी राहू शकते. काही निवडक उद्योगधंद्यांवर अवलंबून रहाणे स्थैर्याच्या दृष्टीकोनातून अयोग्य ठरते. ह्यामुळे अर्थव्यवस्थेत छोटसे प्रगतक्षेत्र आणि विशाल अप्रगत क्षेत्र असा औद्योगिक असमतोल निर्माण होतो. ह्या सर्वांवर संरक्षणनीती हा एकमेव उपाय ठरतो.

लोखंड, पोलाद, सिमेंट इत्यादी उद्योगांवर देशाचे औद्योगिकरण आधारीत असते. संरक्षणाच्या अभावी ह्या क्षेत्राचा विकास अशक्य असतो.

मुक्त व्यापार धोरणामुळे ह्या देशांचे कच्चा माल आणि इतर साधनसामुग्रीची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. देशांतर्गत औद्योगिकरणासाठी ही मूल्यवान सामुग्री देशाबाहेर जाणे इष्ट नसते. संरक्षणनीतीचा अवलंब करुन हा धोका टाळता येतो.

मुक्त व्यापार आणि संरक्षण ह्या धोरणांच्या फायदा, तोट्यांचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की या दोन पर्यायांमध्ये निवड करणे अवघड आहे.

अर्थव्यवस्थेच्या गरजा लक्षात घेऊन लवचिक धोरण स्विकारणे निश्चितपणे शक्य आहे. संरक्षण तात्पुरते तर मुक्तव्यापार दीर्घकालीन धोरण असावे.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत संरक्षण नीतीला महत्त्वपूर्ण स्थान आहे.

अविकसित राष्ट्रातील संरक्षण नीतीची भूमिका पुढील मुद्यांवरुन स्पष्ट होते. बालोद्योग, विकासाचे सामर्थ्य असलेली शेतीप्रधान अर्थव्यवस्था, परकीय चलनाची जपणूक, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, स्वयंपूर्णता, रोजगार निर्मिती, व्यापारशर्तीत आणि व्यवहारशेषात सुधारणा, औद्योगिक वाढ आणि विकास, नैसर्गिक साधनसामुग्रीचे जतन, उत्पन्न सारांश, अविकसित देशांचा आर्थिक विकास साधण्यासाठी संरक्षण नीती अपरिहार्य आहे.

''शिशूंचे लालनपालन करा, बालांचे रक्षण करा आणि प्रौढाना स्वातंत्र्य द्या''.

आपली प्रगती तपासा :

१. व्यापारनिती ही संकल्पना अभ्यासा.

२. व्यापारनितीचे विविध परिणाम कोणते ?

३. व्यापारनितीची व्युहरचना स्पष्ट करा.

४. विकसनशील देशाची व्यापारनीती आणि महत्त्व स्पष्ट करा.

१५.३ भारत आणि चीनमधील जागतिकरणाच्या समस्या आणि उपाय (Problems and prospects of Globalisation in India & China)

भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण (Globalisation of Indian Economy):

साल १९९१ मध्ये जागतिक बँकेकडून रचनाबदलात्मक कर्जसुविधेसाठी तयार केलेल्या नवीन आर्थिक धोरणात भारताने चार तत्त्वे अंगिकारली होती. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण ही तीन तत्त्वे तसेच राजकोषीय समतोल हे चवथे तत्त्व होते.

जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचा जगातील इतर देशांच्या अर्थव्यवस्थांशी दृढ संबंध निर्माण करणे होय. यासाठी आयात, परकीय भांडवल, परकीय संस्थांकडून मिळणारा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष वित्तपुरवठा, परदेशांशी सेवारुपी व्यवहार या सर्वांवरील नियंत्रणे काढणे, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत झाले. यामुळे देशाचे परकीय कर्जावरील अवलंबन कमी झाले आणि थेट परकीय गुंतवणूक आणि परकीय वित्तसंस्थांकडून प्रत्यक्ष कर्जे आणि भारतीय भांडवलबाजारात वित्तीय गुंतवणूक यांचे महत्व वाढले. जागतिकीकरणातून देशात परकीय व्यवसाय येवून बाजारातील स्पर्धा वाढेल आणि त्यामुळे देशातील व्यवसाय आधुनिक तंत्र वापरुन जास्त कार्यक्षम होतील हे देखिल अभिप्रेत होते. जागतिकीकरणाच्या माध्यमातून परदेशांशी व्यापार वाढेल आणि आयातीबरोबर निर्यात ही वाढेल अशी अपेक्षा होती, ती पूर्ण झाली.

खाजगीकरण म्हणजे खाजगी व्यवसाय क्षेत्राला जास्त वाव देणे असा होतो. स्वातंत्र्योत्तर काळात अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राला वाढता वाव मिळत गेला. जलद विकासाच्या दृष्टीने भांडवली वस्तूंचे उद्योग वाढणे आवश्यक होते, आणि त्यासाठी भरपूर भांडवलाची आवश्यकता होती. अशा उद्योगाकडे वळण्यास खाजगी क्षेत्र उत्सुक नसल्यानेच सरकारने ती जबाबदारी उचलली. सार्वजनिक क्षेत्राकडे भांडवल वळविले गेल्याने खाजगी क्षेत्राची वाढ खुंटली. कामगार व ग्राहक यांच्या हिताच्या दृष्टीने उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनातील उद्योजकांवर अनेक वैधानिक बंधने लागू करण्यात आली.

उदारीकरणाचा अर्थ व्यवसायांवरील नियंत्रणे कमी करणे असा होतो. जुन्या आर्थिक धोरणात ग्राहकांच्या संरक्षणासाठी किंमत नियंत्रण, परकीय चलनाच्या तुटवड्यामुळे लादलेले आयात नियंत्रण व परकीय चलननियंत्रण, समाजवादी विचारातून आलेले मक्तेदारीचे व औद्योगिक समूहांचे नियंत्रण, नवीन व्यवसायासाठी परवाने देण्याबाबत नियंत्रण अशी अनेक नियंत्रणे होती. यातून नियंत्रणे मोडणे आणि त्यासाठी लाचलुचपतीचा मार्ग वापरणे वाढले. उदारीकरणामुळे अनेक नियंत्रणे दूर

झाल्याने व्यवसायांची नैसर्गिक वाढ होईल, भ्रष्टाचार कमी होईल, ग्राहकांना निवड करण्याची संधी मिळेल आणि प्रशासनावरील ताण कमी होईल असे अभिप्रेत होते.

जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम (Impact of Globalization on Indian Economy):

जागतिकीकरणाच्या अपेक्षा रोजगारवृध्दी अशी होती. तथापि या धोरणाचा अनुकूल परिणाम रोजगारवृध्दी होण्यावर झालेला नाही. जागतिकीकरणाच्या धोरणामुळे भारतातील रोजगारावरील परिणाम पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. रोजगार आणि बेकारीवर परिणाम (Employment & Unemployment):

रोजगारवृध्दीदर १९९९-२००० मध्ये २.४८ टक्के इतका वाढला. १९९१ मध्ये नविन आर्थिक सुधारणा कार्यक्रमांतर्गत जागतिकीकरणाच्या धोरणामुळे एकूण रोजगार आणि बेकारीवर अनुकूल व प्रतिकूल परिणाम झाला. एकुण लोकसंख्यांच्या तुलनेत कामगारसंख्या १९९३-९४ मध्ये २.२८ टक्क्यावरुन २००४-०५ मध्ये २.८४ इतकी वाढली तर कार्यभाग कार्यशक्ती २.६१ टक्के १९९३-९४ मध्ये होती ती २००४-०५ मध्ये २.६२ टक्के इतकी अल्पप्रमाणात वाढली. त्यामुळे बेकारीत वाढ झाली. सार्वजनिक क्षेत्रातील रोजगारीचे प्रमाण घटल्यामुळे (२००४-०५ -उणे ०.७०) स्वेच्छानिवृत्ती कामगारांना घ्यावी लागली. तसेच शेती व उद्योगक्षेत्रातील रोजगाराचे प्रमाणही घटले. खाजगीक्षेत्रात रोजगारवाढ झाली असली तरी त्याचा फारसा सकारात्मक परिणाम आढळून आला नाही.

सेवाक्षेत्रात जागतिकीकरणाचा रोजगारावर थोडा अनुकूल परिणाम झाला आहे. सेवाक्षेत्रात हॉटेल, व्यापार, वाहतूक, दळणवळण संपर्कसाधने, बँकींग आणि माहिती तंत्रज्ञांन इत्यादी क्षेत्रात रोजगारसंधी वाढलेल्या असल्या तरी फक्त कुशल आणि उच्चशिक्षित व व्यावसायिक लोकांनाच वाव होता. थोडक्यात जागतिकीकरणाच्या धोरणाचा भारताच्या रोजगारक्षेत्रावर जास्त प्रमाणात प्रतिकूल परिणामच रोजगारवृध्दीपेक्षा बेकारी वाढण्यावर झाला.

२. सामाजिक परिणाम (Social Impact):

संस्कृती या संज्ञेमध्ये मूल्ये, परंपरा, सवयी, धर्म इत्यादी गोष्टी अंतर्भूत असून त्याचा परिणाम व्यक्तीच्या जीवनावर होतो. दुसऱ्या शब्दात लोकांच्या जीवनाचा एकूण मार्ग कल्पना आणि शिकण्याची सवय पिढ्यानपिढ्या ज्ञान वाटून शिकण्याची कला म्हणजे संस्कृती जागतिकीकरणातंर्गत संस्कृती विशिष्ट समाजापूरती मर्यादित न राहता माहितीतंत्रज्ञानाच्या विषयामुळे जलदगतीने समाजवार त्याचा परिणाम झाला आहे. मूल्ये शिक्षण, सवयी परंपरा आणि निरिक्षण यामध्ये तत्परतेने बदल होताना दिसून येत आहे.

३. ग्राहकवाद (Consumerism):

ग्राहकवाद किंवा ग्राहक चळवळ म्हणजे ग्राहकांच्या हित संरक्षणासाठी व त्यांच्या कल्याणासाठी सुरु केलेली चळवळ असे म्हणता येईल. उद्योगधंद्यांच्या विकासात ग्राहकाला एक 'राजा' म्हणून महत्वाचे स्थान आहे. परंतु प्रत्यक्षात विविध मार्गाने त्याची पिळवणूक करुन तो फसविला जातो. याला आळा घालण्यासाठी ग्राहकवाद महत्वाची आहे. जागतिकीकरणातंर्गत देशातील लोक दुसऱ्या देशातील लोकांचे राहणीमान अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. त्याचबरोबर परिश्रम, कौशल्य, आधुनिक शिक्षण यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात तर दुसऱ्या बाजूने आर्थिक सुबत्तीकरण, शिस्तबध्द जीवन, सामाजिक वर्तन, इतर धर्माबद्दल आदर व प्रेम तसेच इतर भाषा शिकण्याची आवड इत्यादी गोष्टी सकारात्मक होत जातात. निरोगी स्पर्धा, चांगल्या दर्जाचे जीवनमान सुधारण्यास वाव मिळाल्यामुळे देशाचा सर्वांगिन विकास घडून येण्यास मदत होते.

४. सामाजिक पैलू (Social Aspect):

संस्कृतीमुळे लोकांची आर्थिक आणि सामाजिक जीवन सुधारण्यास मदत होते. जागतिकीकरणामुळे समाजाचे परिवर्तन होण्यास मदत होते. देशातील तरुण वर्ग उच्चशिक्षित, आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यामुळे समाजाची नवी मूल्ये तत्परतेने आत्मसात करतात. भारतातील समाजात आज नवीन किंवा युवापिढी सामाजिक उपक्रम आणि सामाजिक साजरीकरण, व्हेलेंनटाईन डे, सौंदर्य स्पर्धा, कार्यक्रमांसाठी शुभेच्छापत्रे, पाश्चिमात्य पोशाख, बर्गर-पिझ्झा सारखे पाश्चिमात्य अन्नपदार्थ इत्यादी विविध मार्गाने होत असते. तसेच सामाजिक वर्तन जाहिरात, पाश्चिमात्य प्रभाव इत्यादी घटकांवर अनुकूल व प्रतिकूल परिणाम झाला आहे.

५. सकारात्मक परिणाम (Positive Impact):

जागतिकीकरणामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर काही अनुकूल किंवा सकारात्मक परिणाम ही झाल्याचे दिसते. जपानी लोकांसारखे भारतीय लोकही प्रामाणिक आणि कष्टाळू आहेत. समानता, समान कायदा, महिला सक्षमीकरण आणि मुक्ती इत्यादीमध्ये जागतिकीकरणामुळे सकारात्मक परिणाम झाला आहे. त्यामुळे पाश्चिमात्य देशांकडून काही फायदे व शिकायलाही मिळाले आहे. काही पाश्चिमात्य देशातील लोकांचा भारतातील लोकांच्या कुटुंबावर चांगला परिणाम पडला आहे. मुलांचे संगोपन आणि संरक्षण वडिलधाऱ्यांबद्दल आदर, आपल्या धर्माचा आदर यामुळे सुखी जीवन, शाकाहारी अन्न इत्यादी अशा सर्व गोष्टी स्विकारल्या जात आहेत. तथापि, दुर्देवाने जागतिकीकरणाच्या भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होत असला तरी काही परंपरावादी किंवा रुढीवादी लोक नव्याचा स्विकार करण्यास तयार नाहीत. ते जुन्याच रुढी, परंपरा आणि संस्कृतीला कवटाळले आहेत. जसे महिला सक्षमीकरण, अधिकार हक्क व स्वातंत्र्य समानता, आर्थिक व सामाजिक बदल इत्यादी. त्यामुळे आर्थिक व सामाजिक विकासात अडथळे निर्माण होतात. भारत हा

लोकशाहीप्रधान देश आहे. समाज उदार आणि मुक्त विचारांचा मानला तरी धर्म कालबाह्य व अर्थशून्य रुढी परंपरा मानणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे.

६) वास्तवता (The Reality):

भारत, ऐतिहासिक काळापासून खुप चांगल्या वाईट, योग्य-अयोग्य अशा गोष्टींचा अनुभव घेत आहे. आज या विरुध्द काय आहे? जागतिकीकरणामुळे जे आधुनिकीकरण झाले आहे ते मुक्तपणे आणि डोळसपणे स्विकारलेले ज्ञान नाही. यापाठीमागे भारताची संस्कृती आणि परंपरा आहे. उदा. लैंगिक शिक्षणाची जाहिरात, खेळणी, वृत्तपत्र याद्वारे होणारा प्रसार सहजतेने स्विकारला जात नाही. भारतात संस्कृती आणि परंपराप्रधान गोष्टींचा अभिमान आहे. तरीही प्रत्येक वेळी प्रत्येक संस्कृतीप्रधान गोष्ट योग्यच असते असे नव्हे. त्यामुळेच जागतिकीकरणामुळे कदाचित सकारात्मक बदल घडवून येण्यास मदत होइल. विविध देशांकडून, समाजाकडून सकारात्मक ते सकारात्मक संवाद साधत गेल्यास लोकांच्या आचार-विचारांमध्ये अनुकूल बदल होतील आणि हे आवश्यक आहे. भारताने काही आव्हाने आणि आवश्यक कारणांसाठी जागतिकीकरण स्विकारले आहे.

आपली प्रगती तपासा.

१. जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासा.

चिनचे जागतिकीकरण (Globalisation of China):

देंगक्सियो पिंग (Dengxiao Ping) यांच्या नेतृत्वाखाली चीनने १९७९ मध्ये जागतिकीकरणाची सुरुवात केली त्यापूर्वी, चीनचे चेअरमन माओ यांनी चीनमध्ये विविध आर्थिक प्रयोग केले होते. १९५८ मध्ये आर्थिक परिवर्तनासाठी प्रगतीच्या दृष्टीने झेप घेतली परंतु केवळ अनर्थ हाच पुरावा राहिला.

ऐतिहासिकदृष्ट्या चीनमध्ये विविध कालावधी जागतिकतेशी जोडलेली आहेत. हॅन डॅनेस्टी (Han Dynasty) यांच्या दरम्यान रेशिमद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्याला प्रोत्साहन दिले तर टँग डॅनेस्टी (Tang Dynest) यांनी रोमन या शहराशी व्यापार चालू केला.

चिनच्या अर्थव्यवस्थेत, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे काही प्रगतीशील महत्वाच्या घटना घडून आल्या त्या पुढीलप्रमाणे.

१९७८ - मुक्त व्यापाराला प्रोत्साहन.

१९७९ - परकिय गुंतवणूक, दक्षिणपूर्व - कॉस्ट आणि यँगसी (Yangzi river) नदी यासमवेत विशेष आर्थिक क्षेत्राची स्थापना (established special economic zones)

१९९० - शांघायमध्ये पहिले रोख्यांच्या खरेदी-विक्रीचे केंद्र (stock exchange).

२००१ - जागतिक व्यापार संघटनेत प्रवेश (WTO) औद्योगिकीकरणात सर्व उद्योगांबाबत उदारीकरणाचे धोरण स्विकारले.

२००३ - समाजवादी राज्यकर्त्यांची चौथी पिढी ह्यु जिंताओ आणि वेन जियाबो यांनी देश आणि अर्थव्यवस्थेची जबाबदारी घेतली.

२००५ - लवचिक आणि व्यवस्थापकीय विनिमय दरपध्दतीची सुरुवात (managed floating exchange rate system) अमेरिकेकडून तंत्रज्ञान आयात करण्यास परवानगी. बिगरजकात बंधने कमी करण्याची अंमलबजावणी (Reduction Non-Tariff Barriers).

चीनने साध्य केलेली महत्वकांक्षी ध्येये / उद्दिष्ट्ये (Achievement of China) :

१) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेदरम्यान चीनने अर्थव्यवस्थेत अनेक आर्थिक बदल झपाट्याने घडवून आणले. त्यामुळे अर्थव्यवस्थेत जलद गतीने सुधारणा होत होत्या. स्थुल देशांतर्गत उत्पादन दरात (GDP) भरीव वाढ झाली एका दशकात ४ अंकापेक्षाही वृध्दीदर गाठणे साध्य झाले.

२) वार्षिक ६० कोटी डॉलर्सपेक्षाही जास्त परकीय गुंतवणूक वाढली.

३) चीनच्या अर्थव्यवस्थेतील उद्योगक्षेत्र आधुनिकता, पेट्रोकेमीकल्स, सिलीकॉन वॉटरस्, डिजीटल डिसप्ले, ऑटोमोबाईल्स, स्टील, जहाजे आणि भांडवलीप्रधान वस्तू इत्यादीबाबत समर्थ किंवा कार्यक्षम झाले. जागतिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झाले.

४) पूर्वीपासूनच चीन बिनतारी संदेशचा (wireless phones) मोठा ग्राहक आहे. संपर्कसेवा, डिजीटल दूरदर्शन (Digital T.V.) आणि इतर अनेक वस्तुंसाठी चीनची बाजारपेठ विकसित आहे. चीनमध्ये जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाची कार बाजारपेठ (car market) आहे.

५) १ अब्ज डॉलर्स (अंदाजे) इतकी निर्यात २००८ मध्ये कारखानदारी देशांना केली होती. तर एकुण गारमेंटच्या अर्धी गारमेंटची आयात चीनच्या खात्यावर नोंदविली गेली आहे.

६) स्पर्धात्मक देशातील वस्तूच्या किंमतीच्या मानाने चीनच्या उत्पादन किंमतीत ३० टक्के ते ५० टक्के पेक्षाही कमी किंमत इतका फरक असल्यामुळे चीनच्या उत्पादनाला चीनकिंमत (China Price) या टोपणनावाने संबोधले जाते.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस गती देण्यासाठी उपाययोजना.

अ. परकिय गुंतवणूक आणि परकीय व्यापारावर नियंत्रणाची गरज.

ब. आर्थिक स्वातंत्र्याची भूमिका.

क. खाजगीक्षेत्र विकसित करणे, खाजगीक्षेत्राची कार्यक्षमता वाढवणे.

ड. अर्थव्यवस्थेला अधिक सक्षम बनविण्यासाठी राजकीय सुधारणांची गरज, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात स्वातंत्र्याच्या अभावामुळे समाजाला समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्या कमी करण्याच्या दृष्टीनी राजकीय सुधारणांची गरज.

इ. सामान्य लोकशाहीस (grassroot) उत्तेजन आणि प्रोत्साहनाची गरज, मानवीहक्क आणि उच्च वृध्दीदरातील दोष यातील सुधारणा.

ई. उदारीकरणाच्या प्रक्रियेस गती देणे, सखोल रचनात्मक बदल घडवून आणणे.

फ. भ्रष्टाचार ही एक भयंकर समस्या आहे. तिचे समूळ उच्चाटन करण्यासाठी काही ठोस उपाय योजणे.

चीन आणि भारत-चिंडीया (China & India - CHINDIA):

१९५०च्या सुमारास चीन आणि भारताने विकासाच्या प्रक्रियेस प्रारंभ केला. चेअरमन गाओ यांच्या नेतृत्वाखाली १९४९ मध्ये चीनला स्वातंत्र्य मिळाले आणि लवकरच आवश्यक अशा जमीनसुधारणा, सामुदायिक शेती अमलात आणली गेली. त्याच बरोबर शेतीक्षेत्रात बदल आणि चीनने देशाच्या आर्थिक विकासास प्रारंभ केला.

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. पंचवार्षिक योजनांतर्गत (five year plan) भारताने आर्थिक विकासाच्या प्रक्रियेस सुरुवात केली. सध्या भारताची १२वी पंचवार्षिक योजना २०१२ ते २०१७ या पाच वर्षाच्या काळात कार्यान्वित होईल.

चीन आणि भारत भौगोलिकदृष्ट्या आणि लोकसंख्येच्यादृष्टीने मोठे देश आहेत. जगातील लोकसंख्येच्या आकारमानात चीन आणि भारत अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या क्रमांकावर आहेत. भौगोलिकदृष्ट्या आणि लोकसंख्येच्या बाबतीत दोन्ही देश सारखेच असले तरी राजकीय अवस्था किंवा प्रणाली दोन्ही देशात अगदी भिन्न आहे. भारताने लोकशाहीपध्दतीचा पुरस्कार केला आणि जगातील भारत हे एक मोठे लोकशाहीप्रधान राष्ट्र आहे. त्याशिवाय लोकशाही तत्वानुसार लोककल्याणकारी संस्था

आणि परंपराही स्थापन केल्या आहेत. दुसऱ्या शब्दात चीनने हुकूमशाही पध्दती स्विकारल्याने तेथे आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य नाही. जागतिकीकरणातंर्गत, आर्थिक उदारीकरणाची प्रगतीशीर ओळख होत आहे. लोकांकडून राजकीय स्वातंत्र्याचा ही अनुभव घेतला जात आहे.

२०व्या शतकाच्या अखेरीस दोन्ही देश एक उत्तम उदाहरण म्हणून विकसनशील देशातील दारिद्रय, अविकसितपणा, मागासलेपणा ह्या संकल्पना स्पष्ट करण्यासाठी चीन आणि भारत ओळखले जातात. २१व्या शतकात दोन्ही देशांमध्ये बाजारी अर्थव्यवस्था निर्माण होईल आणि भविष्यात एक आर्थिक महासत्ता बनतील असा विचार केला जातो. काही अर्थतज्ञानी भविष्यात चीन हे नंबर १ चे आर्थिक महासत्ता राष्ट्र होईल असे भाकित केले आहे तर काही अर्थतज्ञांना भारत हा आर्थिक महासत्ता असलेला देश असेल अशी आशा वाटते.

दोन्ही देश दारिद्रय, बेकारी, भ्रष्टाचार, कमी उत्पादकता, नैतिक आणि धार्मिक संघर्ष अशा आर्थिक व सामाजिक समस्यांना तोंड देत आहेत. भारतात धर्म आणि जातीच्या समस्यांची भर आहे.

सध्या, चीन हा कारखानदारीक्षेत्रात भारताच्यापुढे आहे. भारताने सेवाक्षेत्रात चांगली कामगिरी केली आहे. कुशल श्रमशक्ती आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व यामुळे विशेषतः माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. त्यामुळे भारताला सेवाक्षेत्र फायद्याचे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारताला अणुऊर्जा (हायड्रोजन बॉंब) विक्री करण्यास मिळाले आहे.

चीन-भारत सहकार्य (Co-operation - China & India):

अनेक राजकीय नेत्यांकडून आणि अर्थतज्ञांकडून असे सूचविले जाते की चीन आणि भारत या दोन बलाढ्य देशांमध्ये स्पर्धा न राहता (म्हणजेच जेव्हा प्रत्येक गोष्टीची तपासणी चीन विरुध्द भारत) सहकार्याच्या प्रेरणेने दोन्ही देशांनी एकत्रितपणे देशाची प्रगती करावी असे सुचविले जाते. यामुळे या दोन्ही देशांना फायदेशीर होईलच याशिवाय जगातील त्यांच्या शेजारी राष्ट्रांनाही चीन आणि भारत यांच्यातील सहकार्य फायद्याचे ठरेल. स्पर्धात्मक प्रेरणेने दोन्ही देश परस्परपुरक होऊ शकतील.

जागतिक अर्थव्यवस्थेत भारत आणि चीन या दोन्ही देशांना महत्व आहे. हे २००५च्या (August 22, 2005), बिजनेस विक (Business Week) मधिल 'चीन आणि भारत' (China and India : what you need to know.) या मथळयाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

आर्थिकदृष्ट्या चीन आणि भारत हे दोन देश गरिब असले तरीही संधीसाधूपणा, भिती दरारा यांचे मिश्रण होते. जपान आणि दक्षिण कोरियामध्ये युध्दानंतरच्या कालखंडात अनेक आर्थिक चमत्कार घडून आले. परंतु उद्योगक्षेत्राच्या

खेळातील जगभरातील बदल नुसत्या पुरेशा लोकसंख्येच्या बळावर स्विकारता येणे शक्य नाही. २१व्या शतकाच्या जागतिक अर्थव्यवस्थेत चीन आणि भारत या गतीमान अशा दोन महान सत्ता आहेत. त्यामुळे भविष्यात काही बाबतीत (आयात-निर्यात, उत्पादकता इ.) अमेरिकेलाही ह्या दोन देशांशी स्पर्धा स्विकारावी लागेल.

तक्ता क्र. १५.३. जागतिकीकरणातंर्गत चीन व भारत या देशातील आर्थिक व सामाजिक निर्देशक.

अ.क्र.	निर्देशक	देश	वर्ष / कालावधी	
			१९९०	२००५
१	मानवी विकास निर्देशांक श्रेणी	चीन	१०८ (१९९४)	८१
		भारत	१३८ (१९९४)	१२८
२	मानवी विकास निर्देशांक प्रवृत्ती	चीन	०.६३४	०.७७७
		भारत	०.५२१	०.६१९
३	लोकसंख्या (लाखामध्ये)	चीन	९२७.८(१९७५)	१३१३.०
		भारत	६१३.८(१९७५)	११३४.४
४	आरोग्य रक्षणार्थ लोकसंख्या आकडेवारी (टक्यांमध्ये)	चीन	२३	४४(२००४)
		भारत	१४	३३(२००४)
५	आयुष्यमान निर्देशांक (वर्षे)	चीन	६३.२ (७०.७५)	७२.०
		भारत	५०.७ (७०.७५)	६२.९
६	शिक्षणावरील सार्वजनिक खर्च (GDP च्या टक्केवारीत)	चीन	२.२(१९९१)	१.९ (२००४-०५)
		भारत	३.७(१९९१)	३.८ (२००४-०५)
७	प्रौढ साक्षरता दर (१५ वर्षापेक्षा वरील लोक-टक्केवारीमध्ये)	चीन	७७.८ (१९८५-९४)	९०.९(२००५)
		भारत	४८.२ (१९८५-९४)	६१.०(२००६)
८	आंतरजाल(Internet)वापरणाऱ्या लोकांची संख्या १०००लोकसंख्या पाठीमागे	चीन	०.०	८५
		भारत	०.०	५५

९	स्थुल देशांतर्गत उत्पादन (डॉलरमध्ये)	चीन	२६०४(१९९४)	६७५७
	(व्यक्तिगत)	भारत	१३४८(१९९४)	३७७९
१०	व्यापार-निर्यात (टक्क्यामध्ये) (प्राथमिक वस्तू)	चीन	२७	८
		भारत	२८	२९
११	व्यापार-निर्यात (टक्केवारी) (कारखाणदारी वस्तू)	चीन	७२	९२
		भारत	७०	७०
१२	लिंगदर्शक विकास निर्देशांक (GDI)(Gender Related Development Index)	चीन	-	७३
		भारत	-	११३

स्त्रोत - व्यापार व वित्ताचे अर्थशास्त्र - २००९ (पान क्र. ३२२ आणि ३२३)

वरील तक्ता क्रमांक १५.३ मध्ये चीन आणि भारत या दोन विकसनशील देशातील आर्थिक आणि सामाजिक निर्देशांक मानवी विकास अहवाला (२००७-०८)तील माहितीवरुन दिलेले आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतंर्गत चीन आणि भारत यांनी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वांगीन विकासाच्या दृष्टीने प्रगती साध्य केली असली तरी भारताच्या तुलनेत चीनने जास्त प्रगती साध्य केली आहे. म्हणून भविष्यात एक आर्थिक महासत्ता व्हायचे असेल तर भारताने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा लाभ घेऊन आर्थिक व सामाजिक प्रगती साध्य करणे जरुरीचे आहे.

आपली प्रगती तपासा :

१ चीनचे जागतिकीकरण यावर टिप लिहा.

२ जागतिकीकरण : चीन आणि भारत थोडक्यात स्पष्ट करा.

१५.४ सारांश

१) परकीय व्यापार देशाला अनुकूल होण्यासाठी आयात-निर्यातीचे जे धोरण आखले जाते त्याला व्यापारनिधी असे म्हणतात.

२) व्यापारी व्युहरचना म्हणजे आयात पर्यायीकरण आणि निर्यात प्रोत्साहन याविषयी असलेले धोरण किंवा रचना होय. व्यापारी व्युहरचना आणि व्यापारनितीमुळे देशाच्या परकीय व्यापारात वृध्दी होते तसेच देशाचा व्यवहारतोल सुधारण्यास मदत होते.

३) मुक्त व्यापारी धोरण आाणि संरक्षण व्यापारी धोरण याचे काही फायदे तोटे आहेत म्हणून देशाने व्यापारी व्युहरचना देशाची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती कशी आहे यावरुन ठरवावी.

४) जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेला जगातील इतर देशांच्या अर्थव्यवस्थेशी जोडणे किंवा दृढ संबंध निर्माण करणे होय.

५) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा भारताने १९९१ च्या नविन आर्थिक सुधारणा धोरणातंर्गत प्रारंभ केला. भारताच्या अर्थव्यवस्थेवर त्याचे चांगले-वाईट असे परिणाम झाल्याचे दिसून येते.

६) चीनने जागतिकीकरणाचा स्विकार १९७९ मध्ये केला. चीनच्या अर्थव्यवस्थेवरही जागतिकीकरणाचे प्रतिसाद उमटले आहेत.

७) चीनच्या विकसनशील देशाने जागतिकीकरणातंर्गत आर्थिक विकासाची अनेक ध्येय साध्य केली आहेत.

८) चीन आणि भारत ही दोन्ही राष्ट्रे विकसनशील आहेत. त्याचबरोबर भौगोलिक व लोकसंख्येच्या दृष्टीने समान आहेत. तरीसुध्दा दोन्ही देशात राजकीय प्रणाली अगदी भिन्न आहे. भारतात लोकशाही तर चीनमध्ये हुकूमशाही राज्यपध्दती असून तेथे आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य नाही.

९) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा चीन व भारत या दोन्ही देशांनी पुरस्कार केला आहे. दोन्ही देशांनी आर्थिक विकासाच्या दृष्टीने अर्थव्यवस्थेत काही रचनात्मक बदल घडवून आणले आहेत. त्यामुळे अर्थतज्ञाच्या मते हे दोन्ही देश सहकार्याच्या भावनेने एकत्र राहिले तर भविष्यकाळात आर्थिक महासत्ता बनू शकतात.

१०) भारत आणि चीनने जागतिकीकरणाची सुरुवात केल्यानंतर अर्थव्यवस्थेतील आर्थिक व सामाजिक निर्देशांक सुधारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. तथापि चीन आर्थिक विकासाच्या बाबतीत भारताच्यापुढे आहे हे मान्य करावे लागेल.

११) जागतिकीकरणानंतर चीन कारखानदारी क्षेत्रात अग्रेसर आहे तर भारताने सेवाक्षेत्रात विशेषत: माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात (Information Technology) चांगली कामगिरी केली आहे. भारताचे सेवाक्षेत्र विशेषत: माहिती तंत्रज्ञान क्षेत्र अत्यंत क्रांत आहे. तसेच दळणवळण आणि संपर्कसाधानांमधील मोबाईल मार्केटही विकसित आहे. भारतामध्ये जागतिकीकरणानंतर मोबाईल बाजारपेठ मोठ्या प्रमाणात विस्तारलेली दिसून येते.

१५.५ शब्दकोश

१. Strategic Trade Policy - व्यापाराची व्युहरचना, व्यापाराचे आयात, निर्यात विषयक धोरण कि जे देशाच्या अर्थव्यवस्थेस अनुकूल राहील.

२. Free Trade Policy - मुक्त व्यापारी धोरण (आंतरराष्ट्रीय व्यापारात वस्तु व सेवांच्या देवाण-घेवाणीच्या मुक्तपणे होणाऱ्या हालचाली.

३. Protection Trade Policy - संरक्षित व्यापारी धोरण देशी उद्योगांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने ठरविलेले आयात-निर्यात धोरण सध्या संरक्षित व्यापारी धोरणच योग्य असल्याचे मानले जाते.

४. Globalisation - जागतिकीकरण, व्यापारासंदर्भात देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थ व्यवस्थेशी जोडणे.

५. CHINDIA - चिंडीया - चीन व भारत ही दोन्ही राष्ट्रे भौगोलिक व लोकसंख्यादृष्टीने समान असल्यामुळे तसेच विकसनशील असल्यामुळे जागतिकीकरणातंर्गत व्यापाराच्या संदर्भात दोन्ही देश एकत्रित जोडले गेल्यामुळे त्यांना चिंडीया (China & India) असे संबोधले जाते.

६. China Price - चायना किंमत चीनमध्ये चीनच्या उत्पादन वस्तुची किंमत इतर देशातील वस्तुंपेक्षा कमी असल्यामुळे त्याला चायना किंमत असे टोपननावाने ओळखले जाते.

१५.७ प्रश्नावली

१. चीन आणि भारतातील जागतिकीकरणाच्या प्रगती आणि प्रक्रियेची चर्चा करा (एप्रिल २००९).

२. चीन आणि भारतातील जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील तुलना आणि परस्परविरोध (फरक) स्पष्ट करा (ऑक्टोबर २००९).

३. चीन आणि भारतातील जागतिकीकरणाच्या अपेक्षांची चर्चा करा (एप्रिल २०१०).

४. व्यापार व्युहरचनेच्या धोरणाचे महत्व विश्लेषण करा.

५. चीन आणि भारतातील उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची तुलना करा (एप्रिल २०११)

६. व्यापारी व्युहरचना - टिप लिहा.

७. व्यापारी धोरणाची व्यूहरचना म्हणजे काय? विकसनशील देशातील महत्व विश्लेषण करा (ऑक्टोबर २००९).

८. व्यापारी धोरणाच्या व्युहरचनेचे महत्व स्पष्ट करा (एप्रिल २०११).

*****

अनुक्रमणिका

घटक क्र.	पाठाचे नाव	पान नं.
प्रकरण - १		
१	विदेशी व्यापार गुणक (Foreign Trade Multiplie)	१
२	आंतरिक आणि बाह्य संतूलन (Internal and External Balance)	१२
प्रकरण - २		
३	आर्थिक एकात्मीकरण - I	२९
४	आर्थिक एकात्मीकरण - II	४६
प्रकरण - ३		
५	GATT आणि उरुग्वे फेरी	५६
६	जागतिक व्यापार संघटना (World Trade Organisation WTO)	६९
प्रकरण - ४		
७	विदेशी विनिमय बाजार (Foreign Exchange Market)	८३
८	चलनाची परिवर्तनियता (Currency Convertibility)	१०९
प्रकरण - ५		
९	आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि भांडवली प्रवाह (International Monetory Fund & Capital Flows)	१३०
प्रकरण - ६		

१० चलनबाजार (Currency Market) १५०

११ चलनक्षेत्र (Currency Areas) १५७

प्रकरण - ७

१२ जागतिक वित्तव्यवस्थेतील वादविवाद [Emerging Issues in Global Finance] १६३

१३ आंतरराष्ट्रीय कर्जे (International Debt) १७१

प्रकरण - ८

१४ जागतिक व्यापारातील वादविवाद (Emerging Issues in Global Trade) १८५

१५ व्यापारनीतीची व्यूहरचना आणि परिणाम (Strategic Trade Policy & It's Implications) १९५

♦ ♦ ♦

डॉ. राजन वेळूकर
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. धनेश्वर हरिचंदन
प्राध्यापक-नि-संचालक,
दूर व मुक्त शिक्षण संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

प्रकल्प समन्वयक आणि संपादक : **प्रा. राजश्री पंडित**
साहाय्यक प्राध्यापक आणि सहाय्यक संचालक, दूर व मुक्त शिक्षण संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

अभ्यास लेखक : **डॉ. सौ. मुक्ता अनिल पोटे**
भारतीय विद्या भवन्स महाविद्यालय,
अंधेरी (प.) मुंबई - ४०००५८.

डॉ. सौ. मंजुश्री विलास बोबडे
रयतशिक्षण संस्थेचे भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, औंध, पुणे, ४११०२७.

प्रा. निलेश म्हात्रे
साकेत महाविद्यालय,
कल्याण.

एप्रील २०१२, एम. कॉम (भाग-१), जागतिक व्यापार व वित्ताचे अर्थशास्त्र.

प्रकाशक : प्राध्यापक-नि-संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

अक्षरजुळणी : वरदा ऑफसेट आणि टाईपसेटर्स
अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५८.

मुद्रण :

वाणिज्य शाखेचा उच्च पदविका अभ्यासक्रम भाग-१

(M.Com Part-I)

अभ्यासक्रम

(जागतिक व्यापार व वित्ताचे अर्थशास्त्र)

(जून २००९-१० च्या सुधारित अभ्यासक्रमानुसार आय. डी ओ. एल च्या विद्यार्थ्यांसाठी.)

प्रकरण १ - व्यवहारतोल समायोजन

विदेशी व्यापारी गुणक आणि विदेशी प्रतिक्रिया (प्रतिफलीत) - व्यवहारतोल आणि संमिश्र धोरण- व्यवहारतोल संतुलनात मौद्रिक व वित्तीय धोरणाची भूमिका- अंतर्गत व बाह्य संतुलन प्रतिमान, (मीडस चे प्रतिमान, मुंडेल फ्लेमिंग प्रतिमान)

प्रकरण २ - आर्थिक एकात्मीकरण

आर्थिक एकात्मीकरणाचे प्रकार,(EU, NAFTA, APEC व ASEAN) - सार्क -(SAARC), प्रादेशिकवाद व्यापारवाद विरूद्ध बहुपक्षिय व्यापारवाद.

प्रकरण ३ - विश्वव्यापार संघटना आणि जागतिक अर्थव्यवस्था

विकसनशील राष्ट्रे आणि WTO कराराची अंमलबजावणी - वादनिवारण यंत्रणा- ,WTO च्या भूमिकेचे टिकात्मक परिक्षण.

प्रकरण ४ - परकिय विनिमय बाजारपेठ

लवचिक विनिमय दर- तत्काळ आणि वायदा विनिमय दर- विनिमय दर- व्याजदर अंतरपणन - चलन परिवर्तनियता - राखिव विदेशी विनिमयाचे महत्त्व - विनिमय दर धोके- जागतिक विदेशी विनिमय बाजार जोडणी.

प्रकरण ५ - आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि भांडवली प्रवाह

१९९० पासूनची आंतरराष्ट्रीय रोखतेच्या संदर्भातील आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची बदलती भूमिका आणि टिकात्मक मूल्यांकन - आंतरराष्ट्रीय भांडवली हालचाली- रोखाडपी गुंतवणुकीचा आंतरराष्ट्रीय प्रवाह भूमिका व परिणाम - परकीय भांडवल व विकास - भांडवली प्रवाह व बचतीचा उदय.

प्रकरण ६ - चलन बाजार

युरो चलन, स्वरूप आणि वैशिष्ट्ये, युरो समभाग आणि युरो कर्जरोखे बाजार- चलनक्षेत्र सामाईक चलन आणि युरोपियन मौद्रिक संघटना- युरोपियन संघटनेच्या संदर्भातील आंतरराष्ट्रीय वित्तीय एकात्मीकरण

प्रकरण ७ - जागतिक वित्त व्यवस्थेमधील वादविवाद

जागतिक वित्तरचनेचा उदय-आंतरराष्ट्रीय कर्जाच्या समस्या आणि जागतिक बँकेची भूमिका - आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रस्थान न्युयॉर्क आणि सिंगापूर.

प्रकरण ८ - जागतिक व्यापारातील वादविवाद

जकाती आणि बिगर काळात बंधने - नविन संरक्षणवाद - व्यापार नीतीची व्युहरचना आणि परिणाम - भारत आणि चीनमधील जागतिकीकरणाच्या समस्या आणि अपेक्षा.

♦ ♦ ♦

संदर्भसूची

१. प्रा. कदम, प्रा. दातीर, प्रा. खोमटे, प्रा. उशीर,''आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र '', निराली प्रकाशन, पुणे.

२. प्रा. गोखले, प्रा.भिडे, प्रा. पाठक, ''प्रगत आर्थिक सिध्दांत '', विपुल प्रकाशन, मुंबई.

३. प्रा. शशीकांत हरी अद्रावलकर, ''आर्थिक संकल्पना, डायमंड प्रकाशन, पुणे.

४. एन. बी. कुलकर्णी,''नेट-सेट मार्गदर्शिका'', बिना प्रकाशन, नाशिक.

५. प्रा. यशवंत रारावीकर, प्रा. गोडबोले आणि प्रा. जॉन्सन बोर्जेस, अर्थशास्त्रकोश, डायमंड प्रकाशन, पुणे.

६. हेमराज सिंग, आर गुप्ता, अर्थशास्त्रकोष, रमेश पब्लीशिंग हाऊस, न्यु दिल्ली.

७. डॉ. शं. के. मोडक ''आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र'' विद्या प्रकाशन, नागपूर.

८. प्रा. देशपांडे, ''राजस्व आणि आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र'' चेतना प्रकाशन, मुंबई.

READING LIST:

1. International Economics 1995, H.G.Mannur, Vikas.
2. Managing the Global Economy, Michie and Smith, Oxford Univ. Press 1995.
3. International Economics, Dominic Salvatore, John Wiley, 2001.
4. Handbook of International 2000 Economics, Jones R.W. and P.B. Kenen, Cambridge Univ. Press,
5. Open Economy macro Economics, Dornbush R., Tata Mcgraw Hill, 1998.
6. Strategic Trade Policy and the New International Economics (International Economics : Theory and Practice), Krugman PD, Addision Welsey, 2000.
7. WTO and Developing Countries, Surendra Bhandari, Deep and Deep 1998.
8. Foreign Trade Theory and Practice, Velayudhan TK, Wheeler, 1998
9. International Finance, Avadharu, Himalaya, 1998.
10. International Economics, J. Kindleberger, Irwin, 1968.
11. International Economics, T. Ellsworth, McMillan, 1969.
12. International Economics, Bo Sodersten, McMillan, 1994.
13. International Business, Anant K. Sundaram, Prentice Hall, 2000.
14. Environment of India, Stewart Black.
15. International Business, Michael r Czinkota and Others, Dryden Press 1968 .

♦ ♦ ♦

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

(Question Paper Pattern)}

सूचना : १. कोणतेही पाच प्रश्न सोडवा.
२. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

प्र.१	अ	.....१०	प्रकरण १
	ब	.....१०	
प्र.२	अ	.....१०	प्रकरण २
	ब	.....१०	
प्र.३	अ	.....१०	प्रकरण ३
	ब	.....१०	
प्र.४	अ	.....१०	प्रकरण ४
	ब	.....१०	
प्र.५	अ	.....१०	प्रकरण ५
	ब	.....१०	
प्र.६	अ	.....१०	प्रकरण ६
	ब	.....१०	
प्र.७	अ	.....१०	प्रकरण ७
	ब	.....१०	
प्र.८	अ	.....१०	प्रकरण ८
	ब	.....१०	

टीप : काही वेळा २० गुणांचा सलग एकच प्रश्न विचारला जातो. म्हणून विद्यार्थ्यांनी मागिल दोन-तीन वर्षाच्या प्रश्नपत्रिकेचा अभ्यास करावा. म्हणजे प्रश्न कसा विचारला जाईल हे लक्षात येईल.

♦ ♦ ♦